# जी.ए.कुलकर्णी

## जी ए कुलकर्णी यांच्या १६ कथांवरील चर्चा- भाग -५




प्रवासी ( रमलखुणा )
प्रसाद ( सांजशकुन )
प्रॉमिथ्यूस ( सांजशकुन )
फुंका ( पिंगळावेळ )
बळी ( पारवा )
बाधा ( हिरवेरावे )
भिंत ( सांजशकुन )
भेट (सांजशकुन)
भेट ( पारवा )
भोवरा ( काजळमाया )
माकडाचे काय; माणसाचे काय?(हिरवेरावे)
माघारा ( रक्तचंदन )
माणूस नावाचा बेटा ( हिरवेरावे )
मुक्ती ( पिंगळावेळ )
मुखवटा ( निळासावळा )

# जीए कथास्वाद

## भाग ५

# जीए कथास्वाद ५

## जी ए कुलकर्णी यांच्या कथांवरील चर्चांचे संकलन

## संकलन व संपादन- सुनीळ सामंत


## ई प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

9987737237



या पुस्तकातील सर्व लेखनाचे व चित्रांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे व चित्रकारांकडे आहेत. पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# जीए कथास्वाद ५

प्रवासी ( रमलखुणा )
प्रसाद ( सांजशकुन )
प्रॉमिथ्यूस ( सांजशकुन )
फुंका ( पिंगळावेळ )
बळी ( पारवा )
बाधा ( हिरवेरावे )
भिंत ( सांजशकुन )
भेट (सांजशकुन)
भेट ( पारवा )
भोवरा ( काजळमाया )
माकडाचे काय; माणसाचे काय?(हिरवेरावे)
माघारा ( रक्तचंदन )
माणूस नावाचा बेटा ( हिरवेरावे )
मुक्ती ( पिंगळावेळ )
मुखवटा ( निळासावळा )

# प्रास्ताविक

मराठीतील सर्वोच्च कथालेखकांमध्ये ज्यांचे नांव अग्रक्रमाने घ्यावे अशा श्री जी ए कुलकर्णी यांच्या शताब्दीचे वर्ष २०२२-२०२३. या वर्षाचे सार्थक व्हावे या हेतूने जीएंच्या कथांचे प्रेमी एकत्र येऊन त्यांनी एकावेळी फक्त एक कथा घेऊन त्यावर जमेल तितकी सखोल चर्चा करून, त्या कथेतून काय मिळाले ते सांगण्याचा प्रयत्न केला. जीए यांची कथा लोलकासारखी प्रत्येकाला वेगळा प्रकाश, वेगळा रंग दाखवते. हिऱ्यासारखे जीएंच्या कथेला अनेक पैलू असतात आणि वेगवेगळया वाचकांना त्यातले वेगवेगळे पैलू दिसतात.

चौघांनी आपल्याकडचा एक एक रुपया दिला आणि त्यातून एक एक रुपया घेतला, तर प्रत्येकाकडे एकच रुपया रहातो. पण प्रत्येकाने एक एक विचार दिला तर चौघांकडे चार चार विचार जमा होतात. विचारांच्या या शिस्तबद्ध पण मुक्त देवाणघेवाणी मुळे ही चर्चा अत्यंत आनंदमय झाली. होते आहे. या चर्चेत इतरांनाही आनंद घेता यावा यासाठी हा संकलित पुस्तकप्रपंच.

- संकलक- सुनीळ सामंत(9869674820)

# चर्चेतील सहभागी व्यक्ती

आशा भागवत
अतुल ठाकूर
अभयकुमार कुलकर्णी
अलका तडकलकर
अशोक पाटील
उमेश तुपे
कस्तुरी महेश
जयश्री जंगले
माधव पुराणिक
दिलिप बडे
नागेश कुलकर्णी
नितीन वैद्य
निशा क्षिरे
परमजीत सिंग
प्रदिप कुलकर्णी
प्रमोद कुलकर्णी
प्राची बापट
मंजिरी देशमुख
मनमोहन आंबेकर
महेश आफळे
मिलिंद सकपाळ
मिहीर ठकार

यतीन गुळवणी
राजेश उनवणे
राम कुलकर्णी
लक्ष्मीकांत देशपांडे
लखन दगडे
वंदना बोकील
वर्षा हळबे
विलास वाघोलीकर
विशाखा आपटे
विशाखादत्त
विश्वेश्वर नांदेडकर
वैभव कुलकर्णी
शिवाजी कुऱ्हाडे
श्रीकांत देशमुख
संजीव कुलकर्णी
साधना डोंगरे
सुनीळ सामंत
सुमन महामुनी
स्नेहल बोकील
हेमंत खडके
पुरुषोत्तम मोने
मेघा महाजन

# प्रवासी कथा' - रमलखुणा - - जी ए कुलकर्णी

विलास वाघोलीकर: 'प्रवासी कथा' - पुस्तक रमलखुणा - लेखक - जी ए कुलकर्णी

विवेचक - विलास वाघोलीकर

1)रमलखुणा पुस्तकात ,प्रवासी व इस्किलार या दोन दीर्घकथा आहेत. जी एंच्या तशा, स्वामी -ऑर्फियस - विदूषक, या दीर्घ कथा म्हणता येतील. पण रमलखुणातील या दोन कथा, लघुकादंबरी वाटाव्यात अशा , अनेक पात्रांच्या , अनेक प्रसंगांच्या, एक दिशा असलेल्या व दीर्घ ,लक्षणीय आहेत.

वाचकाला 'प्रवासी' कथा, पौराणिक - ऐतिहासीक वातावरणात नेते. शापित नगर - त्यातील( बकासूराच्या कथेप्रमाणे) राक्षस ,त्यांचा कारभार ,अटी , जंगल ,देऊळ ,रत्न ,वाडा ,आरसे महाल इ. सर्व एखाद्या गतीमान चित्रपटाची आठवण करून देतात.

2)- कथानक - येथे कथानक मोठे आहे. व मूळातून वाचले पाहिजे. नावीक प्रवाशाला सांगतो की ,नदी पलिकडे देवीच्या मुकुटात अमूल्य रत्न आहे. प्रवासी त्रिविधगुणयुक्त( सत्व, रज, तम या गुणांनी युक्त)माणूस आहे.त्याला ते रत्न

चोरण्याचा मोह होतो.( हा प्रवासी लहानपणी अनाथ झाला व मोठ्या वाड्यात आश्रीतासारखा राहीला होता - पान 50) प्रवासी देवळात जातो व तेथे तोडफोड करून रत्न काढतो. त्यातून साप निघतो. प्रवासी धीराचा आहे. तो सापाला मारतो. बाहेर येतो. तर देऊळ भग्न होते. तेथे रक्षक - दंडक - न्यायमूर्ती -वधक अशी एकच व्यक्ती ,त्याला पकडते. पण प्रवासी त्याच्या तावडीतून झटापटीने सुटतो.

3)- येथे जी ए ,अतिउदारमतवादी विचारसरणीच्या न्याय -पद्धतीवर उपरोधीक टीका करतात. निर्दोषाला शिक्षा होवू नये ,या अतिरेकी विचारसरणीन , दहापैकी नऊ गुन्हेगार सुटून ते समाजाला वेठीला धरतात. हे जळजळीत वास्तव ,ते येथे दाखवतात.

4)- नंतर भीषण रात्र होते. प्रवाशाला भूक लागल्याने तो जाळाच्या दिशेने जातो. ते स्मशान असते. व प्रेतावर अन्नाचे गोळे भाजून खाणारा बैरागी तेथे असतो.

-(वाक्य - गाव किती दूर आहे याचा शोध घेत मी जन्म घालवला. पण मला बोध झाला नाही.)

- 5)- बैरागी त्याला गोष्टी सांगतो. या कथा तर्कशास्त्रातील इन्व्हर्शन पद्धतीच्या , मूळ कथांवर वेगळा प्रकाश टाकणाऱ्या आहेत. मानवी जीवन एकाच साच्यात टाकू नये. ते इतके अनंत आहे की ,एका चौकटीत जीवनाकडे पाहणे योग्य नाही. नदीकाठचा धर्म वाळवंटात उपयोगी नसतो. हा इतरत्र अनेकदा मांडलेला मुद्दा ,येथे कथांच्या अनेक रूपांनी दाखवला आहे. त्यावेळी जी ए लिहितात -

"....कथा नवी आहे की जुनी आहे? तिला काही अर्थ आहे का? " फारशी उत्सुकता न दाखवता प्रवाशाने पडल्यापडल्या विचारले.

"हे बघ, कथा काय आहे हे सांगणाऱ्याइतकंच ऐकणाऱ्यावरही अवलंबून असतं.

आणि अर्थाविषयी म्हणशील तर सगळ्याच कथा अर्थपूर्ण असतात किंवा अगदी वेडगळ, अर्थहीन असतात. ऐकून तरी बघ."

यावर प्रवासी काही बोलला नाही, पण बैरागी सांगू लागला :

एकदा एक पर्वत उद्यानात फिरत होता. तेव्हा एक शिळा पाण्याच्या काठी पडून आपले रूप न्याहाळत होती. पर्वत जवळ आला तरी ती उठून बसली नाही.

तेव्हा पर्वताला या अनादराचा संताप आला व त्याने शिळेला शाप दिला, 'तू मानवी स्त्री होशील !'

हा शाप किती दारुण आहे याची शिळेला कल्पना होती. प्रत्येक शिळेत एक मूर्ती दडलेही असते. जिच्यावर ऊन-पाऊस, यौवन-जरा यांचा यत्किंचितही परिणाम होणार नाही, अशी एक असामान्य सौंदर्याची मुद्रा असते. उलट, स्त्री होणं

म्हणजे क्षणिक विकारावर गवताच्या काडीप्रमाणे हलणं, काळाच्या टाकीचे घाव सहन करत कुरूप, जराग्रस्त होणं, दुर्गंधरसाचे स्थान होणं ! ती पश्चात्तापानं

पित्याला शरण गेली तेव्हा. त्याने तिला उःशाप दिला, "तुला एका राजपुत्राचा पदस्पर्श होईल तेव्हा तू मुक्त होशील."

" ती एका सुंदर स्त्रीच्या स्वरूपात रानात राहू लागली. तेव्हा एक शबरी तिची दासी होती. एक दिवस दासीने बातमी आणली की, एक राजपुत्र त्या

मार्गाने येत आहे. तिनं रानफुलं गोळा केली व ती राजपुत्राच्या पायावर ठेवून त्यावर डोकं टेकलं. त्या पावलांचा स्पर्श होताच सुंदर स्त्रीच्या जागी एक शिळा दिसू लागली व भोवतालच्या शिळांमधून आनंदोद्गार प्रकट झाले. पर्वतानं आपल्या

कन्येला प्रेमानं मिठी मारली व म्हटलं, 'तू परत आलीस, पण तू काही काळ मानव होतीस, हा तुझ्यावर अद्याप कलंक आहे. तेव्हा तू दोन सागर जिथे मिळतात, तिथं वास्तव्य कर. दशसहस्र वर्षांत सागरांच्या लाटांनी तुझा कलंक धुऊन जाईल.

परंतु दुर्दैवानं तोपर्यंत ते स्थान मानवांना पवित्र राहील आणि तिथं दर्शनाला येणाऱ्या अनेक मानवांचा सहवास तोपर्यंत तुला असहायपणे सहन करत जगावं लागेल.'

" मी असलीच एक कथा ऐकली आहे, परंतु-" प्रवासी सांगू लागला. - - -"

( एखाद्या कथेवर वेगळा प्रकाश टाकला तर त्यातून जास्त, वेगळाही अर्थ काढता येतो. एका कथेची अनेक रूपे दाखवून वाचकाची जाणीव जास्त समृद्ध करता येते. असे येथे जी ए सांगतात. ग्रीक ऑर्फियस कथेत एक गोष्ट आहे. जीएंनी त्यावर रोपण करून , पिंगळावेळ पुस्तकातील ' ऑर्फियस ' कथा लिहीली. त्यामुळे ज्ञान, पूर्ण ज्ञान, मृत्यू विचार वेगळे मांडले गेले. हे उदाहरण देता येईल. दुसरे उदाहरण

येथे मांडतो.' वाल्या ' कोळीच्या बायकोने " आम्ही तुझ्या पापात सहभागी आहोत" असे सांगितले असते तर रामायण लिहिले गेले नसते. असे दुसऱ्या एका लेखकाने सुचवले आहे. त्याचीही येथे आठवण येते.)

6)"......म्हणजे तू एकंदरीनं वस्त्रांचा किडा आहेस ! " चेहऱ्यावरील सुरकत्या विसकटून हसत बैरागी म्हणाला, " सगळेच किडे, पण त्यात दोन प्रकार असतात. एक शरीर पोखरत आत जातो, तर दुसरा वरच्या वस्त्रातच कसर निर्माण करत सुखानं जगतो. माझा जन्म पहिल्यात झाला. जर वस्त्रांविषयी तुला एवढी आसक्तीच असेल, तर समोर माझी झोपडी आहे. तिच्यात निरनिराळी वस्त्रं आहेत.त्यातील काही तुला उपयुक्त होतील. तुझ्या जगात निव्वळ यात्रिक असून चालत नाही, तर दरोडेखोरासारखं न दिसता यात्रिकाप्रमाणंच दिसावं लागतं !

"यापुढील प्रवासात निराळ्या कपड्यांची गरज लागणार, हे प्रवाशाला जाणवले होतेच. तो उठला व झोपडीत आला. तेथे एका स्वच्छ ओट्यावर व्यवस्थित बांधून ठेवलेल्या विविध वस्त्रांच्या घडया होत्या. यात्रिकाची वस्त्रे, विद्वानांच्या सभेत सन्मानार्थ दिल्या जाणाऱ्या भरजरी शालजोडया त्यात होत्या. प्रवासी बैराग्याला विचारतो - म्हणजे तुम्ही कोण आहात?

7)- माझ्यावरील कात टाकली आहे.पण अद्याप जी कात आहे ती टाकली की मी उरण्यासाठी कोणी रहात नाही....."

-( येथील बैरागी हा ठिपका कथेतील संन्यासासारखा आहे. माणूस आयुष्यात अनेक भूमिका निभावत जगतो. पण सर्व मृत्यूपाशी संपते , असे येथे जी ए सांगतात. सर्व तत्वज्ञानाचा शेवट मृत्यू असतो. असे तत्वज्ञानाचे म्हणणे असते.)

8)- सकाळी प्रवासी तेथून पुढे गेल्यावर खोपट्यात पांगळा ,केस पिंजारलेला , जटाधारी भेटतो. तो गीतकार असतो. त्यावेळी जी ए म्हणतात -

"....प्रवाशाने निराशेने एक सुस्कारा सोडला व तो मटकन खाली बसला. पण त्याला देखील किंचित हसू आल्याखेरीज राहिले नाही. तो म्हणाला, "येथे

तुमची झोपडी आहे. ऐन रानात तुम्ही एकाकी राहाता, घरी वाटीभर अन्न असणारच, असा माझा विश्वास होता. तुम्हीच जर उपाशी आहात तर मग या

ठिकाणी तुम्हाला आयतं अन्न कोण आणून देणार आहे?"

"तुझे म्हणणे खरं आहे. इथं भोवती अनेक कोसांवर वसती नाही. पण त्यापलीकडे अनेक लहान लहान गावं विखुरली आहेत. तिथं कुठंतरी लग्न झालं,

कोणीतरी मृत्यू पावलं, नव्या मुलाचा जन्म झाला, कोणी दीर्घ काळानंतर परदेशाहून परतलं, तर सगळ्या प्रेतयात्रा, वराती, मिरवणुकी मुद्दाम याच रस्त्याने नेल्या जातात. त्या इथं, या खोपटापाशी थांबतात. त्या इकडे येतात ते मुद्दाम माझ्यासाठी, कारण मी एक गीतकार आहे. मग मी त्यांची सुखदुःखं, भूतकाळातील करुण आठवणी, भविष्यातील आकांक्षा-स्वप्नं स्वतः अनुभवतो व त्यांना माझ्या गीतांच्या पिंजऱ्यात पकडून त्यांच्यापुढं ठेवतो. मग कृतज्ञतेनं ती माणसं मला काही

अन्नवस्त्र देतात. मग खंडित झालेला कोणाचा अखेरचा प्रवास किंवा नव्यानं सुरू झालेली आनंदयात्रा पुन्हा चालू होते व ती माणसं निघून जातात. माझे शब्द, माझे सूर, यांवरच मी आतापर्यंत जगत आलो आहे. पण गेल्या आठदहा

दिवसांत कोणीच मेलं नाही, कोणी जन्माला आलं नाही, कुठं लग्न नाही, कुठं नवा तलाव नाही, गृहपूजा नाही, काही नाही. " जटाधाऱ्याने प्रवाशाकडे पाहिले व तो किंचित काळ स्तब्ध राहिला. प्रवासी काही बोलत नाही, हे पाहून

तो उत्साहाने म्हणाला, " मी तुझा फार कृतज्ञ आहे. '

' कृतज्ञ , कशाबद्दल? ' प्रवाशाने आश्चर्याने विचारले.

"अशा वेळी " माणूस काही काव्यावर जगत नाही" असं न म्हटल्याबद्दल !"

जटाधारी हसून म्हणाला. 'नाहीतर म्हशी बोडण्याखेरीज काहीच काम न येणारा एखादा गावडा देखील मोठ्या ऐटीत म्हणून जातो, 'कवितांनी कधी पोट भरत नाही ! '

प्रवासी आता मनमोकळेपणाने हसला. छट् असली हजार लोकांनी म्हटलेले शब्द मला नको असतात...."

"....तुम्हाला गाता येईल? " प्रवाशाने विचारले.

का नाही? तू प्रसंग सांग, मी गीत गाईन. किंवा मी प्रसंग देखील निर्माण करू शकेन. तू आपल्या पित्याच्या अपमानाचा सूड घ्यायला निघाला आहेस; तू एका राजकन्येच्या स्वयंवराला यात्रिकाच्या वेषात चालला आहेस; तुझ्या प्रियेने तुझा विश्वासघात केला म्हणून तू विरक्त झाला आहेस; नगरात तू राजरस्त्यावर उभा असता, मिरवणुकीतून चाललेला शृंगारलेला गजराज तुझ्या गळ्यात माळ घालतो व तू नवा सम्राट होतोस; किंवा मिरवणुकीतील तोच हत्ती उधळतो व त्याच्या पायाखाली तू चिरडला जातोस; तुझ्याच रक्ताचा तुझा भाऊ तुझ्या पाठीत कट्यार भोसकतो; नकळत तुझ्या हातून तुझ्या आईची हत्या होते, किंवा एका असामान्य सुंदर रमणीच्या चेहऱ्यासाठी तू अगदी अभंग मनाने, आनंदाने आपल्या देशाशी द्रोह करशील...

प्रवासी एकदम मोठमोठ्याने हसू लागला व म्हणाला," यातील काहीसुद्धा खरं नाही. मी आपला भटकत चाललो आहे इतकंच ! "

“ काही खरं नाही, म्हणजे ते प्रत्यक्ष घडलं नाही इतकंच. " त्याचे शब्द बाजूला सरकवत असल्याप्रमाणे हात झाडत अधीरपणे जटाधाऱ्याने म्हटले.प्रत्यक्ष म्हणजे अगदीच क्षुद्र गोष्ट आहे. समिधेचा अग्नीशी जेवढा संबंध, तेवढादेखील प्रत्यक्षाचा सत्याशी संबंध नसेल. मी आहे एक कवी. माझ्यापुरतंच बोलायचं झालं, तर जे शक्य आहे ते सत्य आहेच...."

दुसरा संदर्भ येथे देता येईल -

'प्रवासी 'कथेतच, शेवटी शापित नगरामध्ये धाकटा कलावंत मुलगा ,कलेबद्दल म्हणतो -".... माणसे सुख दु:ख भोगतात आणि नाहीशी होतात. पण त्या सुखदु:खांची गीते, ती माणसे गेल्यावरही चिरंतन राहतात. शब्द उच्चारणारा विरून जातो. पण शब्द अमर होतो. मला अजून पुष्कळ पहायचे आहे. पण ते सर्व अलिप्त राहून. धुंद होवून नृत्य करणारा नर्तक त्याच क्षणी नृत्याचा आनंद उपभोगू शकत नाही. त्या क्षणीही अलिप्तता अशक्य असल्यामुळे - खऱ्या अर्थाने नर्तकाला स्वतःचे नृत्य कधी समजतच नाही. ते त्याला इतरांच्या डोळयांत पहावे लागते. मला सगळे काही पाहाणारा डोळा व्हायचे आहे... मला मृत्यूचा कवी व्हायचे आहे. मृत्यू अनुभवायाचा नाही...."

9)( येथे जी ए शब्दकलावंताचे रूप दाखवतात. कला फक्त वास्तवता दाखवते असे नाही. तर जे कल्पनेतही अशक्य वाटेल तेही दाखवणे ,हे कलावंताचे काम असते. वाचकाने त्या भूमिकेत जावून ते समजून घ्यायचे असते. वाचकाने ते अशक्य, म्हणून टाळणे योग्य नाही - असे येथे जी ए सांगतात. साहित्यात अतिवास्ववतावाद

सांगण्याचा हा विचार आहे.(जी ए व)गीतकार म्हणतो,माझ्या वाट्याला आलेली सगळी गीते मी गाऊन झाली आहेत.)

- मृत्यूला जवळ जवळ ओढणार कुत्र्याचे पिल्लू घेवून प्रवासी निघाला...' लहान दोरीचा उपयोग फार तर गळफासापुरता होतो. पण लांब दोरी मात्र गळफासाबरोबर रमणीच्या सज्जावर चढण्यासाठी ही उपयुक्त असते.' गीतकार प्रवाशाला म्हणाला.

10)- प्रवासी जंगलातून पुढे उपाशी जातो. तेथे कातडी शिकारी पोशाख घातलेला उंच माणूस असतो. तुला माझ्या वाड्यात हवे तसे अन्न मिळेल. तू माझा पाहुणा आहेस. फक्त माझ्यामागोमाग आले पाहीजेस. असे सांगून तो प्रवाशाला वाड्यात नेतो.प्रवासी, कुत्र्याची दोरी दाराला बांधतो. तर आत चक्रव्यूहाचा आरसेमहाल असतो. तू तुझे डोळे देवून तळघरात नव्व्यानव लोकांबरोबर रहा. मी तुला जन्मभर अन्न देईन - असे शिकारी सांगतो. येथे 'स्वामी 'कथेची आठवण येते. प्रवासी व शिकारी यांचा आरसेमहालातील सामना एखाद्या Action सिनेमासारखा दाखवला आहे. शेवटी त्यातून प्रवासी सुटतो - ते कुत्र्याला बांधलेल्या दोरीमुळे. या प्रसंगात जी ए लिहितात -

".....घाबरू नकोस ! इथं पाल, सरडा राहू देच, पण एका चिलटालाही प्रवेश नाही.'पण पाहिलंस? एवढी साधी गोष्ट समजावून घ्यायला देखील तुला प्रतिबिंबालाच विचारावं लागतं. आणि ज्या

डोळ्यांनी तू प्रतिबिंबांना शरण जातोस, त्यांना स्वतःचं रूप पाहायला देखील एका प्रतिबिंबाचीच गरज असते. मग तुला काय उपयोग आहे असल्या दुबळ्या फसव्या इंद्रियाचा.

" मी इथे दिव्यांचा स्वच्छ प्रकाश निर्माण केला, तो कशासाठी? माझ्यासाठी नव्हे, तर तुझ्यासाठी. मी स्वतः आता प्रकाशमुक्त असल्यानं त्या रंगीत कारा-

गृहातून सुटलो आहे. पण तू मात्र भोवती पाहा. अनंत रेषेपर्यंत ही प्रतिबिंबांची गर्दी तुला दिसेल. व त्यात देखील एकाचं आणखी एक, त्या दोघांची अनेक,अशी भुतावळ तुला दिसेल. शिवाय तुझा डोळा म्हणजे देखील एक आरसाच !

आरशातील प्रतिबिंब पाहाणारा एक फसवा आरसाच ! आणि या मायाबाजारात

एकेक वस्त्र बाजूला करत सत्याकडे जाऊ पाहाणारा तू वेडा तर नाहीस ना? तू कोण आहेस एवढं तरी कधी तुला तुझ्या डोळयांनी समजावून दिलं आहे का?

या विविध प्रतिबिंबांपैकी तुझं खरं प्रतिबिंब कोणतं? ते किती वेळ स्थिर राहतं?

की तू दरक्षणी बदलणाऱ्या प्रतिबिंबाबरोबर नाचरेपणानं स्वतः बदलत असतोस?

या अगणित प्रतिबिंबाची जर बेरीज करता आली, तर त्यातून तू निर्माण होशील का? हे झालं तुझ्यासारख्या एका बिंदूप्रमाणं असलेल्या एका व्यक्तीविषयी. मग तुझ्या भोवतालच्या, तुला ज्ञात झालेल्या जगाविषयी तर पाहायलाच नको !

एखाद्या चित्रनळीत किंचित हालचालीनं चित्रं बदलतात, तसं सारं गारुड घडत असतं. आधीच आपण एखाद्या आरशातील पडछाया, आणि खेळ पाहातो तो देखील छायांचाच ! युद्धक्षेत्रावर तुंबळ युद्ध होतं व अठरा अक्षौहिणी सैन्य नाश

पावतं. एक असामान्य सुंदरी कुंडलं हलवत डोळे मोडते व तिच्या चेहऱ्यासाठी हजार तारवं समुद्रात ढकलली जातात, आणि आभाळाला भिडलेल्या

मनोऱ्यांची नगरं नष्ट होतात. एक सिंहासन वर येतं, दोन साम्राज्यं नष्ट होतात. बेचिराख होतात ! प्रतिबिंबांचा प्रतिबिंबांशीच संघर्ष !

मग या साऱ्यांविषयी कोणीतरी गातं, लिहितं. पुन्हा छायेची आणखी पडछाया ! आणि ते आम्ही भाबडी माणसं वाचतो व त्याची छाया कवटाळून धरतो...."

या कथाभागाशेवटी शिकारी म्हणतो -

---' मला केवळ माणसांचे जग कळते. पण विश्वात मानव हा काही एकटाच जीव नाही - हे मला सुचले नाही '... शिकाऱ्याने स्वतःला संपवले.

11)( येथे जी ए - एखादा माणूस भ्रम तयार करतो व त्याआधारे जग जिंकायला जातो. ही शोकांतिका दाखवतात. हिटलर, स्टॅलिन, माओ -... अशी , एक वेड घेवून, जगाला वेठीला धरणाऱ्या माणसांची , त्यांच्या विचारसरणींची यादी मोठी आहे. जी ए स्वातंत्र्य व त्याचे मूल्य याचा वस्तुपाठ देतात. तसेच माणूस प्राणीसाखळीत आहे.पण इतरही सजीव, वनस्पती त्याच्याबरोबर आहेत म्हणून माणूस जिवंत आहे. हे नमूद करतात. वेगळ्या पैलूतून, निसर्गाचे, पर्यावरणाचे महत्व सांगतात)

-(* जाता* * जाता*- एक आठवण म्हणून सांगत आहे. पुण्यात सहकारनगरच्याजवळ ' बागूल उद्यान ' आहे. तेथे असा आरसे महाल केला आहे. सशुल्क आहे. आत गेल्यावर दार लावल्यावर सगळीकडे, छतालाही आरसे आहेत. चक्रव्यूहासारखा एक निश्चित रस्ता आहे. आतील गाईडच्या मदतीने फिरून बाहेर

पडता येते. आपल्या स्वतः च्या प्रयत्नाने बाहेर पडणे, अवघड आहे. त्या आरसे महालातून बाहेर बागेत आल्यावर, ' प्रवासी' कथेतील या भागाची आठवण आली)

-------

12) शेवटचे शापित नगर -

रात्र होत आलेली असते. प्रवाशाला नगराचा दरवाजा दिसतो. व येथे अन्न - आसरा मिळेल या आशेने तो नगरात प्रवेश करतो.

पौराणिक कथांवर आधारित -हे जीएंच्या कल्पनेतले नगर सांगीतले आहे. वाचकांनी त्यामधील गुंतागुंत समजून घेतली पाहीजे. नगराला दोन दरवाजे, दोन रक्षक राक्षस ,त्यांच्या अटी व उपअटी अशा आहेत -

- पूर्वेकडील दरवाजाने फक्त रात्री या नगरात जाता येते. त्याप्रमाणे प्रवासी रात्री नगरात जातो.

- रक्षक महाकाल राक्षस असल्याने तो नगरात येवू देतो. पण त्या दरवाजाने नगराच्या बाहेर जावू देत नाही. तेव्हा प्रवाशी बाहेर जाऊ पहातो, तर महाकाल दरवाजा बंद करतो.

- परदेशी रात्रभर नगरात जिवंत राहतो.पण सगळे दरवाजे बंद असतात. कारण त्याला कोणी अन्न पाणी दिले ,तर महाकाल त्या माणसाचा हात तोडतो.

- जो माणूस प्रवाशाला आश्रय देईल त्याचा सूर्योदयावेळी बळी जातो. महाकाल त्या आश्रय देणाऱ्याला मारतो.

- सूर्योदयावेळी महाकाल त्या परक्या प्रवाशालाही मारतो.

- अट - त्या प्रवाशासाठी नगरातल्या कोणी मृत्यू पत्करला तरच महाकाल त्या प्रवाशाला सूर्योदयावेळी जिवंत ठेवतो.

- अट - किंवा महाकालाला हवे ते रत्न दिले तर महाकाल प्रवाशाला मुक्त करतो.

13)- अशा परिस्थितीत नगरातील एका कुटुंबात कडाक्याचे भांडण होते. ते अतिशयोक्त नाही. कारण त्यावेळी प्रत्येकाचा जीविताचा स्वार्थ त्यात अडकलेला असतो. स्वार्थापुढे शेवटी नाती गोती रहात नाहीत, हे कटु पण वास्तव सत्य आहे.

स्वार्थ जणु पुढती आरसा बिलोरी।

आपुलीच प्रतिमा होते आपुलीच वैरी ।

त्याप्रमाणे हे अटीतटीचे भांडण दाखवले आहे. त्यामुळे प्रवासी हताश होतो
14)- अट - सकाळी रत्न घेवून पश्चिम दरवाजाने गेले तर तेथे अकाल राक्षस असतो. त्याला चेहरा ,हात आहेत. पण उरलेले अंग शिलावस्थेत असल्याने, त्याला हवे ते रत्न पाहीजे असते.

- पण त्याची दृष्टी विपरित आहे की ,कोणत्याही रंगाचे रत्न त्याला पांढरे दिसते. त्यामुळे हिरवे रत्नही तो टाकून देतो व माणसांना मारतो.

- अट - रुद्रकालीच्या मुकुटावरील रत्न काढल्यावर तेथील साप महाकाला मारू शकेल.(पण कथानायक प्रवाशाने त्या सापाला आधीच मारले होते.)

- ही अटींची सर्व माहिती त्या नगरातल्या वृद्धाला माहित असते. कारण तो नगराचा राजा होता. पण महाकाल व अकाल हे दुष्ट राक्षस त्याची मुले असतात. तो

त्यांना मारू शकतो. पण मारण्याच्या आधी राक्षसांचे हात निळे -लाल होवून त्यांना त्याची ओळख कळत असते.

-(अशा प्रकारे, जीएंनी पूर्ण हुकुमशाही असलेले, जेथे थोडेही स्वातंत्र्य नाही, असे नगर दाखवले आहे. हा एक हुकुमशाही देश( उत्तर कोरियासारखा) म्हटला पाहीजे. हुकुमशहाने ठरवलेल्या अपराधाला मृत्यूदंड, कठोर शिक्षा दिली जाते. व नगरातून बाहेर जाता येत नाहीं. सर्व माणसे भीतीच्या छायेखाली राहतात. व तो हुकुमशहा सहजासहजी मरत नाही. त्यामुळे लोकांचे आयुष्य जिकरीचे जाते. जीएंनी , स्टालिन, हिटलर या हुकुमशहांचा अभ्यास केला होता. एका पुस्तकाचे भाषांतर केले होते. आजही जगात हुकुमशाही देश आहेत. भारताने एकोणीस माहिने अशा तीव्र हुकुमशाहीचा अनुभव घेतला आहे.)

-..... याप्रमाणे महाकाल त्या रत्नामुळे प्रवाशाला मुक्त करतो. जी ए शेवटी लिहितात -

- प्रवाशाला वाटले, इतरांचे प्रवास संपतात, रस्ता राहतो. पण आपला मात्र आता रस्ता संपून गेला, आणि प्रवास मात्र चालूच राहणार आहे.

15)-(माझे मत मी येथे नम्रपणे मांडू इच्छितो. या कथेतील , बैरागी, गीतकार जटाधारी, शिकारी ही पात्रे काही ना काही शिकवतात. पण हा शापित नगराचा कथाभाग, त्यातील कौटुंबिक भांडणाचा भाग सोडून,अनुभव दाखवत नाही. तसेच नगर, राक्षस, अटी, उपअटी हा भाग गुंतागुंतीचा वाटतो. एका स्वतंत्र, उत्तम कथेप्रमाणे हा भाग झाला असता. पण या दीर्घ कथेत तो अचानक आल्यासारखा वाटतो. प्रवाशाने आधीच साप मारल्यामुळे महाकाल व अकाल निर्धास्त होतात. व

प्रवाशाचा प्रवास संपतो. येवढाच मुद्दा या नगराच्या भागाशी संघटितपणे शेवटी राहतो. अर्थात याबद्दल दुमत असू शकते. पण त्यावर साधार ,आणखी विवेचन व्हावे असे मला नम्रपणे वाटते.

'रमलखुणा ',पुस्तकातील 'इस्किलार' कथा, तुलनेने जास्त बांधेसूद वाटते. पकड घेणारी वाटते. त्या कथेत आधी, " सेरिपी इस्कहार एली "हे रमल शब्द कळतात. नंतर त्यांचा वाच्यार्थ कळतो. पण गूढार्थ कळत नाही. शेवटी घटना अशा घडतात की शेवटच्या परिच्छेदात घटनांतून कथेचा गूढार्थ प्रकट होतो. तेथे भविष्य खरे ठरून कथा संपते. म्हणून इस्किलार कथा पकड घेते. असो.) तरीही प्रवासी कथा अर्थपूर्ण तत्वचर्चा करते. विविध स्वभावाची पात्रे दाखवते. विस्मित करणारे प्रसंग , एखाद्या गतीमान चित्रपटाची आठवण करून देते. म्हणून जी एंची ' प्रवासी' ही कथा मैलाचा दगड ठरते.

धन्यवाद. विलास वाघोलीकर.

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

सुनीळ सामंत: माननीय विलास जी यांनी कथेची चर्चा फार सुंदर प्रकारे सुरू केली आहे त्यांनी प्रयत्नपूर्वक कथा कमीत कमी शब्दात सांगायचा प्रयत्न केला आहे तसेच कथेतील महत्त्वाची अंगेही विशद केली आहेत.

प्रवासी ही कथा वाचताना मला मेसलो यांच्या अचिव्हमेंट theory आठवण येते. माणूस आपल्या सुरुवातीच्या आयुष्यात हवे असलेले धन मिळवण्यासाठी धाडस करायला तयार होतो. तसेच नैतिकता अनैतिकता यांचा फारसा विचार करत नाही. एकदा धनलाभ झाला की मग मात्र त्याला सुरक्षितता नैतिकता यांची आठवण

येते. व आपले धन तसेच आपले शरीर यांना इजा पोहोचणार नाही यासाठी तो धडपडतो. परंतु या काळात तो तडजोडीला तयार होत नाही. हळूहळू प्रगती होता होता तो आपल्याकडचे धन थोडे थोडे इतरांसाठी खर्च करायला तयार होतो. दयाबुद्धी निर्माण होते पशु दुर्बल पशु दुर्बल व्यक्ती यांना तो मदत करू जातो त्याची भूतदया जागृत होते परंतु तरीही तो स्व केंद्रीतच असतो. जसजशी त्याची प्रगती होत जाते तसतसा तो स्वतःच्या केंद्रातून बाहेर पडून स्वतःचे सर्वस्व स्वतःच्या जीव सुद्धा प्रसंगी पणाला लावून इतरांसाठी काही करू जातो. ही त्याची सेल्फ ऍक्च्युअलायझेशनची पायरी असते. यापुढची पायरी त्याला सर्व जीवनच शून्य असून त्याचे वैयर्थ जाणवते.

प्रवाशाची सुरुवात रत्नप्राप्तीपासून होते. त्यासाठी तो काहीही करायला तयार होतो. त्याचे संपूर्ण शरीर हावरे होते. त्याची बोटे अधीर होतात. नंतर मात्र स्वतःचा जीव वाचवण्यासाठी तो रत्नाचा त्याग करतो आणि जीव वाचवल्यानंतर पुन्हा रत्न हस्तगत करतो यानंतर बैरागी भेटल्यावर तो तडजोडीला तयार होत नाही. परंतु हळूहळू शहाणपण शिकत शिकत तो अखेरीला एका लहान मुलाचा जीव वाचवण्यासाठी रत्नही देऊन टाकतो. आणि स्वतःचा जीवही द्यायला तयार होतो. यामधील काळात तो कुत्र्याचे पिल्लू वाचावे म्हणून प्रयत्न करतो.

दिलिप बडे: https://youtu.be/KzE-e2M_njk

प्रवासी कथेचा परिचय करून द्यायचा प्रयत्न या व्याखानात केला गेला आहे.

कथा : प्रवासी कथासंग्रह : रमलखुणा

जी.एं.ची निवडक पत्रे खंड ४ मध्ये प्रस्तावनेमध्ये विजय पाडळकर (म्हणतात) लिहितात की जी.एं.च्या कथा प्रवासी व जीवन प्रवास इथपर्यंत आपली गाडी सोडून फिरत कोणता प्रवास आहे. असे फिरत फिरत त्यांनी कितीतरी दूरचा पल्ला (कथा-लेखनात) गाठला आहे. पण कुठे काही रस्ता थांबला पण प्रवास मात्र चालू राहणार आहे. हा प्रवास चालू राहिला तो त्यांच्या लेखनाचा, तात्त्विकतेच्या, नियतीचा, शब्दखेळ करण्याचा, कुणाकडे कशाचेही मोह पण न होण्याचा.

जी.एं.च्या रूपक कथांमधील नियती ही सर्वसाधारणपणे सामान्य माणसाच्या मनात असलेल्या नियतीपेक्षा वेगळी आहे. भविष्यात जे घडणार आहे ते अटळ आहे असा विश्वास असला तरीही, 'देव जे जे करतो ते ते आपल्या भल्यासाठीच' असते ही श्रद्धाही असते. मात्र जी.एं.च्या कथेतील नियती असे कोणतेच समाधान मानवाला (सामान्य माणसाला व वाचकाला) मिळू देत नाही पण बळ (वैचारिक) मात्र मिळवून देते. माणसे जगतात, मात्र ती कशासाठी जगतात याचे कोणतेही स्पष्टीकरण जी.एं.ची नियती वाव देत नाही.

प्रवासी कथा म्हणजे, पण पूर्वीच्या काळी विक्रमा सांगितलेली कथा, गोष्टी बरेच वेळा प्रवाशाला बोध देऊन जाते मनोरंजन करते पण पोटभुक्या काही मिळत नाही. शारीरिक पातळीवर तो कायम भुकेला राहिलेला आहे. व त्याचे ध्येय (?) गाठण्यासाठी योग्य तेवढा अनुभव मात्र देत नाही.

प्रवाशाच्या प्रवासाची सुरुवात वरवर संपणे पण प्रवास चालू राहणे या वाटा पर्यंत त्याचे भरकटणे ही एक नाट्यात्मक चालत राहिलेली आयुष्याची गोष्ट म्हणजे ही कथा. हा प्रवास त्याची व त्याच्या आयुष्याच्या जीवन भोगाची लालसा आहे. आयुष्य उत्कटपणे, भोगविलासी जगणे, माडी, मदिरा, धन लालसा या करिताच त्याला त्या वैभवशाली हिरव्या रानाची लालसा व मालकीची प्रबळ इच्छा आहे

त्याची विक्री करून पैसा कमवावा व जगातील सर्व सुखे आपण उपभोगावीत या एका कारणाकरीता प्रवाशाचा प्रवास सुरुवात होतो. त्याची नियती, त्याच्या दरवेळेस जीव वाचवण्याकरीता पडलेले रत्न फासे व त्यांचे दान, एक रत्नकरुणा हे नेहमी त्याला जगण्याचे दान देतात व तो अंतहीन प्रवास प्रक्रिया चालू ठेवतो.

[illegible] त्यानंतरच्या एक दोन धावात सुरु होणाऱ्या देवीच्या कथाबाबतीत तो इवलसे तीन हिरवे रत्न सहजी मिळाले पण तेथून सुटका करण्याचा मार्ग रत्नाचा जीव वाचविण्यासाठी दंडूक, न्यायदाता व वधक या ३ कुटींशी वैचारिक व शाब्दिक खडाजंगी देऊन. वधकाचा वध करावा लागतो. रत्ना अशक्तीच जोन्हा न्यायदाता व वधक झाला आहे याचा त्याला अभिमान वाटतो. गोमुखातून रत्न प्राप्त करून तो पुढील प्रवास करण्याचे फासे टाकू लागला. प्रत्येक वेळा दैवाने, नियतीने सत्याचे दान टाकून त्याचा निर्विघ्न प्रवास चालू ठेवण्यास मदतच केली.

कित्येकांना अनिर्बंध सांगितले की त्या वैराग्याची मृत पत्नी, तिची जळणारी चिता व राख निघेपर्यंत वैराग्याने सांगितलेल्या कथा ऐकतांना प्रवासी मात्र अधाशीच असतो.

वैराग्याच्या तोंडी आलेली वाक्ये त्याला अनुभव नसताना सुद्धा समर्पक वाटतात. उदा. "ती कथा निराळी, ही कथा निराळी (वाचणारे) सांगणारे जेवढे असतात, तेवढी रूपे एकच कथा धारण करते" अथवा "अंगणातील गुलाब परसातल्या देखील गुलाब ठरेल असे नाही". प्रवाशाच्या "तुम्ही फार हिंडला असाल, फार पाहिले असेल?" या प्रश्नाला तत्त्वज्ञानीक उत्तर देतो,

"हिंडलो पुष्कळ, पण (फार) पाहता आले नाही,
घडले पुष्कळ, पण (फार) जाणता आले नाही
केले, पण (फार) कारणे उमगले नाही."

वैराग्याचा हा दृष्टिकोन, निव्वळ आयुष्य जगण्याला वा अनुभवाला व्यवसायाधीन आहे (तरीही तो बोलतो) आणि तरीही जेती आत्मविश्वासाने तो प्रवाशाला

सांगतो, "सर्व यात्रा करून तुझे शिकारीचे तेरावे (म्हणजे काय?) तुला इथे मी सहज सांगू शकेन.
हे ऐकून प्रवाशानेही आपले खेळ संपविले व आपल्याला प्रवास करणे जरुरीचे आहे म्हणून नवा वेग घेऊन प्रवासी पुढे चालता झाला.
पिंजारलेल्या केसांच्या जटाधारी, पाय वाकून गेल्याने जगाच्या ह्या थकत नाही पण त्याला अती दिसण्याची देवाने दिलेली जगावेगळी देणगी आता दिसत चालली आहे. नुसत्या गावावर, शेतांवर, पाखरांचे जेवण जेवणारा हा जटाधारी, जगण्याची अभिलाषा. सरून येणाऱ्या माणसांच्या देहांवर एका विकलेल्या बोटाशी अधाशी ओरबाडून प्रवासाप्रवासात अधपोटी उपाशीच राहतो. मात्र प्रवाशाला लांब दोरी गळ्यात बांधलेल्या कुत्र्याची सोडवणूक करायला (मृत्युदंड म्हणून?) सांगून तो प्रवाशाला पुढील प्रवास सुखाचा होवो ही इच्छा प्रकट करतो.
पुढील उत्तर देवाने आधीच मांडून ठेवलाय. आंधळ्या शिकाऱ्याच्या साऱ्या श्रमाला शिकारीची पूर्तता होण्याची. प्रवासी, ती लांब दोरी ते (शांत राहिलेले) कुत्रे यांच्या वाड्यात प्रवेश होण्याची आंधळ्या शिकाऱ्याची अती घाई. प्रवासी कुत्र्याच्या पिंजऱ्यात उंबऱ्याजवळ ठेवतो (उंबरा कायम घराबाहेरच असतो, वास्तुशास्त्र नियमानुसार) व त्याच्या दोरीचे टोक चौकटीच्या एका पितळी आकड्याला बांधतो. त्याच वेळेस आंधळा शिकारी अधीरपणे प्रवाशाच्या मागे लागून पटापट दरवाजा लावून घेतो आणि प्रवासी वाड्यात येतो. (* हे कुत्रे उंबऱ्याच्या जवळ असलेल्या आकड्याला बांधलेले असते, नंतर दरवाजा अडणा लावून बंद होतो पण बाहेर असलेले कुत्रे कधी म्हणतो पुढे दोरी व कुत्रे प्रवाशाच्या हाती कसे काय लागतात?) आता कथा तर पुढे सरकली पाहिजे म्हणून आपण म्हणू की त्या प्रवाशाची नियती, जगाचे रहाटगाडे व त्याचे अस्तित्व असेच म्हणावे लागेल)
शिकाऱ्याला त्याची ओढ पाहिजेत (कुतूहलापोटी) कारण तो आंधळा माणूस (आंधळ्यांच्या मानसिकतेमुळे सोबत्याला काय मिळाले व नंतर काय मिळणार)

खाद्यांला पुढील विवंचना पुकारनाही या शिकाऱ्याच्या
मालक आश्वासनावर प्रवास म्हणतोच "मुठभर
अन्नासाठी मी आंधळा (काहीमु) ज्या रत्नासाठी मी
अर्धा देश तुडविला, प्रवास केला एकासी साठी जीव
पणाला लावून भ्रमंती केली व तेजस्वी रत्नासाठी
आयुष्य वाऱ्यावर सोडले असे म्हणत त्यानंतरचा
सर्व प्रवास त्याच्या नजरेसमोरून प्रतिबिंबासारखा
वाहत गेला. त्या क्षणी एक ओझरता मऊ सुळा
स्पर्श (कुत्र्याचा) झाल्यावर त्याची ती लावलेली
मनगटाला बांधून घेऊन हळूहळू त्याच्या जगण्याच्या
प्राक्तनाकडे कोवळीपूर्वक चालू लागला एका असहाय
क्षणी तो दरवाजाबाहेर पडला (प्राक्तनी) पण
कुत्र्याचा मृत्यु त्याला पाहावा लागला.

"खुदा तौफिक देता है जिन्हे, वो ये समझते है
के खुद अपने ही हाथोंसे बनाकरतीहै तकदीर"

शेवटी नशीब, नियती, जगणे हे तुमच्या मनगटामध्ये जोपर्यंत जोर आहे आयुष्य जगण्याची धग आहे तोपर्यंत तुम्हीच तुमच्या जीवनाचे शिल्पकार राहता. हे जरी असले तरी कधीच पार पडलेले नाही व प्रवास पुढे चालून ठेऊनही अपेक्षित प्राप्ती होतेच असे नाही हे प्रवाशाला थोडे तरी उमकले.

आतापर्यंतच्या त्याच्या प्रवासात अनुभव काय तर नेत्रांशिवाय जग पाहण्याची संधी असूनही केवळ (भावनाप्रधान व दूरदृष्टी नसल्याने) प्रेताच्या आसनावर लोट मारून सुरुवात करावी लागते. जटाधारी, अनंत डोळ्यांची अती दिसणारी दृष्टी असूनही, हळूहळू चेतनाहीन होणाऱ्या आयुष्यातील धग तगवून ठेवण्यासाठी पिकल्या बोराची अभिलाषा ठेवतो तर आंधळा शिकारी अतीसामान्य जगण्याची इच्छा ठेवून अंधत्वावर बळी जिंकून गेल्याच्या दुःखात वेडापिसा होतो. या सर्वांचीच जगण्याची इच्छा म्हणजे त्याच केली गर्दीरहत ठवकी व सुगाचार शब्द-बुडबुड्यांचे सुयश निरर्थक कथाकथन ज्याचा कसाला

(५)

पण माथी पडलेले प्राक्तन ( जी. ए. हे म्हणे का घडले याची लेखक म्हणून काही कारणमिमांसा देत नाहीत पण कथाशोध पुढे चालू राहतो हे ही अनाकलनीय) अकाल, महाकाल यांचा मृत्यू घडवून आणणाऱ्या सर्पांनी प्रवाशाकडून मुक्तकाव्यात दिसलेली हत्या, व त्यामुळे दोघांना मिळालेले अनाहूत अमरत्व व हिरव्या रत्नाचा रंग-आंधळेपणा ( परंतु लेखक मोलकरीन म्हणाली की रत्नाचे आरशात प्रतिबिंब पाहिले असते तर कदाचित जीव येऊन आरशात रत्नाची प्रतिमा दिसली असती, तर रंग पाहणे अशक्य नव्हते. आरशात बिंब पाहणे हा एकच ज्ञानाचा मुक्तीचा मार्ग होता. हे ही अनाकलनीय जर मूळ रत्न सुवर्णाच्या डोळ्यांनी पाहताना रंग दिसत नसतील तर प्रतिबिंब पाहताना दृष्टी कशी नीट राहते व रंग पाहू शकते?) असताना ते रत्न नदीतळाशी कुठेतरी चिखलात रुतलेले राहते हे सत्य खरे धरावे तरी रत्नाच्या कथाकरितीच न साधलेला उपयोग, (एक प्रवाशाचा यदा आलेला प्रवास संपतो) एका कुटुंबातील रत्नाचा जीव वाचविण्यासाठी एकमेकांच्या चारित्र्यांवर केलेले लांछन व स्वार्थी विचार यावर प्रकाश पडतो. त्या मोठ्या मुलीचा भावी वर्ग म्हणून उपयोग करावयाचे ठरल्यावर प्रवासी वैतागाने माझे प्रश्न मीच सोडवितो. तुम्ही कोणी मदत करू नका म्हणणे त्याचा आत्मविश्वास दाखवितो.

सर्वांत शेवटी रत्नाचा त्याग झाल्यावर प्रवासी महाकालाला परशु देताना वधकाचेच रूप पाहतो व तो अवलक्षणी प्रदक्षिणा पूर्ण करण्याचे प्राक्तन त्याच्या कपाळी लिहिलेले आहे हे समजून बुद्धी, शब्दचातुर्याने, त्याला पाहिजे ते दान अनपेक्षितपणे, महाकालाकडून मिळवते व त्यातून सुटतो. पर्यायाने ते मूल ही जीवित राहते.

आता या सगळी ना त्याच्याकडे परशू आहे तो ते हिरवेगार रत्नमणी व अनाहूत पण माहीत नसलेल्या सर्वांना 'ज्ञानदान' प्राप्त होऊन, तो विचारतो म्हणतो. या ज्ञानाचा, दानाचा ... काही लोभ नाही →

(६)

शेवटी तो म्हणतोच ज्याला ज्ञान प्राप्त होते व मृत्युच्या क्षणापर्यंतच्या आयुष्याने इतरजनांना मार्गदर्शन करू शकतो तो भाग्यवान मी नव्हे. याचे कारण ज्ञानाचा क्षण केव्हाही स्थिर, नेमका ठरलेला असतो पण ज्ञान प्राप्ती होणाऱ्या व्यक्तीला तो माहित नसतो. तो जेव्हा निसटतो तेव्हा रस्ता मात्र संपून जातो व निष्फळ प्रवास मात्र चालू राहणारा असतो.'

हीच प्रवासाची गोलगोल फिरणारी नियती, आयुष्य दानाचे निष्कर्ष न पाहिलेल्या व कुणीच फासे खुळखुळवून न टाकलेल्या रमलाचे फासेवत.

थोडक्यात प्रवास थांबत नाहीच.

ता० ३०/०६/२०२२
सायंकाळी ८.३०

संजीव सावळगांवकर 7350002870

कथा प्रथम प्रसिद्धी ! लघुकथा दिवाळी अंक ...

स्वगत. प्रवासी या दीर्घ कथेवर आधारित लेखन करणे अति अवघड आहे. मनातले सांगायचे तर मी लिहणार नव्हतो पण दोनदा कथा वाचल्यावर लिखाणाची उर्मी दाटून आली. कच्चा खर्डा काल केला, आज त्याला लेखन स्वरूपात आणले. यावर कमी शब्द आणि आशय पूर्ण लेखन मला तरी अशक्य वाटले. तरीही लेखन पूर्ण केले आहे. आपल्या प्रतिक्रिया आणि आलोचना याची वाट पाहतोय. Sanjukaka.

सुनीळ सामंत: संजीवजी

आपण अत्यंत बारकाईने कथा वाचून तिचे रसग्रहण केले आहे. या कथेतील काही कच्चे दुवे(उदा. कुत्र्याचे पिल्लू आत येणे, रत्नाचा रंग आरशात दिसणे) आदी विचारात घेतले आहेत. या कथेचा समग्र भावार्थही समजून घेऊन वाचकांना दिला आहे. या सर्वांसाठी आपले मनापासून अभिनंदन आणि आभार.

आपण म्हणता तशी ही कथा काहीशी पसरट असली तरी मला वाटते की एका समग्र आयुष्याची कथा आहे. आणि खरे आयुष्य(तुमचे आमचे सर्वांचे) हे एका सूत्रबद्ध कथेसारखे नसते. आपल्या आयुष्याची अनेक वर्षे आपण भरकटण्यात किंवा एकूण आयुष्याशी असंबद्ध घालवतो. एक जीना चढावा तसे आयुष्य नसतेच. त्त्यामुळे ही कथा मला खऱ्या आयुष्याचे एका कलाकाराने केलेले सौंदर्यपूर्ण चित्रण वाटते.

आपण टिपणा अंती दिलेले निष्कर्ष मात्र लाजवाब आहेत आणि त्यातील शेरही.

रत्न, रस्ता आणि परशू यांचा आपण लावलेला प्रतिकार्थही योग्य वाटला. नियतीवादाबद्दलचे तुमचे विचार चर्चेयोग्य आहेत.

सुनीळ सामंत: प्रवासी ही कथा अनेक अंगांची पैलूदार कथा आहे. प्रत्येक वाचकाला ती कथा वेगळी दिसते. त्यामुळे या कथेवरील चर्चेत सर्वांनी आपल्या परीने व आपल्या दृष्टीकोनातून भाग घ्यावा अशी अपेक्षा आहे.

सुनीळ सामंत: हा व्हिडिओ छान आहे. ज्यांना कथा वाचायला मिळाली नसेल त्यांना जवळपास संपूर्ण कथा या व्हिडिओत ऐकता येईल.

यात कथेचे विश्लेषण कमी व अभिवाचन व संक्षिप्त कथन अधिक आहे.

परंतु त्यांनी मांडलेले काही मुद्दे मला विचारार्ह व वेगळे वाटले.

१) ही रुपक कथा नसून, मिथक कथा आहे.

२) शेवटचे कुटुंब त्यातली टोकाची भांडणं आणि नंतरचा मनोमिलाप हा अगदी आपल्या सर्वांच्या कुटुंबांचा आरसा आहे.

३) रामायण महाभारत हे एका व्यक्तीने लिहिलेले नाही

४) आटोपशीर समजूतदार दुःख याबाबत बैराग्याचे विचार.

या कथेचे विश्लेषण अधिक खोलवर करता येईल, किंवा आधीच कोणीतरी केलेलेही असेल असे मला वाटते.

विलास वाघोलीकर: योग्य सारांश केला आहे. संजीवजींनाही खूप खूप धन्यवाद. इतकी पाने विचाराने लिहिणे हे आवड ,व कष्ट केल्यावरच , शक्य आहे. धन्यवाद. गुड डे. विलास वाघोलीकर

विश्वेश्वर नांदेडकर: मला ही कथा खूप जास्त आवडते. पण त्या राक्षसाचे रंग आंधळे आसने मला कथेचा शेवट एकदम ओढूनताणून दुःखद केल्याचे वाटते. अर्थात त्यांनी प्रवासी मरतो aase न दाखवता कथेला थोडे अलीकडेच संपवले आहे. त्या वरून कथेचे अनेक शेवट आसू शकतात असे दर्शवत आसवेत असे मला वाटते

सुनीळ सामंत: प्रवासी या कथेवर फ़ारशी चर्चा झाली नाही याचे आश्चर्य वाटते.

खरे तर जीएंच्या वाचकाने रमलखुना वाचले नाही असे सहसा होत नाही. मला तर तो जीएंचा शिखरबिंदू वाटतो.

प्रवासी ही कथा सरळसोट नाही. प्रत्येक वाचकाला त्यात वेगवेगळे अर्थ निघावेत इतकी ती विविधांगी आहे.

या कथेवर आतापर्यंत तीनच टिपणे(मी, विलासजी आणि संजीवजी) आली. व एक व्हिडिओ. या चौघांच्याही दृष्टीकोनातून कथा वेगळी आहे आणि प्रत्येकाला त्यातला वेगवेगळा भाग जास्त महत्वाचा वाटला. मुळात कथेचा पायाच चौघांनाही वेगवेगळा दिसला.

या कथेवर सर्वांनी लिहावे असा आग्रह करतो व म्हणून पाच दिवस पूर्ण झाल्यावरही पुढची कथा सुरू करत नाही.

विलास वाघोलीकर: 🙏 ☝️ सुनीळजींनी मनापासून लिहिले आहे. प्रवासी व इस्किलार या जीएंच्या दोन स्पष्ट दीर्घकथा आहेत. त्या कथांवर किंवा कथाभागावर ,बरे वाईट लिहावेसे वाटणे, ही संधी समजून, आपल्या अनुभवांची प्रवासी कथेशी सांगड घालता येईल. आयुष्य एक प्रवास आहे, हे लक्षात घेवून, या कथेवर आणखी प्रतिसाद मिळाला, तर ते आनंदाचे ठरेल. गुड डे. विलास वाघोलीकर.

महेश आफळे: अगदी खरंय

पण रमलखुणा वर एकदा मी लिहू लागलो, तर त्याचे स्वतंत्र पुस्तकच होईल,तरीही मला असमाधान राहील

ह्याच भावनेतून अजून लिहिले नाही

बघूया कधी योग येतो ते

हा कथासंग्रह म्हणजे एका वाक्यात कथावाङ्मयाचा dead end आहे

या पलीकडे बहुधा काही शिल्लक राहत नाही

कथाकथनाचा पैस इथे संपतो

महाकादंबरीत किंवा महाग्रंथात जे सांगितले जाते ते कथेत सांगता येते हे सिद्ध करणारी कथा आहे ती

Natha Chitle: मी प्रवासी ह्या कथेचे नाट्य रुपांतर करुन सादर केलेले आहे त्याचे हिंदी भाषेत भाषांतरा,किरण संगवई ह्यानी केले आहे

सुनीळ सामंत: वाह. त्याची प्रत शिल्लक असल्यास पाठवाल का? किंमत कळवावी.

खरे तर हा एका चित्रपटाचा विषय आहे. भव्य दिव्य सेट्स आपोआप डोळयांसमोर येतात. जीएंच्या शब्दांत एखाद्या आर्किटेक्टची भव्यता, सिनेमॅओग्राफरची फ्रेमिंगची ताकद आणि सिनेदिग्दर्शकाची प्रसंगाला उठाव देण्याची ताकद आहे.

पुलंप्रमाणे जीएंना जर तशा संधी मिळत्या तर ते सत्यजित रें प्रमाणे एक जागतिक सिनेदिग्दर्शक जाले असते.

सुनीळ सामंत: अशोक पाटील यांनी हे लिहिलेलं असावं- नक्की माहित नाही

----

प्रवासी

----

"बेळगांव नावाच्या गावास....पावले जरी दूर भटकत गेली तरी तुझ्या जुन्या आठवणींची बुत्ती सतत जवळ राहिली आहे..." ~ ही आहे अर्पणपत्रिका "रमलखुणा" या पुस्तकाची....जी.ए.कुलकर्णी यांची. एक प्रवासी...शरीराने जरी खूप भटकंती केली नसली तरी(बेळगावहून १०० किलोमीटर दूर असलेल्या धारवाडमध्ये येऊन राहिले आणि तिथलेच झाले) मनाने आणि कर्नाटक युनिव्हर्सिटी येथील ग्रंथालयात बसून नॅशनल जिऑग्राफिक मॅगेझिनच्या वाचनाने साऱ्या जगाची सफर

करत असत. त्यांच्यातील प्रवासी प्राचीन काळातील त्या रम्य आणि रोमहर्षक प्रांतांतून भटकण्यास सदैव उत्सुक असे. त्याना ग्रीक, रोमन, आफ्रिकन साम्राज्याच्या घडामोडीविषयी आकर्षण होते. कल्पनेने ते काबूल, कंदाहार, इस्पहान, समरकंद, मदिना आदी मिथकांनी भरलेल्या नगरीतील अगदी छोट्यामोठ्या गल्लीतून अभ्यासू नजरेने फिरत असत. त्यांच्यातील प्रवाशाला फक्त त्या स्वप्नील गावातील सुंदर आणि प्रेक्षणीय स्थळेच पाहायची नसतात तर तेथील रहिवाशांच्या जगण्यामरण्याच्या व्याख्या कशा चित्रविचित्र रितीरिवाजांनी फुलल्या आहेत...त्यांची अंमलबजावणी करणारे शासक कसे आहेत. प्रशासनाचे धारदार शस्त्रांनी भरून गेलेले हात महत्त्वाचे की धर्मसत्ता राज्यसत्तेवर कुरघोडी करण्याची तयारी दाखवित आहे. दोन्हीतील छुपा आणि प्रसंगी उघड संघर्ष किती पराकोटीचा असू शकतो यानी तर प्राचीन इतिहासाची ग्रंथे भरभरून वाहत आहेत तर त्याच जोडीने या दोन अकाल महाकालामध्ये सर्वसामान्य नागरिक किती आणि कसा भरडला जातो याचाही जी.ए.कुलकर्णी अत्यंत कुतूहलाने अभ्यास करत आणि त्यातूनच मग "प्रवासी" आणि "इस्किलार" अशा कादंबरीच्या आवाक्याच्या दीर्घकथा त्यानी जन्माला घातल्या. दोन दीर्घ कथांचा हा संग्रह म्हणजे "रमलखुणा".

जी.ए.कुलकर्णी यांच्या कथाप्रवासाकडे एक अभ्यासक या नजेरेने आपण पाहात गेलो तर सर्वसाधारणपणे तीन टप्प्यात त्या कथासंग्रहांना ठेवता येईल. "निळासावळा....पारवा....हिरवे रावे...रक्तचंदन" असा सुरुवातीच्या काळातील प्रवास तर एकट्या "काजळमाया....पिंगळावेळ" यान दुसर्या टप्प्यात ठेवता येईल आणि "रमलखुणा...सांजशकुन..." यांच्यासाठी तिसरा टप्पा असे स्थूलमानाने मानता येईल(अर्थात वाचकागणीक यात मतभेद असू शकतात हे मान्यच). या दोन संग्रहातील कथा आणि पात्रे आपल्याला नित्यनेमाने व्यावहारिक पातळीवर वा

समोरासमोर भेटत नाहीत. "रमलखुणा" मधील दोन दीर्घकथांचे दोन्ही नायक....दुर्दैवी नशीब घेऊनच जन्माला आले आहेत...पराक्रमी आहेत, संकटांना बेडरपणे सामोरे जाऊन वाटेत येणाऱ्या प्रत्येक विरोधी पावलाला ठेचायची क्षमता आहे त्यांच्यात, पडेल ते कष्ट करायची, संकटे झेलायची प्रवृत्ती आहे त्यांच्यात. संवादावरून ते सुसंस्कृतही आहेत...तरीही नियतीच्या खेळापुढे ते हतबल झाल्याने अंती अटळ अशा पराभवाला ते सामोरेही जातात(शरण जातात असे मी म्हणणार नाही...कारण ते भाग्य बदलण्याचे त्या दोघांनीही अथक असे प्रयत्न केल्याचे दाखले कथानक प्रवासातून आपल्याला स्पष्टपणे दिसून येतेच). पराक्रमी तरीही पराभूत असले तरी वाचकांच्या मनी त्या दोघांबद्दल प्रेम आणि प्रेमच निर्माण करण्यात जी.एं.ची कथनशैली कमालीची यशस्वी झाली आहे.

याना रुपककथा म्हणावे की दृष्टांतकथा की लोककथा की मिथक की प्रवासवर्णन?....याचे उत्तर ज्याने त्याने शोधायचे आहे. जी.एं.चा हा एक प्रवास आहे....त्या नायकाकडे पाहताना जाणीव होते की हा बराच भटकलेला जीव आहे. प्रवासाचा ढोबळ अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पायी वा वाहनाच्या मदतीने जाणे वा परत घरी येणे. प्रवास या संकल्पनाचा बौद्धिक पातळीवरील विकास करत जी.एं.नी आपल्या नायकाना कल्पनेच्या गावी भटकभटक फिरविले आहे. त्यांच्या प्रचंड वाचनभूकेत "अरेबियन नाईट्स...गलिव्हर्स ट्रॅव्हल्स, डॉन क्विक्झोट, हेलेन ऑफ ट्रॉय, क्लिओपात्रा" अशा लोककथा दीर्घ स्वरूपी येत असल्याने आणि मुळातच या साऱ्या, कहाण्या वाळवंट, निळे आणि काळे आकाश सोबतीला गलबताच्या मदतीने करावा लागणारा समुद्र प्रवास यांच्याशी निगडित असल्याने जी.एं.ना त्याची भूल आणि ओढ असणे नैसर्गिकच. या वाचनाच्या जोरावरच अद्भुतरम्यतेच्या झुल्यावर त्यांच्या कल्पनाविलासातील नायक आपल्यासमोर

अनुभवाची पोतडी उलगडतो...घेऊन जातो आपल्या बोटाला धरून...पानापानातून एका अशा विश्वात की तोच नव्हे तर आपण...एरव्हीचा एक वाचक...आता पुढे काय? हा प्रश्न नायकाला विचारत राहतो...किंबहुना त्या कथानकाच्या गर्द डोहात उडीच घेतो....तो अनुभव म्हणजे "प्रवासी" आणि "इस्किलार" ह्या दोन कथा.....त्यापैकी आज मी तुमच्यासाठी "प्रवासी" घेऊन आलो आहे....मनोमनी इच्छा आहे की तुम्हालाही ह्या नायकाला सोबत करावीशी वाटेल. त्याच्या कपाळी जे काही लिहिले होते सटवाईने ते दूर करण्याची क्षमता आपल्याकडे नाही, किंबहुना "अल मख्तूब मख्तूब....जे लिहिले आहे ते लिहिले आहे..." या वचनावर विश्वास ठेवण्याची वाळवंटी शिकवण असल्याने आपण भागधेय जे आहे ते ज्याचे त्याला भोगावे लागणार आहे ही बाब मनी पक्की ठेऊनच कथानकाच्या मागेमागे जावे हेच बरे.

"रमलखुणा" ~ अरेबिकमध्ये 'रमल' म्हणजे वाळू...भविष्यवेत्ता वा ज्योतिषक वाळूवर बोटाने वा काडीने करीत असलेल्या खुणा किंवा रेषा...त्या अगम्य अशा आकृतीवरून समोर पृच्छा करणाऱ्या व्यक्तीचे तो पुसटसे भविष्य वा कपाळी आलेले भोग सांगतो....हा रमलज्ञ. रमलात स्वच्छ झगझगीत काहीच सांगितले जात नाही....रेषांमधून दिसणाऱ्या आकृतीतील संदिग्धता हाच मुख्य विशेष. काजळचित्रच एकप्रकारे....स्पष्टता नसल्याने नेमके आपल्या वाट्याला काय आले आहे हे जाणण्याची उत्सुकता कमालीची ताणली जाते....किंबहुना "सारे काही उघडपणे सांगितले जात नसल्यानेच" रमलज्ञाकडे येणारी गर्दी कधी आटलेली नसते. "इस्किलार" देवळातील नवी सेविका रमलाच्यापुढील भविष्य प्रखरतेने पाहात असल्याने भविष्य जाणून घेणारे कमीच झाले असे तेथील दासी सांगते. "ही आली आणि सारेच पालटले. तिच्यामुळे चित्रे अत्यंत स्वच्छ झाली. भयानकतेवर

अस्पष्टपणाची छाया नाही, शद्बांना अनेकार्थांची माया नाही..." ~ असे जळजळीत चित्र सर्वसामान्य व्यक्तींना नको असते. पण या दोन दीर्घकथांतील नायकांना मात्र अशा चित्रांसमोर जाण्याची तीव्र इच्छा आहे....आणि त्यांचाच मागोवा घेण्याचे कार्य जी.ए.कुलकर्णी यानी अत्यंत समर्थपणे आपल्यासमोर ठेवले आहे.

दोन्ही कथांविषयी एकाच धाग्यात लिहिणे शक्यच नाही हे तर स्पष्टच असल्याने मी "प्रवासी" कथा निवडली आहे. "इस्किलार" ची माया सांगण्याचा प्रयत्न करतो इतपत म्हटले तरीही ते कार्य किती मोठे आहे याची जाणीव ज्यानी ती कथा वाचली आहे त्याना निश्चित पटेल. तरीही पुढे केव्हातरी त्या कथेचीही ओळख करून देणे मला फार आवडेल. "प्रवासी" कथा संपूर्णपणे सांगणे योग्य नाही. हा लेख वाचल्यावर कथा न वाचलेल्या सदस्यांनी "रमलखुणा" पुस्तक घेऊन त्या वाचनाला सुरुवात करावी असाही उद्देश्य असल्याने कथेची सुरुवात करून दिल्यानंतर प्रवासी अकाल आणि महाकाल या दोन शासकाच्या शापित नगरीत आल्यानंतर तेथून पुढे जे काही घडते त्याचे औत्सुक्य तुमच्या मनी राहाणे अत्यंत आवश्यक असल्याने नायकाने नगरीत प्रवेश केल्यानंतर मी थांबतो.

"प्रवासी"...विश्वाच्या या अफाट विराट पसाऱ्यात मानवी जीवनाच्या ऐहिक आणि पारलौकिक सार्थकतेची प्रवासी या नायकाला चिंता नाही....[एक विशेष सांगितले पाहिजे....प्रवासी आणि इस्किलार या दोन्ही कथेत अनेक पात्रे आपापल्या नावानिशी वावरत असली तरीही विशेष म्हणजे दोन्ही दीर्घकथेतील नायकांना सर्वसामान्य असे नाव नाही....अन्यांना आहेत. त्यामुळे प्रवासी या नामानेच मुख्य पात्राला ओळखले जाते]....कथेतील नायकाला अनोख्या आणि समृद्धतेने भरून गेलेल्या ठिकाणी येऊन काही लोकशिक्षण घ्यायची इच्छा नाही...त्याला काहीतरी

भव्यदिव्य संपत्तीने भरून गेलेले काहीतरी प्राप्त करायचे आहे...जीवन सुखात ठेवून लाल रंगाचे स्फटिकाप्रमाणे चमकणारे मद्य घशाखाली रिचवून परीसम रमणीच्या बाहुपाशात राहून त्याला आयुष्याची सज्जा सजवायची आहे. जंगले, पर्वत, दऱ्याखोऱ्यातील बिकट वाट, जंगली हिंस्त्र प्राण्यांशी मुकाबला करून, समयी अन्यांच्याविरोधात लढाई करत तो आता प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यात आला आहे. दुर्गम टेकडीवरील प्राचीन मंदिरातील रुद्रकालीच्या मूर्तीवर...देवीच्या कपाळावर जडवलेलं एक अमूल्य असे झगझगीत हिरवे रत्न मिळविणे हे त्याचे आयुष्यभराचे ध्येय आहे. नंतर ते विकून त्यातून मिळणाऱ्या अफाट संपत्तीतून येणाऱ्या सौख्याचा त्याला भोग घ्यायचा आहे. कथेच्या सुरुवातीस नावाड्याला घाई करून सूर्यास्तापूर्वी हा प्रवासी नदीच्या काठावर उतरतो, दोन्ही बाजूंनी गर्द झाडी आहेत...त्यामधून पायवाट काढत तो टेकडी चढून मंदिरात येतो. निर्जन आहे आजुबाजूला सारे. तरीही मंदिरात त्या समयी दोन समया तेवत आहेत, ते पाहून त्याला किंचित नवलही वाटते. पण आता तो ते सारे विचार बाजूला ठेवत आहे आणि अत्यंत अधीरपणे तब्बल पुरुषभर उंचीच्या अष्टभुजा आणि नृत्यमुद्रेत असलेल्या रुद्रकालीच्या कपाळावर रुतून बसलेले ते आकर्षक हिरव्या रंगाचे रत्न पाहतो...बधीरच होतो त्या सौंदर्याने....जणू काही आपला प्राणच आता हिरवा होऊन त्याचे रुपांतर या रत्नात झाले आहे असे त्याला वाटते आणि देवीची नजर चुकवून हातातील लोखंडी दांड्याने तिच्या मस्तकावर प्रहार करतो आणि ते झपदिशी हातात आलेले हिरवे रत्न प्राणपणाने घट्ट पकडून ठेवतो.

पण आता त्याला हर्षासोबत विलक्षण अशी भीतीही वाटू लागली आहे. मूर्तीवर लोखंडी दांड्याने प्रहार केल्यावर तिचे मस्तक फुटले आणि रत्न जरी निखळले असले तरी आता तेथील पोकळीतून एक लाल डोळ्यांचा सर्प बाहेर येत

आहे. भीतीपोटी असेल वा अंगी निर्माण झालेल्या असहाय्य अशा संतापापोटी असेल, प्रवासी त्याच दांड्याने आता देवीच्या सर्पावरही त्वेषाने प्रहार करतो आणि त्याच भरात त्याचे तुकडेतुकडेही करून टाकतो. पण दुसरीकडे सर्पाच्या मृत्यूपाठोपाठ सभोवताली निसर्गाचा रुद्रावतार सुरू होतो. मंदिरात उत्पात घडतो, धरणीकंपाने देवतेची मूर्ती पूर्ण भंगते, बाहेर वादळ सुरू झाले आहे, विजेचा कडकडाट होऊन ते मंदिर पूर्णपणे कोसळते. ह्या कंपीत अवस्थेतही प्रवासी स्वतःला सुरक्षित ठेवण्याचा यत्न तर करतोच पण त्याचजोडीने त्याच्या दृष्टीने आता प्राण बनलेले ते रत्नही मुठीत घट्ट धरून ठेवतो....हाताला आधार म्हणून दुसरा हात तिकडे नेताना त्याला जाणवते की आपला हात अगोदरच कुणीतरी तितकाच घट्ट धरून ठेवला आहे. विस्मयाने तो पाहतो तर एक धिप्पाड आकृती तिथे आली आहे. हा आहे दंडदूत. त्याने प्रवाशाला चोरी करताना पकडले आहे. म्हणून त्याला पकडून न्यायाधिशासमोर आणले जाते. दंडदूत प्रवाशाला बंधक बनवून न्यायप्रासादात घेऊन आला आहे. त्याला बाकावर बसवून दंडदूताने आता तिथे खुंटीवर अडकविलेली मखमली पायघोळ वस्त्रे घातली आहे आणि तोच आता न्यायाधीश बनला आहे. प्रवाशाने चोरी केली आहे हे दंडदूताने पाहिले असल्याने न्यायाधीश प्रवाशाच्या अपराधाबद्दल देहांताची शिक्षा सुनावतात. शिक्षा सुनावल्यानंतर न्यायाधीश आसनावरून उठतात आणि वधकाची काळी वस्त्रे परिधान करतात...हातात तळपता परशू घेऊन प्रवाशाला समोर येण्यास सांगितले जाते कारण आता त्याचा शिरच्छेद होणार आहे. दंडदूत, न्यायाधीश, वधक या तिन्ही भूमिका एकाच व्यक्तीने करणे प्रवाशाला रानटीपणाचे वाटते. पण वधक त्याला आपले तत्वज्ञान सांगतो, "तू गुन्हा केला आहेस, दंडदूताने ते पाहिले आहे, रत्नचोरीची तू कबूलीही दिली आहेस. असे असताना तुझ्या एकट्यासाठी आता तीनतीन वेगळी

माणसे कशासाठी? तुझ्या अपराधासाठी तीन लोक नेमणे म्हणजे तू काही समाजावर उपकार केलेले नाहीस. शिरच्छेदासाठी तयार हो..." असे म्हणत वधक आपला परशू वर उचलतो. त्याचवेळी प्रवाशाला जाणवत राहते की आपला हात जरी पट्टीने मागे बांधलेला असला तरी आता ती वादी सैल झाली आहे, सुटत आहे. तो लगबगीने हालचाल करून ती सोडवितो आणि वर हात केलेल्या वधकाचे पाय ओढून त्याला खाली पाडतो आणि स्वतःच त्याचा वध करतो...झालेल्या घडामोडीमुळे तो आता खूप गडबडला आहे. एका पिशवीत ते हिरवे रत्न ठेवून ती कमरेला बांधून तसल्या अंधाऱ्या रात्रीतच तिथून तो बाहेर पडतो आणि पुढील प्रवासाला लागतो.

रात्रीचा प्रवास, तोही घनदाट अशा जंगलातून करताना प्रवासी थकून जातो. अंधारात त्याला आता एके ठिकाणी अग्नी तेवत असल्याचे दिसल्यावर तिथे कुणी तरी असेल आणि आपल्या भुकेल्या पोटाला काहीतरी मिळेल या आशेने तिकडे खेचला जातो. जवळ गेल्यावर त्याची भूकच मरून जाते कारण तो जाळ म्हणजे पेटती चिता आहे आणि अत्यंत तटस्थपणे पत्नीच्या देहाला स्वाहा करण्यासाठी भडकलेल्या अग्नीकडे पाहात एक बैरागी बसला आहे. इतकेच नव्हे तर त्याच चितेवर तो पीठाचे गोळे भाजून खातही बसला आहे, ते पाहून प्रवाशाला अगदी उन्मळून येते. त्याची भूक मरतेच. आता रात्र दाट झाली असून पुढील प्रवास तशा स्थितीत करणे शक्यच नसल्याने प्रवाशाला नाईलाजास्तव सकाळपर्यंत त्या बैराग्याच्या सहवासात थांबणे भागच असते. विषयांतर आवश्यक असल्याने प्रवासी बैराग्याला सहज विचारतो, "तुम्ही फार हिंडला असाल. फार पाहिलं असेल नाही?"....त्याला बैरागी उत्तर देतो, "दिसलं पुष्कळ, पण मला पाहता आलं नाही, घडलं पुष्कळ, पण जाणता आलं नाही, केलं पण फारसं उमगलं नाही. काही कण मात्र हाडात व्रणाप्रमाणे रुतले. सगळीकडे वेडाचे झटके येणारे तेच रक्त आहे,

सगळ्यांची शेवटी तीच राख होते, सर्व स्त्रिया अंधारात सारख्याच असतात. पशू म्हणून पाहिल्यास माणूस सर्वात बुद्धिमान पशू आहे, परंतु दैवी अंश म्हणून बघितल्यास त्याच्यापेक्षा हीन, क्षुद्र जीव नाही...". बैराग्याचे त्याचे असे अनुभवातून आलेले वा त्याने निर्माण केलेले तत्त्वज्ञान प्रवाशाच्या डोक्यावरून जाते कारण जीवनाविषयीची त्याची आसक्ती कमालीची आहे आणि त्यासाठीच तो आपला जीव धोक्यात घालून ते रत्न मिळविता झाला आहे. इथून पुढे तो बैरागी प्रवाशाला सकाळ होईतोपर्यंत काही कथा सांगायला सुरुवात करतो. त्या कथा कोणत्या आणि त्यांची बैराग्याने केलेली मांडणी ही मूळातूनच वाचणे महत्त्वाचे ठरते.

नव्या बांधणीतील कथा तसेच बैराग्याचे तत्त्वज्ञान ऐकून प्रवासी सकाळनंतर आपले मार्गक्रमण पुढे चालू ठेवतो. काही वेळानंतर त्याला दूर अंतरावर असलेल्या एका गावाच्या खाणाखुणा दिसू लागतात. गावाच्या प्रवेशद्वाराच्या अगोदर त्याला एक जटाधारी भेटतो. तो प्रवाशाला आपली ओळख एक गीतकार, कवी अशी करून देतो. हा गावातील लोकांच्या सुखदु:खांना, भूतकाळातील करूण आठवणींना, भविष्यातील आशाआकांक्षा, स्वप्नं, जणू काही स्वतःच अनुभवून आपल्या कविताद्वारे त्यांची मांडणी करत असतो. इतकी प्रखरता गावकऱ्यांना सोसवत नसते. त्याना सुख वा दु:ख पाण्यावरून सुळकन सटकणाऱ्या. माशाप्रमाणे हवे असते...तितकेच. जीवनाविषयीची गोडी कमी करून टाकणारे भविष्य लोकांना नको असते, पण जटाधाऱ्याच्या वाणीतील प्रखरता सहन होत नसल्याने त्यानी त्याला गावातून बाहेर काढले आहे आणि रानात त्याच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करून दिली आहे. आता तो एकटाच आहे. त्या वाटेने येणाऱ्या प्रवाशाला तो थांबवितो. प्रवासी आणि जटाधारी यांच्यातील संवाद जी.ए.कुलकर्णी आपल्याला जणू काही त्यांचीच जीवनदृष्टी, काव्याचे महत्त्व आणि प्रत्यक्ष जीवन यातली जादू उलगडून

दाखवितात. प्रवाशाच्या सर्व शंकांची जटाधारी उत्तरे देतो. एक महत्त्वाचा विचारही बोलून दाखवितो, "प्रत्यक्ष म्हणजे अगदीच क्षुद्र गोष्ट आहे. समिधेची अग्नीशी जेवढा संबंध तेवढादेखील प्रत्यक्षाचा सत्याशी संबंध नसेल. मी आहे एक कवी, माझ्यापुरतेच बोलायचं झालं तर जे शक्य आहे ते सत्य आहेच...". आपला नायक या तर्काला विरोध करतो कारण बैरागी आणि हा जटाधारी यांचे विचार रखरखीत सत्यसृष्टीत जगणाऱ्या प्रवाशाच्या पचनी पडत नाहीत. श्रेयसप्राप्तीची त्याला आस आहे...ते त्याचे साध्य आहे आणि त्याच्यासाठी करावी लागणारी साधना जीव पणाला लावून तो करीत आहे. जीवनसत्याची मांडणी ऐकून तसेच जटाधाऱ्याने तेथील झुडुपात अडकून पडलेले आणि भूकेने तळमळत असलेले कुत्र्याचे एक पिलू त्याच्या दोरीसह घेऊन प्रवासी आपल्या पुढील वाटचालीसाठी निघतो. यानंतर प्रवाशाला भेटतो तो एक शिकारी...जो आंधळा आहे. आपल्या कौशल्याने तो अचूक शब्दवेधाने सुरीच्या साहाय्याने शिकार करीत आहे. प्रवासी आणि शिकारी हा भाग एका स्वतंत्र कथेचाच विषय आहे. त्या शिकाऱ्याच्या महालात अडकलेला प्रवासी आपली कशी सुटका करून घेतो हे वाचणे फार रोमहर्षक आहे. दंडदूत, न्यायाधीश, वधक, पत्नीच्या चितेसमोर बसलेला बैरागी, प्रखर काव्य करणारा जटाधारी, आंधळा शिकारी हे प्रवाशासोबत बौद्धिक वादविवाद करून जीवनसत्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करताना दिसतात....शिकाऱ्याला तर पराभवामुळे जीवनभर जपलेले वा निर्माण केलेले तत्त्वज्ञान सर्वस्वी चुकले याची जाणीव होते...नैराश्येने तो फाटून जातो अगदी.....हा भाग विलक्षण प्रभावी उतरला आहे कथेत.

इथे संपतो कथेचा पूर्वार्ध.... शिकाऱ्याच्या कांडातून सुटका मिळालेला प्रवासी पुढे निघतो आणि इथपासून सुरू होतो या दीर्घकथेचा उत्तरार्ध. यापुढे कथानक लोककथेच्या शैलीत उतरले आहे. नायक एका शापित म्हटल्या जाणाऱ्या नगरीत आला आहे. गावावर अंगावर येईल अशी शोककळा पसरली आहे...सारे काही थंड, प्रेतवत झाले आहे. लोक आहेत पण भयभीत अवस्थेत आपला चिमूटभर बिनकिमतीचा जीव जपत...आपापल्या घराची दारे घट्ट बंद करून आत गुडूप पडून आहेत. काळोखातच आहे सारे विश्व. प्रवाशाला भूक लागली आहे तहान आहे. पण कुणीही त्याला दार उघडून या आत असे म्हणत नाही. कित्येक घरांच्या दारावर हा थाप मारतो, पण दार निर्दयी असल्याप्रमाणे उघडले जात नाही. बिनआतड्याचे हे असले मेलेले गाव पाहून संतापून प्रवासी आल्या मार्गाने परत जायला निघतो तर प्रवेशद्वार आपोआप बंद झाले आहे...त्याला या गावाखेरीज आता कुठलाच रस्ता नाही. शाप आहे गावाला असे तेथील एक वृद्ध प्रवाशाला त्यातूनही सांगतो...महाकाल आणि अकाल या दोन शासकांनी हे गाव आपल्या रेट्याखाली ठेवले आहे. रात्री वेशीतून कुणीही आत येऊ शकतो पण कुणालाही येथून बाहेर पडता येत नाही. बाहेरून आलेला परदेशी सूर्योदयापलीकडे जिवंत राहू शकत नाही. लाल राक्षस मनोऱ्यावरून खाली उतरतो व नव्या प्रवाशाचा शिरच्छेद करतो. त्यामुळे आपल्या नायकापुढे आता उपाशीपोटी मरायचे की शिरच्छेद होऊन प्राण सोडायचे एवढाच विकल्प उरला आहे.....

....प्रवासी समोर येणाऱ्या घटनांना सामना करण्यास तयार झाला आहे. इथून पुढे काय होईल वा होते....याचे प्रत्यक्ष वाचन तुम्ही सदस्यांनी "रमलखुणा" तून करावे अशी मी विनंती करीत आहे....

अनुभवाचे अनेक पदर वाट्याला आल्यानंतर ज्ञानप्राप्ती होते असे म्हटले जाते. प्रवाशाच्या भाग्यात जे काही येते ते पाहून खुद्द तोही संभ्रमीत होऊन जातो....त्याला वाटते, "इतरांचे प्रवास संपतात, रस्ता राहतो....माझ्याबाबतीत रस्ता संपला आहे....प्रवास मात्र चालूच राहाणार आहे...." ~ हे सारे विलक्षण आहे...जी.ए.कुलकर्णी यांची जादू.

सुनीळ सामंत: उलट मला असं वाटतं की अशोकजींनी जे लिहिलंय त्यातून त्यांनी इतरांना लिहायचा व विचार करायचा संदेश दिला आहे. - त्यांचं हे वाक्य वाचा- याना रुपककथा म्हणावे की दृष्टांतकथा की लोककथा की मिथक की प्रवासवर्णन?....याचे उत्तर ज्याने त्याने शोधायचे आहे.

इस्किलार आणि प्रवासी या दोन्हीही कथा म्हणजे चिंतनशील मनांना खाद्य आहे खाद्य. महेशजींनी जे म्हटलं(भले लिहिणं टाळलं असेल) की या कथेवर लिहायला बसलं तर एक पुस्तक होईल. अगदी खरं आहे. जसं भगवद्गीता या १५०० ओळींच्या पुस्तकावर लोकांनी(साध्या नाही, टिळक, ज्ञानेश्वर, शंकराचार्य, विवेकानंद अशा लोकांनी) खंडच्या खंड लिहिले तसंच या दोन कथा आहेत.

SHRINIWAS Hemade: हे वेधक व उत्तम आरेखन आहे...

जीए माझ्या आयुष्यात प्रथम आले ते ह्या "रमलखुणा" घेऊनच...

मी 15 व्या वर्षी वाचलेलं हे जीएंचं पहिलं लेखन...

नंतर मी अशाच अज्ञात प्रवासाला निघालो ते तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक म्हणून...

अजूनही प्रवास चालू आहे...

राहिलं तसाच

मला लिहायचंय कधीतरी ह्या पुस्तकावर...

विश्वेश्वर नांदेडकर: Paulo Coelho चे Alchemist हे जगात बेस्ट सेलर ठरलेली कादंबरी. मी वाचली दोनदा तरी. पण इस्केलार आणि प्रवासी या दोन्ही कथा त्या पेक्षा शंभर पटीने सरस आहेत.

मूळ पोर्तुगीज भाषेत असलेली कथा इंग्लिश मध्ये भाषांतरित झाली आणि जगप्रसिद्ध झाली. मूळ कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर पंचवीस वर्षांनी इतर भाषांत भाषांतरित झाल्यावरच त्या कथेचे महत्त्व जगाला कळले. तसेच कमीतकमी इस्केलर आणि प्रवासी कथेची भाषांतरे झाली तरी जी ए चे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात जाईल.

मनमोहन आंबेकर: आस्वादकांचा आनंदही विचारात घ्यावा.

Dayanand Misalkar: माफ करा !मला लिहण्याची ईच्छा आहे पण इतर ठिकाणी व्यस्त असल्याने नाही जमु शकले. मात्रं प्रवासी आणी रमलखुणा या दिर्घकथा म्हटल्या गेल्या तरी त्या दिर्घ क◌ादंबरी सारख्या आहेत. कारण जीए ची एक कथाच कादंबरीसारखी असते. असो. पण आपल्या सर्वांचे विचार मी मनपुर्वक वाचतो. 🙏

मनमोहन आंबेकर: त्यांच्या कथा देखील काव्य प्रमाणे असतात. तस्मात ही महाकाव्ये संबोधिता येतील.

विश्वेश्वर नांदेडकर: प्रवासी कथे बद्दल मनात जुळवाजुळव करत आहे. जवळपास प्रत्येक भाग एक स्वतंत्र कथा असल्यासारखी आहे. मग तो स्मशानात ला बैरागी aaso , की बोर खाणारा कवी ऋषी , किंवा आंधळा राक्षस आदी की एकमेकावर अवलंबून पण स्वार्थी कुटुंब ची गोष्ट आसो, किंवा hiryache सुधा स्वतंत्र कथानक आहे. त्यामुळे मनात लिखाणाबद्दल सुसूत्रता येत नाही ये. पण नक्की प्रयत्न करेन

परमजित सिंग: प्रवासी कथा वाचून खूप दिवस झाले. त्या वेळेस माझ्या एका मित्राला जी ए यांच्या कथेथ काही चूक अडली तर त्याला फार असुरी आनंद होत असे. कारण मला जो जी ए बद्दल अभिमान होता त्याला अस काही मिळाले की तो मला छळत असे. तर त्याचे असे होते की प्रवासी लां जंगलात एक साधू भेटतो आणि प्रवासी ला सांगतो की खूप दिवस झाले त्या झाडीत एक कुत्र्याचे पिलू अडकले आहे त्याचे कळवळले आता सहन होत नाही त्याला इथून घेऊन जा. आता लक्षात घ्या की प्रवासी त्या पिल्ला ला कडतो त्याच्या गळयात मोठी दोरी असते तो दोरी तोड नार असतो तेव्हां साधू सांगतो दोरी तोडू नको कारण मोठ्या दोरीत छोटी दोरी असते.

हे अश्या साठी सांगतो की पुढे त्या कुत्र्याला दाराच्या कोंड्या ला बांधल्या वर तो मध्ये कसा आला

त्या साठी जी ए नी दोरी मोठी ठेवली होती. कारण खूप माझ्या मित्रा सारखे हुशार असतात टीका करायला

पुढे तो बोलला की ज्यावेळेस शिकारी प्रवासी ला घेऊन जातो त्या वेळेस ते कुत्रा त्याच्या कुशीत असते आणि कुत्रा कधी शांत बसत नाही आणि शिकारी तर इतका हुशार असतो की आंधळा असून सुद्धा तो थोड्या ही हालचाली वरून ओळखो तो. तर कुत्रा सोबत आहे त्याला कसे कळले नाही

श्रीकांत देशमुख : 🙏 अगदी खरं. लिहीण्याची ईच्छा असतेच. तथापी ते लिखाण समुहातील अन्य अभ्यासु व्यक्तींच्या तुलनेत अनेकदा तोकडे वाटते. असो. प्रयत्न मात्र करुत.

परमजित सिंग: मला पुन्हा तेच सांगितले की जी ए बारकाईने वाचत जा एक तर तो कुत्रा फार दिवसा पासून उपाशी असतो त्याचे काही त्रान नसते.आणि शिकारी बरोबर जात असताना प्रवासी कुत्र्याला दोन तीनदा पोटात दबती पण कुत्रा हून की चून करत नाही. त्यावेळेस शेवटी शिकारी महनती आऊष्य भर भर मी माणसाचं च अभ्यास करत आलो पण आज एका ykishnthit स्वजातीशी वेर करणाऱ्या प्राण्याने मला फसवले

संजीव सावरगांवकर: बिनधास्त लिहित राहा, नवीन काहीतरी सुचत जाते. तुमचे विचार हाच तुमचा अनुभव असतो. आगे बढो, हम तुम्हारे साथ है.

# प्रसाद सांजशकुन – जी ए कुलकर्णी

विलास वाघोलीकर: प्रसाद - सांजशकुन -लेखक - जी ए कुलकर्णी

विवेचक - व्ही एस वाघोलीकर

-जीएंच्या अनेक कथांप्रमाणे , या कथेतही , एखादा ॲक्शन सिनेमा असावा ,तशा भराभर घटना घडत जातात. वाचक पुढे पुढे वाचत जातो.

-काही लोकसमजुतींच्या पार्श्वभूमीवर ही कथा घडते. सटवाईने लिहिलेले आपल्याला भोगावेच लागते. ते कितीही अचानकपणे घडो. पण ते निश्चित व अनाकलनीय असते , ही लोकसमजूत येथे प्रकट होते.

- कोठेही असला तरी प्रवाशाला सटवाईची चिठ्ठी मिळणार असते. देवळात सर्व पायघोळ बुरखेधारी पण डोळे उघडी असलेली, म्हणजे नेहमीची, अनोळखी, बिनचेहऱ्याची माणसे असतात. कथेतील प्रवासी मात्र साध्या कपड्यात असतो. त्यामूळे हा माणूस सटवाईकडे जाणारा आहे, हे ठरले आहे, हे पुजारी ओळखतो. पुढे या प्रवाशाचे काय होणार , हे पुजाऱ्याला, तसेच बैल पाण्याने धुणाऱ्याला माहित असते.( तसेच नंतर अन्न आणणाऱ्या महिलेला माहित …

सुनीळ सामंत: विलासजींनी अत्यंत उत्कृष्ट तऱ्हेने प्रसाद या कथेवरील चर्चेला सुरुवात करून दिली आहे. कथा थोडक्यात मांडली आहे. खरे तर या कथेचे संक्षिप्त रूप करणे अवघड. कारण प्रत्येक वाक्यातून कथा वळणे घेत, धक्के देत, पुढे जाते.

मी या कथेवर स्वतःचे काही लिहिण्यापूर्वी या कथेतील मला विशेष वाटलेली काही वाक्यं देत आहे.

१) येथे आपण प्रथम आलो याचे त्याला समाधान वाटले

२) त्या साऱ्या रांगेत साधे कपडे घातलेला तोच एकटा होता

३) तेथून बाहेर पडताना त्याला कोणी दिसले नाही

४) त्याला समोर पाहताच पुजाऱ्याच्या हातातील ताम्हण खडख्ड करत खाली पडले

५) वृद्ध अगदी भिंतीला टेकून थरथरत उभा राहिला

६) तसली माणसे येतात मधून मधून. मी तुला बऱ्याच वेळा पाहिले आहे. पण पूर्वी कधी इकडे फिरकला नव्हतास. तू यायची वेळ झाली नव्हती.

७) त्या माणसाने कागद उघडून पाहिला तेव्हा त्याचे तोंड एकदम सैल पडले व डोळे बी दाबून टाकल्याप्रमाणे बाहेर येऊ लागले. तो धावत गेला व एका झोपडीत सरपटत जाऊन दार लावून घेतले. इतर माणसेही नाहीशी झाली. दोघांनी धुळीत खेळत असलेल्या पोरांना आपल्याबरोबर दरदरत नेले.

८) तिथे तुला तुझी जखाई भेटेल

९) आपली अशी ही जखाई कोण

१०) अखेर एकदाचा तू आलास मी सुटले

११) तिच्या नृत्याची लय वाढली. पेटत्या जिभांनी लपेटलेली जखाई, एक कुरूप भीषण सांगाड्यासारखी स्त्री होती, ही गोष्ट त्या उसळत्या अग्नीत जळून गेली.

१२) तिने वाचल्यामुळे कागद स्वच्छ झाला आहे

१३) ती माणसे प्रेमळ आहेत ती तुझ्याशी विचित्र वागली कारण त्यावेळी तुझ्या जवळ तो कागद होता

१४) सुदैवाने माणसाची भूक माणसा इतकी मानी नसते

१५) वेळ जायला माणसाने काही करायची गरजच नाही तू स्वतः काहीतरी केलेस तरच वेळ जातो नाहीतर तो मोरीच्या पाण्याप्रमाणे तुंबून राहतो असे नाही,

१६) सारे आयुष्य रत्नखचित असावे हे भाग्य तुला मला कसे भाग लाभणार?

१७) मी प्रश्न विचारू शकतो पण उत्तराचा अर्थ मात्र मला समजत नाही

१८) ज्या प्रश्नाला नेमके एकच उत्तर असेल तो प्रश्नच नव्हे

१९) तुला स्वतःला पाय नसतील पण कदाचित तुझे शब्द फार दूरच्या प्रवासाला निघाले असतील

२०) तेव्हा तर सगळे शब्दच संपल्याप्रमाणे तो कोरडा झाला व स्वतःमध्येच हरवून गेला.

सुनीळ सामंत: सांजशकुन या कथा संग्रहातील कथांचा क्रम हा लेखनकाळानुसार नाही. इतर अनेक प्रकारांनी क्रम समजून घ्यायचा प्रयत्न केला. तेव्हा मला असे वाटले की या कथांमधे शून्यवाद, ते अस्तित्ववाद असा प्रवास आहे. अस्तिस्तोत्र ही कथा जीवाची निरर्थकता दाखवते तर अखेरची अहम ही कथा जीवनाच्या विजयाची कथा आहे.

प्रसाद ही कथा अंताकडची आहे. म्हणजे यातही आशावादाची झलक आहे. ती झलक दाखवणारे शब्द - तुला स्वतःला पाय नसतील पण कदाचित तुझे शब्द फार दूरच्या प्रवासाला निघाले असतील

महेश आफळे: प्रसाद ही कथा मला एका अर्थाने कायम(त्यांच्या इतर काही कथांप्रमाणे)जी एं ची पारलौकिक आत्मकथाच वाटते(जशी लौकिक आत्मकथन म्हणजे उदा माणूस नावाचा बेटा)

पाय असोत वा नसोत,ज्याला कुठे प्रत्यक्ष न जाताही जागीच विश्व भ्रमंती करता येते,त्याच्यासाठी पाय असून नसून सारखेच

आपल्या हातात प्रसादाचा कोणता अगम्य लिपीबद्ध कागद टेकवला गेलाय याची सुस्पष्ट धारदार जाणीव असली की असा कलावंत आणि त्याचे शब्दधन फार दूरच्या प्रवासाला निघालेले असतात,जिथे इतरांची नजरदृष्टीही पोचणार नाही इतक्या उंचीवर...

या प्रसादासाठी निवड होण्यासाठी फार दुर्मिळ भाग्य लागते हे जी एं ना म्हणूनच नेमके माहीत होते

इतर असंख्य लेखक "शिऱ्यासाठी"हात पुढे करत असताना जी एं नी आपल्या हातावर ,लेखणीवर टेकवला गेलेला प्रसाद ज्या निगुतीने जपला ,(आणि स्वतःवर प्रसादकृपा होऊनही आपली कथा अंतस्थ अर्थाने प्रासादिक वा सहजसाध्यही होऊ दिली नाही) त्याला तोड नाही

शिवाय प्रत्येक अस्सल लेखक एकच एक कथा लिहीत असतो,या अवतरणाचे डंखमर्म नेमके माहीत असल्याने मागे मी"स्वामी"वरची पटकथा लिहिली, तेव्हा त्यात अनामिक-ठिपका-प्रसाद-प्रवासी याही कथा आंशिक रुपात सरमिसळ झाल्यात

जी एं च्या एकूणच कथेचे जे चेटूक(निव्वळ भानामती किंवा गारुड नव्हे) वाचकमनाला ग्रासून राहते,ते बघताना आठवत राहते प्रसाद मधील" चेटूक देवता जखाई"

जी एं ची कथा वाचताना ही जखाई वाचकमनात आपसूक प्रवेशते आणि मनातील हिंदोळे आंदोलने यांची अगम्य अगणित वर्तुळे पूर्ण करत मनाच्या केंद्रबिंदूत कथेतील जखाईप्रमाणे शून्यवत होऊन गर्गरु लागते

आणखी एक वेगळी गंमत. कथेत प्रसादाचा कागद चिठोरा आहे,पण जखाई चे तीर्थ देखील आहे, ते जिथे पडले तो भाग आपसूक निर्जीव होतो

तीर्थ म्हणजे जीवनाचा सारांश किंवा लसावि असे तर जी एं ना अभिप्रेत नसावे?

दिलिप बडे: प्रवाशाने स्मशान गावापर्यंतचा प्रवास केला.त्याला अपंग भेटला. प्रवासी व अपंग यांच्या संवादातुन काही जिवनभाष्ये प्रकटझाली.ती म्हणजेच प्रसाद 1) तिचे डोळे -ते मात्र निळसर नसावेत.निळे डोळे रिते वेडसर वाटतात.हरिणीच्या मांडीवर सुर्यप्रकाश पडला की जो धुंद तपकिरी रंग दिसतो तसे ते असावेत आणि त्यातही ती असावी केवळ मादी!केवळ आपले ऊष्ण रक्त.मदिर शरीर यांच्या इशार्यांनी जगणारी;आत्मा,मन,पापपुण्य असल्या कोळीष्टंकापासुन स्वच्छ असलेली एक निरंजन, केवळ स्रि!

2)मला कवने लिहीता येतात थोडी पण त्या ओळीचा अर्थ मलाच समजत नाही.अर्थ नाही समजला तरी कधीतरी तुझी एखाददुसरी ओळ डोळे ऊघडेल आणि ओळखीने पाहिलही.कवने ती देखील तुझ्यात आटली तर समोर पुष्कळ घडते त्यात विरून जा किंवा त्याला तरी तुझ्यात विरू दे

3)हे जे सौंदर्य दिसते ते आपण निर्माण करत नाही की मुद्धाम अनावृतही करत नाही.ते आपल्यामधून परावर्तीत होते एवढेच.(म्हणजे विश्वातील सर्व आनंद व दुःखाची निर्मिती ही व्यक्ती सापेक्ष ठरते)मनाचा - विचारांचा prism जितका पारदर्शी - स्वच्छ तितकी रंगाची ऊधळण चकचकीत.जी.एं.नी हे वैश्विक सत्य आपल्यासमोर ठेवले आहे.जसा आपला कॅमेरा तसे आपले फोटो.4)खरा प्रश्न अनेक ऊत्तरे स्वतःच्या चेहर्यावर घालुन पहात असतो आणि तसल्या प्रश्नाना अंतिम ऊत्तरच नसते.मी सारखा प्रश्नच विचारत राहणार आणि इथे येणारा पिंगळा सतत ऊत्तरेच सुचवत राहणार.

सुनीळ सामंत: महेशजींनी दिलेला धागा पकडून पुढे लिहीत आहे. जी एं ची पारलौकिक आत्मकथाच वाटते हा तो धागा,

या साऱ्या रांगेत(हेतूसाठी लिहिणाऱ्या लेखकांच्या) तोच एकटा साधे(स्वतःचे नेहमीचे) कपडे घातलेला होता. रांगेतून बाहेर पडताना त्याला कोणी दिसले नाही. त्याला पाहून पुजारी(समीक्षक? नेहमीचे वाचक?) गडबडला. त्याने पुजाऱ्याने त्याला जखाईकडे धाडले. टाळले. ती जखाई त्याचे पत्र वाचून मुक्त झाली. आणि हा मात्र कायमचा जमिनीला जखडला. पाय नसतानाही प्रवासाला तो निघाला. पण शेवटी शब्दच संपले व तो कोरडा झाला.

जीएंची ही कथा १९७४ ची आहे. त्यानंतर साधारण २-३ वर्षांत त्यांनी कथा लेखन थांबवले असावे. कारण मी तरी त्यांच्या १९७६ नंतरच्या कथा(स्वतःच्या) वाचलेल्या नाहीत. पिंगळावेळ आणि रमलखुणा दोन्हीही १९७५-७६ मधल्याच.

सारे आयुष्य रत्नखचित असावे हे भाग्य तुला मला कसे भाग लाभणार? - या वाक्याचा अर्थ या संदर्भात लागतो.

पण जखाईने वाचल्यामुळे कागद स्वच्छ झाला व ती माणसे प्रेमळ आहेत ती तुझ्याशी विचित्र वागली कारण त्यावेळी तुझ्या जवळ तो कागद होता. या वाक्यांचा अर्थ मात्र स्पष्ट होत नाही.

असो. आपल्याला तरी जीऐंचे पूर्ण आयुष्य कुठे माहिती आहे? त्यांच्या कथा, पत्रे आणि आख्यायिका यांच्याद्वारे जे समजले त्याच्या आधारे फ़ार काही लिहिणे व निष्कर्ष काढणे अयोग्यच. थांबतो.

दिलिप बडे: हा पिंगळा पहाट होताच निघुन जातो.हे झाड बोलत बसायला ठिक आहे.पण रहायला मात्र दुसरे झाड हवे असे त्या पिंगळयाला का वाटते, मग हिवाळयात स्वच्छ चांदण्यारात्री भिंतीपलिकडील निवडुंगाच्याही मागून कुठून तरी अत्यंत नाजूक कोवळा वास येतो.व तो वास येत असता झोपणे देखिल अपवित्र वाटू लागते.त्या वेळी ईच्छा होते-एखादा रंगीत मऊ पक्षी,अगर नुकतेच जन्मलेले शुभ्र वासरू ऊचलुन आपल्या ऊघड्या छातीशी धरावे.2)कवने लिहिणारा प्रवासी,अशा अनेक जागा प्रत्येक कथेत असतात.वाचताना अशा जागा जेंव्हा जेंव्हा भेटतात.तेंव्हा जी.ए.स्वतः आपल्याशी बोलत आहेत असा भास होतो.अशा वेळी आपले मन आनंदाने-सुखसवेंदनांनी भरून वाहते.

महेश आफळे: जी एं च्या हाती नियतीने सोपवलेला कागद इतका अद्भुत होता की यासाठी आपली निवड का झाली नाही याची जणू खंत(वा मत्सर) वाटत असल्याने बाकीच्या साहित्यिक विश्वाने त्यांना जणू वाळीतच टाकले,बहिष्कृत केले(कारण जी ए हे जी एं च्याच भाषेत लिहीत होते

त्यामुळे जी एं ना आपल्यात घ्यायचे नाही हे"त्यांचे"जणू पक्के ठरलेले असावे

शिवाय, ज्या गावी आपल्याला जाता येत नाही,तिथे आपल्याला मुळी जायचेच नव्हते असा पवित्रा घेणे सोयीस्कर असतेच ना?)

प्रसाद ही कथा मला एका अर्थाने कायम(त्यांच्या इतर काही कथांप्रमाणे)जी एं ची पारलौकिक आत्मकथाच वाटते(जशी लौकिक आत्मकथन म्हणजे उदा माणूस नावाचा बेटा)

पाय असोत वा नसोत,ज्याला कुठे प्रत्यक्ष न जाताही जागीच विश्व भ्रमंती करता येते,त्याच्यासाठी पाय असून नसून सारखेच

आपल्या हातात प्रसादाचा कोणता अगम्य लिपीबद्ध कागद टेकवला गेलाय याची सुस्पष्ट धारदार जाणीव असली की असा कलावंत आणि त्याचे शब्दधन फार दूरच्या प्रवासाला निघालेले असतात,जिथे इतरांची नजरदृष्टीही पोचणार नाही इतक्या उंचीवर...

या प्रसादासाठी निवड होण्यासाठी फार दुर्मिळ भाग्य लागते हे जी एं ना म्हणूनच नेमके माहीत होते

इतर असंख्य लेखक "शिऱ्यासाठी"हात पुढे करत असताना जी एं नी आपल्या हातावर ,लेखणीवर टेकवला गेलेला प्रसाद ज्या निगुतीने जपला ,(आणि स्वतःवर प्रसादकृपा होऊनही आपली कथा अंतस्थ अर्थाने प्रासादिक वा सहजसाध्यही होऊ दिली नाही) त्याला तोड नाही

रेखा दातार : 'प्रसाद' - G A Kulkarni

शाळकरी वयात असतांना छापलेले काहीही दिसले की ते वाचायचा छंदच जडला होता. त्या वेळी G A चे 'रमलखुणा' हाती आले. थोडे फार वाचल्यावर लक्षात आले की अरे हे तर काहीच कळत नाहीये. G A वाचायचे ते वय नव्हतेच बहुतेक. पण त्या मुळे G A म्हणजे अवघड काहीतरी असे समीकरण मात्र डोक्यात बसले. त्या मुळे त्यांच्यापासुन जरा लांब लांबच रहायला लागले. आत्ता सुध्दा फार कळते अशातला भाग नाही, पण 'प्रसाद ' वाचल्यावर जे काही मनात आले ते

लिहायचा पहिलाच प्रयत्न. बरोबर का चूक माहित नाही पण जे वाटले ते लिहीले आहे एवढे मात्र खरे.

देवळात माणसे आत जात होती पण बाहेर येत नव्हती त्या अर्थी ते मृत्यूद्वार असावे.आत जाणाऱ्या इतर माणसांची शरीरे डोळे सोडल्यास काळया कपड्यांनी झाकली आहेत. ही काळी वस्त्रे म्हणजे त्यांची कृष्णकृत्ये असावीत. ती लपवायलाच त्यांचे चेहेरे पण झाकलेले आहेत.साध्या कपड्यातला हाच एक. साधे कपडे त्याच्या सरळपणाचे प्रतिक. पुजाऱ्याने दिलेली चिठ्ठी म्हणजे याचा पापपुण्याचा आत्तापर्यंतचा हिशोब. तो दाखवल्यावर मिळणारा प्रसाद म्हणजे कर्मफळ.पाप - पुण्याचा हिशोब ज्याचा त्याला चुकता करावाच लागतो. या जन्मात नाहितर पुढच्या जन्मात. आपले नशीब आपल्याला कधीच वाचता येत नाही , त्या मुळे हातातल्या कागदावरची भाषा त्याला अगम्य. ती सटवाईची भाषा तीनेच लिहीली आणि तीच वाचणार.

जखाईच्या वाड्यात गेल्यावर भींतींवरची भीषण चित्रे आत्तापर्यंत आपण ऐकत आलेल्या नरकाच्या वर्णनाशी मिळती जुळती. होडीतुन जाणारी माणसे, कढईत बुचकळली जाणारी माणसे म्हणजे आधी भेटलेली काळया कपड्यातली माणसे असावीत. आपल्या पापकर्मांमुळे आता नरकयातना भोगणारी. जगात यांची संख्या जास्त असते. पापी लोकांना नरक व पुण्य संचय केलेल्यांना स्वर्गाची दारे मोकळी असा साधा सरळ हिशोब. पण जखाई ह्याचा कागद परत देते तेव्हा तो कोरा असतो. म्हणजे याच्या नावे पापही जमा नाही आणि पुण्यही जमा नाही. पाप पुण्याचा हिशोब बरोबर म्हणुन याचा कागद कोरा. पण मग म्हणुन याला नरक नाही पण याच्यासाठी स्वर्गाची दारे पण उघडी नाहीत. तीच स्थिती बाहेर भेटलेल्या अपंगाची. ना धड स्वर्ग ना नरक , मधल्या मधे लटकणाऱ्या त्रिशंकू सारखी दोघांची अवस्था.त्यात जखाईने पाणी टाकल्याने पायही निकामी झाले आहेत. त्या मुळे प्राप्त परीस्थितीत

रहाण्यावाचुन काही गत्यंतर नाही. हे दोघे इथे आहेत म्हणजे नरकात गेलेले नाहित. म्हणजे वाईटही नाहित म्हणुन गावकरी त्यांची काळजी घेत आहेत.

' तू स्वतः काहीतरी केलेस तरच वेळ जातो नाहितर तो मोरीच्या पाण्याप्रमाणे तुंबुन रहातो असे नाही ' असे म्हणुन GA सुचवतात की तू कर्ता नाहीस आणि करविताही नाहीस. सर्व घडवणारा तो सर्वशक्तिमान परमेश्वर आहे.'रे तुझ्या वाचुन काही येथले अडणार नाही' जग चालतच रहाणार. अपंग सांगतो हे आयुष्य माहणजे एक कोडे आहे. आकाशाचा रंग निळा का? आणि झाडाची पाने हिरवी का ? अशा सारखी कोडीच तर माणुस जन्मापासुन सोडवीत आला आहे.आधी प्रश्न , मग त्याचे उत्तर आणि मग त्या उत्तरातुन अजुन एक प्रश्न..... असे सोपे-कठीण प्रश्न सोडवत बसणे हेच माणसाचे जगणे.

रात्र आणि पहाटेच्या सीमारेषेवर पिंगळा झाडावर बसुन बडबड करतो आणि अपंग त्याच उत्तर शोधत बसतो. खर तर ना धड रात्र ना धड पहाट अशी ती कातर करणारी पिंगळावेळा म्हणजेच अपंगाची आणि ह्याची आजची स्थिती!पण अपंग आशावादी आहे. गावकरी लोक चांगले वागवतात, अन्न देतात अशा छोट्या छोट्या गोष्टीत समाधान मानण्याची त्याची वृत्ती आणि कधी ना कधी ही पिंगळावेळा संपुन पहाट होइल हा त्याचा आशावाद त्याला जगण्याचे बळ देतात आणि ह्या मुळेच तो अजुनही निटनेटका दिसतो. अपंगाचा हात हातात घेतल्यावर हाच आशावाद ह्याला पण जाणवायला लागतो आणि नैराश्याचे मळभ दूर व्हायला लागते.

॥ श्री ॥



कथा: प्रसाद कथासंग्रह: सांजशकुन लेखक: जी.ए.कुलकर्णी
प्रथम प्रसिद्धी: सत्यकथा ऑक्टोबर १९७४
आस्वादक: संजीव साबरगांवकर.

प्रसाद.

वेदांचा तो अर्थ। नेत्याने लवावा॥
अतीताचा ठेवा। विलक्षण ॥
रेखियल्या कथा। मूळाची, पुराणी॥
समाज जीवनी। पानोपानी ॥
विठ्ठलाने दिले। डोळे वाचण्याला॥
कृतार्थ हा झाला। जीव आता ॥

"वेदांचा" या शब्दाऐवजी जी.ए. शब्द वाचा. तुमची आमची अवस्था जी.ए. वाचतांना अशीच होईल. जी.ए. अशा कथांचे लेखक म्हणून आपण त्यांच्यावर खुश तर त्यांच्या कथांचे अनेक वेळा वाचन करून, प्रत्येक वेळेस आपणांस एक नवा अर्थ, वाचन आयाम मिळाला म्हणून आपण स्वत:वर खुश.

पण जी.ए. व्यक्ती म्हणून, त्यांच्या कथांवर, कथासंग्रहांवर लिहितांना लेखक न राहता केवळ वाचक व्यक्ती होतात. त्यांच्या प्रतिभेला दरवेळेस वेगळ्या वाटा.

ते सांजशकुन बाबत लिहितात

"एका असमाधानी वृत्तीने मी या कथांचे लेखन केलेले आहे. त्यांच्या मते केवळ senses म्हणून आपणाला (त्यांना) ज्ञान होते ही समजूत (आता, सांजशकुन लिहून झाल्यावर) डळमळू लागली आहे. Natural व Supernatural (म्हणजे आपल्याला अद्याप ज्ञात न झालेले नॅचरल) यातील अस्पष्ट व नि:संशय सीमेवरील घटनांविषयी एक Obsession त्यांना फार पूर्वीपासून आहे (होते)

जी.ए. पुढे म्हणतात (लिहितात) कि मी आता थोडे सांजशकुन या संग्रहाविषयी लिहिणार आहे. जर कधी काळी मी माझ्याच लेखनाविषयी जाहीर पण लिहिलेच, तर मी या एका कथासंग्रहाविषयीच

माणसे आहेत, पण क्वचितच त्यांना नावे आहेत.
अशा प्रकारच्या कथा म्हणजे अर्थ पुरता सापडत नाही पण काही पाऊलखुणा मात्र ओळखीच्या वाटतात (प्रसाद कथेवर हेमलता अंतरकर यांना लिहिलेल्या खाजगी पत्रातील विवेचन गोषवारा)

संदर्भ
श्री.ग्रं.चौधरी
खंड ४

या Perspective मधून 'प्रसाद' कथेचा आस्वाद घेतांना हे निश्चित पणे जाणवते कि लोकांची जीवननियती सटवाईने पाचव्या दिवशीच लिहून ठेवलेली असते. सामान्य माणूस त्याचे आयुष्य जगतांना "देवाचे देणं म्हणजे प्रसाद" म्हणत आयुष्य अनुभवत, खाचखळगे पार करत जगत असतो.

आपल्या प्रसाद कथेच्या नायकाचा तरी काय जीवन सारांश आहे. साधे कपडे घातलेला एक सामान्य माणूस. कोण्या एका आतड्याच्या नातलगाने देवळातील प्रसाद आणावयास सांगितलेले म्हणून गावात पुजाऱ्याकडे येतो. ती नातलग म्हातारी झालेली आहे व तिची ही छोटीशी इच्छापूर्ती करण्याचा त्याचा मानस आहे (A sort of ethical duty) या एका क्षुल्लक कारणाकरीता त्याचा प्रवास सुरु होतो व तो गावात येतो (कायमचा!)

प्रसादाकरीता ओघानेच मंदिर प्रवेश, पुजारी भेटणे, सर्व व्यक्ती काळ्या कपड्यात झाकलेल्या (कदाचित इतरांच्या मृत्यूनियत्या) साधे कपडे घातलेला हा नायक, एकटाच रांगेच्या बाहेरचा देव दर्शन व प्रसाद घेऊ इच्छिणारा साधक. मनकवडीत भुते असतांना मंदिर प्रवेश होणे व अशा वेळेस त्याचे मागे कोणीच नसणे (त्याच्या अदृश्य नियतीशिवाय) हेच त्याच्या विधीलिखितातल्या वहीचे पहिले पान होते.

सामान्य शिरस्त्याप्रमाणे बंद गाभाऱ्यातून डोळे भरून नमस्कार केला व प्रसादाची अपेक्षा करत प्रसादासाठी पुजाऱ्यासमोर हात पुढे केला. पुजाऱ्याला (नियतीचे एक प्यादे) तो त्या वेळेस त्या क्षणी तेथे अपेक्षीत नव्हता म्हणून पुजारी त्याला टाळण्याचे हिशोबाने म्हणतो "गाभारा बंद झालाय. तीर्थप्रसाद ही संपलाय आणि तू कधी

४।८।२२

(इथे) येईल असे मला वाटत नव्हते. नायक मात्र हट्टाने म्हणतो कि मी प्रसाद घेतल्याखेरीज हलणार नाही. आणि येथून त्याच्या नियतीचा खेळ चालू होतो.

पुजारी (ठरल्याप्रमाणे) गाभाऱ्याजवळ असलेल्या पेटीत हात घालून घडी घातलेला एक कागद, चिठ्ठी देतो व सांगतो आता तू गावातच "प्रसाद" घे, ती चिठ्ठी कोणाकडून तरी वाचून घे (अगम्य भाषेतील त्याला न समजणारी भाषा) म्हणजे प्रसाद कुठे मिळेल हे तुला समजेल. त्याच्या आधीच्या सर्वांना पुजारी मंदिरात येऊ देतो, देवदर्शन घेऊ देतो, कदाचित प्रसादही देतो आणि मागील दाराने सर्वांना बाहेरही जाऊ देतो. मग त्यालाच ही अडचण का? त्याचे विधीलिखीत काय? खरे हा प्रसाद स्वतः करिता ही मागत नसतो, मंदिराला भेट दिल्याचे प्रतिक, देवावरील नातेवाईकाची व त्याची श्रद्धा व पारंपारीक रुढीने प्रसाद प्राप्तीची त्याची सामान्य इच्छा डावलली का जाते? असे अनेक प्रश्न पुजाऱ्याने प्रसाद देण्याऐवजी चिठ्ठी देऊन (वाचकाकरीता) निर्माण केले आहेत.

गावात हाच एकटा त्याचे वेगळेपण प्रकटन घेऊन आगळावेगळा टिळा लावल्यासारखा जेव्हा तो चिठ्ठी वाचून दाखवा म्हणून गावकऱ्यांना विनंती करतो, तेव्हा हा कोणी माहीत नसलेला माणूस पाहून घाबरून त्याला टाळतात व मदत न करता पळून जातात. त्याला न मिळालेल्या मदतीने तो भांबावून गेला, भयभीत झाला, त्याला धोक्याची जाणीव झाली भेडाकून गेला व जेव्हा गावातील शेवटची झोपडी मागे पडली तेव्हा मात्र गाव (डोळे गाव) त्याच्याकडे नजर लावून पाहत होते.

मिळालेली ती अवाचनीय चिठ्ठी अगम्य भाषेत लिहिलेल्या तीन ओळी, गिचमीड सही, पुजाऱ्याचे "स्वगत" लसतो भागात येतात मधून मधून (म्हणजे कसलीही), मी तुला पूर्वी बऱ्याच वेळा पाहीले आहे, पण (तू) पूर्वी कधी इकडे (देवाईकडे) फिरकला नव्हतास

"तू मायची नेकच झाली नव्हती" मग जर हे त्याचे अटळ होते, प्राक्तन होते, तरीही तो पुस्तकाच्या ओढीने का इथे आला! त्याची नियती त्याला इथे का घेऊन आली? या बाबत जी.ए. वाचकाला ~~संभ्रम~~ संभ्रमात टाकतात. शेवटी ज्याचे त्याचे नशीब निश्चित ठरलेले असते या तत्त्वानुसार तो कुठेही असता तरी त्याला चिठ्ठी मिळालीच असती व कारणानिमित्त हा खून!च झाला असता हे निर्विवाद सत्य अटळ होते.

गुडघ्यावरती पांगळा झालेला दुसरा प्रवासी (पहिला प्रसाद इच्छुक) आता स्थानिक आश्रय व गजाळ्याच्या बुद वस्तुंकात फिरतोय. तो मात्र ही चिठ्ठी वाचून खरवाईचा पत्ता (चिठ्ठी वाचणारी व्यक्ती?) व ती तुझी चिठ्ठी वाचेल अशी माहिती देतो. नायकाचे दैव त्याला खरवाईच्या दरवाजात आणून सोडते ते एका पांगळ्या, हलू न शकणाऱ्या माणसाच्या सांगण्यावरून.

खरवाईबाबत गावकरी अनभिज्ञ होते असे नाही पण तीचा एक भितीदायक दरारा (गावाला दिलेल्या प्रसादामुळे) या पांगळ्याद्वारे अनुभवत आहेत. तो माणूस पांगळा झाला तरी गाव त्याला निसटू देत नाही (कारण गावातील ३ मुले मरतील?) तसेच त्याला समाजातही घेत नाहीत कारण सगळ्यांचे पाय तसेच (खुरटलेले) होतील हे गावप्राक्तन त्याच्यासह गावाला माहीत आहे.

इथे वाचक म्हणून मला एक प्रश्न आहे. हा पांगळा माणूस, गुडघ्यावरती पाय वाकलेला हा हे नायकासारखा असाच जुन्या काळ घटने तून, भुतकाळात वावरलेला पहिला (१) प्रसाद सूचक आहे का? सध्याचे शारीरिक व्यंग घेऊन गाळकिडयानं राहतो आहे तर त्याला सुद्धा "त्याची खरवाई" भेटली असणारच आहे. व असेच त्याच्या बाबत घडलेले असणारच कारण आपला कथानायक जेव्हा खरवाईच्या घरात जायला निघतो तेव्हा हा पांगळा माणूस त्याला सांगतो "त्या ठिकाणी जे घर आहे तिथे तुला तुझी

भेटलो. या वरून प्रश्न हा की पंगाळ्यालाही त्याची नरवाई भेटली होती का? कारण नायक ज्यावेळेस नरवाईला भेटण्यासाठी, त्याच्या हातातील कागद तिच्याकडून वाचून घेण्यासाठी भेटण्याची इच्छा प्रकट करतो, परवानगी मागतो व दरवाज्याला उभा राहतो तेव्हा नरवाईच्या घरातून भूतावळ प्रमाणे "मग आत ये" हा आवाज येतो (नरवाईचाच असावा, असणार). दरवाजा उघडला जातो. सुरुवात गोरेगोरे दोन हात बाहेर येतात, निंबाची पाने टाकलेले परातभर पाणी त्याच्या पायावर फेकले जाते, गुडघ्यापर्यंत पाय ओलसर झाले तरीही तो वाकून बिचकत आत येतो. नरवाईने कागदासाठी हात पसरला व त्याने कागद तिच्या हातात देताच २,३ नखरेवाइक स्त्रिया (कदाचित भविष्यातील नरवाया) जेव्हा तिच्या जवळ आल्या त्यावेळेस ती ओरडली "ज्या मेंढ्यांनो, अजून तुमची वेळ आलेली नाहीये" (आणि कागद वाचून सगळी मुक्त होण्याची वेळ मात्र आली आहे हा नरवाईचा विचार व निश्चितीकरण).

कागद वाचताना आल्याने नरवाईकडे कागद आणल्याचे त्याचे प्राक्तन तर कागद हातात घेऊन तो वाचून, कोरा करायचे नरवाईचे प्राक्तन बरोबरच त्या नियती माध्यमाचा शेवटचा उपयोग करून घेत नरवाईची सुटका (अखेरचा (किंवा तू आलास, मी सुटले) या सर्व घटनेला लागलेल्या वेळात नायकाला नरवाईच्या घरातील नरकयातना पहिल्याचा एक कोरा करकरीत व घाबरवणारा अनुभव सुन्न करून जातो. नरवाई अंतर्धान पावते व तो बेभानपणे धावत सुटतो व गुलमोहराखालील अपंग हिसळ्यावर (त्याच्या पायातील) शक्ती जाते व धुंदीत पडतो.

नरवाईने तो कागद वाचला. जो तिचे मुक्तीपत्र होते. व कागद कोरा झाला. हे जेव्हा नायकाला समजते तेव्हा तो अपंगाला विचारतो "मग मला का नाही सांगितला, तो वाचलेला मजकूर".

या क्षणापासून अपंग नायकाचा नियती पुढे होतो. नाहीतर एरवी लेखकाने त्याचे तोंड

(६)

हे वाक्यच दिले नसते. " तुला जर तिने तो सांगितला असता तर तूच जगाला असता मजाही प्रमाणे आणि ती राहिली असती कायम भुता प्रमाणे" कारण कणाद म्हणजे सरकारांच्या मुक्ती हेच होता. हा मात्र गाव वेशीत, गावातील नागरिकांच्या नजरेच्या तिरस्काराने, गाव चौकटीत कायमचा अडकलेला राहिला.

नायक व अपंग यांच्यामधील या पुढील संवाद हा लेखकाच्या आवडतारखेद, तो त्यांनी नेहमीसारखाच खुलत ठेवलेला आहे.

नायकाच्या ह्या कथेतील हा प्रसाद चिठ्ठीचा अनुभव ही काही एखादी घटना नाहीए तर ती एक माणसाची मनोवृत्ती आहे. मात्र माणसाला माणूस म्हणून जगताना अटकपणे जे भोगावे लागते ते या कथेचा विषय होऊन बसते. गोष्टीचा अर्थ पकडण्यासाठी एक फार्स म्हणजे कथेच्या ओघात वातावरण निर्मिती साठी केलेली वाक्यरचना होय. काही वेळा सुरुवातीचे काही सापडत नाही तर काही वेळा काहीतरी सापडल्याचा भास होतो इतकेच. वाचकाला ज्या वेळेस अर्थ समजतो असे वाटते त्या वेळी संपतो तो माणूस. विचार व आयुष्य नव्हे.

नायकाला शेवटी नियतीपुढचा अपंग म्हणतो, तू पत्र फाडून टाकले असतेस तरी तू प्रवासास निघाला असतास. पत्र फाडण्यात ना प्रसादाची अपेक्षा, ना प्रसाद न मिळाल्याची अपेक्षा, ना जखडाई, ना तिची मुक्ती, ना ह्याच्या ह्याला कायमचा मिळालेला अपंगत्वाची आग. शेवटी काय मूळभूत गरजा गाभा करून परस्पर भागतात ही त्यांची (आता दोघांची) नियती व आयुष्यरेखा. वेद, चिकित्सक, या भोकळ्या मनाच्या संकल्पना हातात धरून व मिळालेल्या" प्रसादाची भूक ठेवून आयुष्य कंठणे सुरू राहते.

नेहमीप्रमाणे जी.ए.ची काही वाक्ये अत्यंत मननीय, वाचनीय, विचार करायला लावणारी आहेत. काही तर जीवनमूल्येही सांगून जातात. कथाविस्तार व कथाशिल्प या कथेच्या ओघात ती समर्पक वाटतात एवढे एक शास्त्रीचे फलीत.

—x—

संजीव सावरगांवकर: कधीतरी मला वाटते मी जास्त पाल्हाळीक लिहितो की काय? यावर आपले अभिप्राय द्यावेत. माझ्यातील सुधारणेला वाव मिळेल कदाचित.

विश्वेश्वर नांदेडकर: खूपच चांगले तर्कशास्त्र. एकदम पटले. आगदी जी ए नी ह्याचा मूळ विचारातून ही कथा लिहिली आहे थोडाफार फरक आसू शकेल , पण माझ्या मते एकदम तार्किक आर्थ लागला सगळ्या कथेचा.

सुंदर एकटाकी विचार मंथन आणि पूर्णतया वेगळ्या दृष्टिकोनातून कथा परीक्षण व लेखन. असेच लिहिते रहा.

सुनीळ सामंत: The best understanding.

Congratulations.

🏆 There are few rare times when i feel proud and very happy to have formed this group. This post is one.

विलास वाघोलीकर: कॅलिडोस्कोप हलवला की, दुसरे सुंदर डिझाईन दिसते, तशा जीएंच्या कथा वाटतात. म्हणून त्या वेगवेगळ्या दृष्टीने, पुन्हा पुन्हा, वाचल्या जातात. कथानक माहित असूनही वाचले जाणे, हे श्रेष्ठ ललित लेखनाचे लक्षण आहे, असे वाटते. सटवाई( जखाई) आयुष्याचा हिशोब लिहिते व चुकविते या

लोकसमजुतीआधारे दिलेला अर्थ विलक्षणपणे पटणारा आहे. त्याबद्दल मी धन्यवाद देतो. नायकाला पांगळे करून बाहेर सोडले जाते, याचेही पैलू पाहता येतील."यापुढे तू फळाची अपेक्षा न करता, कर्म करत रहा. कलेमध्ये, तत्वज्ञानान जीवन घालव" असे सांगण्याची ती सूचना असावी. मग कलेबद्दल, भाविष्य तत्वचर्चेबद्दल जे भाष्य आहे , ते जास्त पटते. आपल्या प्रतिसादाबद्दल खूप आभार. - विलास वाघोलीकर

श्रीकांत देशमुख? : वृषालीताईंचे विवेचन अत्यंत तर्कशुद्ध आहे. त्याबद्दल धन्यवाद.

पण काही प्रश्न अनुत्तरित रहातात.

१ मंदिरात नायकाच्या पुढील सर्वच पापी कसे? ते सर्व काळे कपड्यांत कसे? त्या सर्वांना कसे कळले की ते पापी आहेत?

२ मुळात प्रसाद कथानायकाच्या आतड्याच्या म्हातारी झालेल्या नातलगासाठी आणायला गेल्याचे अपंगाला सांगतो. म्हणजे त्याला स्वतःसाठी नको असतो. त्यामुळे कागदावरील संदेश हा नायकाचा पापपुण्याचा हिशेब कसा?

३ कागदावरील संदेश हा नायकाचा पापपुण्याचा हिशेब असे समजून व 'पाप नाही व पुण्य ही नाही' असे म्हटल्यास नायकाला अपंगत्वाची शिक्षा कशी?

४ पुजारी नायकाला कसा ओळखतो?

ही प्रसाद कथा समाविष्ट असलेल्या सांजशकुन कथासंग्रहातील मलपृष्ठावर जाड अवतरणातील मजकूरप्रमाणे या दृष्टांत कथेत अनेक सूचितार्थ असावेत. वृषालीताईना एक अर्थ गवसला.

प्रयत्न करूया.

# प्रॉमिथ्यूस- लेखक जीए कुलकर्णी- सांजशकुन

सुनीळ सामंत: प्रॉमिथ्यूस- लेखक जीए कुलकर्णी- कथासंग्रह- सांजशकुन

सांजशकुन या कथासंग्रहातील प्रॉमिथ्यूस ही साधारण संग्रहाच्या मध्यावरची कथा आहे. सांजशकुन या कथासंग्रहाची रचना शून्यवाद, निराशावाद ते अस्तित्ववाद, अहंवाद अशी केलेली आहे असे मला वाटते. या कथेमध्ये या सर्वांचे मिश्रण आहे असे मला जाणवले.

जीएंच्या कथेवर काही बोलण्यापुर्वी मूळ ग्रीक कथा काय आहे ते पाहू. प्रॉमिथ्यूस हे एका ग्रीक देवाचे नाव आहे. प्रॉमि म्हणजे प्राईम, प्रथम, आधीचा आणि थ्यूस म्हणजे थॉट, विचार, थिसिस. प्रॉमिथ्यूस इतर देवांच्या पुढचा विचार करणारा असा देव. ग्रीक कथांमध्ये असे सांगितले आहे की मानवाला अग्नी व संस्कृती देणारा हाच देव आहे. इतर देवाहून काहीसा वेगळा असा हा देव आहे. देवांकडचा अग्नी चोरून त्याने तो मानवांना दिला आणि त्यांना संस्कृती बहाल केली. त्याचा राग येऊन झियस या देवाधिदेवाने(आपल्या इंद्रा…

विलास वाघोलीकर: - सुनीळजींनी - प्रॉमिथ्यूस क थेची ग्रीक पार्श्वभूमी व जीएंची कथा ,यांचे सुंदर विवेचन केले आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

-जीएंचा, ग्रीक , भारतीय प्राक्कथांचा अभ्यास होता. त्यांवर वेगळा प्रकाश टाकून त्यांनी अनेक कथा लिहिल्या. ऑर्फियस, प्रॉमिथ्यूस, एका देवाचा मृत्यू यांना ग्रीक पार्श्वभूमी आहे. इस्किलार कथेतही ग्रीस इतिहास डोकावतो.

- भारतीय प्राक्कथांच्या पार्श्वभूमीवर जीएंची अनेक कथा लिहिल्या आहेत. भेट( सांजशकुन), कांचनमृग, विदूषक, प्रवासी, काली, रक्तमुखी, अनंत इत्यादी अनेक उदाहरणे देता येतील. अलिकडच्या काळात हिंदू प्राक्कथांना ' कल्पनेचे इमले' म्हणून हेटाळण्याची फॅशन आहे. युरोपियनांनी ग्रीक ,रोमन संस्कृती , त्यांच्या गुणदोषासकट स्वीकारली व स्वतःची भाषा, संस्कृती समृद्ध केली. आधुनिक भारतीयांनी यापासून बोध घेतला पाहिजे.

- माणूस हा शारीरीक दृष्टीने दुबळा प्राणी आहे. शिंगे, नखे, धावणे, गती ,गंधशक्ती, दृष्टी इत्यादी अनेक अंगांनी तो प्राण्यांपेक्षा दुबळा आहे. त्याला बुध्दी जास्त दिली आहे. पण अग्नीचा शोध, चाकाचा शोध, हत्यारांचा शोध यांमुळे त्याच्या प्रगतीचा आलेख उंचावला. म्हणून अनेक संस्कृतींमध्ये अग्नीला दैवी रूप मानले आहे.पारशी मध्ये अग्नीपूजा, जपानमध्ये सूर्यपूजा, म्हणून हिंदूंमध्ये यज्ञाला महत्व आहे.

- अग्नी दैवी आहे. देव अमर असतात. म्हणून अग्नी हा, 'प्रॉमिथ्यूस ' या अमर देवाकडून मिळाला. त्याने सर्वेश्वराची आज्ञा डावलून , अग्नी मानवाला दिला. या प्राक्कथेतील विलक्षणता या कथेत आली आहे.

- अमर गिधाड ,अमर काळजात, सतत जखम करून जगते ,हा संदर्भ जीएंनी दिला आहे. तो अश्वत्थाम्याची आठवण करून देतो. प्राक्कथांची झळाळी जी एंच्या शब्दांत व्यक्त करणारी ही कथा लक्षणीय झाली आहे. धन्यवाद. - विलास वाघोलीकर

मंजिरी देशमुख: संपूर्ण मानव जीवनात क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणणारं कार्य संपन्न करताना त्या क्रांतिकारी परिवर्तनाची किंमत मनुष्याला जीवनभर चुकवावीच लागते हे जी ए या कथेतून सुचवत आहेत असं वाटतं. प्रतिभावान अलौकिक प्रज्ञावान मानव उदा. वैज्ञानिक, तत्वज्ञ यांची चरित्रे वाचताना हे लक्षात येतं की मानव समाजात त्यांनी आपल्या कार्याने आमुलाग्र परिवर्तन घडवून आणलेत परंतु त्यांच्या वैयक्तिक आयुष्याकडे बघितलं तर मन कुरतडणारं असाधारण जीवनाला पुरून उरणारं वेदनादायी आयुष्य ते जगलेत.

प्राँमिथ्यूस ही कथा वाचल्यानंतर माझ्या मनात हे विचार आलेत.

दिलिप बडे: प्रॉमिथ्यूस'हि कथा असामान्य मानवासाठी motivated आहे.मानवी शरिर अमर होईल का?रोबोला संवेदना देता येईल का?अन्य ग्रहावर एखादा सजिव असेल का?अशी आवाक्याबाहेरची स्वप्ने पहा.अशा प्रेरणा घेऊन जीवनाकडे पहा अस सुचित करणारी हि कथा आहे.जी.ए.च्या कथा निराशावादी असतात या मताला हि कथा छेद देते.भवितव्यतेचे खेळ खेळा.मोठी स्वप्ने पहा.आपल्यातील वेड जपा-वाढवा.अस ही कथा सुचित करते.

रेखा दातार : प्रॉमिथ्यूस म्हणजे पुढचा विचार करणारा. जो वर्तमानात न अडकता कायम पुढचा विचार करतो तो चिरंतन टिकतो. म्हणुनच प्रॉमिथ्यूस अमर असावा का?

विलास वाघोलीकर: चित्र - प्रॉमिथ्यूस व अटलास - ग्रीक मिथकाप्रमाणे, प्रॉमिथ्यूस ने मानवाला अग्नी दिल्यामुळे सर्वेश्वराला राग आला व त्याने प्रॉमिथ्यूसला खडकाला बांधून ठेवले. मग दररोज गिधाड( किंवा गरूड) येवून प्रॉमिथ्यूसचे काळीज खाई. पण प्रॉमिथ्यूस अमर असल्याने रात्रीत परत काळजाची वाढ होई. शेवटी, हर्क्युलिसने प्रॉमिथ्यूसला बंधमुक्त केले - माहिती गुगलवरून. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: उत्तम माहिती. हर्क्युलिस ने सोडवणूक केल्याचे माहिती नव्हते.

मूळ कथा वेदनादायी आहे.

जीएंनी ती आनंददायी व विधायक अर्थाची केली.

जीएंच्या बाबत कोणीतरी आपल्या ग्रुपवर लिहीले की जीएंची कथा संपत नाही तर तिथून ती वाचकाच्या मनात सुरू होते. हे खरेच आहे.

पण जीए स्वतःही जुन्या कथांच्या आधीच्या कथा कल्पनेतून जन्माला घालतात. प्रॉमिथ्यूस हे तसेच एक रूप.

# फुंका- जी ए कुलकर्णी- पिंगळावेळ

विलास वाघोलीकर: I)संजीवजी सारगावकर यांनी 'फुंका ' कथेचे प्रास्ताविक नेमकेपणाने केले आहे. मी त्यांना धन्यवाद देतो.कथा गुंतागुंतीची आहे. प्रास्ताविकाने , कथेचा प्रसंग - क्रम छान दाखवला आहे. त्यामुळे ही कथा समजून घेण्यास मदत झाली आहे.या कथेची काही वैशिष्टये सांगता येतील -

2) या कथेत, जी एंनी टेकडी जवळची छोटी वस्ती ठळकपणे चित्रित केली आहे. कथेत अनेक लोकसमजुती येतात. फुंका, जारणमारण, मुठ मारणे, सुतक इत्यादींची गुंतागुंत कथेत दाखववली आहे.

3) संगा हा भुरटा चोर मध्यवर्ती पात्र आहे. जीएंनी अनेक कथांमध्ये, ओवाळून टाकलेली माणसे दाखवली आहेत. गुन्हे व ते करणारे गुन्हेगार दाखवले आहेत. मानवी जीवनातील षड्रिपू उफाळून येवून कसा गुन्हा होतो हे दाखवले आहे. फारच थोड्या लेखकांनी भुरट्या चोराला मध्यवर्ती ठेवून ललित लेखन केले असेल. त्याच्या मनातले विचार दाखवले आहेत." गेला बाजार, त्या मुखवट्याचे पंधरा रुपये येतील - पंधरा रुपये."

- 4) यमनी जोगतीणीचे व्यक्तीचित्रण, तिचे उद्योग, तिचे जोरकस शब्द, हे सर्व ताकदीने दाखवले आहेत.

- 5) भुरटा चोर, संगा, त्याच्या मुलीच्या,छोट्या गांगुलीच्या अचानक मृत्यूने हादरून जातो. त्याची बायको, पार्वती निघून जाते. घर विस्कटते. त्याचे सावट सर्व कथेवर आहे.

- 6)त्यात यमनी जोगतीणीने टाकलेला फुंका, त्याची मुखवटा व मडक्यांतील पैसे चोरण्याची हाव, गावकऱ्यांचा संगावर बहिष्कार यांची भर पडत जाते. व शेवटी परिणीती यमनीच्या खूनात होते. आवाजाने गावकरी झोपडीभोवती जमा होतात. व संगा मामूच्या सोबतीने मढयाजवळ रात्रभर राहतो. फुंका - जारण मारण यांचा पगडा असलेला संगा घाबरलेला असतो. म्हामू त्याला समजूतीचे चार शब्द सांगतो.

-हातातोंडाशी गाठ असलेल्या परिस्थितीतील अनेक माणसे, त्याही स्थितीत जीवन काढतात याचे चित्रण, जीवनाचे विविध पैलू या कथेत पहायला मिळतात. त्यात , यमनी जोगतीण, तिचा फुंका, त्याचा गावकऱ्यांवर पगडा, लाडक्या गांगुली मुलीचा अचानक मृत्यू,समज गैरसमज यांची भर पडते. जीवनाचे विस्कळीत रूप, अव्यवस्था व त्यावर पडलेले अस्मानी सावट जीएंनी प्रभावीपणे दाखवले आहे.

- वेगळ्या वातावरणात नेणारी ' फुंका' ही लक्षणीय कथा आहे.

- धन्यवाद - विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: फुंका- जी ए कुलकर्णी- पिंगळावेळ

श्री संजीवजी सावरगावकर यांनी केलेले फुंका या कथेचे अगदी सुयोग्य विश्लेषण आवडले. ही कथा वरवर वाचताना एका व्यक्तीची कथा वाटते. पण संजीवजींनी त्यातले बारकावे दाखवून तिला एक वेगळे परिमाण दिले आहे.

फुंका या अंधश्रद्धेवर, ना जीएंचा विश्वास, ना संजीवजींचा. त्यामुळे त्यांना फुंक्यामागचा कार्यकारणभावही(गंगीचे अति खाणे) दिसला. संगाचा भित्रा स्वभावही जीएंनी नेमका दाखवला आहे आणि तो संजीवजींनी नेमका हेरला आहे(मढ्याबरोबर रात्र काढण्याची भिती). यमनीदेखिल भित्री आहे हे तिच्या स्वप्नांतून कळते. हे सर्व पहायला बारकाईचे वाचन मात्र हवे.

फुंका या कथेचा शेवट जीएंनी(संजीवजींनी दाखवून दिले तसे) वैश्विक केला आहे. मला वाटते म्हामूच्या एका वाक्याने(आमच्या सगळयांवरच एक अस्मानी फ़ुंका पडलेला असतोय उमरभर) या कथेला इतर लेखकांच्या कथेहून वेगळेपण मिळाले आहे.

सुनीळ सामंत: जीएंच्या इतर कथांहून फ़ुंका ही कथा बरीच वेगळी आहे. कुलकर्णी आडनावाच्या एका शहरी प्राध्यापकाने ग्रामीण जगातले ताणेबाणे इतक्या सूक्ष्मपणे जाणून घ्यावे आणि ते इतक्या परिणामकारकतेने एखाद्या कथेमधे मांडणे हेच आश्चर्यकारक आहे. शंकर पाटील किंवा तत्सम ग्रामीण लेखकांच्या 'ग्रामीण' म्हटल्या जाणाऱ्या कथांमधेही खऱ्या ग्रामीण जीवनाचे इतके बारिक सारिक संदर्भ मला दिसले नाहीत. आणि दलित साहित्याच्या इतक्या मोठ्या प्रवाहातही संगा आणि यमनीसारखी त्रिमिती असलेली जिवंत पात्रे, त्यांची हाडापर्यंत जाणवणारी दुःखं मला खुद्द दलितांच्या साहित्यात जाण्वली नाहीत. याचे कारण केवळ भाषा असू शकत नाही. जीएंची मांडणीही त्याचे कारण नाही. तर त्या वेदनांशी स्वतः जीए समरस झाल्याशिवाय ही वेदना ते आपल्यापर्यंत पोहोचवू शकलेच नसते.

या कथेतील जी एंची भाषा हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे.

॥श्री॥

PAGE No. १०।८।२२ DATE / / ①

फुंका : कथासंग्रह : चिंधावेल.

फुंका म्हणजे करणी, जारणमारण कृती. कोणाचे तरी वाईट व्हावे म्हणून केलेली तांत्रिक विद्येने केलेली अघोरी इच्छा व त्याची फलश्रुती अर्थातच दुःखाची फलश्रुती.

फुंका साधी कथा वाटते पण ती जी.एं.नी फार छान. वेगळ्या पद्धतीने लिहिली आहे. एखाद्या सिनेमामध्ये दिग्दर्शकाने वर्तमानकाळातील सगळे दाखविलेल्या कथेतील भूतकाळातील Flashback इतका सुंदर गुंफला आहे हे कथा वाचतांना जाणवते.

हा गुंता याच प्रकाराने व घटनाक्रम लक्षात घेऊन वाचल्यास तर संगा, यमनी, गंगुली, म्हामू या कॅरेक्टर्स त्यांच्या त्यांच्या जागी योग्य ठिकाणी फिट बसल्यासारख्या वाटतात. गावचे वर्णन गावकऱ्यांची यमनी, संगा यांचेबाबतची अबोलती मते व त्या त्या घटनेमध्ये केलेल्या कृती, बोललेली सहज भाषा यावरून फुंका कुठे जाणार याचा अंदाज येत जातो.

या कथेतील घटनाक्रम असा तरी असा दिसलाय. १) परवाचा प्रसंग म्हणजे संगाने यमनीच्या कडीचे मोघचा चोरणे 2) यमनी सोंगतीणीने गंगुलीची ख्याती केलेल्या बाहुलीचे डोळे मिटणे म्हणून (एक आश्चर्य म्हणून) बाहुली घरी येऊन पाहणे 3) गंगुली घरी ~~येऊन~~ लोहाराची मेख घेऊन परत येणे ४) तिला शोधायला संगा short cut करून यमनीच्या झोपडीजवळून जाणे ५) मोघवा तोडणे ६) यमनीच्या झोपडीत प्रवेश व पूर्वचा चोरीचा विचार करणे ७) यमनी अचानक घरात येणे ८) त्यांनी दोघांनी एकमेकांचा सुखकर करणे ९) दुसरे दिवशी यमनीने गावात येऊन संगावर फुंका टाकणे (मात्र हे संगाला समजत नाही कारण दुपारी उपरांत तो ओढ्याकडे झोपलेला होता) ९) फुंका टाकल्याने संगाला गावकऱ्यांनी धिक्कारणे १०) त्याचे कारण फुंका मोघचाचोरी नव्हे ११) चिडून संगाने यमनीच्या झोपडीकडे जाणे व तिथे यमनीला गंगुलीच्या बाहुली बरोबर खेळवतांना पाहणे १२) गंगुलीवर फुंका केल्याच्या

संशयाने संगाने यमनीचा खून करणे कारण
गुळीचाही मृत्यु (फुंका मुळे / करणीमुळे) झालेला असा त्याचा संशय
) गावकरी व म्हामू येणे, म्हामू राहणे
असतानी फुंका म्हणणे - संगा व म्हामू ने तेथेच
जबरदस्तीस राहणे. असा घटनाक्रम पाहिल्यावर
कथा उलगडत जाते, समजावयास सोपी जाते.

संगा तसा बेरक्या मुरलेला चोरच, चोरीवरच
उदरनिर्वाह, पार्वती त्याची बायको, त्याच्या गंगुळीनावाच्या
मुलीच्या अचानक झालेल्या मृत्युमुळे घर सोडून गेलेली
संगाला मात्र यमनीने करणी केली अशी धारणा आहे.
संगाला पैसा लागत असतो व त्याच्या चोऱ्या. त्याचा
मुसलमान मित्र म्हामूला माहीत असते. तशातच
गंगुळीच्या डिलेली डोळे मिटणारी बाहुली पहायला
यमनी जोगतीण येते (कदाचित तीनी ही सामान्य
इच्छा असेल पण जोगतीणीकडे स्वच्छ नजरेने
पाहणारा संगाही नसतो व गावही).
गंगुळीच्या अती खाण्याच्या वृत्तीने ती
खर तर निसर्गाने! मरते पण त्याचा कार्यकारण भाव
संगा ~~बाहुली~~ गंगुळीची बाहुली यमनीच्या झोळीतपाहून
लावतच विचार करतो. त्या आधीच यमनीच्या
शेजारील मोयच्या चोरल्याने यमनी दुसऱ्या दिवशी
ईर गावाने फुंका करते ते संगावरती. या मुळे
तिला स्वतः:ला संगा फुंका करेल अशी स्वप्ने
पडल्याने ती धास्तावलेली असते. त्याचे संगाचे
हातून तिचा खून घडतो कारण गावकरी त्याला
फुंकात ही समजतात व फुंका टाकल्याने त्याने
सुन. लोकही राहू इच्छीतात. त्या मुळे चिडून
संगाकडून यमनी अमानुषपणे मारली जाते. शेवटी
तिच्याच झोपडीत संग्याला डांबून ठेवायचे ठरते तेव्हा
तो म्हणतो "पण तिचं, या मढ्याजवळ ठेवू नकोस". असा
बरट संग्या.

हा फुंका आहे प्रत्येकाच्या मत्युमनाचा.
पाहून पण कथानको येतो व प्राणहरण करतो. गंगुळीचा
मृ तसा नैसर्गिक, अती खाण्याने नकळत झालेला मृत्यु फुंका
मृत्यु पाहणारा संगा तिच्यावर यमनीने करणी
म्हणून यमनीचा खून करणारा. यमनीलाही त्यांच्या

③

१८/१०/२२

मृत्यू फुंका स्वप्नात दिसतो तो असा कि संग्या रात्री चोरासारखा येणार व आवळा चेंदा करणार. घडते तसेच पण संग्याचा कार्यकारण भाव त्या वेळी वेगळा असतो. सोन्या मळक्यातील पैसे व मूर्तीवरील चोरण्याच्या उद्देशाने आलेल्या गंगुळीची बाहुली यमनीच्या हाती पाहून बेभान होऊन तिचा खून करतो हा संग्याच्या अनपेक्षित फुंका.

या सर्व कथानकात म्हामू कासार, अनवाणी फिरणारा, मुसलमान (गावातील कदाचित एकमेव), कायम खोकणारा गंगुळीला दिलेल्या बांगड्यांचे पैसे उधार ठेवणारा म्हामूला, तो सगळ्यांनी छिडकारलेला संग्या जेव्हा म्हणतो "म्हामू आज सगळा मामला निराळाच वाटतोय बघ" त्याला म्हामू कडवट उत्तर देतो "पन्नास वर्ष हाय मी इथं, पण शेवटी परका तो परकाच! म्हामूला समई चोरणे, तिचे अकरा कलम मिळणे अशा सर्व गोष्टी ज्ञात असतात. त्याला त्याच्या दफनाची काळजी म्हणून संग्याला तो बोलतो, सांगतो पण संग्याला त्याचे कथन आवडत नाही म्हणून रागाने यमनीच्या झोपडीकडे जातो व (त्याच्यावर फुंका पडल्याच्या समजुतीखाली, गावकऱ्यांच्या समजुतीखाली)

तीच यमनीचा खून करतो. व मोबदून गेल्यावर.

म्हामू त्याची समजूत काढतो तिच्या फुंक्या जाऊ दे रडण्यात, आमच्या (आपल्या) सगळ्यांवर एक अस्मानी फुंका पडलेला असतोय उमरभर, सगळ्यांची उमर म्हणजे फुंका आहे. त्याला बाकीचे काय करणार (पण ते सर्व निर्दोष मात होत असतात हे कधीही लेखक कायम सुचवत राहतो)

असा हा जगावेगळा फुंका व जी.एं.च्या गावविश्व व त्यातील गावकऱ्यांची चित्रकथा.

सुनीळ सामंत: संजीवजींनी केलेले फुंका या कथेचे सखोल विश्लेषण पुन्हा एकदा वर दिले आहे.

सर्वांना विनंती.

सध्या फ़ुंका या कथेवर चर्चा सुरू आहे.

त्या व्यतिरिक्त इतर जीए विषयक सर्व चर्चा दुसऱ्या ग्रुपवर(जीए मुक्तचर्चा) कराव्यात ही विनंती.

विलास वाघोलीकर: सहमत. वेगळे वातावरण, वेगळ्या व्यक्ती, त्यांचे वेगवेगळे स्वभाव, त्यांची वेगळी भाषा सहसा दाखवली जात नाही. ललित कलेतून हे दाखवले आहे. हे महत्वाचे. धन्यवाद. विलास वाघोलीकर

रेखा दातार : फुंका

संगा

संगाच्या घरी अठरा विश्वे दारीद्र असते. यमनीच्या भाषेत सांगायचे तर ती संगाला म्हणते 'तुझ्या घरचे दगडाचे जाते सुध्दा उपाशी मरेल.' संगाची बायको पार्वती वडा खालच्या बसस्टाॅपवर केळी, पेरु असे काहीबाही विकुन संसाराला हातभार लावणारी, पण संगाला मात्र उदरनिर्वाहासाठी काम करण्यापेक्षा उचलेगीरी करणे अधिक सोपे वाटते. एकीकडे आपली भामटेगीरी कोणाला कळली तर याची त्याला लाजही वाटत असते. त्यामुळेच गंगुलीच्या मृत्यू नंतर पार्वती जेव्हा चोरीवरुन त्याला दोष देते तेव्हा तिला गप्प करण्यासाठी तो तिला मारतो. म्हामूला आपणच

त्याचा पितळी तांब्या चोरल्याचे आणि इतरही चोऱ्यांचे प्रकार माहिती आहेत हे कळल्यावर त्याला लाज वाटते. यमनी गंगुलीची भावली बघायला घरी येते तेव्हा सुध्दा ती आपल्या भोपळा चोरीचा बोभाटा करेल या भीतीने तो अस्वस्थ होतो.

आळस संगाच्या अंगात ठासुन भरला आहे. त्या मुळेच गंगुलीला शोधायला जातांना प्रथम तो टाळाटाळ करतो पण अगदीच दिवेलागणीची वेळ जवळ येते तसा त्याचा नाईलाज होतो. परत येतांना सुध्दा लांबचा वळसा टाळण्यासाठी भीती वाटत असुन देखिल तो यमनी जोगतीणीच्या आवारातुन यायला तयार होतो. तेथेच त्याला यमनीने लावलेल्या वेलीवरचा भोपळा चोरायचा मोह होतो व त्याच वेळी यमनी कडुन पकडला गेल्यामुळे दोघांचे भांडण होते.

संगाला देवळातली समई चोरायला किंवा यमनीचे देवीचे मुखवटे चोरायचे बेत करतांना काहीच वाटत नाही , पण दुसरीकडे फुंका , मूठ मारणे , जारण-मारण इत्यादी गोष्टींची मात्र भिती वाटत असते. जमनी मेल्यावर नारु जेव्हा ठरवतो की रात्रभर संगाला जमनीच्या झोपडीतच बंद करुन ठेवावे व सकाळी पोलीस आल्यावर काय ते बघतील , तेव्हा सुध्दा पोलीसी शिक्षेपेक्षा संगाला रात्रभर यमनीच्या मढ्याबरोबर रहायची शिक्षा जास्त भयंकर वाटते.

संगाची गावातल्या लोकांशी मैत्री आहे.

यमनीने संगावर फुंका टाकल्यावर तीचा रोष आपल्यावर ओढवायला नको म्हणुन गावातले लोक संगाला टाळतात पण संगाला हे सांगणे त्यांना जड जाते. व त्या साठी ते त्याला खोटी कारणे देतात.

यमनीने आपल्यावर फुंका टाकल्याचे कळल्यावर संगा चिडतो. यमनीचे गुढगे तुरकाडी प्रमाणे मोडुन तीला शिक्षा द्यायला तो निघतो. तिचे पैसे आणि मुखवटे

चोरायचाही त्याचा बेत असतो. पण गंगुलीच्या भावलीशी यमनीला खेळतांना पाहिल्यावर त्याचा संताप अनावर होतो. मरायच्या आधी ग्लानीत असतांना गंगुलीने याच भावलीचा ध्यास घेतला असतो. यमनीनेच गंगुलीला मूठ मारुन तिची भावली चोरली या बद्दल त्याची खात्री पटते. संतापाच्या भरात तो मुखवट्याने यमनीला ठार मारतो, तीची पैशांनी भरलेली मडकीही फोडतो पण आता मात्र त्याला त्या पैशाचा मोह वाटत नाही.

म्हामु -- पन्नास वर्ष गावात राहुन देखिल गावाला म्हामु परकाच वाटत असतो.म्हाताऱ्या माम्हुला आपल्या अंताची चाहुल लागली असते. आपल्या मरणा नंतर आपला दफनविधी योग्य रितीने पार पडावा एवढीच त्याची शेवटची इच्छा असते. त्या साठी त्याने एक चांदिचे पानदान आणि एक सोन्याचा ताईत जपुन ठेवले असतात.आपले जातवाले कोणी जवळ नाहीत त्या मुळे त्याला संगाच्या चोरीच्या कथा माहित असुन देखिल तो संगावर विश्वास दाखवुन आपला ऐवज त्याला सोपावतो.गंगुलीला दिलेल्या बांगड्यांच्या पैशाबद्दल देखिल काही बोलत नाही. ऐवज विकुन आलेल्या पैशातुन मरणोत्तर आपले थडगे बांधायची तो संगाला गळ घालतो.

यमनी मेल्यावर तिच्या मढ्याबरोबर संगाची सोबत करायला तो थांबतो, पण आता आपल्या मढ्याला घरटे बांधायच्या त्याच्या उरल्या सुरल्या आशाही संपुष्टात आलेल्या दिसतात. आता आपल्या मृत्यूनंतर आपलीही गत रस्त्यावरच्या कावळे-कुत्र्यांप्रमाणे होणार याची खात्री पटुन तो हताश होतो.

यमनीच्या फुंकाला काय घाबरायचे तीच्यावर काय किंवा आपणा सर्वांवर काय आस्मानी फुंकाच पडला आहे आणि त्या पासुन पळुन पळुन जाणार कुठे असे तो संगाला सांगतो.

यमनी --- यमनी ही सगळया गावाला नकोशी असते. गिधाडाच्या नखासारखी बोटे असणारी आणि वेणीचा पट्टा आणि हळदीने माखलेल्या कपाळामुळे कवड्या सापासारख्या दिसणाऱ्या यमनी पासुन सर्व गाव लांब असते. कोणी प्रत्यक्षात पाहिले नसले तरी तिच्या झोपडीत हाडे कवट्या आहेत व ती जारण मारण करते अशा अफवा गावात असतात. गाव तिला घाबरुन असले तरी यमनीला मात्र संगा आपल्या जीवावर उठला आहे अशी भीती वाटत होती. गावापासुन दूर वाळीत टाकल्यासारखेच तिचे घर होते. तीला मारल्यावर तिच्यातुन उकिरड्यावरच्या किड्यासारखा हिरवट पिवळट द्रव बाहेर येईल असे संगाला वाटते पण प्रत्यक्षात मात्र तिच्या अंगातुन माणसासारखेच लाल रक्त आल्यावर संगा थिजुन जातो.

यमनीचे रंग-रुप आणि अवतार पाहुन लोक तिच्या पासुन लांब रहातात पण घाबरुन तीला पैसे धान्य पण न बोलता देतात. त्या मुळेच तिचा उदरनिर्वाह चालतो. पण त्या मुळेच ती एकाकी असते का?

दबलेल्या इच्छा पूर्ण करण्यासाठीच ती गंगूलीची भावली चोरते का? गंगूलीचा मृत्यू हा केवळ योगायोग होता का? यमनीने मूठ मारल्याने उडाणटप्पू गंगली मेली नसुन रानात जाउन वाट्टेल ते खाण्याची सवय तिला बाधली?

विलास वाघोलीकर: आपण नेमकेपणाने कथेतील महत्वाच्या पात्रांचा आढावा घेवून एकूण कथाच सलगपणे सांगीतली आहे. मला कथा गुंतागुंतीची वाटली. पण फेकून दिलेल्या, वळचणीच्या, परिस्थितीने मेतकुटीला आलेल्या माणसाची ही कथा असल्याने ,कथा लक्षणीय आहे. गंगुलीबद्दलसुद्धा सांगण्यासारखे आहे. कारण तिच्या जीवनाचा परिणाम, पार्वती, वस्तीतील गावकरी, यमनी, व शेवटी संगावर होवून कथेतील फुंका दिसतो. त्यामुळे या कथेत जीएंनी प्रसंगांची साखळी, भाषा, भाष्य यांमुळे कसा परिणाम साधला आहे. हे आस्वादासाठी समजून घ्यावेसे वाटते. आपण लिहीले याबद्दल पुन्हा एकदा आपले व विवेचकांचे आभार. - विलास वाघोलीकर

दिलिप बडे: संगा.मांडणी अगदी स्वच्छ-स्पष्ट-सरळ-सोपी--अभिनंदन.

रेखा दातार : मोजक्या शब्दात डोळ्यासमोर चित्रच उभे करतात!

अजुन एक मला आवडलेले वाक्य म्हणजे ' घायपात्याच्या रांगेत एके ठिकाणी दातपड होती, तेथुन त्याने अलगद पाय टाकला '.....किती सार्थ वर्णन!

सुनीळ सामंत: फुंका या कथेचे आपण अतिशय सुंदर विवेचन केले आहे. बारकाईने कथा वाचणे आणि त्यातील नेमकी सौंदर्यस्थळे हेरणे व इतरांना दाखवणे यासाठीच हा ग्रुप आहे. आपण ते काम अगदी बरोबर केले आहे.

जीएंच्या कथेतील एका एका पात्राचे असे विश्लेषण मी तरी प्रथमच वाचले. जीएंची कथा multidimentional असते. कथेचे केंद्रस्थान बदलत असते. त्यामुळे

इतर कथाकारांच्या कथेप्रमाणे ही एकाच पात्राची कथा नसते. महाभारत जसे अनेक केंद्रांचे आहे तशीच हीसुद्धा.

जीएंच्या सर्व लेखनाचे(किमान २० व्यक्तीबहुल कथांचे) अशा तऱ्हेने विश्लेषण व्हावे. यावर एक चांगले पुस्तक होऊ सकेल.

फुंका या कथेच्या भाषावैभवाबद्दल तर सलामच. रेखाजींनी नेमका हेरलेला दातपड हा शब्द किती अर्थपूर्ण आहे. व्वा.

संजीव सावरगांवकर: येस, रेखा जी असेच लिहित रहा. ग्रुप मधून याबाबत अवश्य सहकार्य मिळेल. नेहेमी पेक्षा एक वेगळा उपक्रम तयार होऊ शकतो.

वैभव कुलकर्णी : खरे आहे... 👍

एक वाक्य कैक वर्षापुर्वी आवडलेले होते.....लक्षातही अवर्जुन राहीलेले आहे ————आमच्यावर सगळयांवरच एक अस्मानी फुंका पडलेला असतोय उमरभर! संगा, तुला सांगू काय? अरे, बेवकूफ तुझी माझी सगळयांची उमर म्हणजेच फुंका हाय नव्ह? त्याला यमनी काय करणार, तू काय करणार आणि टिनपाट फाटका म्हाम्या तरी काय करणार?"

वैभव कुलकर्णी : एक अजुन भारी शब्द सापडला आहे......

गुंडगोळं !

या विषयी कोणाला काही माहीती आहे का?

सुनीळ सामंत: फुंका मधे आहे? थोडा संदर्भ द्या.(बाकी गुंड म्हणजे दगड)

वैभव कुलकर्णी : होय......

कथेचा भागच पाठवतोय.....

तर सरड्याएवढं! त्यात नारबा घरी नाही. त्याला आणून पोचलो खरं; पण सारं अगदी स्वच्छ गुंडगोळं झाल्यावर -" आणि म्हामू एकदम मुस्कटात मारल्याप्रमाणे गप्प झाला.

सुनीळ सामंत: धन्यवाद/ त्या निमित्ताने पुन्हा एकदा कथा वाचली.

फुंका या कथेतील माझ्या डोळ्यांत भरलेल्या ओळी.

==============================

शिवनाथाच्या देवळाचा चिकट पिवळया रंगाचा कळस झुडपात बोर पिकल्याप्रमाणे स्पष्ट दिसू लागे आणि देवळाशेजारी असलेल्या हिरवट पाण्याच्या कुंडातील तळाशी असलेले मगरीच्या पाठीसारखे वाटणारे खडक उन्हाला वर येऊन पडत.

*जणू त्याच्या खोकण्यानेच लालसर धुळीचा धूर उडाला.*

*कुणाचाच धंदा काही धाप लागल्यासारखा चालत नव्हता.*

*तो दबलेल्या पण धाकट आवाजात म्हणाला*

*ती खळ गेलेल्या कापडाप्रमाणे मऊसूत झाली.*

*पार्वतीने 'आलास तर मला कापून खाशील अशी करकरीत शपथ घातली.'*

*रात्री अगर सकाळी(गंगुली) एखाद्या वड्डराचे जेवण रचत असे.*

*पण या वयातही गंगुली नारू लोहाराची उंडगी दांडगी म्हैस अलगद घरी वळवून आणत असे.*

*द्रोण भरून फाटावर त्याप्रमाणे ती(यमनी) तोंड पाघळून हसली.*

*ते पोर(बाबल्या) नको त्यावेळी सतत डोळ्यात शिरणाऱ्या घुंगुरट्याप्रमाणे समोर भटके.*

*तिथल्या नाकाड्यावर उभे राहिले की थेट यम्मीहाळ पर्यंत सपाट शिवार दिसे.*

*तीन बगळे पताकांप्रमाणे उडत होते.*

*लोहाराची म्हैस अगदी नव्या नवरीप्रमाणे निमुटपणे तिच्या मागोमाग येत होती.*

*घायपाताच्या रांगेत एके ठिकाणी दातपड होती.*

*एका दोरीसारख्या वेलाला मात्र फुग्यासारखा एक लाल भोपळा होता.*

*तुझ्या घरी दगडाचं जातं उपाशी मरेल.*

*मग हा भोपळा काय तुझ्या ढुंगणातनं पडला होय रे सोद्या?*

*हा हा संगा विस्तव शिवू नको अद्याप सांजची पूजा झाली नाही.*

*भेटेल त्याला कुठे कुठे म्हणत काय जिभ वळवतोस कुत्र्याच्या शेपटी सारखी!*

*इथं, वाटेवर, वडाखाली, कुठेही कंदील विझून जाईल.*

*घसा घसा माती घासून तिनं तीनदा डोक्यात घातली आणि डोकं हळदीने भरलं. हातात तीनदा भंडारा घेऊन तुझ्या नावाने तिने भंडारा उधळला आणि तुझ्यावर फुंका टाकला.*

*घरदार बायको असून आपण जमीन अंथरून काळवंडलेले गुब्बारा भरलेले आभाळ पांघरूण करून येथे पडले आहोत, गाव मसन यांच्या बांधावर, माणसे आणि यमनी यांच्यामध्ये, आजच्या जरा पुढे, उद्याच्या जरा आधी.*

*जमिनीतून अनेक हात वर उगवल्याप्रमाणे दिसणाऱ्या घायपाताकडून आलेल्या पायवाटेवर एकदम दिवट्या दिसू लागल्या.*

*एकाने एक दिवटी मोडक्या पाटलागात तिरपी खोचली*

*आतडं फुटलेल्या म्हसरानं बुट्टी भर शेण टाकावं तसं पडलंय मढ तिचं.*

सुनीळ सामंत: जीएंची भाषा हा एका स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहेच.

वैभव कुलकर्णी : आपल्या सगळयांवरच एक जीएंचा साहित्यिक फुंका आसमानी पडलेला आहे,,....जन्मभरा साठी !

आणि तो अनुभवताना धन्य वाटतय !

संजीव सावरगांवकर: हे मात्र 100% खरे.

संस्कृतीची शिकवण माणसाला केवळ निरीक्षणाने, अनुकरणानेच मिळते असे नाही, पण त्याला काही किमान ज्ञान त्याच्या मनात जन्मापासूनच अस्तित्वात असतो. काही काही कल्पना सर्व मानववंशाने इतक्या त्याज्य मानल्या आहेत. लहानपणापासून बुवा, भोकाडी, अंधार, भूत यांची भिती थोडे मोठे झाल्यावर त्यातील भितीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची धाडसी वृत्ती. २-३ मित्रांनी केलेले जारण मारण (खोटे खोटे) अनुयोग, संमोहिनी तिचे आकर्षण. जडीबुटी, कवटी, हाडे यांची मानसिक भिती समाजात पसरलेल्या अफवा, क्वचित प्रसंगी मारलेल्या जपा नरबळी. समाजात यांचा मानवी मनावर पगडा बसतो व तो साधारणतः भितीदायक, मन अस्थिर करणारा, दोलायमान मनाची भिती वाढविणारा असतो.

या सर्व गोष्टींचे अपूर्व, अनुभव घेण्याची एक अनामिक इच्छाही असते. मग कोणी अशुभ सणी संग सारखा माणूस बळी पडतो. त्याला ~~ताप~~ त्याच्याच मनप्रवृत्तीचे आकर्षण वाटते व तो यमनीच्या विळख्यात डोकावतो. तसेच पैसा हे त्याचे मुख्य आकर्षण असते. त्याला तो पाहिजे ही असतो पण पापाचा पैसा, वाईट वृत्तीचा पैसा म्हणून मनाच्या पातळीवर नाकारत ही असतो.

आपण कितीही मानसिकता, शिकवण संस्कार हे असतात क्वचित प्रसंगी मात्र व्यसने करणे, चोरी करणे, व्यभिचार, या विचारांचा पगडा मनावर बसतो. रत्नाकर मतकरी त्यांच्या 'छोटा विल्कु, मोठा विल्कु' या कथेत लहान मुलाच्या मनावर मोठ्या विल्कुचे प्राबल्य दाखवून एक एक खून करवून घेतो. व शेवटी वडील त्याला मुंबईला घेऊन जातात आणि मोठ्या विल्कुला कामाल मोठे क्षेत्र मिळते. तसेच कुणी तरी मनाच्या बाबतीत घडते, त्याविरुद्ध वर्तन अशक्य होते आणि प्रसंग घडून गेल्यावर, ज्याने ते केले तर त्याला ते सतत जाणवत राहते. मनाला पाप खाते. तसे हत्या ही गोष्ट निषिद्धच आहे. तरीहून घडते की या चुकीची जाणीव असते

4

मनाला होऊन असते व ते त्याचा विचार पुढे होत नाही.

हीच मिती. हीच गिरीश फुका कथेत आला आहे.

फुका म्हणजे करणी, जारणमारण कृती. कोणाचे तरी वाईट व्हावे म्हणून कोणीतरी तांत्रिकविधीने केलेली अघोर इच्छा व कृती.

आपल्या कडे गाव संस्कृती मध्ये जसा महारवाडा, शेतकरी गावकऱ्यांची वस्ती तशीच गावाबाहेर, गावकुशी वर समाज-सरवाई राहायची नाही, जोगतीण राहत असतेच. तिचा उदरनिर्वाह गावामुळे. गावातील/वर बाहेर शक्तींचा उपद्रव होऊ नये म्हणून जोगतीणीला गाव पहारा. तीची मदत पण, तीची भिती पण.

सेगा तसा बेरकया, मुरलीखोर, चोरीकरून उदरनिर्वाह. त्याचा कुटुंबातील बायको पार्वती मुलगी गंगुबाई अचानक आलेल्या मृत्युमुळे घर संपून गेलेले. सेग्याच्या नियतीचे वर्तुळ यमनी जोगतीणीची त्याच्यावर टाकलेली फुका, करणी. ही सुरवात आहे. गंगुबाईचे मरण यमनीच्या करणीमुळे झाले याची त्याला यत्किंचित कल्पना नाही. माहीतीही नाही. कनवटीला पैसा नाहि आणि दारू त्याशिवाय चालत नाही ह्या अवघड परिस्थितीत गेळ आकणारी बाहुली पाहायला मिळाली यमनी जेव्हा त्याच्या घरासमोर अंगा खाली उतरवून ठेवली तेव्हा वस्ती पांगली. यमनीने बघून बाहुली घेऊन पाहीली व तोंड पाडवून हसली. सेगाने अंगा तिच्या डोक्यावर ठेवला. आणि यमनी निघुन गेली.

# बळी –( पारवा)- लेखक - जी ए कुलकर्णी

विलास वाघोलीकर:

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

बळी -( पुस्तक पारवा) लेखक - जी ए कुलकर्णी

विवेचक - व्ही. एस. वाघोलीकर

- बळी कथा वाचली की, जीएंचा मानसशास्त्राचा, व समुह(झुंडीच्या) मानसशास्त्राचा सखोल अभ्यास होता, हे कळते.

- कथेतील पात्रे अशी आहेत - सखाराम पाटील - जोतिर्लिंग गडाच्या पायथ्याशी चांदगाव हे लहान खेडेगाव असते. त्या गावाचा हा पाटील आहे. गडाला इतिहास आहे. त्या किल्लेदाराचा हा वंशज असल्याने ,त्याचा गावात दरारा आहे, त्याला मान आहे.

- सखारामाची बायको , पाटलीणबाई - धट्टीकट्टी, तोंडाने फटकळ आहे. त्यांना साहेबराव नावाचा लहान मुलगा आहे.

- अमाशी- 3 - 4 वर्षांची, अमावस्येला जन्मलेली मुलगी आहे. पूर्वी विठा जोगतीण गावात आली होती. तेव्हा त्या तमासगीरीणीपासून पाटलांना झालेली ही

मुलगी, ती तमासगीरीण, विठा , गावातच सोडून गेली. ती निष्पाप, पण वेडसर मुलगी आहे. पाटलीणबाईने तिला हाकलल्यामुळे, ती पडझड झालेल्या अशा शंकराच्या देवळात राहते. पाटलाला तिचा कळवळा असल्याने ,तो तिला अन्न देतो. ती आपाल्याच वेडसर विश्वात जगत असते. खेडेगावातील समजुतीप्रमाणे, तिची नजर पडली की ते काम बिघडते. अशी कुप्रसिद्धी असल्याने सगळे तिचा रागराग करतात. फक्त पाटलाचा तिला आधार आहे.

-( अशीच , एखाद्याची नजर पडली की काम वाईट होते, ही लोकभावना' राधी ' कथेत, जीएंनी दाखवली आहे.)

- कथेत गावकऱ्यांचे संदर्भ आहेत - सोमू गडी, बंदूकवाला सत्ता कुंभार, लखमा लोहार, तातोबा शिंपी, दादूभट, गुरव इत्यादी. या बलुतेदारांमुळे गावगाडा चालतो. पूर्वीच्या काळातील त्या गावगाड्याचे यथार्थ वर्णन कथेत आहे. ते मूळातून वाचण्यासारखे आहे

- लिंगायत गुळगुड गंगाई ही म्हातारी, काठी टेकत , गावभर सगळीकडे फिरत असते. ती गावभर लक्ष ठेवून असते.

- कुंभाराची चंद्री - अमावस्या, पौर्णिमेला, तिच्या अंगात देवी येते. तेव्हा प्रसंगी हलगी वाजवत मिरवणूक काढतात. ती देवीच्या वतीने, भविष्य, तोडगे सांगते. कथेत हे मध्यवर्ती पात्र आहे.

- गावाची जमीन जिरायत आहे. तळे, विहीरी, आड ही पाणी पुरवठ्याची साधने असून त्यावर शेती होते. व बारा बलुतेदार दिवस काढतात.

- गेल्या वर्षी व या वर्षी मात्र पाऊस पडला नाही, व भीषण दुष्काळ पडतो. खेडेगावातील या दुष्काळाचे यथार्थ चित्रण जीएंच्या शब्दांत चित्रीत होते -

."...पण माणसे बोलत होती तसे घडत होते हे मात्र खरे. या वर्षी देखील टाळूवर मारण्याएवढा देखील पाऊस नव्हता. चौखांबीच्या उतरणीवर काटेरी फडाच्या पंज्याखेरीज काही हिरवे औषधाला उरले नाही. करवंदाच्या जाळया जळक्या होऊन जुन्या दोराच्या ढिगासारख्या दिसू लागल्या. जांभूळ-करवंदांची नुसती हाडे राहिली. उतरणीवर पाहिले की हावऱ्या उन्हाची लाट झळाळत येत असे. आणि डोळयात माती पडल्याप्रमाणे ते गपागपा मिटत. शिवारे तर ठार मेली. वीतवीत वाढलेली वातीसारखी मरतुकडी घाटे उपजताच जळाली. बांधावरचे गवत काडी काडी उडून गेले आणि जमीन भुसभुशीत होऊन धुरळू लागली. वाऱ्याचा झोत आला की गावचा हिरवा पदर हलण्याऐवजी लालसर धुळीचा धूर सुटायचा. गावातील पंधरा-वीस गुरे पाटीलवाड्यावरून घरी परतायची. गुरे कसली, हाडांची नुसती मोटकुळी, डोळयात मूक दैन्य. जाताजाता कशात तरी तोंड घालायची आणि फू फू करत धूळ उडवून जायची. आबा कुळकर्ण्याचा अस्सा घागरीएवढ्या वशिंडाचा बैल, पण तोही आता मुतायचा ते पोट पिचल्याप्रमाणे ! काल तो धापा टाकत फेस ओकू लागला आणि रात्री पाय ताणून खलास झाला ! चौखांबी टेकडीवरील गडावरच्या हणमंतभावीचा तळ बापजन्मी दिसायचा नाही, पण तेथे आता घराएवढे दगड दिसू लागले होते. मारुतीच्या देवळामागचा तलाव आटून चौकोन

चौकोन फुटला होता. काही वेळा पुरुषभर खड्डे खणून लोक मातकट चिखल घागरीतून नेत. माणसे गेली की गाई-कुत्री धावत येत, भराभरा ओला चिखल तोंडभर भरत. मग रात्रभर पोट फुगून ओरडत. काही आपोआप बरी होत. काहींना ओढून

भुताच्या खडकावरून खाली फेकावे लागे. मग रखरखीत ऊन आपल्या ओरडण्याने करकर कापत कावळे टणाटणा उड्या मारत लचके तोडू लागत.

"सूर्या तेरावा डोळा उघडलाय व्ह् य बायांनो!" कानशिलावर कटाकटा बोटे मोडत गुडगुड गंगाई तळतळत म्हणे, "हाड गेली चुलीत कुणा दुष्टाची !" म्हणजे गावात झालेय तरी काय या वर्षी? हे असले बिनबापाचे खेचर वर्ष आलेय इथे! हणमंतभावीचा तळ दिसला. नाना कुळकर्ण्याचा झरा गडकऱ्यांच्या बंडापासून कधी आला नाही, तो आता थेंब थेंब गळतोय. याच वर्षी पटकी आली, तापाने पाच-पंचवीस माणसे चचली. चौदा दुभत्या गाई, म्हशी थानातून रक्त गळून मेल्या. आपल्याकडूनच काही चुकले नाही ना, कसला कुलाचार राहून गेला नाही ना, अशी त्याला*(* सखाराम पाटलाला) सारखी रुखरुख लागून राहिली. बायकोच्या सांगण्यावरून त्याने महिन्यापूर्वीच एक बकरा गडावर पाठवला होता, पण आता आणखी काय झाले? पण विचारायचे तरी कुणाला? साऱ्या भटा-कुणब्यांचा आधार म्हणजे पाटील. त्याला तक्रार सांगितली की तिचे निवारण झाले, अशी त्यांची मेंढीसारखी श्रद्धा. म्हणून तो अलीकडे मन कुरतडत असे. कुण्णाशी बोलायचा नाही, कुणाशी मिसळायचा नाही....."

- शेतीवर अवलंबून असलेली खेडेगावची माणसे, या भीषण दुष्काळाने हवालदील होतात. आता माणसे, गाव सोडून इतरत्र पांगण्याच्या तयारीला लागली आहेत. यावर पौर्णिमेला, देवीपाशी पर्यायाने , चंद्रीपाशी कौल मागतात. तेव्हा ती घुमत म्हणते," मी भुकी हाय. मला माणूस पाहिजे. रगत पाहिजे. नाहीतर सत्यानाश करीन. गाव खावून टाकीन. आसक...."

- जी एंनी, चंद्रीने देवी अंगात येवून, घुमत हे सांगीतल्यावर झालेल्या सर्वांच्या प्रतिक्रिया जिवंतपणे दाखवल्या आहेत अमाशीचा बळी द्यायचा, हे सर्वांना मान्य होते. हे गंगाई सखाराम पाटलापुढे बोलते.

- सखाराम विरोध करतो.अगदी बंदूक उगारतो. मग सत्या कुंभारही बंदूक काढतो. व प्रकरण हातघाईवर येते..

- तेव्हा,( ठरवल्याप्रमाणे), पाटलीणबाई त्याला, पाटलाला, स्पष्टपणे पण तिरकस बोलते."... नाहीतर माझ्या साहेबरावाला न्या.." असे सांगून पाटलीणबाई इमोशनल ब्लॅकमेल करते..पाटलाचा नाईलाज होतो. तो चिरडल्यासारखा बसला व धोतऱ्याच्या सोग्याने डोळे टिपू लागला.

- मग जमाव पिसाळतो. निरागस अमाशीला बावेच्या कोनाड्यात ढकलतात. व तिच्यावर दगडे फेकून, तिला जमाव मारतो.

-( समुहाने एखाद्याला दगडाने मारणे ही प्रथा एखाद्या धर्मात मान्य आहे. तसे लेखीही त्या धर्मग्रंथात लिहिले असते.(' पेल्टिंग' कुप्रसिद्ध आहे.) या सामुदायिक गुन्ह्यात कोणाच्या दगडाने मृत्यू झाला , हे सांगता येत नाही. हा गुन्हा समुदायाचा एकत्रित असल्याने, कोणालाही जमावात कोण होते हे बाहेर सांगण्याचे धाडस होत नाही.)

- मात्र अमाशीचा बळी गेल्यावर चंद्री ओरडते, " असला नासका घास घालणार तुम्ही ! थू : ! मला घास चखोट पाहिजे." त्यामुळे सगळयावर बोळा फिरवला जातो.कथेला ट्विस्ट(twist) मिळतो. " बघू आता पुढल्या अमावस्येला...." म्हणत जमाव पांगतो. जमावाची ताकद माहित असल्याने पाटलीणबाई मात्र मनातून हादरते.

- शेवटी सखाराम पाटील अमाशीपाशी बसून शोकशब्द बोलतो. "... आणि आपणसुद्धा फुकटच जन्मलो आणि असेच एक दिवस माती होवून जाणार झालं..."

" पण साऱ्यामुळे त्याचे आयुष्य लाथेने मारून फोडलेल्या बेडकीप्रमाणे आकारहीन, ओंगळ, फुटके फुटके होऊन गेले...."

- ए) जीएंनी गुन्हेगारी पार्श्वभूमीवर काही कथा लिहिल्या आहेत - उदा. स्वामी, पुरुष, काकणे इ. गुन्हेगारी हा कथाप्रकार जी एंनी अत्यंत समर्थपणे हाताळला होता.

- तसेच माणसाने दुसऱ्या माणसाचा बळी देण्याचा विषय, मानवी गुलामगिरीइतका जुना आहे. बळी देण्यामध्ये, केलेला खून हा जाहीर असतो. तो कोणी बाहेर जाहीर सांगत नाही. हे त्या बळीप्रकाराच्या खूनाचे वैशिष्ट्य असते.काही कथांमध्ये जीएंनी यावर लिहिले आहे. उदा. गोरिला( सांजशकुन), बळी( सांजशकुन), गुलाम( काजळमाया) इत्यादी.

- बी)या कथेत जीएंनी माणसाच्या विलगतेची ,अलगपणाची भावना अधोरेखित केली आहे. जी ए शेवटी सखाराम पाटलाच्या मनातले विचार सांगतात -"...आणि आपणसुद्धा फुकटच जन्मलो आणि असेच एक दिवस माती होवून जाणार झालं..."

- सी)नियती अनाकलनीय असते. ती वेगवेगळी रूपाने समोर येते. उदा. पाणमायमध्ये, जवळची माणसे, मायच्या विरुध्द जावून तिला गुपित सांगायला भाग पाडतात. व मग तिला मृत्यूला सामोरे जावे लागते. भोवतालच्या माणसांचे षड्रिपू हेच एखाद्या माणसाची नियती होते. या कथेत, भोवतालच्या माणसांच्या षड्रिपूंच्या व आकाशस्थ शक्तीच्या( दुष्काळाची परिस्थिती) स्वरूपात, नियती होवून अमाशीचा बळी जातो.

- डी)जीएंच्या लेखनाच्या सुरवातीच्या काळात प्रसिद्ध झालेली ही कथा आहे. ही कथा , त्यांच्या लेखनाचे शिखर आहे. त्यानंतर जीएंनी आणखी , उंच,उंच शिखरे गाठली. म्हणून ही कथा लक्षणीय आहे.

धन्यवाद - विलास वाघोलीकर

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐

नीतीन वैद्य: डोळ्यासमोर साक्षात होते कथा..

रेखा दातार : बळी

G. A. Kulkarni

बळी कथेतील अमशीचा बळी जरी गावकऱ्यांनी घेतला असला तरी मला वाटते तिचा खरा बळी तीची आई विठा जोगतीण तिला सोडुन गेली तेव्हाच गेला. विठाने जातांना तिची तिची कवड्यांची माळ आणि घुंगर अमशीला दिली आणि स्वताःची सुटका करुन घेतली पण अमशीला मात्र या व्यवस्थेचा बळी बनवले.

अमशी शिवाय या कथेत वेगवेगळ्या प्रकारे बळी गेलेले अनेक जण आहेत.

गावात सतत दोन वर्षे दुष्काळ पडला आहे. या दुष्काळाने अनेकांचे बळी घेतले. आबा कुलकर्णाचा घागरी एवढ्या वशिंडाचा बैल गेला. देवळामागिल अटलेल्या तलावातील मातकट चिखल खाऊन गावातल्या अनेक गाई - कुत्र्यांचा बळी घेतच् गेला.पटकीने पाच पंचवीस माणसे चचली आणि चौदा दुभत्या गाई -

म्हशींचा रोगाने बळी घेतला. खाली मैदानात शहरी नखऱ्याचे चोरांचे चांदगाव भुईतुन वर आले आणि तेव्हाच त्याने खऱ्या चांदगावचा अर्धाअधिक बळी घेतला होता. आता सलगच्या दुष्काळामुळे पांगापांग झालेले चांदगाव अजुनच खचले. या दुष्काळाचे संकट निवारण्यासाठी गडावर सखाराम पाटलाने बकऱ्याचा बळी दिला.शत्रुला फितुर होउन मारुतीच्या दीपमाळे जवळुन तोफ डागल्यास ती तटाला लागते हे गुपीत सांगणाऱ्या हरामखोर कृष्णाजी वडेर याने ज्योतिर्गडाचा बळी दिला. गोऱ्यांचे पाय गडाला लागले आणि त्या मुळे गाव जळुन गेले. वरवंटा सारख्या दंडाची शेकडो माणसे गडावरील देवळात पडली आणि आणि त्यांच्या सवाष्णी हणमंत भावीत गेल्या. गाव- गड उजाड झाले आणि एके काळी शेकडो घोड्यांना पाणी पाजणारी हणमंतभाव अजुबाजुच्या गावातील चुकार गुरा - वासरांचे बळी घेउ लागली.

गावाची पडझड झाली तशी सखाराम पाटलाच्या वाड्याचीही पडझड सुरु झाली.आता शिल्लक राहिलेल्या तीन धडक्या खोल्यांमधे सखाराम पाटिल रहातो. काळाच्या ओघात त्याच्या पाटिलकाचाही बळी जात आहे.पाटील म्हणुन असलेला त्याचा मानही हळुहळू कमी होत आहे. आता नोकर चाकरांची चैन संपल्यामुळे पाटलीणबाई आता स्वतःच दणादणा भाकऱ्या करतात आणि त्यांचा मुलगा साहेबराव इतर पोरांप्रमाणे अनवाणी पायाने लाकडे गोळा करतो.

गण्या भटाचा बळी अचानक गेला आणि शंकरजी कुलकर्ण्याच्या मुंज झालेल्या मुलाचा बळी कुठल्याशा आजाराने घेतला. गणूभट आणि शंकरजींची घरे मुला बाळांविना उजाड पडली. मग गावकऱ्यांनी त्या घरांचे सामान एक एक करुन नेत त्या घरांचे बळी घेतले.

जेडाच्या काशी बद्दलच्या भांडणात शिवा रामोशाने जाना कदमाचा बळी घेतला तो स्वतः आणि जन्मठेपेवर गेला. मग शिवाच्या चुलत भावाने कदमाच्या भावाचा बळी घेतला, मग त्या भावाच्या बायकोच्या तीन भावांनी त्या चुलत भावाच्या जावयाचा बळी घेतला......

अमशी बेडकीला पकडुन बांधुन ठेवते. तीला रंगित कागद चिकटवुन हौसेने सजवते पण शेवटी सत्या कुंभाराने मारलेल्या लाथेने भिंतीवर आपटुन तिचा बळी जातो..... जणु काही अमशीने तिला बळी जाण्या आधी बळीच्या बकऱ्या प्रमाणेच सजवले असते.

चंद्रिच्या अंगातल्या देवीने अमशीचा बळी मागितला. गावकऱ्यांच्या मते गावाच्या मुळावर उठलेली, आई बापाने उलथवलेली , बेवारस कुत्र्याप्रमाणे असलेल्या अमशीच्या जीवाचे मोल ते कितीसे ? पण सखाराम पाटील अमशी कडे बघुन स्वतःची मुलीची हौस भागवत असतो. अमशी त्याचीच मुलगी असायची पण शक्यता असते. अमशीला वाचवण्यासाठी सखाराम पाटील खूप प्रयत्न करतो पण शेवटी पाटलीण बाईने गावकऱ्यांपुढे अमशी नसेल तर साहेबरावांचा बळी द्या असा पर्याय ठेवल्यावर त्याचा नाईलाज होतो.

त्या पोरक्या लेकराचा - अमशीचा - बळी घेतल्यावर सुध्दा चंद्रीच्या अंगातली देवी शांत होत नाही. तीला अमशी म्हणजे नासका घास वाटतो आणि आता तिला चोखट घास हवा असतो......आता पाटलीणबाईचे धाबे दणाणते. आणि तिची साहेबरावचा बळी जाण्यापासुन वाचवण्याची केविलवाणी धडपड सुरु होते.

अमशीचा बळी कोणी घेतला? दुष्काळाने ? चंद्रिच्या अंगात येणाऱ्या देवीने ? गावकऱ्यांच्या अंधश्रध्दांनी ? पाटलीणबाईने ? तिला वाऱ्यावर सोडुन निघुन जाणाऱ्या विठा जोगतीणीने ? का उघड उघड तिचे पितृत्व न स्विकारणाऱ्या सखाराम पाटलाने ?

G A यांची ही कथा मनाला उदास करुन जाते. पाना पानागणित ही उदासी वाढत जाते आणि अमशीच्या बळीने ती परमोच्च बिंदू गाठते. अमशीला वाचवु न शकणाऱ्या सखाराम पाटलापेक्षाही आपण हतबल होतो. चाली- रीती , शकुन - अपशकुन , रूढी, झुंडशाही यांच्या ओझ्याखाली चिरडल्या जाणाऱ्या त्या निष्पाप अमशीला धावत जाउन सोडवावेसे वाटु लागते. बळी जायला निघालेले ते अजाण लेकरु ह्या सगळ्या वावटळीत पहिल्यांदा गांगरते पण नंतर सगळे विसरुन हाताला चिकटलेल्या बेलफळाशी खेळत रहाते तेव्हा आपल्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय रहात नाही.

G A ची प्रसंग उभा करण्याची हातोटी जबरदस्त आहे. वाचता वाचता आपण कधी त्या कथेचा भाग होतो समजत नाही.ताशाचे आवाज कानठळ्या बसवु लागतात , अंगभर भीतीची लहेर पसरते आणि आपला जीव अमशीला वाचवायला धडपडु लागतो. दगडांपासुन अमशीचा बचाव करता करता नकळत आपल्या दगड लागु नये म्हणुन हात अभावीत पणे तोंडासमोर येतो.

गोष्टीतले गडाचे आणि गावाचे वर्णन आणि प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या चांदगावाचे आणि ज्योतीर्गडाचे वर्णन वाचुन असे वाटते की आधी गाव होते आणि त्या नंतर GA नी त्याचे वर्णन केले ,की आधी G A नी लिहीले आणि मग त्या वर्णना बरहुकूम प्रत्यक्ष गाव तेथे उभे राहिले? G A च्या प्रतिभेला सलाम

गोष्टी बद्दल लिहावे तितके थोडेच आहे. प्रत्येक वेळी नविन काहीतरी सापडत जाते!

रेखा दातार : संजिवदादांनी कथेचा सर्व बाजुने विचार करुन छान लिहीले आहे. जी. ए. च्या कथेला इतके आयाम असतात की सर्व सौंदर्य स्थळे मांडणे शक्यच होत नाही

सुनीळ सामंत: बळी ही कथा वाचताना होणाऱ्या वेदनांमुळे ही कथा वाचायला मला त्रास होतो. अत्यंत परिणामकारक भाषा, अंगावर कोसळणारे अभद्र विचार आणि एक बळी घेऊन झाल्यावरही अतृप्त राहिलेली ती भयानक शक्ती. कथेच्या अखेरी उभा रहाणारा प्रश्न- पुढच्या अमाशेला कोणाचा बळी?

आणि त्याहूनही भयानक म्हणजे हे वास्तव आहे, आपल्या देशात हे असे अजूनही गावोगावी कमीअधिक प्रमाणात घडत असते याची भीषण जाणीव. अस्वस्थ करणारी.

विलास वाघोलीकर: अगदी बरोबर अजूनही तुरळक प्रमाणात, बळी देणे, मॉब किलिंग व गुलामगिरी चाल आहे

विलास वाघोलीकर: त्यामुळे ही कथा, तशी एका सामाजिक प्रथा पुढे आणते. अशा प्रसंगी बळी घेणाऱ्याने व गेलेल्या चे मन स्पष्ट करते. आपण विचारपूर्वक प्रतिसाद दिलात , याबद्दल धन्यवाद.

सुनीळ सामंत: विलासजींनी या कथेचे अगदी मुद्देसूद विश्लेषण केले आहे. शेवटच्या परिच्छेदात त्यांनी आकाशस्थ शक्तींच्या नियतीवादाचा उल्लेख केला आहे.

जीएंच्या बहुतांश कथा या नियतीवाद आणि अस्तित्ववादाच्या परिघातल्या असतात हे खरे. पण पारवा हा कथासंग्रह मानवी जीवनातील ताण्याबाण्यांच्या, भावभावनांच्या व त्यातील कुट्ट बाजूंच्या कथा आहेत असे मला वाटते. पाळणा, काकणे, जखम, बळी, रातराणी व इतर संग्रहातील राधी, कैरी या कथा वाचताना मानवतेविषयीच प्रश्नचिन्हे उभी रहातात. ते केवळ नियतीवादाच्या आधाराने सिद्ध करता येणार नाही. भूक सोडून इतर कोणत्यातरी कारणाने एखाद्या जीवाची हत्या करणे हे कोणत्याही पशूत दिसत नाही. फ़क्त मानवात दिसते. बळी मधील चंद्रा, लखमा लोहार, गुडगुडगंगाई, या माणसांच्या स्वभावाला शब्द सुचत नाही. कोनतातरी हिशोब चुकवण्यासाठी एखाद्या अश्राप जीवाला मारणारे किती हीन दर्जाचे असतात ही भावना आणि असे लोक आपल्याही अवतीबवती असतात ही जाणीव भयानक अस्वस्थ करते.

श्री



कथा : बळी   कथासंग्रह : पारवा. जी.ए. कुलकर्णी.

बळी देणे याचा अर्थ अर्पण करणे, अर्पण करणे जरी असले तरी नक्की त्याग कशाचा, कोणाचा व कशासाठी. गाव वाचविण्यासाठी दिलेला बळी म्हणजे गावकऱ्यांनी सर्वानुमते दुसऱ्या अजाण व्यक्तीचा जीव घेऊन गावकरींना त्याग केला गेला आहे ही एक कुप्रथा असलेली समजूत आहे. दुसऱ्याचा बळी देणे म्हणजे आपल्याकडून केल्या गेलेल्या या बळीच्या हत्येमुळे गावाची, गावकऱ्यांची दुष्काळाच्या संकटातून मुक्ती मिळावी अशी अशक्यप्राय इच्छापूर्ती होण्याची अपेक्षा हा या कथेचा केंद्रबिंदू होय.

जी.ए.ंच्या कथामध्ये जुन्या प्रथा व त्यावरील लिहिलेल्या कथा हे आपल्याला नवीन नाही. पण अशी गोटीबंद कथा कि जीचा एकही चिरा काढावयाचा म्हटला तरी काढता काय हलविता सुद्धा येत नाही. कथेतील माणसे, निसर्ग, गावकुसाचे वर्णन, गावकऱ्यांचे खुसपट काढणारे, विविध, कातडीबचाव विचार, हलगीच्या वाजणाऱ्या तालांवर त्या विचारांची आंदोलने, व हळूहळू बळी म्हणून अमोशीचे नाव पुढे आणून तिचा बळी देणे या घृणास्पद वाईट कृतीच्या नंतर गावकऱ्यांचे एकदम शांत होणे हा या कथेचा शेवट आहे. यात सखारामपाटलांची मानसिक ओढाताण, पाटील असूनही गावाच्या सामूहिक निर्णयाला नाही म्हणूनही अमोशीचा बळी जातोय व करता काही येत नाही याची अगतिकता, पाटीलीण बाईचा (बायकोचा) [illegible] गावातील वातावरण व गावकरी, चंदा जोगतीण यांच्याभोवती कथा फिरत राहते.

स्वतः अमोशी, अर्धवट वयाची, लहानपणापासून वेडसर व असलेली, आई, विठी जोगतीणीने गावावर सोडून दिलेली बेवारस, अनौरस अपत्य आहे. सखाराम पाटलाला तिचा असलेला (बाप म्हणून) लळा, प्रेम गावकऱ्यांना ठसठसते आहे. न बोलून देखील गावात असलेले हे पाप बळीच्या निमित्ताने नष्ट होणे व पाटलाची किंमत गावकुसात कमी करणे

गावकऱ्यांनी वेगळ्या पद्धतीने तिढा टाकून साथ केली
गावकरी ही सर्व बेरके आहेत, दुष्काळाचे वर्णन
कधी ते सरळ करत नाहीत. सूर्याने तेरावा डोळा
उघडलाय, बिन बापाचे खेचर वर्ष आलंय, हणमंत
भावीचा तळ दिसतोय, गडाचे डोकेच गेल्यासारखे झाले.
मरीआई देवळाचे उत्पन्न बंद झाल्याने दिवा विझला
आहे, यावर्षीही (मागील वर्षाप्रमाणे) टाकूर
मारण्याइतका पाऊस आलानाहीये, हणमंत भावीचा
तळ बापजन्मी कधी दिसला नाही, पण तिथे आता
घरा एवढे दगड दिसू लागलेत. गावकरी गावकरी
सोडून बाहेर चालले आहेत. गुरेढोरे मरत आहेत
पिण्याच्या पाण्याची वणवा आहे, गावगाडा रडत
चालला आहे. हा सारा गोळा की गावाची नाडी
मरणार हे गाव मरणाचा क्षण नजरेसमोर येत
आहे. या सर्व पार्श्वभूमीवर कुंभारवाड्यात
चंद्रीच्या अंगात देवी संचारेल म्हणून गेले सहा
महिने अमावस्या पौर्णिमेला तळ ठोकून आहेत.
देवी संचारली तर गावाच्या प्रश्नांची सुटका
होणार ही मांथकी खात्री गावकऱ्यांत आहे
पण सहा महिने देवी बोलली आणि त्यामुळे
वातावरण एकदम स्तब्ध होऊन बसले आहे.
आज खाडकन पडदा बाजूला सरला
आहे. मूक बसलेली हाडगी रडू लागलीय, चंद्री
घुमतीय व सखाराम पाटलाने विचारलेल्या प्रश्नाला
चंद्री ओरडून सांगते "मी मुकी हाय" सहा
माणूस पाहिजे, रगत पाहिजे, नाहीतर सत्यानाश
करीन. गाव खाऊन टाकीन असले, हडळी
बाजत होती, गावकरी भूत पाहिल्या प्रमाणे गपगार
झालेली होती. कमी शब्दात पण बोलण्यात विखार
ठेऊन सखाराम पाटलांनी मोकनाळचे वर्तन स्वच्छ
केलेले होते. गावकरी अमोशीला बळी म्हणून
द्यायचे सांगून टाकतात.
कथेच्या प्रवाही शैलीने सांगते. पूर्ण कथा
एकही शब्द, वाक्य न गाळता वाचल्याने त्यांची
मिळणारी, टाळता न येणारा निर्णय, गावकऱ्यांची
मानसिकता, त्यांचा स्वतःचा जीव वाचविण्यासाठी,
गाव वस्तीलायक राहण्यासाठी, घरे राहण्यासाठी

झालेली बळीची निवड तेच सार्थ ठरवतात.

सखाराम पाटील कोलमडतो. विरोध करतो आपले घर, जमीन विकायला निघतो कारण त्याला त्या अकाली पोरीचा घास देवीला द्यायची इच्छा नसते. घरातील बायकोने केलेला भिकारी अपमानही तो दुर्लक्षित करतो. पण गावाला आता नशा चढलेली असते आणि कथेचा उत्तरार्ध चालू होतो.

या छोट्याशा कथेत जी.ए.नी माणसे तरी किती घ्यावीत. सगळी इरसाल आहेत, बळी आहेत, पाटलांचा पण मुलाहिजा करणारी आहेत. एक दोन शब्दात, वाक्यात त्या त्या गावकऱ्याचं वर्णन जी.ए.नी अगदी चपखलपणे केलेले आहे कारण त्यांची शब्दांवरची व वाक्ये लिहिण्याची हुकमत. बघा हं, अमाशी, खाम्या, सखाराम पाटील, सोहवराव (पुजारी), पाटलीणबाई, सत्या कुंभार, गुडगुडगंगाई, बिठो (जोग तीथ), त्रानोबा शिंपी, आबा कुलकर्णी, तात्या, शास्त्री धनगर, (म्हातारा गडकरी, (गावचा इतिहास), कृष्णाजी वडर, सातप्पा गुरव, पद्मण शेट्टी, सुबा धनगर, गणु भट, शंकरजी कुलकर्णी, बापू धनगर, बसप्पा जेठी, सुताराची कुळणी, मळप्पा गुरव, चंद्री सुतारीण, रमाबाई, जाना कदम, शिवा रामोशी, जेडाची काशी, चंद्री, लक्ष्मा लोहार, दादू भट, गंगाई व यांना सर्वांना धरून ठेवणारे गाव टेकडीवरचे चांदगाव व नंतर रवाळी वसविलेले चोरांचे कुंडी गाव ज्या गावात ही बळी देण्याची कथा घडते. ज्योतिर्गड व अवकुपालचा परिसर, जो परिसर यात मळ्ये यादी व वडर यांनी लिहिलेली बळी कथेवरची नोंद आहे, त्यातील वर्णन वाचल्यावर कथेतील प्रत्येक जणांचा कंगोरा अन कंगोरा उलगडून टाकतो व त्याची वर्णने कथेची हुकमावल्या व बळी होण्याची भिषणता हुबेहूब उभी केलेली दिसते.

कथेचे ओघवतेपण हळूहळू तयार होणारी

वातावरण निर्मीती, प्रत्येक गावकऱ्याचे एकचपणासुद्धा वाक्य, प्रेक्षक पाहणे. तिरकस बोलणे, प्रसंगी पदरावर घेऊन जाणे. त्याची इभ्रत धुळीला मिळविण्याची अतृप्त लालसा ठेऊन घडमोडे चेहरे, तुरळत्ता इकडे रखाऱ्या, चिडणाऱ्या छोटा बारकाइन कथेत आलेल्या आहेत. बायकोकडूनही चर्चा आहे मिळतो व भावनेच्या भरात साहेबराव ला ही बळी घेऊन जा म्हणून गावकऱ्यांना आवाहन देणे पण चंद्री जेव्हा "नारळा बळी नाही चालणार, मला बळी चकोर पाहिजे" म्हटल्यावर पाटलीणीच्या चेहऱ्यावरची. बागाळ्यातील मजीती व गावकऱ्यांचे पाय धरून साहेबराव वाचावा म्हणून वाचवण्याची केलेली मनधरणी घटका लागून जाते.

आता वळू मुलराणीकडे.

त्या सर्व गदारोळात अमौशीला काहीच कल्पना नाही. ती बेलफळाशी रवैकर्नीय निष्पापपणे, आणि तो क्षण येतो अमौशीला सरवाराम, सोन्यापासून दूर केले जाते. पाटलीण गंगूबाईला खूण करते. हालग्यांना आता वेग आला. अंधार वाढू लागला. प्रेमळपणाची कुठे खूण अमाशीकरीता उरली नाही. पहावे तिकडे काळीज चिरणारे दैत्यांचे चेहरे हजार डोळ्यांचे चांदणे करून, चौरवाविवरून निघरत त्याच्या गावापर्यंत पसरले. गावकऱ्यांच्या डोक्यावर आता खून चढला होता त्या वेड्या [illegible] मध्यभागी [illegible] असल्या प्रमाणे संथपणे चंद्री चालली होती (देवीची तिच्या माध्यमातून इच्छापूर्ती झाली म्हणून) व अमाशी (मृत्यु म्हणजे काय याचे अज्ञान असलेली अनाणपौर बळी म्हणून). मुठभर कुंकू तिच्या चिंध्या, चेहऱ्यावर फिरवीते आणि सारा जमाव (गावकरी) एकदम अनेक मुख्यी शिकारी झाला. दगड गोळा करून मारू लागला, त्यातील पहिला दगड पाटलीणीचा होता. आणि थोड्याच कालावधीत अमाशीचा मृत्यु झाला, दगडांनी ठेचून मारून. गावाचा बळी म्हणून. जी.ए.नी कथेला इथे एकदम नवे वळण दिले जे अनपेक्षित आहे. चंद्री अमाशीच्या बळीनंतर परत [illegible] व तिने गावकऱ्यांना बोल लावला

असला नासका (अनौरस संततीचा. बेवारस पुढीचा. जिला आईबाप कोण हे माहीतनाही) घास घालणार तुम्ही. तू तुमची, मला घास चकोट पाहीजे.

लोकांचे हातून दगड गळून पडले, ते संभ्रमीत झाले, पाटलीणी कावरीबावरी झाली. गावापेक्षा पोटच्या गोळा जास्त लाडका? आता पाटलीणीचा सामाजिक बळी होण्याची वेळ आली तर 'साहेबराव' ला चकोट बळी होण्याची नामुष्की तिच्यावर ओढवली. तीने नाक घासले, भिक मागितली कि साहेबराव ना बळी नको म्हणून. तिचेही नशीब त्या क्षणाला बलवत्तर असल्याने ती सुटली कारण चकोट घास घायचा का नाही हे पुढील अमावस्येला ठरवायचे असे गावकऱ्यांनी ठरविले.

एकंदर सत्कामाचा आणखीन अपमान गंगाईने केला "नासका" घास असल्याने देवीनी बळी स्विकारला नाही म्हणजे "देवीपण ~~थुंकली~~ थुंकली सत्यावर".

कथेचा आस्वाद घ्यायचा म्हटले तर काही प्रश्न उपस्थित होतात.

१) अस्तीत्ववादी गावकरी (समाज) यांचे जगणे सुसह्य व्हावे म्हणून निरपराध माणसाचा बळी का शोधतात व बळी देतात.

२) या कथेतील बळी तर लहान बेवारस मुलगी जिच्या आईवडलांचे (अपरोक्ष पता असूनही) अस्तीत्व नाही, आगापिछा नाही ~~[illegible]~~ व बळी तिला ठरविण्याचा अधिकार गावकरी, चंद्री, गंगाई, सत्याला कोणी दिला? पाटलीचा विरोध करून पुढील अमावस्येला "चकोट" बळी पाटलांच्या घरच्या निवडा करण्याचा निर्णय होणार का नाही याकरता सरदारांच कुटुंबाचा "बळी" होण्याचे कोण ठरवणार? का ठरवणार? आता कोणतेही सबळ कारण दिसत नाही.

थोडक्यात गावकऱ्यांनी दगडाने ठेचून मारलेल्या अमलो ची नासका घास बळी देऊनही नाकारला जाणे, 'फुकट जन्माला आली, अन फुकट मरून गेली' जरी मान्य केले तरी दुष्काळाची परिस्थिती बदलण्याची ताकद ना चंद्रीची आहे ना गावकऱ्यांची

असमाधानी गलितगात्र झालेले गावकरी तिच्या मृत्युनंतर, अमानुष बळी घेऊन सुद्धा, या समाज मनाला खंत वाटते का? आणि खंत वाटून सुद्धा हे कृष्णकृत्य केल्याचे अनैतिक समाधान उराशी घेऊन खोटा विजय प्राप्त झाल्याचे चेहऱ्यावर कोणीच दाखवू शकत नाही. मग बळी दिल्याचा या समाजाला उपयोग काय असे अनेक प्रश्न वाचकांपुढे ठेऊन श्री. ए. ही कथा मानसिक पातळीवर संपवतात.

आपण सुद्धा फुकटच जन्मलो आणि असेच एक दिवस मरतो होऊन, जाणार झाले ही नकारात्मक भूमिका विचार घेऊन सखाराम ही त्याच्या तत्वांचा निष्कारण बळी गावकऱ्यांना देऊन एका अर्थाने अमारशीच्या मृत्युस कारणीभूत होतो असे म्हणावेसे वाटते.

—*—

टी.क.! या वेळेस कथेतील संवादवाक्ये वा निसर्गवर्णन कथेचा आस्वाद घेतांना हेतुपुरस्सर टाळले आहे. त्यामुळे आस्वाद विस्तार सिमीत ठेवत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या प्रतिक्रिया, सकारात्मक, नकारात्मक अपेक्षित आहेत. त्यामुळे चर्चेस वेगळा आयाम मिळू शकेल.

सावरगांवकर संजीव 7350002870
कथा : बळी कथासंग्रह : पारवा

सुनीळ सामंत: संजीवसरांनी ही कथा नेहमीप्रमाणेच अतिशय ूबारकाईने वाचून त्यातील महत्वाचे अंतर्विरोध दाखवले आहेत. इतर कथांतील सौंदर्यस्थळे व शक्तीस्थळे दाखवणाऱ्या संजीवजींना या कथेतील सौंदर्य दाखवावेसे वाटले नाही, उलट भीषणता पाहून ते सुन्न झाले यातच सर्व काही आले.

सखाराम पाटलांची मानसिक ओढाताण त्यांनी टिपली तसेच गावकऱ्यांचे बेरकीपण(अमानुष) त्यांना दिसले. जीएंच्या लेखणीची ताकदच अशी(संजीवजींनी म्हटल्याप्रमाणे) दोन ओळींतच ते एक एक व्यक्तीरेखा स्पष्ट करतात. एकाद्या चित्रकाराने दोन चार रेषांतच शिवाजी वा गांधीजी दाखवावे तसे. म्हणूनच तर आपण सारे जीएंच्या प्रेमात पडतो.

संजीवजी आपण पाने न मोजता लिहावे. आपल्या विश्लेषणातून कथेची अनेक परिमाणे आम्हाला कळतात.

संजीव सावरगांवकर: धन्यवाद 🙏

सुनीळ सामंत: रेखाजी. तुम्ही जीएंच्या शिर्षकाचा नेमका सूर पकडला आहे. या कथेत बळी कोण(आणि कथेत अजून न अलेला बळी कोण) हा प्रश्न खरेच फ़ार मोठा आहे.

तुमच्यासारखी कथा वाचायलाजमावी हीच इच्छा.

जीएंच्या कथेत बरेच काही लिहिलेले असते. पण ते हिमनगाचे टोक आहे की काय असे वाटावे इतके न लिहिलेले पण सुचवलेले असते. आणि हे जे सुचक शब्द किंवा वाक्यं असतात ती अनेकदा आपण कथेच्या ओघात ओलांडून पुढे जातो. तुम्ही नेमकी ती चिमटीत न्पकडून बघता आणि कथेमागची, कथे आधीची आणि कथेनंतरची कथा तुम्ही वाचता.

विठा जोगतीण हा एका अख्ख्या कथेचा विषय आहे आणि तो जीएंनी जरी चार दोन वाक्यांत संपवला असला तरी त्या केवड्याच्या गंधाची ती कथा तुमच्यासारखा खरा वाचक पूर्ण वाचतो. लोहाराला सखाराम पाटलाचा एवढा राग का असवा आणि पाटलिणीला अमाशीचा एवढा दुस्वास का तेही पडद्यामागचे पडदे सरकवले तरच कळून येते.

कथे नंतरची कथा पुढच्या अमाशेला होणर आहे. तोवर सखाराम पाटील हातावर हात ठेवून स्वस्थ बसणरा नाही आणि आपला डूसाव तो तेव्हा टाकील का? लोहारावर? की गुडगुदगंगीवर वीज कोसळेल?

भयानक कथेच्या आजूबाजूची भयाणता अजूनच गडद लाल होत जाते.

संजीव सावरगांवकर: होय, त्या कथा वाचनात expert आहेत. कथेचे मागची कथा लवकर visualize करतात. बळी वरील लेखन सुंदरच आणि कथेचा एक वेगळा आयाम देऊन जाते.

वैभव कुलकर्णी : खूप खूप सखोल आणि सर्व बाजूने केलेले विवेचन......

👍👍👍

वैभव कुलकर्णी : वृषाली मॅडम नमस्कार 🙏🏽 ,

जीएंच्या कथा मी कैक वर्षे वाचतोय ,

पण तुम्ही कथा कशा प्रकारे वाचायची ते शिकवलेत.

मनापासून धन्यवाद.....

रेखा दातार : 🙏🏼 मी नविनच आहे हो!....जी. ए.च अस काही लिहीतात ना!

'बळी' कथे मधे दुष्काळाचे वर्णन करतांना जी. ए. नी वापरलेले एक आवडलेले वाक्य.

'मारुतीच्या देवळा मागचा तलाव आटुन चौकोन चौकोन फुटला होता.'

किती छान वर्णन! डोळ्या समोर क्षणार्धात पाणी अटल्यामुळे तडे गेल्याने वेड्या वाकड्या चौकोनांचे डिझाईन तयार झालेली जमीन येते. यालाच 'शब्दचित्र' म्हणावे! 😊

# बाधा- जी ए कुलकर्णी- हिरवे रावे

सुनीळ सामंत: बाधा- जी ए कुलकर्णी- हिरवे रावे

जी एंच्या कथांचा मी प्रेमी असलो तरी त्यांच्या काही कथा माझ्या डोक्यावरून जातात.(ज्या इतर कथा समजतात असा माझा समज होता तो या ग्रुपने घालवला. हे खरेच. 😁 ). बाधा ही कथा त्या डोक्यावरून गेलेल्यापैकी एक.

या कथेत एक रमा नावाची विवाहित तरूण स्त्री आहे. तिला एक चांगल्या स्वभावाची सासू, सज्जन नवरा आणि राघू नावाचा हुषार छान मुलगा आहे. त्यात सांगण्यासारखे न्यून असे काहीच नाही. तरीही काही आहे जे तिला ओझे वाटते. ते तिला स्वतःलाही स्वतःशी सांगता येत नाही. पण खुपते. आहे मनोहर तरी गमते उदास अशी तिच्या मनाची अवस्था आहे.

लग्नापुर्वी तिला तिच्या मैत्रिणीचा भाऊ, दिवाकर, आवडत असतो. पण त्या काळातील प्रथांप्रमाणे त्याचा उच्चारही कधी ती करू शकत नाही. संसारात एक प्रकारची सततची कुचंबणा तिला भेडसावते. ती वेदना इतकी सूक्ष्म आहे की तिला कोणाशी ती व्यक्तही करता येत नाही.

एका सांध्यकाळी ती एका भग्न मंदिरात जाते आणि तिथे तिला दिवाकरचा भास होतो. आणि मग तिला बाधा झाल्यासारखे ती वागते. हळू हळू ही गोष्ट घरात आणि नंतर गावभर होते. कोणी काही बोलत नाही पण सगळे तिला टाळू लागतात.

त्या मनोविकाराला हातभार लागतो तिला आपली आता कोणालाच गरज नाही या भावनेचा. आपण आता नकोशी झालो आहोत या भावनेचा.

शेवटी एका कातरवेळी ती देवळाशेजारच्या पाण्यात स्वतःला स्वाधीन करते.

एवढीच कथा आहे.

यात न कळण्यासारखे काय आहे? किंवा कळण्यासारखे तरी काय आहे? पण वाचताना रमेसारखेच आपल्यालाही काहीतरी न्यून जाणवत रहाते. असे काहीतरी जे जीएंनी शब्दांतून दडवून मांडले आहे आणि ते आपल्यापर्यंत पोहोचत नाही. आपली जाण कमी पडते आहे असे वाटते.

या कथेवर चांगली चर्चा व्हावी अशी इच्छा आहे.

या कथेतील सौंदर्यस्थळांविषयी नंतर.

सुनीळ सामंत

रमा गर्गे: ही कथा मला खूप आतून आवडते.  कदाचित कथा नायिकेचे नाव रमा आहे,हे सुरुवातीचे कारण असेल.  पण ही रमा खूप खोल रुतून बसली आहे मनात. ती पाणी भरते तेव्हा ओले झालेले स्वयंपाकघर, तिचा थकवा आणि उत्साह एकत्रितपणे ओसंडून वाहणे, राघूला लिंबाचे लोणचे आवडते हे काहीतरी गुपित आहे,जे आपल्यालाच माहीत आहे असे वाटणे! सगळंच ती स्वतःला या संसारात अडकवून ठेवण्यासाठी करत असते. गोपाळरावांच्या कपड्याची इस्त्री,अमृतांजनची आठवण,राघूचे कपडे,ताटली या सगळ्यातून ती सतत स्वतःलाच बजावते,की आपण नसलो तर हा गाडा चालणार नाही. पण आतून तिला कळत असते की असे काहीही नाही. मग दिवाकर विषयी दडपलेले भाव उसळी मारतात.

स्त्री संसारात रमून जाते,पण केव्हा?तर केंद्रबिंदू असलेला नवरा पसंतीचा असेल तेंव्हा!!इथे आकर्षणाचा लख्ख क्षण येऊन गेला,आणि दुसरा त्याला पुसून टाकून स्वतःची नक्षी उमटवेल असा नव्हता!

रमा स्वतःला संसाराचा केंद्रबिंदू करू पहाते. पण तो बिंदू सतत ढासळतो. आपल्या शिवाय सारे काही ठीक चालू शकते,ही भावना तिला मृत्यूसारखी भासते. आणि मग तिची मानसिकता सुसायडल होते.

सासूबाई तिच्यावर प्रेम करीत असतात. पण गोपाळच्या संसाराकडे मला बघायला हवे ,हिची लक्षणे बाधा झालेल्या बाईची आहेत,तेव्हा नुसती हळवी,नाजुक स्नेहल रमा नको,तिच्याजागी एखादी ओबडधोबड, गावठी सून चालेल पण हा 'आटाला'ओढून नेणारी हवी,हे सासूचे मनातले बोलणे,त्याचवेळी रमेच्या भोळसर डोळ्यांकडे पाहून अपराधी होणे,हे ही खासच आहे.

या कथेत भांडी कुंडी आणि त्यांचे व्यक्तीशी असलेले भावबंध पण सुरेख रेखाटले आहेत. अमक्याची कळशी,चमकदार थाळीत आरश्याप्रमाणे बघून नीट केलेली मुगबट(नथनी),राघूची ताटली वगैरे.

रमेच्या घरात ती एका लहान वर्तुळात असते,तर पाणी आणायला देवळाकडे गेली की एकदम विस्तृत पटावर तिचे मन स्थिरावते. तो काळा कातळ,तिचे पायऱ्या पायऱ्यानी पाण्यात उतरणे,सगळंच दरवेळी आपल्याला सुद्धा त्या पाण्यात ओढून नेणारे!!

संजीव सावरगांवकर: Spontaneous thoughts and brief script.

बाधा :                कथासंग्रह : डोहकाळीमा
संजीव सावरगांवकर
                                    735002870

ही कथा वाचतांना असे जाणवते की जी.एं. नी शिर्षक आधी ठरविले कि कथा आधी लिहीली. कथा आणि शिर्षक एकरूप झाल्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

ती कुमार होती तेव्हा दिवाकर बाबत असलेले एक नकळत प्रेम ही तिची जिवंत बाधा होती. ती बाधा मनात ठुसठुसत होतीच पण शब्दातून ती व्यक्त करू शकली नाहीच.

तत्कालीन कालमानानुसार कमलेचे लग्न झाले व ती सौ. रमा झाली. लहानपणापासून मूक पण सहन करण्याच्या सवयीने संसाराच्या गोड्यातील सर्व संस्कार सहन केले, नवऱ्याचा रगाडा खुशाल मान मोडली तरी ओढत घेतला. प.ह. वर्षात मूल झाले पण संसार ओढणेच चालू होते. गोपाळ रावांच्या सुरू अन केवळ नावाचा संसार बिनतक्रार करू लागली.

इतक्या वर्षात एकदाच माहेरी गेलेली रमा (माहेरची कमला) ग पांच शब्द संपले आणि दिवाकर विषयी बोलायचे होते, पण शब्दच तिच्या तोंडून येईनात पण अंदाज्या लोकांनी दिवाकर हि पणी तो मुंबईला नोकरीला गेला ही माहिती मिळाली. संभाषण संपले. त्याची केवळ रमामधील कमळी नाहीशी झाली. रमा परत त्या बाधीत गावात आली अन तिचे वागणे बदलून हे असे (बाधीत) आयुष्य झाले.

रमाला जाता पाण्याची बाधा झाली होती. ते गावच तसे होते. या गावात कुठेही बाधा झाली असती. असली कथा या गावात होती. गावाला मृतकाळाचा पिंजरा तिकटलेला अन रमाने हे गाव कधीच जिवंत झाल्याचे पाहीले नव्हते.

देवळात मूर्तीच नाहीत तर गाभारा ओसाडच्या खोलीप्रमाणे. पण सूर्यास्ताच्या वेळी देवळाचे आणि वरील खांबांचे प्रतिबिंब खालच्या पंपा सरोवरात पडते की पाण्यातून तंतूबाधा वर

आल्यासारखे वाटे आणि त्या सुबक सोनेरी रुपेरी स्वप्नमय आकृतींनाही बाधा झाल्याप्रमाणे होत असे.

उमानंतर गोपाळरावांबरोबर संसार असला तरी अंतर्मनी दिवाकरचे अस्तित्व होतेच. कोकिळेच्या कावळ्यासारखी, कवड्याच्या कणासारखी नागायला इरकली लुगड्यासारखी सुंदर रमा गोपाळरावांना मात्र बाधा झालेली जाणवू लागली. त्यावेळेस परत्वेर ते 'मुलगी' पाहण्याचा कार्यक्रम करून जातीने दिवा मौन [illegible] होते.

पूर्वायुष्यातील दिवाकर हा केवळ दुराचा विचार राहिला होता. एका दिवशी संध्याकाळी ती तळ्यावरून कळशी घेऊन आली आणि उंबऱ्यावर [illegible] बसली. त्या दिवशी वरच्या देवळाने तिला जणू खूण करून बोलावून घेतले होते. या मनीचे गुज त्या मना कळले हा बाधित क्षण म्हणजे दिवाकरचा न दिसलेला पण कथेत दिसणारा मृत्यु व कमळची (रमेची) मुलाखत. मृत्यूनंतर दिवाकरच्या आत्म्याचे जाणविणे (ही त्याची बाधा) व तो वेळोवेळी बाधित रमेस दिसणे हा या कथेतील संघर्षबिंदू.
दिवाकर तिथे [illegible] दिसला नंतर लहानाच्या प्रकाशाच्या वरच्या पायरीवरही दिसला पण एक दोनवेळा धागा सुटला अन् रमा आपल्या [illegible] परतली ते मन ठरवूनच. ही तिची अवस्था सासूबाई, गोपाळराव, मुलगा, गावातील बायका आपापल्या वकुबाप्रमाणे पाहात, स्वतःपुरता सोयिस्कर अर्थ लावत तिच्या अपरोक्ष स्वतःचे आयुष्य रमेशिवाय जगण्याचे मनसुबे रचत राहतात.

रमा आपल्या परीने स्वतःशी झगडत होती पण इतरांची मात्र संशयात कुचंबणा होत होती. सर्वांचीच तिच्याबाबत असलेली उपेक्षा रमा नीट समजत होती. तिला एकदम हलके दुबळे वाटून तिच्या आयुष्याचा पीळच सैलला तिला [illegible]

२०।८।२२

सारे घर टेकडीवरील एकाकी देवळाप्रमाणे अंधारे, उजाड आहे आणि आपण त्यात आकृती साकुरी। तितक्यात चालली असता तेथे आपण एकट्या दिसत

जाणवले आहोत. एकटी म्हणताच तिचे अंग थरथरू लागले अंगातील कणाकणात दुःख भरून वाहत होते. स्वतःचे अंग तिला आवरेना आणि समोर कुणीसुद्धा नव्हते तरी पदर तोंडापुढे धरून अंगाला हिसका देऊन रडू लागली.

आता बाहेर रमा तिच्या स्वतःच्या कह्यात राहिली नाही. एक कळशी पाणी घेऊन येते म्हणून बाहेर पडली. तिने चार सोनेरी काकणं सहजपणे सईला देऊन टाकली. अगदी शेवटची निरवानिरव करण्यासारखेच जणू

जातांना रमा हसली, हातांची बोटे लाल कुंकवासारखी, कपाळावर कुंकू निखाऱ्यासारखे आणि समोर सगळीकडे निखाऱ्याच्या रेखाटलेल्या आज सगळीकडे आगपंचमी आहे. रमाच्या कानात मोठा घुमारा सुरू झाला देऊळ पेटल्याप्रमाणे लाल आगीच्या जिभा फुटू लागल्या.

कमरेपर्यंत पाण्यात ती भारलेल्या अवस्थेत आली. वारा बेबंद झाल्याप्रमाणे तिच्या कानातील आवाज घुमू लागला. पाण्याच्या अद्भुत लाटांनी गर्जना होऊ लागली. हाताने तोंड पुसून रमा समोर पाहत होती.

प्रतिबिंब विलक्षण रेखीव आहे, हसऱ्या चेहऱ्याचा दिवाकर पायऱ्या उतरून तिच्याकडे येत होता. तेच हसणे तेच मूक निमंत्रण उफाळलेली आगपंचमी शांत करण्यासाठी रमा अंतःकरणाचे सारे पीक शहाण्यासारखी सोडवीत तलावाच्या उकळत्या पाण्यात दिवाकरच्या हसऱ्या चेहऱ्याकडे पाहून सुखाबरोबरच निघून गेली.

रमाच्या वर्तनाचेही असेच म्हणावे लागेल गुंतलेले असतानाही गुंतलेले न राहणे, पछाडलेले असतानाही मुक्त राहणे, स्वतःच्या कृतीची विफलता जाणूनही ती करीत राहणे व बाधित असणे आणि तरीही नसणे या प्रकारच्या

[illegible]

४

मनोव्यापारातील रमा त्रिंबकला भेटायला स्वतः च्या शारीरिक मुक्तीचा विचार करुन शेवटी पाण्यात विलीन होण्याकरीता समर्पित होते.

मौत कितनीही संगदिल हो मगर।
जिंदगीसे मेहेरबान होती है॥

स्वतः च्या पासुनाने मृत्युकडे जाताना, तो मृत्यु कितीही पाषाणहृदयी असला तरी तिच्या मते बाधित जीवनापेक्षा तो नक्कीच अधिक दयाळू असतो हेच खरं. तिच्या खांद्यावरचे हे ओझं तिच्या नकळत झालेल्या बाधित जीवनाची ही कथा 'बाधा' अधोरेखीत करते.

—x—

बाधा - 2

मी (रमाने) काकशी सुचवली व मोरी मध्ये मोकळी केली. सासुबाईंनी तिरक्या नजरेने हे पाहिले. त्यांना आश्चर्य वाटले. संध्याकाळ व्हायला आली होती. गोपाळराव कोणत्याही क्षणी घरी येण्याची शक्यता होती. ती वेळच तशी होती ना घरातील ना झुडपातील थंडाव्या त्रासिक स्वरात सासुबाई काहीतरी सांगणार होत्या तेवढ्यात मीच म्हटले "सासुबाई येवढी काकशी भरून आणते हं. आलेच" माझी खुपच लगबग झाली. जीव श्वास घुसमटू लागला. झुडपा बाहेर पाऊल टाकले तो पाऊल चिखलातच पडले. रोड फक्त सुकाली पाऊस व तिन्हीसांजेला याची सुवेळ गाठली होती. घरापासून थोडे लांब आल्यावर, श्वासात श्वास आला. आता मला थोडे मोकळे वाटले. आयुष्यभराचे हे अकल्पित ओझे माझ्या मानगुटी केव्हा येऊन बसले याची आठवण मनात होतीच. त्याच अगम्य विचारांच्या तारेत मी देवळाकडे ओढली जात होते. समोर पाऊस, टपूटपू येणारी सांजवेळ, गायी घरी परतण्याच्या वेळची गोधुळी मुळे समोरचे धुसर दिसत होते. रस्ता पायाखालचा होता. तरीही नजर साथ देत नव्हती. कोणत्याक्षणी माझे काय होईल याची अस्पष्ट जाणीव मला त्रास देत होती पण ती जाणीव सुरक्षितही वाटत होती.

रोजची सवय चालणारी मी आता मात्र मार्गभ्रमित झाल्यासारखी चालत होते. रोजाहून जाणाऱ्या मैत्रिणी, गावच्या पाणी भरणाऱ्या बायका, कुजबुज बोलतांना भासत होत्या पण एकाही कानाशी शब्द स्पष्ट ऐकू येत नव्हता. असतील कदाचित माझ्या बाबतीतच बोलत. एक सारखुटी गायी रोजाहून गेली तिच्या शेपटीचा फटकारा मला लागणारच होता पण ती

गायचं अचानक नावाची आरोळी, माझ्याकडे पाहिले
आणि एक हंबरडा फोडून एकदमच मागे वळली
न थांबे पळून गेली. कुणी ही कळायच्या
आधी. पाऊस थोडा कमी झाला आणि नदीकाठचे
देऊळ नजरेसमोर तरळू लागले. जीव ओढीला
लागला. शरीरापेक्षा मनाचा वेग वाढला.
शेवटी नदीकाठी पोहोचलेच. काठावरील तिघी
चौघी बोलत थांबल्या होत्या, त्या एकदम शांत
झाल्या, त्यातली एक म्हणालीच "रमा, बाहेर
येऊन देवू काय? जाताना बरोबर आजू. माझ्या
मनात कोलाहल कल्लोळ उठला होता, अनाहूत
पण मी बोललेच " आज येतेच आता, सावकी
होईल" पण त्यांना ते बोलणं ऐकू गेलं की
नाही हे मला उमगले नाही.

वाहत्या पाण्याचा काठाचा खळखळाट
आता स्पष्ट ऐकू येत होता. सूर्यास्ताच्या
आधीचा हा प्रहर या नदीकाठी फार सुंदर
लागून असतो हे ह्या बाबीत गावाने मौन
न बोलता सांगितले होते. ते माझं स्वतःचे
गुपित मी कशाला कोणाला सांगू म्हणून
एक विचारही माझ्या मनात आला.

सूर्याची अस्ताला जायची आज काय
घाई होती हे कळत नव्हते पण त्याचा संधिवेग
पाण्यावर नारिंगी रंगाच्या वेगवेगळ्या छटा सोडत
पाणी कधी किरमिजी, कधी सोनेरी तांबूस रंग घेत
चमकत होते. देवळाकडे नजर टाकली तर
वरील खिडकीमधून सूर्यप्रकाश पडून
खांबाची चकाकी वाढवत होता. तेवढ्यात तो
दिसला. दिवाकरने सोनेरी काठाचे पांढरे धोतर
नेसलेले होते. उपरणे कुठ्ठलंसं होते, नजरेत
चमक होती व विचित्र ओढही वाटत होती.
हात पसरून माझ्याकडे हसत काही म्हणत
होता, मला जणू बोलावतच होता. मी
भारलेल्या असल्यासारखी काठावरून चालत
पुढे गेले. कधीही काठावर म्हातारीची ठेवली.
क्षणभर कळ्यावरील नाव नजरेसमोरून
[illegible]

सोडून माझा प्रवास चालू होणार याची जाणीव झाली. पहाटे पासून गार पाण्यात पडले, एक शिरशिरी आली. आता मागे वळून पाहण्याचे कारणच नव्हते. त्या दोघींनी बांधीत गावाचा रस्ता नेहमी प्रमाणे धरला होता. आता मी. देशमुख दिवाकर, अस्ताला जाणारा दिनकर, नदीचे सोनेरी चंदेरी वाहते पाणी आणि कायम शोधलेली ती असोशीची वेळ.

मंद वाऱ्या स्थितीने पावले पुढे पडत होते. पाणी गुडघ्यापर्यंत आले. घातक नसती भुरळ पाडते याचेही भान राहिले नाही, समोर दिवाकरही पाण्याच्या समीप आला होता असे दिसले. पाण्याचा गारवा आता जुबकर झाला होता, क्षणभर नजर सूर्याकडे गेली. त्याच्या किरणांनी माझ्या नजरेत वेगळीच चमक आली. पाणी छातीपर्यंत आले. आता अनामिक ओढ लागली होती त्या बांधाची. त्या दिवाकरची. त्या ओढीची. मनात विचारात आता असीम शांती होती कुठलीही आसक्ती जाणवत नव्हती, मी शांतपणे पाण्यावर तरंगत होते, दिवाकर आता हाताच्या अंतरावर होता अन् शेवटच्या श्वासाआधी मला एकदम उलगडले. सर्व चित्र त्या क्षणात नजरेसमोरून, बुद्धीसमोरून तरळून गेले, माझ्या बांधील आयुष्याचा सारीपाट हा लहानपणापासून कसा होता व कोणत्या कारणाने वाढत गेला हे स्पष्टपणे मला दिसून गेले व मी त्या मायमय दिवाकराला माझ्या मृत्यूच्या पहिल्या क्षणाला बिलगून जायचा प्रयत्न करीत सूतकाळ आठवत एकदम शांत होऊन गेले.

( या क्षणानंतर Flashback, कुमारी, लहानपण, २ मैत्रिणी, दिवाकर, पाहण्याचा कार्यक्रम गोपाळराव बरोबर लग्न. पहिल्यासारखी कठोर अन् दिवाकरची प्रतिमा वाढू लागते, बाधा वाढते .... कथा सुरुवाती)

इतकी अढाव डोक्यात आली होती, त्याचा निचरा होणे शक्यच नव्हते. प्रयत्न ही केला पण त्याची साफसफाई करायला जो शांतपणा लागतो तो या संसारात मिळालाच नाही. सार काही गुंतागुंतीचे होऊन माझी मीच मला विलक्षण लागत होते. त्यात खिडकीवर असला तर लहानपणीची तळ्यातील दिव्याकडची आठवण. स्पर्श करण्याची, बोलण्याची इतक्या वर्षांची दडून राहिलेली इच्छा त्यामुळे हा सर्व गडबडगुंडा होऊन बसला होता. मला काही वेळा कसलेतरी पलीकडची मी होऊन जायची. अन मग मला पाण्याची ओढ लागली. मैलभर अंतर असले तरी त्या शीतल पाण्याच्या स्पर्शाने मला कधीकधी अशी मन:शांती मिळू लागली.

जे दिसत नाहि पण असते
त्यांना प्रत्येक क्षणी मी दृष्टीआड करते
त्या मैत्रिणी बोलत नाहीत पण त्यांच्या
आवाजातील सतत कुजबुजीचा. मी देत नाही
लक्ष पण आतून त्यांच्या विचारांची
दिशा कळते व मला पाहताना त्यांनी
मला बाधित पाहतात ही आठवण छळत
जाते शेवटी. त्यांचे पूर्वग्रह मी तोडू शकले नाही
आणि पाण्याची सहानुभूती मी विसरू
शकले नाही. निर्मळ, स्वच्छ, ~~..~~ खळाळत
वाहणारा प्रवाह, हा ज्ञानतीर्थ कुंड
मृत होण्यापेक्षा, कुत्सित नजरांपेक्षा मला जास्त
आपला वाटला, अलौकिक साथ देणारा वाटला
असे म्हणून तो मला जास्त प्रिय होत
गेला. आता यात माझी काय चूक. पण
शेवटी शेवटी साखळीच कशी, हे कोण किंवा
पोटच्या मुलांना काय हळूहळू दुरावत गेले.

॥ श्री ॥

२३/१२२

बाधा कथेतील रमेचा बाधा प्रवास वाक्ये.

1) रमाचे लक्ष त्यांच्या शब्दांकडे नव्हतेच. ती त्यांच्याकडे निरखून पाहात होती.

2) सासूबाईंना वाटले "कसली बाधा झालीय कारटीला कुणास ठाऊक

3) त्या गावात कुठेही बाधा होऊ शकली असती.

४) प्रथम तर तिला आपले कान गच्च झाले की काय असा संशय येई (रमा पहिल्यांदा गावात आली)

५) रमा कुंद वातावरणाच्या कुरशीत गुरफटली. कुरशीने कदाचित रमाला गिळून टाकले असते पण तिचे वागणे बदलून असे झाले.

६) (एका) करकरीत संध्याकाळी एक कवडी नवऱ्यामागून आवली अन् अर्धा तासभर मुंबळावर पाय सोडून मुर्तीसारखी बसली.

७) डोक्यात वारा घुमू लागल्याप्रमाणे चमत्कारिक आवाज होऊ लागला, डोक्यावर पातळ लोळवत पापुद्रा चढल्याप्रमाणे सारेच लोळवत दिसू लागले रमा थेदरून निघाली. अंधिवट अंधारात तिला दिवाकर दिसला. रमाला आपल्या भितीचा विसर पडला "तू इथ रे कसा? इथं कसा आलास दिवाकर".

८) रमाने शून्य नजरेने समोरच्या खांबाकडे पाहिले पण रमा मात्र तेव्हापासून बदलली

९) परवा तो अगदी कोडोशर मंतरावर आला होता, रमा कातीभर पावसात उभी होती पण हलवकी धागा तुटला.


१०) अशा सोन्यासारख्या संसाराला कुणाची दृष्ट कळत समजेना, कारटीला कसली बाधा झालीय कुणास ठाऊक (सासूबाईंचा दृष्टिकोन)

११) काहीतरी कायमचे हरवले असे विलक्षण ताण तिच्यात निर्माण झाले. एका ऋणानुबंधाची गाठ सुटली.

१२) आयुष्य टाकून निघून लागतांना डोक्यात शहारा भावजा दिव्यदृष्टिपणा तिच्यात होता.

१३) रमेचे अंग आता जळल्यासारखे होऊ लागले. एक कवडी पाणी घेऊन येते हं. आज सगळीकडे नागपंचमी आहे नागपंचमी

ता



१४) कानातील आवाज निवळणं सुरु लागले पाण्याची गर्जना होऊ लागली. कानातील आवाज एकदम थांबला. समोरचे दृश्य आता स्वच्छ झाले होते. खोलखोलात गुरफटलेला सूर्य खोलातून मोकळा होऊन रमाला निरभ्राच्या माथीचे ती शेवटच्या पायरीवर उतरली व हलकेहलकेच वाटून स्वतःच एक लाट असल्याप्रमाणे तरंगू लागली. सुटकेचा स्पर्श होतोय.

सुनीळ सामंत: संजीवजी

आपण कथेचे सूत्र कथेच्या शिर्षकापासून सुरू करून मृत्यूच्या दयाळूपणापर्यंत आणून सोडले. हा विचार ही कथा वाचतना मला सुचला नव्हता. पण आता मात्र गझलेच्या त्या प्रसिद्ध ओळी आठवल्या

इतकेच मला सरणावर जाताना कळले होते

मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते.

पण खरेच रमाचा इतका टोकाचा छळवाद होत होता का? बाधा होण्यापुर्वी तिचा संसार चारचौघींसारखाच(स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या दुःखांना गृहित धरले तर) चाललाच होता. तिला मुलगा परका झाला किंवा नवऱ्याने दुसऱ्या लग्नाचा विचार केला तो बाधा झाल्यानंतर. बाधा होण्याचा क्षण, दिवाकराच्या मृत्यूचा अबोध सांगावा हे जीएंच्या एकूण कथांमधल्या तर्कशास्त्रीय बैठकीत बसणारे नाही वाटत. मतकरींनी लिहिले असते तर ठीक.

ही कथा या दृष्टीने जीएंनी केलेला एक वेगळा प्रयोग आहे का?

सुनीळ सामंत: वाह रमाजी

तुम्ही(नेहमीप्रमाणे पण अधिक आत्मीयतेने) यातले बारकावे दाखवले आहेत. कदाचित स्त्री असण्याचा आणि ही कथा समजण्याचा जवळचा संबंध असेल.

तुम्ही रमेच्या सासूच्या मनात्ले द्वंद्व जवळून स्मजून घेतले आहे.

मला या कथेमागची वैश्विकता अस्पष्ट जाणवते आणि निसटते. नेमकी पकडता येत नाही. धूसर होते. एक स्त्री म्हणून नव्हे तर एक विचारी व्यक्ती म्हणून आपल्याला हे सर्व नको आहे्त आणि यांना आपण नकोसे आहोत अशी भावना स्त्री पुरुष कोणत्याही देशात, कोणत्याही व्यक्तीला होऊ शकते. तसे काही या कथेतून जीए सुचवत आहेत का? अनेक कुटुंबांत, संस्थांत, नोकरीत, अगदी व्हट्सप ग्रुपवरही अशी भावना एखाद्याला होऊ शकते आणि इथले जगणे संपवावे असे वाटू शकते.

जीएंच्या कथांत वैश्विक भाव असतो. म्हणून मला असे वाटले. पण नेमके मांडता येत नाही.

रेखा दातार : खूप छान बारकावे दाखविले आहेत! 👌🏻

महेश आफळे: मी या कथेचा वेगळ्या प्रकारे विचार केला

रमेला बाधा झाली असे गाव समजते

हे केवळ आपल्या अंतर्मनातील द्वंद्व नाही हे तिने कदाचित ओळखले असावे

आपल्या संस्कृतीत अश्या बऱ्याच रमा असतात

मनात दुसराच पण तडजोडीच्या खिंडीतून अन्य कुणाशी संसार(तोही सुखाचाच)करत निमुटच नव्हे तर समाधानाने जगतात,कृतार्थ होतात

या कथेत त्या भग्न मंदिर/किल्ल्यापाशी जे भास होतात त्यातून मला जे जाणवले ते असे की...दिवाकर आता या जगात नसावा

मग तो ज्या जगात आहे तिकडेच त्याच्या निस्सीम मिठीत आपण जावे या विचाराने रमा प्रेरित तर झाली नसावी?

आणि इकडे सासू,नवरा गोपाळ(राव)यांच्या मनात काय सुरुय हे तिच्या गावीही नाही,नसावे

निरोप वा कांकणे कथेपेक्षा या कथेचे वेगळेपण ते हेच(निरोप कथेत तर तिला जन्म मृत्यूचा उंबरा ओलांडल्यावर समजते की आपला प्रियकर ही याच निर्वात वाटेवर उभा आहे ते)

रेखा दातार : बाधा

रमा लहानपणा पासुनच आई वेगळी पोर. भावाने सांभाळले , लग्न लावुन दिले, पण मनाचा कोंडमारा लहानपणा पासुनच. शाळेत सुध्दा दोनच मैत्रिणी. त्यातील अंबूच्या भावावर हिचे एकतर्फी प्रेम, जे तिला कधिच प्रकट करता आले नाही. ना भावाशी त्या बद्दल उघडपणे बोलता आले. मन मारुनच गोपाळरावांशी लग्न करावे लागले. शहरी रहाणी सोडुन एका छोट्याशा उदासवाण्या गावात यावे लागले. लग्न करुन आल्या आल्या घरच्या सर्व जबाबदाऱ्या पेलाव्या लागल्या. नवरा वाईट नव्हता जमेल तशी तिची काळजी घ्यायचा, पण तिच्या स्वप्नातील

राजकुमार दिवाकर हा दिसणे ,वागणे, बोलणे , खेळ, अभ्यास, टापटिप या सर्वच बाबतीत उजवा होता. या उलट तीव्र शारीरीक गंध असलेल्या गोपाळरावांची शारीरीक जवळीक पण रमेला नको वाटत असावी. मुलगा राघु पण यथातथाच( रमा केतकी सारखी पण राघु वेड्यावाकड्या दाताचा)

एकुणच काय तर माहेरच्या कमला या नावासकट सर्व सोडुन रमा झालेल्या हिची सर्व बाजुने मानसिक कुचंबणा झालेली. माहेरचा दादा, शांतू आणि दिवाकर बद्दल वाटत असलेले एकतर्फी मुके प्रेम एवढेच तिच्या जवळ शिल्लक. त्या आठवणींवर रमा सासरी रहाते. सासूबाई, नवरा , मुलगा यांच्याशी जुळवुन घेत मन रमवायचा प्रयत्न करते. पण पाच सहा वर्षांनी परत कधीतरी पहिल्यांदाच माहेरी जाते तेव्हा तिने जपुन ठेवलेले माहेरचे एक एक धागे तिला तुटुन जातांना दिसतात. भाऊ संसाराच्या कटकटी सावरण्यात गुंतला असतो, जवळची मैत्रिण शांतू पहिल्या बाळंतपणा नंतर कोळयाच्या जाळया प्रमाणे विरुन गेलेली, तिचे मूक प्रेम दिवाकर नोकरी निमीत्त लांब मुंबईला गेला असतो. इथे माहेरी आलेल्या कमलाची परत रमा होते. जगण्याचे आशेचे धागे असतात ते सर्व असे तुटुन जातात. माहेराहुन परतलेली रमा सैरभैर होते. जगण्यासाठी लागणारा आशेचा अंकुरच आता कोमेजला असतो. तशात टेकडी वरच्या देवळाच्या गूढ वातावरणात तिला दिवाकरचा भास होतो.

तेथील खांबांवर कोरलेल्या कमनिय नर्तकी आणि देवाची मूर्तीच नसलेला रिता गाभारा तिला तिचेच प्रतिक वाटतात. बत्तिस खांबांनी वेढलेला तळयाकडे जाणारा अरुंद जीना तिला मुक्तिचे प्रवेशद्वार वाटते. ती तेथे आकर्षीत होते, पण नवरा सासू, मुलगा , संसार यांचे बंध तिला मागे खेचुन घेउन येतात.

अशा विमनस्क मानसिक स्थितीने आणि द्विधा मनस्थितीत ती परत संसारात रमायचा प्रयत्न करु लागते. पण तलावात जाणाऱ्या मुक्तीच्या वाटेची ओढ जबरदस्त असते. सैरभैर झालेल्या रमाला बाधा झाली असे घरातील आणि गावातील लोक समजु लागतात. रमा संसारात परत यायची धडपड करत असते पण सासू आणि नवरा दुसऱ्या लग्नाच्या तयारीला लागतात. मुलगा राघूला पण आता आपली गरज नाही हे लक्षात आल्यावर मात्र ह्या नकोशा संसाराचे तिचे उरले सुरले बंधही तुटतात आणि ती मुक्त होण्यासाठी तलाव जवळ करते.

जी. एं. नी नेहमी प्रमाणेच ही कथा छान उलगडत नेली आहे.

महेश आफळे: दिवाकर आता भिंती पलीकडच्या जगात आहे हे तिने जाणले आहे ,हे लक्षात घेतले तर एक नवे परिमाण मिळू शकते(कदाचित)या कथेला

जीवनोत्तर वा मृत्योत्तर मिलन(प्रत्यक्षात ते होते की नाही हे कथाबाह्य)

विहीर म्हणजे गूढ परंतु मर्यादित "जीवन"च

जुन्या कालच्या बहुतांशी विहिरी या अश्या असंख्य रमेच्या आत्महत्येसाठीच जन्माला आल्या असाव्यात

चौकटीतले जीवन तसेच वर्तुळातले जीवन

या कथेतले गुराख्याच्या मुलाने तळयात फेकलेला दगड तळे जबडा क्षणभर उघडून गिळंकृत करतो : हे वाक्य अंगावर काटा आणते

विहिरीही तेच करत असतात

विश्वेश्वर नांदेडकर: खूप जवळ पोहोचल्याची जाणीव झाली तुमची पोस्ट वाचल्यावर. 🙏 🙏 🙏

विलास वाघोलीकर: कथेचे सुतोवाच आवडले. थोडक्यात, मुद्देसूद. धन्यवाद

वैभव कुलकर्णी : नमस्कार ,

आज बरेच दिवसानी या समुहावर लिहतोय....प्रथम कथेतली मला आवडलेली वाक्ये ——————

....आणि चुली भोवतीची थोडी जागा सोडली तर आता तेथे तीळ ठेवायला जागा ऊरली नव्हती.

.........त्यांचा चेहरा ,धुण्याचा पिळा चुकून वाळत घालायचा राहून जाऊन सारा दिवस तसाच रहावा त्याप्रमाणे कुसकरल्या सारखा दिसत होता......

,,,,,,.......कुणा अज्ञात शिल्पकारांना रात्रीचा दिवस करून तेथले काळे खडक माणसाळले होते.......

.....हे सारे शिलामय रेषाधुंद जग सुटकेच्या क्षणाची वाट बघत बंदीवासात असल्या प्रमाणे अतृप्त.....

Gauri Deshpande: व्वा! फारच सुंदर वाक्ये.

वैभव कुलकर्णी : शांतु हे नाव जीएंनी अनेकवेळा अनेक कथांमधे वापरलेले आहे का?

वृशाली मॅडम नमस्कार 🙏 . आपण कथा बारकाईने वाचलेली आहेच.

पण मला काय म्हणायचे आहे....की जीएंच्या कथांमधे हिस्टेरीया आणि स्किझोफ्रेनीयाची बरीच पात्रे अढळतात.......विहरीत ,पाण्यात जीव देणाऱ्या अनेक स्रीया दिसतात ,....किंवा सुसायडल टेंन्डंसी पदोपदी अनुभवायला मिळते.

वेडसरपणा , भास , लहानपणीचे काहीतरी खोलवर मनात रूतून बसलेले......विकृत , स्वतःलाच छळणारे ,......

जीएंचे सायकॅट्रीचे ना◌ॅलेज अत्यंत सखोल असावे.

अगदी प्रत्येक कथेत ते प्रकर्षाने जाणवत रहाते.

जीएंनी केलेले अनुवाद सुध्दा त्याच लेव्हलचे आणि अफाट आहेत.ऊ.दा. ला◌ॅर्ड आ◌ॅफ द, फ्लाईज..(मुळ लैखक Willam Golding नोबेल आहे या पुस्तकाला), सोन्याचे मडके(Crok of the gold..By Jems Stephen)शिवार , by Rector Conrard.....

या अँगलने म्हणजे , जीए इतके महान होते की अशा मनोरूग्णांच्या नजरेतुनही जग अनुभवू शकत होते आणि त्यांच्या भावनात्मक पातळीवर आपल्याला पोहोचवतात........

मी काय लिहतोय..माझे मलाच समजत नाही....,.मलाच बाधा झाली असावी.

ऊद्या मुद्देसुद लिहुन पोस्ट करतो......

विशाखा आपटे : मला वाटतं दिवाकर चा मृत्यू झालेला नसावा. रमा च्या विमनस्क एकाकी मानसिक अवस्थेत तिला hallucinations होतं असावीत. पाणी भरण्यामध्ये relaxation मिळणे हेही obsessive compulsive disorder चे लक्षण आहे असं वाटतं.

रेखा दातार : मलाही असेच वाटते की जी.एंची मानसशास्त्र या विषयावर जबरदस्त पकड असावी. वर वर पहाता त्यांच्या गोष्टीत बाधा, जारण मारण अशा अतर्किक घटना असल्या तरी त्या तर्काच्या भक्कम पायावर उभ्या असतात.

मानसशास्त्राचा माझा अभ्यासही नाही पण जे काही थोडेफार वाचले आहे त्या वरुन मला असे वाटते की माणसाच्या action -reaction वर मनाचा खूप मोठा पगडा असतो. बाधा , अंगात येणे अशा कितीतरी घटनांमधे अतृप्त इच्छा, मनाचा कोंडमारा इ. गोष्टी कारणीभूत असतात. बाधा मधली रमा सुध्दा मला अशीच मनातील दबलेल्या भावनांमुळे स्किझोफ्रेनिआ अगर तत्सम मानसिक रोगाची शिकार वाटते. तीचा रोग जसा बळावत जातो तशी तशी ती दिवाकरच्या भासमय जगाकडे ओढली जाते. घरातील आणि बाहेरील लोकांकडुन तिला 'बाधा' झाली आहे असेच समजले जाते आणि त्याचे पर्यवसन शेवटी तिच्या आत्महत्येत होते.

जी.एंच्या गोष्टी मला एखाद्या puzzle प्रमाणे वाटतात. ते puzzle pieces गोष्टभर विखुरलेले असतात. ते जर एकत्र करुन आपण नीट लावु शकलो तर चित्र स्पष्ट होते.

महेश आफळे: छळवादामुळे रमाने स्वतःला संपवले असे तर नाहीच या कथेत

तिचे दिवाकर वरील अव्यक्त प्रेम कथेत दाखवलंय

पण आता हयात नसलेल्या दिवाकरचे तिच्यावरील अव्यक्त प्रेम तिला त्याच्याकडे खेचू शकते ही शक्यता लक्षात घेतली तर कथेला वेगळे परिमाण मिळू शकते

मग ती आत्महत्या न ठरता मरणांतिक आत्ममिलन ठरू शकते

दिलिप बडे: Puzzle pieces नेच सर्व कथा भरलेल्या आहेत.तुकड्यांची संगती लावतांना"कुठल्याच कथेवर कब्जा मिळाला असे वाटत नाही.लख्खपणे कथा समजल्याचा fillकधीच येत नाही.आपल्या तर्काच्या आवाक्यात या कथा येत नाहीत.

महेश आफळे: स्वप्नांच्या बाबतीत मी स्वतः काही निर्णयाप्रत आहे पूर्वीपासून

म्हणजे"मनी वसे ते स्वप्नी दिसे"या ओळी मला बऱ्यापैकी यमकबाज आणि किंचित सत्य असलेल्या वाटतात

आपल्या पैकी अनेकांनी अनुभव घेतला असेल की आपण ज्या गोष्टीचा ज्या व्यक्तीचा कित्येक वर्षे विचारही केला नाहीय अश्या व्यक्ती अचानक तुमच्या स्वप्नात जेव्हा येतात तेव्हा त्याचा एक अर्थ असा असू शकतो की त्या व्यक्तीने तुमची आठवण काढली असावी,तुमच्या भेटीची कामना केली असावी

या दृष्टीने या कथेकडे बघितले तर हे वेगळे सूत्र हाती लागते

रेखा दातार : या कथा कॅलीडोस्कोप सारख्या आहेत. जरा बघण्याची दृष्टी - angle- बदलली की वेगळे चित्र दिसते.

महेश आफळे: एका कॅलिडोस्कोप मध्ये किती नक्षी लपलेल्या असतात याचे उत्तर कोणी देऊ शकेल?

जी एं च्या कथेशी झोंबी केली तर पराभव हमखास ठरलेला

सुनीळ सामंत: क्या बात है!

दिलिपजी, महेशजी, रेखाजी.

याला म्हणतात नस पकडणे.

संजीव सावरगांवकर: रमाची "बाधा" हा तिच्या कुटुंबातील व त्यांच्या सामाजिक आणि बौद्धिक स्तरावर अडचणीची बाब ठरते. तिच्या नवऱ्याने दुसरी मुलगी पाहिली हे तिला माहिती असण्याचे कारण नाही. त्यामुळे त्या भागात रमेला "बाधा" का झाली आणि त्याचे निराकरण म्हणजे तिला माहेरी पाठवून देणे यापर्यंत सीमित राहते. 2. तिला संसाराची असोसिएशन आहे पण नवऱ्याकडून "प्रेम" नाही. कमला तर दिवाकर च्या प्रेमात आकंठ बुडाली आहे पण त्याची प्राप्ती नाही तसेच दिवाकर ला ही one way love स्टोरी माहीत नाही दिवाकर चा मृत्यू होणे ही

अशक्यच आहे. 3. रमेची मानसिक स्थिती बाधित झाली आणि दिवाकर बाबत तिला दिवास्वप्ने दिसू लागली पण तेही तिने कोणास सांगितलेले दिसत नाही. जीव दिला म्हणजे दिवाकर ची भेट होईल हे ही दिवास्वप्न आहे. पण त्या शिवाय तिला पर्याय माहीत नाही. त्यामुळे आपला अंत म्हणजे सुटका हा एक विचार ठेऊन ती पाण्यात जाण्याचा पर्याय स्विकारताना दिसते. 4. कथा वाचन, तत्कालीन काळ, त्यातील व्यक्ति व त्यांची वागायची मानसिकता इथे पर्यंत वाचकाने स्वतःला सीमित ठेवले पाहिजे. कारण लेखन होऊन गेलेले असते मात्र ते वाचताना प्रत्येक वाचक स्वताच्या कॅलिडोस्कोप मधून कथा दर्शन व आस्वाद घेत असतो. ह्या सर्व बाबींचा विचार करताना इतर सर्व मानसिक आजारांच्या बाबी त्या characters ना चिकटवणे आणि वाचकाने आपले विचार घुमरे त्यात अंतर्भूत करणे मला तरी आस्वादक म्हणुन योग्य वाटत नाही. अर्थात प्रत्येकालाच अभिव्यक्ती स्वातंत्र असल्याने लिखाणाला अनेक कंगोरे येऊ शकतात ही निर्विवाद बाब आहे. पण असे विचार करून आपण, वाचक ही एक प्रकारच्या hallucinations मध्ये अडकतो आहोत हे आपण विसरतोय.

संजीव सावरगांवकर: असे अनेक अंगाने कथेचे बाबत कितीतरी विचार येत राहतात आणि ते शब्दात लिहिणे, पकडता येणे शक्य होत नाही. ही पण आपल्याला झालेली बाधा च की.

लखन दगडे: जी.ए.च्या कथांपैकी मला विशेष करून आवडलेल्या कथा 'बाधा'आणि 'राधी' होय. तसे पाहिले तर त्यांची प्रत्येक कथा मैलाचा दगड आहे.

बाधा कथेतील रमा बद्दल बोलायचे झाले तर प्रत्येक स्त्रीला आपले पहिले प्रेम विसरणे तसे कठीणच जाते.आल्या परिस्थितीतीला ती तडजोड करते पण ते विसरायला परिस्थिती अनुकूल नसेल तर मात्र नकोशा वाटणारया आयुष्यातून स्वतःची सुटका करू पाहते.

अशा अवस्थेत हवीशी वाटणारी माणसे आपल्या जवळ नसने.स्वतःची दुःखं दुसर्या पाशी व्यक्त न करता येणं. आपल्या वर कुणीच प्रेम न करणं हे सारं फारच वेदनादायी असतं. आणि यातून सुटका तरी मृत्यू शिवाय कोण करणार........

असो असे काही लिहीण्याचा माझा पहिलाच प्रयत्न , काही चुकले असल्यास क्षमस्व.

आवडल्यास कथेबद्दल सविस्तर लिहीण्याचा प्रयत्न करेन.

धन्यवाद...

संजीव सावरगांवकर: लिहित रहा, तुमच्याकडेच चांगले लेखन विचार आहेत. का, कशा आवडल्या आणि व्यक्ति स्वभाव विशेष लिहिले की कथा सार येत जाते हा माझा अनुभव. व्यक्त व्हा, मार्ग मिळतोच.

सुनीळ सामंत: लखन सर आपण मांडलेले मुद्दे, विशेषतः स्त्रीच्या पहिल्या प्रेमाबद्दल चा मुद्दा, कथेच्या केंद्रस्थानी घेतला तर ही कथा पूर्णतः वेगळया अर्थाने समजून येते. आपल्या या मुद्द्यासाठी आपले मनापासून धन्यवाद. कृपया लिहीत राहा.

विश्वेश्वर नांदेडकर: दिवकरचे भास रमाला होण्यास सुरुवात होते याचाच अर्थ कथा लेखकाला रमाच्या आत्महत्येस ते मुख्यत्वे कारणीभूत आहेत हेच दाखवायचे आहे. अर्थात सगळयांनी दाखवल्या प्रमाणे सगळीकडून एकाचवेळी तिला सगळ्यापासून तोडणाऱ्या घटनाही तेवढ्याच महत्त्वाच्या , जसे माहेर तुटणे , मुलाचे तुटून वागणे आणि सासरच्या कोणीही तिच्या अडचणीच्या काळात सहनभुतीने तिला त्या सगळ्यातून बाहेर काढायचा प्रयत्न न करणे याचा एकत्रित परिणाम म्हणजे आत्महत्या असे म्हणता येईल.

गौतमी कोंडे: बाधा

कथा पूर्ण झाली, शेवट अनपेक्षित होता.. 'जी. ए. नच्या अनेक कथेत मुख्य पात्र मरते, किंवा कोणत्याही प्रकारे त्या पात्राचा शेवट हा मरणाने होतो' हे ऐकून होते.

पण रमा ने का मरावे? तिचे जीव देणे माझ्या करिता अनपेक्षित होते.. एकतर तिला चांगल्या स्वभावाची सासू होती, तिच्या वर प्रेम करणारा मुलगा देखील होता. अशा कितीतरी स्त्रिया असतात, ज्या मनाविरुद्ध लग्न झालं तरी आयुष्य निभावून नेतात भलेही लग्ना पूर्वी प्रेम वेगळया व्यक्तीवर असले तरीही... परंतु जी. ए. नी रेखाटलेल्या रमा मध्ये एक गोष्ट वेगळी जाणवली, ती म्हणजे रमा लग्नापूर्वी एक अल्लड पोर होती. दादाने केलेले कठोर पण निस्सीम प्रेम तिला आईच्या मायेप्रमाणे उबदार वाटत होते. मैत्रिणींनी सोबत घालवलेले क्षण तिला आठवत होते, मनातून कुठेतरी ते सारं आता अनुभवता येत नाहीये ह्याची सल होती, त्यात अजून भर म्हणजे देवदत्त. तीनं पोरवयात जे स्वतःच आयुष्य रेखाटलं असेल ते प्रत्यक्षात कैक पटीने

वेगळं असावं. ज्या ज्या गोष्टींना, व्यक्तींना जीव लावला त्या घरातल्या साऱ्या गोष्टी आता आपल्याशिवाय देखील व्यवस्थित होत आहेत, कुणाचेच आपल्या वाचून अडले नाहीये ही जाणीवच मुळात आत्महत्येस प्रवृत्त करणारी आहे. देवळासमोरच्या तळयावर असताना ह्या साऱ्या गोष्टींचं एका एका लाटे सोबत मनात उधाण आलं असावं आणि देवदत्त चा भास देखील त्याचीच एक प्रतिमा, अखेरीस रमा त्या प्रतीमेकडे आकर्षित होत गेली आणि जगाच्या मते तिला बाधा झाली होती. अखेर तिने सर्वांच्या प्रश्नातून आपली सुटका करून घेतली. जी. ए. नी केलेल्या बाधा मधील लिखाणातून, वाचताना अनेक प्रश्न पडतात परंतु त्या प्रश्नांची उत्तरे आपण केवळ तर्क वितर्क लावूनच शोधू शकतो. काही प्रश्नांना उत्तरं नसतात.

सुनीळ सामंत: गौतमीची प्रतिक्रिया वाचून विशेष आनंद झाला.

तिने हे अगदी मोठ्या माणसासारखं लिहिलंय पण ती आहे एक विद्यार्थिनी. तिने आणि तिच्या बरोबरच्या मित्रमैत्रिणींनी जीए वाचायला घेतले हे मला या शताब्दीवर्षाचे एक यश वाटते.

तुला या कथेचे मर्म - रमाचे इतर स्त्रियांहून वेगळेपण- समजून घेता आले यातच या कथेचे यश आहे. जीएंची कथा जिथे संपते तिथे वाचकाच्या मनात दुसरी कथा सुरू होते हे महेशजी आणि इतर सर्वच लोकांचे मत मला आता प्रत्येक कथेत जाणवते. हे तुलाही जाणवले हेही उत्तम.

अशाच विचारपुर्वक कथा वाचत रहा. लिहायचाही प्रयत्न कर. नवीन पिढीकडून मला जास्त अपेक्षा आहेत.

लखन दगडे: 'देवळात मूर्तीच नाही, व गाभारा आंधळ्या खोबणीप्रमाणे आहे. त्यामुळे हे सारे शिलामय रेषाधुंद जग सुटकेच्या क्षणाची वाट पाहत बंदीवासात असल्याप्रमाणे अतृप्त, असहाय वाटे.' या वाक्यांमध्ये कथेचे सारे सार लपले आहे.

कसे ते पहा, रमेच आयुष्यही दिवाकर वाचून रितंच आहे.आणि तिलाही असहाय, अतृप्त आयुष्यातून स्वतःची सुटका करायची आहे. म्हणूणच ही कथेतील वाक्ये रमेची अतृप्त आणि असहाय मनःस्थिती सूचित करतात.

जाणकारांनी आपलं मतप्रदर्शन करावे ही अपेक्षा....

दिलिप बडे: गौतमी,जी.एं.ची कथा आपआपल्या तर्काने समजून घ्यावी अस म्हणते.आत्मविश्वास चांगला आहे.

संजीव सावरगांवकर: इतक साधे सोपे लिहणे अत्यंत अवघड असते. पण हे शिवधनुष्य हिने लीलया पेलले आहे. कथेची जाण चांगली आहे. मला तिला विचारायचे आहे की हे लेखन करण्या आधी तिने कथा किती वेळा वाचली होती.?

गौतमी कोंडे: आपली प्रतिक्रिया वाचून आनंद झाला.. मी ही कथा 3 वेळा वाचली आहे.

Gauri Deshpande: चांगल लिहिल आहे गौतमी. 👌

हेमंत खडके: खूप छान लिहिलं बेटा 👍 💐 💐 💐

गौतमी कोंडे: खूप धन्यवाद

दिलिप बडे: व्यवहारात रमेलाच बाधा होते.त्याची कथा कादंबरी सिनेमा नाटक कविता सिरियल होते.दिवाकरला बाधा होते पण ती संवेदनेमध्ये फार कमी ऊमटते.

जयश्री जंगले : रमेच्या अवतीभवतीची खरीखुरी माणसे भासवत् ठरतात. मैत्रिणीच्या भावाची प्रतिमा खरी मानून ती खऱ्या आयुष्याचा त्याग करते.त्याला आपण हवे असणार असे समजून.तसे नाही हे खोलवर कळत असताना. नैराश्यातून आत्मघात.अर्थात्, आपण काय करीत आहोत, याचे भान तिला दिसत नाही. ती जीवन संपवते. Euphemism चे अत्यंत सुंदर उदाहरण.

सुनीळ सामंत: एक गोष्ट अजून.

पुर्वीच्या स्त्रिया(काही प्रमाणात अजूनही) लहान मूल सोडून कोनत्याही पुरुषाला नावाने हाक मारणे, अरे म्हणणे शक्य नसे. रमाने दिवाकरला "तू इथे रे कसा? तू इथे कसा आलास दिवाकर?" असे म्हणणे हेही वेगळे वाटले.

विश्वेश्वर नांदेडकर: हा मुद्दा नाही. बहिणीच्या भावाला बहिणीच्या मैत्रिणी अरे तुरेच करत आमच्या लहानपणी. अर्थात तेवढं घरोबा आसेल तर. माझ्या बहिणीच्या मैत्रिणी मी कॉलेज मध्ये असतानाही अरे तुरे हाक maraychya. ही १९७६ -७७ च काळ होता

संजीव सावरगांवकर: वैयक्तिक involvement मुळे, ती एकेरीवर येणे शक्य आहे. दुसरे मैत्रिणी चा भाऊ असल्याने लहानपणापासुन ती त्याला पाहती आहे जरी बोलली नसली तरी.

लखन दगडे: जी. ए. कुलकर्णी हे प्रतिभासंपन्न आणि प्रथितयश कथाकार आहेत. त्यांच्या कथेतून व्यक्त होणारा तटस्थपणा हा एका सच्चा कलावंताचा आहे. त्यांच्या कथेतील माणसे ही बऱ्याचदा नियतीच्या गराड्यात सापडलेली आणि असाहाय्य मनःस्थितीत असलेली दिसतात. त्या मुळेच ती निराश आणि एकाकी जीवन जगताना दिसतात. 'बाधा' कथेतील रमाही याला अपवाद नाही.

संपूर्ण कथेत रमा अतिशय एकटी आहे. मनाने ती एकाकी आहे, हे आपल्याला जाणवत राहते. तिला कुणाचाही मानसिक आधार नाही आणि ज्यांचा मानसिक आधार होता ती माणसे तिच्याजवळ राहिली नाहीत. त्यांच्या आठवणीने सदोदित ती व्याकूळ होत राहते. ती माणसे जवळ नाहीत आणि जी जवळ आहेत त्यांच्या दृष्टीने रमेला शून्य किंमत आहे. एका रेव्हेन्यू कारकुनाने आणि एका सिमेंट-चुनावाल्या ओव्हरसिअरने तिला नकार दिला होता. त्याला पाच हजार हुंडा हवा होता. तो देणे शक्य नव्हते. नकारांमुळे ती नेहमी निराश आणि हताश दिसते.

चारचौघींसारखेच रमेचे लग्न झाले. चार-सहा ठिकाणी कुंडली, हुंडा यासाठी ते मोडल्यावर मग ती गोपाळरावांच्या घरी आली. शांतू आणि अंबू या तिच्या शाळेतल्या दोन मैत्रिणी. पण त्याही लग्नाला आल्या नाहीत कारण त्यांना कुणी बोलावलेच नाही. लग्नातले सारे संस्कार रमा मूकपणे सहन करते. तिची लग्नानंतरची मनःस्थितीही निराश आहे. शेवटी ती त्या 'मरगळलेल्या म्हाताऱ्याच्या पाठीवरील

आवाळूप्रमाणे वाटणाऱ्या गावात' आली. जी.ए.च्या  या वाक्यावरून ती माणसे, तो गाव यासंबंधी आपल्याला कल्पना येते आणि तिथे रमा कशी दिवस काढत असेल याची आपण कल्पना करू शकतो.

लहानपणी अंबू आणि शांतूसोबत दिवाकर असायचा. दिवाकरसोबत घालवलेले क्षण रमा विसरू शकत नाही. ती दिवाकरशी कधी एक शब्दही बोलली नव्हती. अंबूच्या घरी गेले की, ती त्याची ओळख करून देईल असे तिला वाटे. पण तसे कधी झाले नाही.

घरात रमेला भरपूर काम करावे लागे. सारे काम कष्टाचे असे. अंथरुणे घालायची, धुतलेल्या कपड्यांच्या घड्या करायच्या, भांडी घासायची पण इतकी कामे करूनही तिच्या भ्रमिष्टासारख्या अवस्थेमुळे आई तिला वाटेल तशा बोलत. लहानपणी वारलेल्या आपल्या आईचा उद्धार ऐकला की, ती एकदम गोठून गेल्याप्रमाणे सुन्न होई. अशा स्थितीतही तिला कुणाचा आधार नव्हता. मग आपल्या गेलेल्या आईची आठवण होई आणि तिच्या पदराखाली लहानपणीप्रमाणेच ती खूप रडून घेई.

रमाचा नवरा गोपाळराव हाही तिच्या मनासारखा होता असे नाही. त्याचा स्वभावही वेंधळा होता. डोक्यावर तेलकट टोपी, खिशात कधी हातरुमाल असे-नसे. त्याच्या अंगाचा उग्र वास तर कपाळात तिडीक आणायचा. त्याचे मनही वासनेने बरबटलेले. रमाला या साऱ्या गोष्टींची फार किळस येई. एकीकडे उकिरड्यासारखे गावघाण्याच्या बैलासारखे काम करायचे आणि दुसरीकडे वेड लागलेले घर. यातून आपली सुटका मेल्याखेरीज नाही असे तिला नेहमी वाटे. गावातल्या बायकाही रमाला पाहून एका बाजूला जात. लगबगीने नाहीशा होत. रखमाकाकू तर मुद्दाम

कुत्सित प्रश्न विचारायची. म्हणायची, 'काय हो लक्ष्मुंबाई, पाहावं ते एकेक अरिष्टच तुमच्या रमेच! पिंपळाला महिन्याच्या प्रदक्षिणा एकाच वेळी काय घालते..... दाखवा कुणा तरी देवरशाला !'

कदाचित सासूबाईंना-आईंना-तरी आपण हवे असणार आहोत असे रमाला वाटे. पण तिच्या भ्रमिष्टपणाला कंटाळून एकदा त्यांनी रमाला माहेरीच जायला सांगितले. आईला कामाचा त्रास सोसणार नाही म्हणून आपण पाठवत नसल्याचे गोपाळरावांनी सांगितले. पण 'माझं काय मी सांभाळेन कसे तरी ! लग्नाआधी तीच होती की काय ? नशिबात असेल ते काही चुकत नाही हेच खरं' असे म्हणून रमाला कायमची माहेरी पाठवायची आणि सीताबाईंच्या भाचीशी चांगला हुंडा घेऊन गोपाळरावाचे लग्न लावून द्यायचे त्यांनी ठरवले होते. याचा अर्थ आपल्यामागे आई सारा संसार व्यवस्थित सांभाळतील, याची रमाला खात्री झाली होती. या सर्वांचे तिला वाईट वाटे. आपली गरज कुणालाच नाही, ही तिच्या मनाची खंत होती आणि त्यामुळे जगण्याची उमेदच रमा हरवून बसली होती आणि राघूही आता मोठा झाला होता. त्यालाही आता आईची - रमेची फारशी गरज उरली नव्हती. याचेही तिला आणखी दुःख होई. राघू तर आपल्या रक्तामांसाचा गोळा होता. पण तोही आता तिच्यावर अवलंबून राहिला नव्हता. या सर्वांमुळे आपल्या एकाकीपणाची तिला सारखी जाणीव होई. आपल्यावर कुणीप्रेम करीत नाही या भावनेने तिच्या मनाची तडफड होई.

रमेवर प्रेम करणारा होता तो फक्त दादा. त्याचे आतडे आपल्यासाठी आकसायचे नाही  याची तिला पूर्ण खात्री होती. आपल्याला मोरपीस आणून देणारा, केळीच्या पानाची पिपाणी करून देणारा, आई आजारी असताना आपली वेणी

घालणारा आणि आपण इकडे येताना डोळेभर पाणी काढणारा दादाही एकाकीच होता. संतापी होता. पण चाफ्याच्या फुलासारख्या मनाचा होता. त्याला इकडे बोलवावे असे तिला वाटले, पण नंतर तोही विचार तिला नकोसा वाटला.

अशी रमा म्हणजे क्रूर नियतीच्या हातातली एक कळसूत्री बाहुली आहे. या परिस्थितीत तिचे जीवन अगतिक आणि असाहाय्य बनले आहे. तिच्या जीवनातल्या या निराशेचे, एकाकीपणाचे चित्रण जी.ए. नी अतिशय प्रत्ययकारीपणे केले आहे.

सुनीळ सामंत: उत्तम प्रकारे कथा उमजून लिहिले आहे.

कथेतील महत्वाचे नेमके टिपले आहे. एकाकीपण हा महत्वाचा मुद्दा अधोरेखित केला आहे.

लखन दगडे: जगात दुःखाची व्याप्ती खूप मोठी आहे. म्हणूनच जी.ए.च्या कथेतील पात्रांची दुःखे आपल्याला आपली वाटतात.आणि केवळ जी.ए.च्यामुळे त्या पात्रांची दुःखे आपल्याला जगता येतात.

# भिंत- जी ए कुलकर्णी – सांजशकुन

सुनीळ सामंत

भिंत ही रूपककथा निहिलिझम(शून्यवाद) च्या बाजूला झुकलेली आहे असे जरी असले तरी ती मुख्यतः पारलौकिकवाद्यांचा उपहास करणारी रूपककथा आहे असे मला जाणवले.

एका उंचच उंच भिंतीच्या एका बाजूने जनप्रवाह चालला आहे. त्यात कथानायकही आहे. आपण कुठे चाललो आहोत हे कुणालाच माहीत नव्हते. पायाखालच्या वाळूत घरटी बांधीत, शहराचा देखावा उभा करीत, किंवा बाजूच्या मातीत फुलझाड लावून त्यावर ओंजळभर पाणी ओतीत. मागून येणाऱ्यांच्या पावलांनी घरटी, झाडे चिरडून जात.◌ीकूण जीवनप्रवाहाचा जीएंनी लावलेला हा अर्थ.

डाव्या बाजूने ती कठोर भिंत अनिवार्यपणे सोबत होती. तिच्यातील एक दगड पाहून पलीकडे काय आहे हे पाहण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. पारलौकिक कुतुहलाचे हे रूपक जीएंनी उभे केले आहे.

पण त्याच वेळी सूर्याचा सोनेरी प्रकाश पिवळ्या रेशमी वस्त्रासारखा वाटून नायक धावत त्या प्रकाशात जाऊन उभा होतो आणि तो उत्कट प्रकाश ओंजळीत घेऊ लागतो. हे पहाताच एक पारलौकिकवादी जटाधारी योगी हातात एक ग्रंथ घेऊन उभा रहातो आणि "या क्षणिक मोहिनीत वेळ घालवू नको. हा इथला प्रकाश क्षणात

नाहीसा होईल. त्या भिंतीपलीकडे प्रकाश आहे, तो कधी जराग्रस्त होत नाही व त्यात कसलीही छाया पडत नाही. " असे सांगून नायकाकडून तो आनंद हिरावून घेतो. “त्या भिंतीआड जो पक्षी आहे तो अमर आहे. त्याच्या गीतात क्षणिक सुखाचा उन्माद नाही, भासमान दुःखाची आर्तता नाही पण चिरंतन शांती आहे” असल्या भाकडकथा सांगून तो योगी सर्वांनाच आनंदापासून परावृत्त करतो. असे अनेकदा घडते. अखेर नायक त्या भिंतीच्या पलिकडे पोहोचतो.

आणि त्या भिंतीच्या पलिकडेही काहीच नसते. उलट तेथील हिम शीत धान्याने हाडे एकदम वितळू लागली. सर्वत्र धूसर अंधार आहे. कुठेही प्रकाश नाही. सुगंध नाही. कुठेच फुलेच नाहीत. सारे काही मेल्याप्रमाणे निरंतन अमर्याद सारी अभंग भीषण शांतता.

या कथेतून मला तरी असा संदेश मिळतो की आला क्षण आपला. तो निघून जाण्यापुर्वी त्यातला आनंद घ्यावा. इंद्रधनुष्याकडे पाहून आनंद घ्यावा. ते किती टिकेल की विरेल आणि खरे की खोटे, आभास याचा उहापोह करत आपला क्षण वाया घालवू नये.

हे कितपत योग्य वाटते?

याहून वेगळे कोणाला काही दिसले का?

अशा प्रकारचा उपहास जीएंच्या दुसऱ्या कथेत दिसला का? मला तरी नाही.

हा केवळ योग्याचा उपहास आहे की खुद्द जीए च स्वतःवर, स्वतःच्या तात्त्विकतेवर शंका घेत आहेत या कथेत?

जीएंचे सर्वच वाचक वेगवेगळ्या स्तरांवर आयुष्याकडे तात्विकतेनेच पहातात. त्यांनाही हा झटका आहे का?

श्रीकांत देशमुख : नमस्कार. सुनिळजी आपण अतिशय मार्मिक यथार्थ कथा परीचय दिलात. आपण सुचित केल्या प्रमाणे साधु, तत्त्ववेत्ते सांगतात मानवी जीवन अनश्चित क्षणभंगुर आहे. मग आपण ती क्षणभंगुरता उपभोगायची कि अलौकीक, पारलौकीक ;ज्याचे वर्णन प्रत्येकाने वेग- वेगळ्या पद्धतीने केलेले आहे ;त्याचा पिच्छा पुरवत हाती आलेले(आपल्याला सोनेरी वाटणारे) क्षण गमावुन त्या कोणासही ज्ञात नसणाऱ्या अनंताचा पाठलाग करत राहायचा हा अनादी प्रश्न ज्याचा त्याने आपल्या मतीस, मितीस पटतो तसा सोडवायचा हे ठरविणे महत्वाचे. जि. एं.च्या कथेत असे प्रश्न ठाई ठाई उपस्थित होत असतात. त्या प्रश्नांचे ही एक गारुड चेटुक आपल्या मनाला व्यापुन राहतं.

महेश आफळे: मनुष्य हा विधात्याचा(?)एक फसलेला किंबहुना सतत नव्याने फसण्यासाठीच जन्माला आलेला एक किंचितमात्र जीवजंतू आहे

कारण खऱ्या अर्थाने"सत्य"जाणून घेण्याचे इंद्रियच त्याला लाभलेले नाही

उजवा हातच नसलेल्या व्यक्तीला त्या हाताचे ढोपर खाजवण्याची उर्मी येत असावी तसे हे चेटूक असावे

हेच या कथेचे गम्य

आपण आणि सत्य यात सतत उन्हाची एक काळोखी अभेद्य भिंत

प्रकाश आणि अंधार यात सनातन काळापासून उभी असलेली उन्हाची पारदर्शक भिंत

आध्यात्मिक गुरूंचे प्रस्थ तर जगातील सर्वच भागात वारेमाप फोफावले आहे

एकीकडे आपल्या इथे गुरुपरंपरा अगाध असल्याचा अनुभव येतो तर दुसरीकडे या बाबतीत सतत धरसोड वृत्ती निपजते

ऐकीव तर सोडाच जे प्रत्यक्ष डोळ्यांनी बघू तेही सत्य असेलच याची खात्री देता येत नाही(कारण ही इंद्रिये जेमतेम अर्धसत्य दर्शवू शकतात)

मग मानवाने शेवटी करावे तरी काय?

हीच हतबलता या कथेने अधोरेखित केलीय

"निळया चेहऱ्याची आकृती"ही कथाही भिंत शी नाते सांगणारी आहे

सतत वंचना,फसवणूक हीच मानवी जीवनाची शोकारंभिका

सुनीळ सामंत: खऱ्या अर्थाने"सत्य"जाणून घेण्याचे इंद्रियच त्याला लाभलेले नाही- हे महेश्सजींचे वाक्य आता डोक्यात फ़िट बसले.

विश्वेश्वर नांदेडकर: वेगळ्या पद्धतीने विचार करायला हवा. फक्त भौतिक बाबितून जी ए च्या कथांचा विचार करत राहणे dipresive होणारच. पण याचा अर्थ ज्ञानेश्वर तुकाराम बुद्ध यांनी जे सांगितलेले तत्वज्ञान एकदम कचरा कुंडीत टाकायचे का.

मानसिक आत्मिक समाधान आणि त्यातून मिळणारा आनंद हा चिरकाल टिकणारा असतो आणि तो याच जन्मात अनुभवता येवू शकतो भिंती पलीकडे जायची गरज नाही.

तुकाराम महाराज साक्षात्कार झाल्यावर " आनंदाचे डोही आनंद तरंग " लिहीन जातात.

तर ज्ञानेश्वर लिहितात ,

आज सोनियाचा दिनू वर्षे अमृताचा धनु

हरी पाहिला रे पाहिला

हे सगळे मिळवण्यासाठी भिंतीपलिकडे जाण्याची गरज नाही.

आणि हा आनंद चिरंतन असतो हे ही त्यांनी सांगितले.

बुद्धांनी सुद्धा सर्व इच्छा संपवून तक तरच चिरंतन शांती मिळेल हेच सांगितले.

जी ए ची पात्रे आपल्या आकांक्षा आशेच्या मागे धावतात आणि नियतीच्या कचाट्र्यात सापडतात. आणि शेवटी दुःखाच्या गर्तेत त्यांचा शेवट होतो.

त्यामुळे जी ए नी आध्यात्म थोतांड ठरवले वगैरे आततायी आर्थ काढून तेच खरे असे मांनने थोडे धार्ष्ट्याचे होईल 🙏 🙏

महेश आफळे: थोडी गल्लत होत आहे तुमची

संत आणि आध्यात्मिक गुरू या दोन्ही वेगळ्या संज्ञा आहेत

संत सर्वांच्या आरपार असतात

आणि भोंदू गुरूंना सतत भोवती मूर्ख अंध अनुयायी हवेच असतात

त्यांचे अस्तित्वच त्या पायावर उभे असते

आणि सरते शेवटी

हा प्रवास ज्याचा त्याला करावा लागतो, ज्याचे ज्याच्यात्याच्यापुरते सत्य ज्याला त्याला शोधावे लागते

अन्न ग्रहण किंवा विसर्जन हे जसे अगदी वैयक्तिक अनुभव आहेत तदवत

गुरू वा संत फारतर घास भरवू शकतात इतकेच

विश्वेश्वर नांदेडकर: आपल्या देशात गुरू परंपरा मोठी आहे. ती उगाच नसावी. माझे म्हणणे एवढेच की अध्यात्म थोडक्यात आत्म्याची ओळख हे थोतांड म्हणून उडवून येणार नाही. अर्थात त्यासाठी थोडा तरी संत वांगमय अभ्यासले तर त्यातील यथार्थता लक्षात येवू शकते. भोंदू बाबा आहेतच त्यांच्या पासून सावध राहणे तितकेच महत्त्वाचे. जी ए चे साहित्य वाचताना थोडा धोका संभवतो म्हणून हा उपद्व्याप 😀 😀

महेश आफळे: संत प्रवृत्तीत निरिच्छतेवर आणि वैराग्य वृत्तीवर भर असतो आणि व्यावहारिक जगात क्षणोक्षणी वासना कामना अपेक्षा इच्छा इ चा सामना प्रत्येकाला करावा लागतो

या पेचामुळे मानवी जीवन संभ्रमित झालेय इथले

महेश आफळे: हेच जी एं नी वारंवार मांडले आहे

विश्वेश्वर नांदेडकर: यात्रिक कथा या दृष्टीने खूप महत्त्वाची

रेखा दातार : भिंतीआड डोकवण्याचा माझा प्रयत्न......

भिंत

' चिरेबंदी भिंतीच्या बाजूने खाली पहात रांग पुढे सरकत होती आपण कुठे चाललो आहोत हे कुणालाच माहित नव्हते. पुढची व्यक्ती सरकली की मी पुढे सरकत होतो'

हा 'मी' आणि रांगेतले सर्वच परिस्थितीने गांजले, पिचलेले आहे त्या मुळेच खाली मान घालुन पुढे चालले आहेत. पुढच्याचे अनुकरण करत आहेत. त्यांच्या पायाखाली वाळु आहे.... सरकणारी वाळु.... आधार देणारी भक्कम जमीन नव्हे. त्यातील काहीजण त्या वाळुतही घरे बांधायचा, शहरे उभी करण्याचा प्रयत्न करतात. पण वाळुचे ईमले ते, किती काळ तग धरणार? त्यांनी लावलेल्या फुलांच्या बागा सुध्दा त्यांच्या स्वप्नांप्रमाणे पायदळी तुडवल्या जाणाऱ्या. बरोबर आधार देणारी, आपुलकी दाखवणारी प्रेमाची माणसे म्हणावीत तर त्यांचीही साथ शाश्वत नाही. कधी सुटेल सांगता येत नाही. 'मी' आणि सर्वाचाच भूतकाळ मागे पडला आहे. चिरेबंदी भिंतीमागे त्यांचा भविष्यकाळ दडलेला आहे याची त्यांना खात्री आहे. या भिंतीआड दडलेल्या भविष्यकाळात एकदा तरी डोकावुन पहावे अशी सर्वांचीच धडपड सुरु आहे. आपणा सर्वांचीच तशीच धडपड सुरु असते ना? आणि आपण जेव्हा अगतिक असहाय्य असतो तेव्हा तर अधिकच ! हातात ग्रंथ घेउन उभा असलेला जटाधारी योगी म्हणजे 'काळपुरुष'. त्याचे काम हे जीवनचक्र अव्याहत चालू ठेवणे एवढेच! भूतकाळ आणि भविष्यकाळ यांच्या मधली पुसटशी रेषा म्हजे

वर्तमानकाळ. जो आपल्या पुढे असतो तेव्हा तो भविष्यकाळ असतो आणि मागे पडतो तेव्हा त्याचा भूतकाळ झालेला असतो. हा वर्मानकाळ कितीही सोनेरी , आकर्षक असला तरी काळपुरुष आपल्याला तेथे रेंगाळु देत नाही. कारण त्याचे कार्य एवढेच की हे जीवनचक्र सतत पुढे जात राहिले पाहिजे. वर्तमानात कोणी रेंगाळु लागला तर त्याने पुढे चालत रहावे या साठी तो भविष्याची निरनिराळी अमीषे दाखवतो अथवा प्रसंगी कधी कठोरही होतो, पण वर्तमानात कोणाला रेंगाळु देत नाही. आणि आपणही वेडे सर्वजण त्या भविष्यातील सोनेरी स्वप्नांमागे धावत रहातो. वर्तमानात जगतच नाही.

गोष्टीतला 'मी' जटाधारी व्यक्तिला विचारतो की ' या भिंतीच्या पलीकडे काय आहे हे तुम्हाला माहित आहे का? जटाधारी कुत्सित हसतो आणि निघुन जातो. का? कारण मृगजळा मागे धावण्याचा मनुष्य स्वभाव त्याला चांगलाच माहित आहे. कालचक्र सुरु ठेवण्यासाठी तो त्याचाच तर उपयोग करुन घेतो. आणि 'मी' कधी ना कधी तरी आपल्याला भिंती मागच्या अद्‌ भूत जगात प्रवेश मिळेल या आशेवर चालत रहातो. 'मी' काय, तरुणी काय , गायक काय किंवा इतर स्त्री- पुरुष काय , काळपुरुष कोणालाच वर्तमानात रेंगाळु देत नाही. भविष्याची स्वप्ने दाखवत पुढे ढकलत रहातो.

एके दिवशी भविष्या मागे धावणारा 'मी ' थकतो. त्याचा भिंती पलीकडला प्रवास संपतो. 'काळ' म्हणजे मृत्यूच त्याला भींती पलीकडे ढकलुन देतो. भिंती पलीकडचे जग भ्रमनिरास करणारे असते. ती स्वप्नभूमी नसुन वैराण मरुभूमी असते.

मग 'मी' चा प्रवास आधी तेथे पोचलेल्या अनेक फसलेल्या लोकांसोबत भिंतीच्या पलीकडुन सुरु होतो. बाहेरचे आवाज त्याला ऐकू येत असतात. बाहेरील भविष्यामागे धावणाऱ्या असमंजस लोकांना भिंती पलीकडील वास्तव सांगावे या साठी त्याची धडपड सुरु होते. पण या त्याच्या प्रयत्नांच्या मधे अभेद्य चिरेबंदी भींत आड येते.

मला वाटते G A ना काय सांगायचे आहे हे इथुनच सुरु होते.

Yesterday is history, tomorrow is mystery and today is the gift from God and hence it is called 'present'.

History विसरुन जा. ती झाली, गेली. Mystery च्या मागे लागु नका. ती नक्की कशी आहे हे तुम्हाला माहित नाही. पण present म्हणजे वर्तमानकाळ, जी God gift आहे, ती छोटी असली तरी तिचा उपभोग घेण्याचा प्रयत्न करा. जन्मलेल्या प्रत्येकाचे अटळ भविष्य म्हणजे मृत्यु हे सर्वांना ठावुक असते. तो सगळ्याचा शेवट असतो पण तेच अंतिम सत्य असते. ते स्विकारा. त्या ठिकाणी दुसरे पर्याय शोधण्याचा प्रयत्न करत आपला वर्तमान वाया घालवु नका. कालपुरुष त्याचे काम करतच राहिल. 'काळाच्या' मागे धावण्या पेक्षा 'काळावर' मात करा आणि वर्तमानातील सोनेरी क्षण अनुभवा. परीस्थितीच्या काळ्या ढगांमागुन क्षणभर डोकावणारे हे सोनेरी किरणच तुमचे आयुष्य उजळुन टाकतील. बाकी भिंती मागचे जग म्हणजे केवळ एक मृगजळ!

बारबिंद सर: विवेचन अतिशय आशयपूर्ण आहे.प्रश्न असा आहे की भिंतीच्या पलीकडील प्रवास हा वैराण भुमीतील आहे,भ्रम निरास आहे याचा अनुभव घेणारा ' मी ' हा अस्तित्वातच नसतो, शरीरा शिवाय मी ची कल्पना करताच येत नाही.दुसरे सत्य असे की मन हे वस्तूनिष्ठ नाही.मन हे अनुभवाच्या संस्कारातून निर्माण होते.चार्वाक एक सत्य सांगतो भस्मी भुतस्य देहस्य.मृत्युनंतर बर्या वाईट कल्पना करतात म्हणजे असे आहे की, निजरुपाशी एक रुप झालेल्या व्यक्तीने ' अहंमब्रह्मास्मी' हे सांगत सुटणे.हे जसे वदतोव्याघात आहे तद्वतच मृत्यू नंतरच्या अनुभवाची कल्पना करणे आहे.असो.

Madhav Puranik: https://youtu.be/cLr_KR2nXCk

Madhav Puranik: कथा भिंत - लेखक जी ए कुलकर्णी - दृकश्राव्य सादरीकरण. माझा हा प्रयोग / प्रयत्न ,तुम्हाला आवडेल अशी आशा आहे.- डॉ माधव पुराणिक

विश्वेश्वर नांदेडकर: यात्रिक मध्ये सँको आणि न्हावी च्या तोंडातून भौतिक जगात जगण्याचे तत्वज्ञान मांडले आहे.

या कथेत योगी भेटतो. तर यात्रिक मध्ये बोटाने इंद्र धनुष्य काढणारा विदूषक

संजीव सावरगांवकर :---

भिंत                २४।८।२२

1) जरा मरण यातून सुटका. रोज कल्पनेचा
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा.

2) यावत जिवेत सुखं जिवेत
ऋणं कृत्वा घृतं पिबेत
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः!

3) ज्याची जन्माला आला की मृत्यु अटळ आहे. या
भिंतीच्या कडेकडेने आयुष्य चालावे लागते.
जगतांना मोह येतात पण जगावयाचे कसे ते
नियती ठरवते असे या भिंतीच्या पलीकडे
ह्यापेक्षा चांगल्या आयुष्य कल्पना आहेत अन
नियती या आयुष्यातील वर्तमानाचे छोटे
छोटे क्षण सुध्दा उपभोगु देत नाही. आणि
आयुष्याची चाल थांबवली भिंत ठाकतो.

भिंत वेगवेगळ्या वयांच्या माणसांना गिळंकृत
करते म्हणजे ज्याची आयुष्य दोरी संपली आहे
त्याला या जगातून ओढून भिंतीपलीकडे नेते.
त्या क्षणी आपले लक्ष इतरत्र असते व त्यांचा
मृत्युक्षण आपण पाहू शकत नाही. आपल्या
स्वतःच्या मृत्युक्षणाची जाणिव नाही वेळ माहित
नाही अन पाऊले चालती पैलतीरी वाट ही
न्यायाने कुठे थांबून कोणत्याच गोष्टींचा आनंद
,,, घेताना येत नाही. हा सारासार विचार करून
याची निर्मिती झाली आहे.

॥श्री॥

DATE: 25/10/22

कथा: भिंत   कथासंग्रह: सांजशकुन.

सामंत सरांच्या विचारांना पुढे न्यायचे म्हटले तर त्यांच्या प्रश्नांची उत्तरेही द्यावी लागतील. आलाहणा उपमेमा हे तत्त्व फार कमी जण स्वतःच्या आयुष्यात वापरतात. या कथेतील भिंत सर्वव्यापी आहे. सुनिश्चितपणे सर्वांना. त्यामुळे लहान मोठा, मुलगा मुलगी, स्त्री पुरुष ही भिंत पार होऊच शकत नाही.

तरीही जन्म होतात, मृत्यू होत असतात प्रत्येकाची जीवनरेखा म्हणजे ही न संपणारी, अभेद्य भिंत. डावीकडे असलात तर जगणे उजवीकडे असलात तर मरणे आणि ही मध्ये भिंत. अडीग.

त्याची जन्माला आली की मृत्यू अटळ आहे. (या कथेच्या संदर्भात लेखकाच कदाचित भोगावयाला 'मुक्ती, मोक्ष' हे शब्द कधीच उच्चारत नाही). भिंतीच्या कडकडेने आयुष्य चालत राहणे हीच समाजाची नियती असते. आणि ही नियती भोगावयाच्या भयाने कायम नकारात्मक बोलत असते. तो जे बोलतो त्याची त्याला माहिती ही नसते फक्त पूर्वसुरींनी सांगितलेले तो फक्त पुनरुक्ती करत असतो (कथेच्या शेवटी मी उजवीकडे भोगावयाचा अशाशीने वाट पाहताना दाखविले आहे) थडक्यात छोटे छोटे साधे सोपे आनंदक्षण उपभोगू नका तिकडे यापेक्षा सुंदर आयुष्य आहे अशा फसव्या कल्पना करून हे ही (कोणी) आयुष्य जगू देत नाही. मग सामान्य माणसाने चार्वाकाचे तत्त्वज्ञान आयुष्यात वापरले तर ते जास्त सोयीचे होईल.

चार्वाक म्हणतात

यावत् जीवेत् सुखम् जीवेत्
ऋणं कृत्वा ~~घृ~~ घृतम् पिबेत
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनः कुतः।

पण उद्या चांगले दिवस येतील, असतील या भ्रमात मानव आजचा दिवस नासवून टाकतो.

जी. ए. च्या या कथेतही त्यांच्या ~~अनेक~~ सखोल वाक्यांची रेलचेल आहे. त्यांच्या चश्म्यातून तो योग्य ही आहे. पण सामान्य वाचक त्यातून स्वतः त्याचा अर्थ काढतो व कथा वाचनाचा आनंद घेतो.

ही जीवनरेखा भिंत वेगवेगळ्या वयांच्या
मृदु माणसांना गिळंकृत करणारी, भुसभुशीत होते पण एरवी तिचा एकही चिरा ढळत नाही.
(भुसभुशीत आणि मृदू ?) ज्याची आयुष्य दोरी संपली आहे त्याला या जगातून ओढून भिंती पलीकडे नेते. त्या क्षणी भुवरील जगाचे लक्ष इतरत्र असते व त्यांचा मृत्युक्षण आपण पाहू शकत नाही.

आपल्या स्वतःच्या मृत्युक्षणाची जाणीव नाही, क्षण माहीत नाही, वेळ माहीत नाही मग तरीही पाऊले चालती पंढरीची वाट या न्यायाने कुठेही न थांबता, कोणत्याच गोष्टीचा आनंद न उपभोगता पुढेकडे, भविष्यात काहीतरी चांगले आहे या फोल आशेवर चालणे चालू ठेवतो.

चार्वाक तेच म्हणतोय हा क्षण जगा, आनंदाने जगा. ओशो ही तेच म्हणतात हा क्षण सर्वार्थाने संपूर्ण जगा. उद्या ही निकल्प(?) ही भविष्यातील नसलेल्या गोष्टींची जपणा आहे अन म्हणून माणसे अव्याहत चालत राहतात डाव्या बाजूने भिंतीला साक्ष ठेवून. पण भिंत कधी कठीण आहे तर कधी भुसभुशीत, मृदू.

भिंत अभेद्य, चिरेबंदी पण आमची इच्छाही अमर्याद, दुर्दम्य, कधी स्वरामुळे कोमल पालवी फुटते ती मनाला, तर कधी स्मृतींच्या दशा विसरल्यासारखे होते. आसमान दुःखाची आर्तता नाही पण चिरंतन शांतता आहे.

आयुष्यरेषा संपत आलेली असल्याने तो भिंतीला टेकतो, पाय निर्जीव होतात. भिंत मृदू होऊन अनेक हातांनी त्याला ओढून घेतात, त्याचे

③

PAGE No. / DATE

आवाज गेला, शब्द अुमटले नाहीत. श्रीत सांघाडी मृत्यु झालाय. अुत्साह ओसरला आहे.
प्रकाशाची वानवा, धुसर अंधार, सुगंध नाही, फुले नाहीत. सारे काही मेल्या प्रमाणे चिरंतन, अमर्याद, अभंग, भिषण शांतता. व तिच्यात ठिकठिकाणी लवलवणारे सहस्त्र धगधगीत. कसलेले डोळे. हेच खरे सत्य आहे.

त्यामुळे अुजवीकडील माहीत नसलेला आनंद झगमगाट सोडून चार्वाक तत्वाने आयुष्य जगले तर माणसाचे अस्तित्वात असलेले आयुष्य अुपभोगणे हेच शाश्वत सत्य. आणि पूर्णपणे योग्य.

जी.ए. चां स्वत: वर लेखक म्हणून १००% गाढा विश्वास होताच त्यामुळे त्यांच्या तात्विकतेवर ते कधीला शंका घेतील. त्यांनी तर या कथेत सार्वकालीन सत्य सांगितले आहे. प्रश्न अुरला वाचकांचा. वाचकाला समजण्याचा त्याचा स्वत:चा जेवढा नकुब विचारखोली, जी.ए. वाङ्मयाचा अभ्यास असेल तेवढी कथा त्याला त्याच्या Perspective मध्ये समजणार.

थोडक्यात अनंताचा पाठलाग करु नका असं तरीही गदिमा यांच्या खालील ओळी मानवी आयुष्याचे कथासार सांगून जातात.

जरा मरण यातून सुटला कोण कल्पनेचा
पराधिन आहे जगती, पुत्र मानवाचा
दोष ना कुणाचा.

—x—

सुनीळ सामंत: वाह.

तुमचे हे विवेचनही जीएं च्या वाचकाला शोभेसे कलात्मक झाले आहे.

जीएंच्या इतर कोणत्या कथेमधे असा जीवनातल्या Present चा आनंद घेण्याचा संदेश मला आढळला नाही.

त्या अर्थाने ही कथा वेगळी आहे असे वाटते का? की इतरही अशा कथा आहेत?(अहम- काहीशी तशी आहे का?)

जीएंच्या कथांवर आणि विचारांवर जीवनाबाबत नकारात्मकतेचा आरोप होतो. तो कितपत खरा आहे? या कथेच्या आधाराने यावरही चर्चा व्हावी.

Madhav Puranik: भिंत - सांजशकुन(१९६३) विवेचन डॉ माधव पुराणिक

मुद्दे १ कथेतील जीवनाबद्दल नकारात्मकता २ अस्तित्ववादी व्यूहरचना - (इच्छा+ जिज्ञासा +रसग्रहण),(दुःख दयाकरूणा),(श्रध्दाहीन वैफल्य+शक्तीहीन वैफल्य) ,(क्षणिक सुख~ क्षणिक व्यावहारिक, कलात्मक आनंद ~ शाश्वत आनंद)

१ शाश्वत घटना- विशाल,कठोर, चिरेबंदी, अभेद्य, अनिवार्य भिंतीच्या एका बाजूने जनांचा अव्याहत चाललेला प्रवाह. काळाच्या क्षणभर तुकड्यात मृत्यू येईपर्यंत,माणूस सुंदर घर निर्माण करण्याचा व(आतड्याचे एक तरी) नाते विकसित करण्याचा प्रयत्न करतो.

२ धर्माचा, परंपरेचा प्रतिनिधी जटाधारी योगी भिंती पलिकडच्या शाश्वत सुखाची व अलिकडच्या क्षणभंगुर सुखाची कल्पना देतो.

३ कथानायकाचा तिन्ही प्रकारचा अनुभव अलिकडे(सांसारिक), भिंतीला टेकून उभा राहणे,कपाळ आपटणे( असफल, अपुरे प्रयत्न) व नंतर पलिकडे जाऊन अपेक्षाभंग होणे

४ Jean Paul Sart…

५. लोक इच्छेने पूर्ण जिज्ञासेत, पूर्ण रसग्रहणात रूपांतर करताना दिसत नाहीत.या अर्थाने ही बरीचशी नकारात्मकता म्हणावी लागेल.

६ कथेतील लोकांचे वैफल्य बरेचसे श्रध्दाहीन आहे. त्यामुळे प्रवाहपतित तर आहेतच पण संसार करून - त्याच वाटेने भिंतीवरच्या श्रध्देने चालत आहेत. हळूहळू मृत्यूच्या दिशेने चालत शक्तीहीन होत आहेत. हे अटळ, अपरिहार्य, अनिवार्य आहे कारण या विश्वात माणूसच क्षुद्र, मर्यादित आहे( अस्तित्ववाद).

७ माणसाला स्वत:ची क्षणोक्षणी मनात निर्माण होणारी इच्छा पूर्ण होईल अशी आशा असते.मग अपेक्षा निर्माण होते. मग अपेक्षाभंगाचे दु:ख होते. जी एं च्या कथांत हे दिसते( स्तर १)

नंतर दुसऱ्याचे दुःख बघून माणसाच्या मनात दया उत्पन्न होते( स्तर २) जी एं च्या कथांत हे क्वचित दिसते.मग सकारात्मक कृतिशील करूणा - सर्वजण माझ्या सारखी माणसे आहेत. त्यांचे दु:ख दूर करण्यासाठी मी प्रयत्न करीन.मी तसा बनेन, मी तसा होईन.(स्तर ३) हे दिसत नाही.या अर्थाने नकारात्मकता कथेत दिसते.

८ प्रत्येक वर्तमान क्षण आनंदात घालवावा.हे बरोबरच आहे.पण सुख व आनंद यांच्या कल्पना संदिग्ध आहेत. चढत्या श्रेणीचा( शारीरिक, मानसिक, कलात्मक,आत्मिक) आनंद मिळवण्यासाठी सकारात्मक,एकदिश, सातत्याने, शेवटपर्यंत, वास्तववादी,अनुभव घेत,तपासत, प्रयत्न करावे लागतात. ते कथेत जाणवत नाहीत.

९( मी पण असणे + मी पण नसणे) = १००% जीवन.

(भिंती अलिकडे+ भिंती पलिकडे) = १००% जीवन

रोजचे जीवन अलिकडे पण पलिकडचा ,मीपण नसण्याचा काही क्षण अनुभव(ध्यानात) घेता येतो. मग परत 'मीपण' येते. ही प्रक्रिया( मी पण नसण्याचा काळ वाढविण्याची पध्दत) माणूस स्वतःच्या निर्णयाने चालू ठेवू शकतो. हा पलिकडचा अनुभव तर्कशुद्ध सिध्द करता येत नाही.पण तो असतो असा माझा अनुभव आहे.

डॉ माधव पुराणिक

सुनीळ सामंत: डॉ. माधवजी पुराणिक सरांनी या चर्चेत भाग गेतल्यामुळे आनंद झाला. खरे तर कालच बारबिंद सरांनी चार्वाकाचा उल्लेख केल्यावर मला माधव सरांची उणीव जाणवली होती. पण त्यांच्या सध्या हाती घेतलेल्या कामामुळे त्यांना डिस्टर्ब करणे योग्य वाटले नाही. विलास सरही सध्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे सहभाग कमी आहे. अशा वेळी भारतीय तत्त्वज्ञानाच्या अंगाने या कथेचा आस्वाद घेणे आवश्यक वाटत होते ती उणीव माधव सरांनी भरून काढली.

जीएंचे वाचन व अभ्यास(भारतीय आणि भारताबाहेरील अत्सेच पारंपारिक, प्राचिन आणि ाधुनिक अशा अनेकांगांनी इतके विविध होते की त्यांच्या कथांचा आस्वाद घेताना असंख्य संदर्भांची गरज पडते.

अशा वेळी या ग्रुपवरील वाचक सहभागींची वाचनाची विविधता आणि व्याप्ती या मुळे माझ्यासारख्यांना लाभ होतो.

माधवजी असेच येत रहा. काही विशेष कथांसाठी तर याच.

दिलिप बडे: भिंत'हे शिर्षक समोर ठेऊन काही मांडणी करता येईल का?

संजीव सावरगांवकर: म्हणजे काय कशी?

दिलिप बडे: भिंतीवर डोके आपटणे-निरूत्तर होणे.

संजीव सावरगांवकर: मला वाटले वेगळी संकल्पना, कथा

दिलिप बडे: दोन विभाग.

दिलिप बडे: अशाश्वत -अस्थिर वर्तमान आणि काल्पनिक आनंदाचा-सुखाचा भविष्यकाळ यांना जोडणारा दुवा म्हणजे जटाधारी.दोन्ही कडे नैराश्यच भरून आहे.वर्तमान आणि भविष्य यांना वेगळ करणारी काल्पनिक भिंत.भिंतीच्या दोन्ही बाजुने चालणारे चिरंतन मानवी जिवन.मोक्ष-मुक्तीचा विचार नाही.

निशा क्षिरे: डावीकडे असलेली भिंत म्हणजे आपला जीवन प्रवास किंवा जीवन रेषा आहे आणि या प्रवासात अनेक सुख दुःखाचे अनुभव येतात कोणी घर बांधतात झाडे लावतात सोनेरी मातीच्या स्पर्शाने उन्मदित व्हायला होते पण ते सगळे क्षणभंगुर ठरते बांधलेली घरे झाडे चिरडली जात आहेत उजव्या बाजूला काही काळ उत्कट वाटणाऱ्या गोष्टी घडत. जसे सूर्याचा सोनेरी प्रकाश किंवा झुडुपात गाणारा पक्षी, तलावात उमलनारे कमळ पण प्रत्येक वेळी काळपुरुष येऊन या मोहात गुरफटू नको त्या भिंती पलीकडे याहून खूप चांगले आहे असे सांगत असतो जणू भिंतीपलिकडे स्वर्गच तो मिळवण्यासाठी तुम्ही इथल्या मोहजालात न अडकता चालत रहा इथले सर्व नाशवंत आहे. परंतु जेव्हा मी भिंतीपालिकडे म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गात पोचतो तेव्हा त्याला काहीच दिसत नाहीं त्याच्या बरोबर असणारी पण अचानक नाहीशी झालेली माणसे इकडे आली असतील ती किंवा तो अमर पक्षी यांना मुक्ती मिळाली असेल का. त्यामुळे ज्या कल्पना घेऊन मी भिंतिपलिकडे आला

आहे त्या त्याला काहीच अनुभवता आल्या नाहीत. त्यांच्याप्रमाणेच अनेक जण काही सुंदर अनुभूत अनुभवायला मिळेल म्हणून भिंती पलीकडे आल्यावर त्यांचा भ्रमनिरास झाला असावा म्हणून भीषण शांततेत ठीकठिकाणी लखलखणारे सहस्त्र धगधगीत फसलेले डोळे आहेत असे वाटते. सतत माणसाला विचार करत ठेवणे असेच जि एंचे वैशिष्ट्य असे वाटते.

सुनीळ सामंत: ही कथा मला फ़ारच साधी सरळ वाटली होती. योगी पारलौकिक जगाचे आमिष दाखवून लौकिक जगाकडे पाठ फ़िरवायला सांगतो, आणि ’मी’ जेव्हा खरेच परलोकात जातो तेव्हा योगी जे बोलला ते संपूर्ण खोटे होते याचा "मी" ला प्रत्यक्ष अनुभव येतो. जीए " आहे हा क्षण जगा" असे सांगतात. एवढाच मी कथेचा अर्थ घेतला.

पण जसजसे इतरांचे मत वाचत गेलो तसतसे ही कथा किती खोल आणि विविधांगी आहे याचा अनुभव आला. आज पुन्हा कथा वाचली.

श्रीकांतजी, विश्वेश्वरजी, महेशजी, संजीवजी, रेखाजी , बारबिंद सर, माधवजी, दिलिपजी आणि आता निशाजी या प्रत्येकाला ही कथा वेगळी दिसली. एकूण दहा अंगांनी पाहिल्यावर मात्र ही सरधोपट वाटणारी कथा किती अनेकांगी आहे ्याचा प्रत्यय आला.

जीएंचा तत्त्वज्ञानाचा अभ्यास होता पण ते एकाच पठडीतले नव्हते. त्यांना अमूकवादी असे म्हणणे हा त्यांच्यातील कथाकारावर अन्याय आहे. त्यांच्या कथांतून वेगवेगळी तत्त्वज्ञाने आणि इझम्स दिसतात. काही कथांमधे विरोधाभासी पात्रेही आहेत. आणि जीए या सर्वांच्या पलिकडे राहून आपली गंमत बघत असतात.

जीएंची कथा जिथे संपते तिथे अनेक नवीन कथा उगम पावतात.

जिएंची कथा पृष्ठांच्या संख्येत मोजता येत नाही.

हे कळणे हाही साक्षात्कारच. परलोकासारखा.

महेश आफळे: तंतोतंत मान्य

किंचित सुधारणा सुचवू इच्छितो

जी एं ची कथा ही खरी अमितीय सौष्ठवपूर्ण आणि कोणत्याही पुस्तकातच मुळी न मावणारी

श्रीकांत देशमुख : सुनिळ सर, आपण उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येकाला वेगवेगळी जाणीव व अर्थ प्रतीत करणारी ही कथा. याउपरही दशांगुले उरणारे असे काहीतरी जि. एं. च्या लिखाणुन आम्हाला मिळत राहते. दरवेळी नव्याने. म्हणुनच त्यांचे वाङ्मय वैश्विक(युनिव्हर्सल) पातळीवरचे जाते.. त्याचा अतिशय संतुलित सुंदर सारांश आपण सांगितला.

ह्या समुहाचा सदस्य असल्याने फार मोठा फायदा होत आहे. जि. एं. चे साहित्य कसे वाचावे. मनन करावे व पुन्हा वाचावे पुन्हा मनन करुन ईतरांनी वेगळ्या मितीतुन टाकलेला कोन बघावा असे घडत जाते आणि व्यक्तिगत फायदा होत राहतो. धन्यवाद.

# भेट- जी ए कुलकर्णी – सांजशकुन

सुनीळ सामंत: भेट- जी ए कुलकर्णी – सांजशकुन

सांज शकुन हा कथासंग्रह 1975 यावर्षी प्रसिद्ध झाला. भेट आणि भिंत या त्यातील कथा मात्र 1963 सालच्या माणूस च्या दिवाळी अंकामध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. या मधल्या काळात जीएंचे इतर संग्रह प्रसिद्ध झाले; पण त्यात या कथांचा समावेश केला गेला नाही. सांज शकुन मध्ये या कथा संग्रहाच्या मध्यावर आहेत.(सांजशकुन हा कथासंग्रह शून्यवादापासून ते अहमवादापर्यंत असा बाविस कथांचा प्रवास आहे असे मला वाटते) एवढेच नाही, या दोन्ही कथा मृत्यू आणि जीवन यांच्यावर भाष्य करणाऱ्या, या बाबत वेगळा दृष्टीकोन मांडणाऱ्या आहेत. भिंत वर आपण चर्चा केली आता भेट वर करुया.

भेट ही कथा गौतमाच्या घराबाहेर पडल्यावर आलेल्या अनुभवावर आधारित आहे. प्रसादामध्ये सर्व सुखं उपभोगणारा गौतम शहरात फ़िरायला बाहेर पडतो. त्याला रस्ते शरीरातील नसांप्रमाणे दिसतात. सुखदुःखांचे जीवन त्यावरून …

भेट - प्रतिसाद.

।) एखाद्या उंच शिखराप्रमाणे वाटणारी ही जीएंची अलौकिक कथा आहे. गौतम व अश्वत्थामा यांची भेट होते व त्यांच्या त विचारांची चर्चा होते ही कल्पना विलक्षण आहे. अशी कल्पना जीएंसाररख्या प्रतिभावंतानाच सुचू शकते. जीएंचे कथा रचनेचे सामर्थ्य यातून दिसते. कथेतील ऐतिहासिक वातावरण जीएंनी

थोडक्यात पण शब्द प्रभुत्त्वाने केले आहे. राजवाडा, रथ, रस्ते इत्यादींचे थोडक्यात वर्णन केले आहे. ही कथेची एक पातळी आहे.

2)- कथेच्या दुसऱ्या पातळीवर गौतमाला जाणवणारे मानवी जीवनाचे दुःखमय स्वरूप दाखवले आहे. जीएंनी त्यांच्या कथांमध्ये दुःखाच्या अनेक छटा दाखवल्या आहेत. या दृष्टीने जीएंच्या कथा गौतमाचा जीवन दृष्टीकोन प्रकट करतात

3)- पण याहीपेक्षा अमर दुःखाची कल्पना भयावह आहे. अमरत्वाच्या संबंधी हा दृष्टीकोन जी ए अश्वत्थाम्याच्या तोंडून सांगतात. अमरत्वाकडे सुखाने न पाहता दुःखानेही पहाता येते. हा वेगळा दृष्टीकोन जीएंनी मांडला आहे. येथे प्रॉमिथ्यूस कथेची आठवण येते. अमर देहात सतत चोच खुपसून जखम करणारा गरूड( किंवा गिधाड) तेथे असतो. व तो प्रॉथीम्यूसला अमर वेदना देत असतो. याप्रकारे मृत्यू, नियती आहे, म्हणून माणसाला सुटकेची आशा आहे, हा नियतीवरील महत्वाचा दृष्टीकोन जीएंनी येथे मांडला आहे. व तो पटण्यासारखा आहे.

- जी ए लिहितात - इथे ज्याप्रमाणे सुख क्षणभंगुर आहे त्याप्रमाणे दुःख ही क्षणिक आहे. तुलनेने शाश्वती, अमरता भीषण आहे.

- म्हणून जीएंची मराठीतील ही असाधारण कथा आहे. सुनीळजींनी कथेचे सूतोवाच सुंदरपणे केले आहे. त्यांना धन्यवाद. विलास वाघोलीकर

Gauri Deshpande: जीएनच्या प्रत्येक कथेचे सहजसुंदर शब्दात रसग्रहण आणि विश्लेषण करणाऱ्या विलासजी यांची तब्येत लवकरात लवकर ठणठणीत बरी होण्यासाठी शुभेच्छा!

Gauri Deshpande: सहमत! आणि अजून एक जोड त्याला देता येईल ती म्हणजे...कथेचे रसग्रहण करणारा आणि ते वाचणारा या दोघांनाही तितकाच आनंद मिळतो. 😄

आणि त्याचे श्रेय पूर्णपणे हा ग्रुप creat करणाऱ्या सुनीलजी यांना जाते. 🙏

सुनीळ सामंत: विलासजी, तुम्हाला प्रॉमिथ्युस आठवण्याचं एक कारण आहे.

सांजशकुन हा कथासंग्रह जीएंनी(आणि भटकळांनी) अगदी वेचकपणे आखला आहे. त्यात अनेक शेड्स आहेत. निळ्या रंगाच्याच पण हलके हलके बदलत जाणाऱ्या शेड्सचे(मला वाटते व्हि एक गायतोंडेंचे) एक चित्र आहे. त्याची इथे आठवण होते. यात जीएंचे तत्त्वज्ञान हलके हलके बदलत जातानाचा पट आहे. तो कालानुरुप नाही तर विचारानुरुप आहे.

बारबिंद सर: परंतु, खेळणार्यापेक्षा पहाणार्याला खेळ सर्व बाजूंनी केवळ पहाता नाही तर न्याहाळता येतो( समालोचन) त्यामुळे खेळाचे विश्लेषण करता येते.इथे पहाणार्यात नुसता आनंदाचा भाग नसतो, तर त्याच्या ठिकाणी खेळ पहाण्याचा आनंद व त्या खेळाचे Analysis हे एकसमवायाच्छेदतेने चालू असते.हीच प्रक्रिया वाचणार्याच्या ठिकाणी देखील असते म्हणून तो केवळ त्या पुस्तकाचा आनंद घेत

नसतो, तर त्या ग्रंथातील विषयाचे समीक्षण देखील करू शकतो.दोघा असलेला हा फरक मला तरी जाणवतो.

सुनीळ सामंत: खरे तर माझीच चूक. भेट नावाच्या जीएंच्या दोन कथा आहेत हे माझ्या लक्षात आले नव्हते. मी यादीत भेट ही पारवा मधील कथा निवडली. पण भिंत वाचताना भेट अचानक समोर आली( भिंत शोधताना) आणि त्या दोन कथांचा संबंध पाहून आधी भेट ही सांजशकुनमधली कथा घेतली. यानंतर पारवामधील भेट घेउया.

दिलिप बडे: निश्चिती-खात्री-शाश्वती असलेला कोणताही खेळ खेळायला मजा येत नाही.म्हणुनच जी.ए.अनिश्चिच आणि अशाश्वत निकाल देणार्या रमी मध्ये रमले असावेत.जीवनात ही त्यांनी रूळलेली वाट निवडली नाही.आपल्या कथांमध्ये त्यांनी कधी "सुखाचा संसार"चित्रित केला नाही.भेट या कथेतही त्यांनी राजपुत्र आणि वृद्ध योद्धा यांची भेट दाखवली आहे.अनेकांना इतरांचे दुःख दिसते-जाणवते.पण याकडे करूणेने पाहिले ते गौतमाने.दुःखाचा अंत मुर्त्यूने होतो.दुःख संपणे आणि अस्तित्व संपणे या दोन वेगळ्या घटना आहेत असे मला वाटते.अमरता- शाश्वती-निश्चिती-खात्री जीवनात कुठेच नाही.म्हणुनच हातात येतील ती पाने घेऊन डाव जिद्दीने खेळणारा बाजीगर ठरतो.

दिलिप बडे: रमी-जी.ए.-बाजीगर.

दिलिप बडे: दुःख-मुर्त्यु-अमरत्व याची जाणिव राजपुत्राला संवादातुन झाली.अमरत्व- शाश्वती यांना दुःख-शाप ठरवुन अश्वत्थाम्याच्या रूपाने अमरत्व अनंत मार्गाने चालु लागले. म्हणजे प्रवास दुःख आणि यातनांचाच सुरू झाला.

निशा क्षिरे: राजपुत्र जेव्हा प्रासादातून बाहेर पडला तेव्हा त्याला जर्जर झालेली एक वृद्ध व्यक्ती दिसली त्यानंतर एक अंध मुलगी भिक मागताना दिसली मानवाच्या आयुष्यात कुणाचीही भेट होणे यामागे निश्चित काही कार्यकारण भाव असतो कोणतीही व्यक्ती आयुष्यात येणे या मागे काही कारण असते. त्यानंतर त्याला एकटीच जळत असलेली चीता दिसते. त्या व्यक्ती कडे अमाप दौलत होती खूप पुण्यकार्य त्यांनी केले होते पण तरीही अंतिम सत्य एकच ठरलेले आहे मृत्यु. मृत्यु माणसाचा मित्र आहे असेच मानावे लागेल कारण अमरत्वाचा शाप अश्वत्थामा भोगतो आहे. राजपुत्राच्या आधीही अनेकांनी अशी दृश्य पहिली असतील पण राजपुत्राच्या विचारांवर या सर्व घटनांचा खोल परिणाम झाला. त्याच्या कडून खूप मोलाचं काम घडवून आणायचे म्हणूनच ईश्वराने या सर्वांची भेट घडवून आणली असावी आणि या सर्व घटना घडल्या त्याला दिसल्या जाणवल्या ही ईश्वराने त्याला दिलेली भेट - बक्षीस ही म्हंटले पाहिजे. त्यामुळे त्याने पुढील आयुष्यात मोठे कार्य केले. जि एंच्या या शीर्षकात दोन अर्थ आपल्याला मिळतात भेट - कुणीतरी भेटणे आणि दुसरा म्हणजे भेट - gift. जि एंच्या कथांवर जितका विचार करू तेवढा कमीच आहे.

श्रीकांत देशमुख : छान व वेगळेच विश्लेषण. 🙏 आणखी वेगळा विचार. म्हणुनच जि. एं. चे लेखन बहुआयामी व बहु प्रमेयी 🙏

सुनीळ सामंत: संजीवजी, तुम्ही प्रयत्नपुर्वक आपल्याकडचे ज्ञान व चिंतन सर्वांना दाखवल्याबद्दल आपले आभार.

त्यातही एकवेळ अश्वत्थाम्याची मूळ कथा शोधून वाचणे सक्य असते. पण त्याच्या वाक्यांचा परिणाम गौतमावर झाला आणि त्याचे भविष्य घडले हा कथेतला भाग तुम्ही नेमका दाखवला आहे. तो मात्र सहजपणे दृष्टिला आला नसता. खरे तर कथेचा axis point तेच वाक्य आहे हे आता लक्षात आले.

रेखा दातार : भेट

- सांजशकुन

आपण ऐकत आलेल्या गौतमाच्या कथेत राजवाड्या बाहेर पडलेल्या गौतमाला दैन्यवस्थेतील अंध स्त्री,प प्रेतयात्रा, अतिशय वृद्ध व्यक्ती व संन्यासी भेटतात. जी. ए.

नी या गोष्टीतील वृद्ध म्हणजेच अश्वत्थामा असे कल्पून गौतमाच्या गोष्टीची एक वेगळीच भेट आपल्याला घडवुन दिली आहे.

राजवाड्यातील सुखासीन आयुष्य बाजूला करून बाहेर पडलेल्या गौतमाची दुःखाशी कधी साधी तोंड ओळख देखील झाली नसते. जीवनातील दैन्य, दारिद्र्य ,शरीर पीडा, मृत्यू पाहून तो अस्वस्थ होतो. जीवनातल्या वास्तवांची व त्याची ही

पहिलीच भेट असते. जन्माबरोबरच आलेले अटळ सत्य म्हणजे मृत्यू ,पण तो पाहून गौतम व्यथित होतो. गौतम काय किंवा आपण सर्वच काय जन्मापासून या मृत्यूला हुलकावण्यात दे टाळत त्याच्यापासून शक्यतो लांब पळण्याचा प्रयत्न करत असतो.

अश्वत्थाम्याचे आयुष्य गौतमाच्या अगदी उलट होते. जन्मापासून दारिद्र्य , दुःख ,मानहानी आणि अवहेलनाच त्याच्या वाट्याला आली. पात्रता असूनही कायम सुखापासून तो वंचितच राहिला. इतका कपाळ करंटा की इतरांना हेवा वाटावा असा असा लाभलेला कपाळावरील दिव्यमणी आणि चिरंजीवी पणाचा वरही त्याच्यासाठी शापाप्रमाणेच ठरला. लहानपणापासूनच अनुभवलेल्या अवहेलनेने म्हणा त्याची मानसिकता सूडानेच भरली. त्यामुळे कौरवांना सामील झाला. आपल्या वडिलांच्या मृत्यूला अप्रत्यक्षरीत्या आपणच जबाबदार आहोत( अश्वत्थामा मेला, नरो वा कुंजरोवा) या कल्पनेने सूड भावनेने सर्व पांडवांचा नाश करायला उद्युक्त झाला. त्याने सोडलेले ब्रह्मास्त्र उत्तरेच्या गर्भातील जीवाची हत्या करण्यास निघाले.परिणामी कृष्णाच्या रोषास पात्र झाला. शिक्षा म्हणून कपाळावरील दिव्य मणी कृष्णाने काढून घेतला व कपाळावर भळभळती जखम तेवढी जन्मभरासाठी मागे राहिली.

मृत्यूला दुःख मानुन या वास्तवाने व्यथित झालेला गौतम व टाळू बघत असलेल्या मृत्यूला कवटाळण्याच्या प्रयत्नात त्याचा पाठलाग करणारा अश्वत्थामा. बरोबर विरुद्ध दिशेने वाटचाल करणाऱ्या या दोन प्रवाशांची भेट जी. ए. यांनी घडवून आणली आहे.

लहानपणी आई आजी नेहमी म्हणत असलेली एक म्हण मला आठवली. 'असेल ते विटवा नसेल ते भेटवा'. येथे गौतम आणि अश्वत्थामा यांचे तसेच आहे का? सुखविलास सोडून दारिद्र्य ,शारीरिक कष्ट यांना भेटायला निघालेला गौतम आणि चिरंजीवी पणा शाप समजून मृत्यू ला भेटायचा ध्यास घेतलेला अश्वत्थामा!

' मानवाचे आयुष्य दुःखी असले तरी संपणारे आहे आणि मृत्यू हा माणसाचा मित्र आहे' असे म्हणणाऱ्या अश्वत्थामाला बघून सुरेश भटांच्या या ओळी मला नव्याने समजल्या -

'इतकेच मला जाताना सरणावर कळले होते,

मरणाने सुटका केली जगण्याने छळले होते!'

Vasant Vankudre: सुनील सामंत,

भेट या कथेचा आधार घेत 1986 साली मी एक एकांकिका लिहीली होती. तिला वरेरकर नाट्यसंघ बेळगाव तर्फे त्यावर्षी सर्वोत्कृष्ट लेखनाचं पारितोषिक मिळालं होतं.

एकांकिकेचं नाव होतं -' अंत वेदनेचा '.

- वसंत वणकुद्रे

संजीव सावरगांवकर: कथेतील राजपुत्र हा गौतम आहे हे आपण आपल्या कल्पनेने जाणले आहे. अश्वत्थामा जेंव्हा एक वाक्य म्हणतो कमळात जन्माला आलास, कमळात बसुन जगाला ज्ञान देशील, तेंव्हा तो संदर्भ जुळतो.

सात चिरंजीव मध्ये अश्वत्थामा पहिला जो नकारात्मक कामाकरिता, कृत्ये करण्यात यशस्वी त्याला चिरंजीव केले ते द्वेष या वृत्तीचा म्हणुन. तो चिरंजीव ठरला याकरताच.

विलास वाघोलीकर: छान लिहिले आहे. विशेषतः अश्वत्थामाच्या जीवनाचा योग्य संदर्भ घेतला आहे. ही कथा मोठे शिखर आहे. जीएंच्या प्रतिभेने ही भेट मिळाली आहे. नाहीतर दुसऱ्या कोणीतरी या आधी गौतम व अश्वत्थामा यांची भेट घडवून आणली नसती का? म्हणून आपण आणखी सविस्तर लिहील्यास आनंद होईल. धन्यवाद. विलास वाघोलीकर.

दिलिप बडे: गौतमाला मुर्त्यु चे भय,तर अश्वत्थाम्याला अमरत्वाचा वर.या दोघांची भेट. भेटीचा निष्कर्ष काय तर क्षणभंगुर जिवन आणी अमरत्व दोन्ही दुःखाचे सार.

राम कुलकर्णी : वणकुद्रे सर...जी.एंच्या कथेवर एकांकिका फार कमी लोकानी लिहिल्या आहेत.पण ती लिहुन आपण प्रथम पारितोषक प्राप्त केलेत. वाचण्याची खूप उत्सुकता आहे....

Vasant Vankudre: सर,

ही खूप जुनी गोष्ट आहे. 1986 सालची. त्यावेळचे हस्तलिखित आता फोटोजेनिक राहिलेले नाही.

पुन्हा टंकलिखित करून पाठवतो.

थोडा वेळ लागेल.

- वसंत वणकुद्रे

राम कुलकर्णी : अवश्य...सर जी.एंचे संदर्भ सार्वकालिक असतात.ते जुने होत नाहीत.....

Madhav Puranik: कथा -भेट(१९६३) , संग्रह -सांजशकुन

- गौतम व अश्वत्थामा यांची अस्तित्ववादी भेट

विवेचन - डॉ माधव पुराणिक

१ अस्तित्ववाद तत्व१ मानवाने स्वतंत्रपणे झेप घेऊन निर्णय घेतला पाहिजे.

उदा.गोतमाने विशाल कठोर जगात प्रथमच पाऊल टाकले.त्याच्या चेहऱ्यावर नवा साहसी आनंद दिसला. अश्वत्थामा बरोबर कटु सत्याची चर्चा केली.

२ अस्तित्ववाद तत्व २ - ' ,मी कोण?' या प्रश्नामध्ये ' मी कोण व्हावे? ' हा प्रश्न लपलेला असतो. यांचे उत्तर 'मी आहे.' एवढेच नसून ते उत्तर ' संदर्भरहित माझ्या अस्तित्वाचे भान मला येते.' ' असा मी आहे.' हे आहे. संदर्भ म्हणजे ईश्वर, निसर्ग, धर्म, जात, कुटुंब, व्यवहार,मोबदला, प्राप्त कर्तव्य, यशापयश, सुखदुःखे इत्यादींची ' व्यवस्था '( चौकट, system, framework).या संदर्भात जगणे.

उदा या 'भेटी'त गौतम व अश्वत्थामा वरील कोणताही संदर्भ न देता बोलतात. गौतमाने या भेटीत कोणतीही चौकट स्वीकारली नाही. तो खरे असतेपणाचे भान शोधत आहे.

याउलट लक्ष्मी नंदन वैश्य ,' रत्ने, पैसा,दान, इ' समाजमान्य व्यवस्था मान्य करणारा होता

तत्व ३ -जगणे म्हणजे अखंडपणे जन्मापासून मृत्यूपर्यंत अनुभवांचे ग्रहण करीत राहणे. ही एक अखंड ज्ञानप्रक्रिया आहे. जीवनाचा प्रत्येक क्षण हा ज्ञानाचा क्षण आहे.

पण माणसाला तसे वाटत नाही. साऱ्या जीवनाच्या अर्थशून्य तेची जाणीव व व्याकुळता माणसाला जाणवते.

यावर अस्तित्ववादी म्हणतो ही अटळपणे भोगावयाची वस्तुस्थिती आहे. हेच मनष्यत्व आहे.

गौतमाला हीच जाणीव जीवनाच्या/ सुखदुःखाच्या क्षणभंगुरतेमुळे झाली आहे. तो व्याकुळ झाला आहे.

पण अश्वत्थामा त्याला ' ,तू प्रत्येक क्षण ज्ञानाचा असा जगशील ' ही शक्यता दाखवितो' हा जी एं चा

आशावाद सकारात्मक आहे.

ही अखंड व्याकुळता गौतमाला वाटते.ती अश्वत्थामाच्या अनुभवातून अधिक तीव्र होते जेव्हा अश्वस्थामा सांगतो कि तो जरी अमर ,स्थलकालातीत असला तरी दु:खीच आहे.कारण गौतमाचे सगळे आधार, जी एं ची अस्तित्ववादी दृष्टी काढून घेते. त्याला विज्ञानाचा( कार्यकारणभावाचा), निसर्गाचा, , विवेकबुद्धी अशा नैतिक कल्पनांचा, ब्रह्मज्ञान,मोक्ष, ईश्वर, धर्म इ.ची प्राप्ती या पारलौकिक कल्पनांचा आधार घेता येत नाही. याशिवाय जगण्याचा शोध कोणालाही एकाकी, दुःखपूर्ण,उदास, निराधार वाटतो.

जी एं नी या 'भेटी'त हे प्रभावीपणे व्यक्त केले आहे.

( हुसेर्ल( १८३९-१९३८)ची ज्ञान मीमांसा,)

संदर्भ-' अस्तित्ववादाची ओळख ' - दि. के. बेडेकर(मार्चि १९७२),व्हीनस प्रकाशन,पान ६२

माधव पुराणिक

सुनीळ सामंत: अतिशय सुंदर आणि मुद्देसूद विश्लेषण. अस्तित्त्ववादाच्या तीन तत्त्वांनुसार या कथेचा अर्थ वेगळाच लागतो.

या पुर्वी दिलिप बडे सरांनी "गौतमाला मुर्त्यु चे भय,तर अश्वत्थाम्याला अमरत्वाचा वर.या दोघांची भेट. भेटीचा निष्कर्ष काय तर क्षणभंगुर जिवन आणी अमरत्व दोन्ही दुःखाचे सार." हा अर्थ मनता फ़िट बसला होता.

सुनीळ सामंत: भेट - जीए कुलकर्णी - पारवा कथासंग्रह

जीएंचे साहित्य एकदाही न वाचलेल्या व्यक्तीला पारवा हा कथासंग्रह प्रथम वाचायला द्यावा व त्यातही भेट, रातराणी अशा कथा प्रथम वाचायला सांगाव्यात. जीएं च्या कथामधील नेहमी आढळणाऱ्या सखोल आणि गुंतागुंतीच्या तत्त्वज्ञानाचे या कथांतून फ़ारसे दर्शन होत नाही. अगदी घरगुती, पण तरीही जीए कुलकर्णी या नावाचा आब राखून असलेल्या, या कथा आहेत. यात थिल्लरपणा, उथळपणा अजिबात नाही; वरवरचे बटबटीत नातेसंबंध नाहीत, ओढून ताणून आणलेले संवाद

नाहीत; अगदी सहजपणे पण तरीही केवळ वाचनात एक्सपर्ट असणाऱ्यालाच विश्लेषण करता येतील अशा भावनांचे त्यात दर्शन होते.

भेट ही अशी एक कथा आहे. कथा फारच लहान आहे. लता आणि प्रभा या सख्ख्या बहिणी एकत्र रहातात. लता हरहुन्नरी आहे. चित्रकला, गायन अशा अनेक कला तिच्या अंगी आहेत. ती महाविद्यालयात शिकते. तिला एक प्राध्यापक आवडतात. त्यांनी आपल्याशी बोलावे, त्यांनी एकदा घरी यावे असे तिला वाटते, व म्हणून ती त्यांना घरी बोलावते. ते जेव्हा घरी येतात तेव्हा ती त्यांना आपल्या कला आपले संगीत हे सारे दाखवण्याचा प्रयत्न करते. त्यांनाही ते आवडते. पण तरीही त्यात काहीसा कोरडेपणा आहे, काहीसे हवेहवेसे वाटणारे त्यात नाही, हे तिला जाणवत असते.

अचानक तिची बहीण घरी येते. प्रभा ही नावासारखीच प्रभावळ असणारी असते. तिला पाहिल्यावर मात्र प्राध्यापक वेगळे दिसू लागतात. त्यांच्या बोलण्यात वागण्यात एक वेगळी चमक येते. ते निघतात तेव्हा प्रभाशी बोलताना त्यांच्या डोळ्यात असे काही दिसते जे लताच्या लक्षात येते व याच गोष्टीसाठी लता गेले तासभर वाट पाहत असते. ते त्यांच्या नजरेत प्रभाशी बोलताना येते. जीएं च्या भाषेत सांगायचे तर इतका वेळ पसरलेल्या निव्वळ प्रेमळ सहानुभूतीच्या ओलसरपणातून, उत्कट, धगधगीत भावनेचा, अभिलाषेचा, लाल लाल कोंब उमलला होता. पण तो तिच्यासाठी नव्हता.

कथा इथेच संपते पण जीएं च्या इतर कथासारखी एक नवीन कथा वाचकाच्या मनात सुरू होते

विलास वाघोलीकर: -सुनीळजींनी या कथेचे सूतोवाच मुद्देसूदपणे केले आहे ,याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

- कथेत सर्वसाधारण अनुभव दाखवला आहे." A boy meets a girl" असा हा अनुभव आहे. कथेतील दोन्ही बहिणी व प्राध्यापक तरुण आहेत. आई वडीलांच्या माघारी बहिणी रहात असून, थोरली बहिण ऑफिसमध्ये काम करते. धाकटी मॅट्रिकला आहे. तरूणपणी अंतः प्रवृतीने जी ओढ तयार होते, ती या कथेत दाखवली आहे. उदा. -

- प्रभा म्हणते," ताईसाहेब आम्हाला फसवू नका बरे. आम्ही मॅट्रीकला आहोत म्हटले. "

- प्रभाच्या कोरीव ज्योतीप्रमाणे उष्ण रसरशीत वाटणाऱ्या आकृतीकडे पाहून तिचे मन अभिमानाने मोहरले.

- "ही माझी धाकटी बहिण. यंदा मॅट्रिकला आहे. नाटकातही भाग घेते " प्रभा किंचित लाजली.


- "अरे हो, तुमच्या बहिणीला हाक मारा ना जरा"

- " सर ,येत चला वरचे वर" इअरिंग्जबरोबर मान हलवत प्रभा म्हणाली. आणि प्रत्युत्तरादाखल ते हसले.

म्हणजे प्राध्यापकांनाही प्रभाबद्दल ' वाटले' होते.

- सर्वसाधारण प्रसंगातील अनुभव जीएंनी कथेत मांडले आहेत. अर्थात त्यामध्येही त्रिकोणी कोन, धार, आहे. आशा निराशेचा खेळ आहे. सुरीची धार जाणवण्याचे दुःख आहे. हे सर्व या अनुभवात जीएंनी पकडले आहे. हे लक्षणीय आहे. धन्यवाद. - विलास वाघोलीकर.

सुनीळ सामंत: जे अनुभव सर्वांना येतात पण सहसा बोलले जात नाहीत आणि सब्दांत सांगण्याच्या पलिकडचे असतात असे नेमके मांडणे हे खऱ्या श्रेष्ठ साहित्यिकाचे लक्षण आहे. जीएंच्या पारवा मधे असे अनेक अनुभव आहेत.


भेट : सांजशकुन 30/[illegible]/22

(x) जी.एं.नी या कल्पित कथेचा मूळ [illegible] सांगितलाय. असत्याचा शाप घेऊन फिरणारा अश्वत्थामा त्याची ती भळभळती जखम, दुसरे रोगांनी पछाडलेले शरीर, स्मृतीचा कल्लोळ, आयुष्य जगण्याची दुर्दम्य इच्छा, त्याचे कारण म्हणजे कपाळावरील मणी काढून देण्याचे कृत्य ज्यामुळे आपोआप आयुष्य जगण्याचे [illegible] आलेले दुर्भाग्य [illegible] चक्र [illegible] त्याचे प्रकरण.

हेच त्याचे जीवन वैशिष्ट्य. कधीही मृत्यू येणार नाही ते स्मृती लोप पावणार नाही यात असह्य दुःख कपाळी आलेले हे एक चिरंजीव.

वर हा मिळाला कोणाला तर [illegible]. ज्यांनी अजून जगाचे प्रतिबिंब नाही, दुःख अनुभवले नाही. मृत्यु म्हणजे काय [illegible] ठाऊक नाही. अनभिज्ञ असणारे [illegible]. या लोकांच्या [illegible]

राजपुत्राच्या विचारांचे कोवळेपण दिसते तर अश्वत्थामा पूर्ण आयुष्य जगलेला, सर्व पापे केलेला ब्राम्हण असून दुर्योधनाकरीता लाचार झालेला, त्याच्या अन्नावर, कृपेवर जगलेला जीव, आणि म्हणून आयुष्य भोगलेला योद्धा. ही त्याची कितीही (कु)कीर्ती

अश्वत्थाम्याची कथा लहानपण सर्वांना माहीती असते, आहे पण त्याला अमरत्व एका शापामुळे मिळालेले आहे, आयुष्य जगण्याच्या तीव्र इच्छेमुळे मिळाले आहे ह्याची जाणीव सर्वांनाच आहे असे नाही.

थोडे विषयांतर करून लिहतो.

द्रोण-कृपी या जोडप्याचा एकुलता एक मुलगा म्हणजे अश्वत्थामा. लहानपण सर्व द्रोणांच्या आश्रमात तर द्रोण कायम कौरवांचे आश्रीत ब्राम्हण. पांडवांच्या द्वेषाने कायम आचरण केल्याने दुष्टला रक्तात मिनळेला. ते दुर्योधनाकरीता सहाय्य करण्याची कायमची अभिलाषा. त्यामुळे तामसी व निधुकोली म्हणूनच तो माहीत होता. सारासारविवेक बुध्दीही त्याकडे नव्हती.

तो ब्राम्हण असुनही व अंगी अपार गुणवत्ता असुनही कौरवांच्या राजसत्तेला अनुमोदन देणे हिच त्याची आयुष्याची इतिकर्तव्यता होती. द्रोणांकडून त्याने हट्टाने ब्रम्हास्त्र प्राप्त केले पण अर्धवट ज्ञानामुळे तेच ब्रम्हास्त्र त्याचा अमरत्वाचा शाप ठरले.

ब्रम्हास्त्र कधीही माणसांवर सोडू नको हे द्रोणांनी घातलेली मर्यादा त्याने ओलांडली व ब्रम्हास्त्र सोडले पण ते त्याला परत घेता येईना. व्यास व नारद यांनी त्याला खूप समजावले शेवटी अश्वत्थाम्याला भगवंताने व अमर्य लाभलेला कपाळावरील मणी त्याने पांडवांना द्यावा (त्यामुळे त्याच्या कपाळावर कायमची जखम झाली) पण त्याने अट घातली कि सोडलेले ब्रम्हास्त्र तर तो परत घेऊ शकत नाही म्हणून ते पांडवांच्या गर्भावर जाऊन पडेल व पुढचा वंश होणार नाही. तो गर्भ होता अभिमन्यूची पत्नी उत्तरेच्या पोटी. अश्वत्थामा त्याचा मनी भयंकर दुष्ट होता कि जिवंत माणसांनातर ठार केले पण गर्भालाही ठार करण्यास प्रवृत्त झाला.

# कथा: भोवरा, कथासंग्रह: काजळमाया

संजीव सावरगांवकर: **कथा: भोवरा,**

**कथासंग्रह: काजळमाया,**

हंस दिवाळी अंकात 1966 मध्ये पहिल्यांदा प्रसिद्ध झाली.

माझ्या मणक्याची माझे हाती बेडी|
ऐसी कैसी तेढी शिक्षा तरी ||

आपलेच घर, तुरुंग आपुला|
यासी न्याय दिला म्हणावे का? ||

सुख जवा पाडे दुःख तो पर्वत |
तुझीही करवत चालते ची||

भोगतोच आहो आम्ही सर्व भोग |
आता नवा रोग कशासाठी||

तुझे तुझे ज्यानी म्हणविले सदा |
ते तो परागंदा दाही दिशा||

आपल्या चर्मा चा लगाम आपणा|
ऐसा कमीपणा देऊ नका||
(अनामिक काव्यरचना 1977)

काजळमाया संग्रहातील पहिली कथा प्रदक्षिणा याची सुरुवात मृत्यू घडून गेल्यानंतर चौदा पंधरा दिवसांनी होते त्या कथेतही मानवी स्वभावाचे वागण्याचे भोवरे आहेत प्रत्येक भोवऱ्यात आपल्या वेगाने अंगावरील रंग दाखवत , फिरून झाल्यावर शांत होत, त्या त्या क्षणांचे जीवनभाष्ये क्षण, फिरवत तो सांगत असतो. मी कसा योग्य वेळी योग्य पद्धतीने फिरलो ते सांगतोय तो भोवरा.

तसाच "भोवरा" कथेमध्ये जिग्सा पझल चे वेगवेगळे तुकडे जोडत प्रत्येक व्यक्तीमत्व कथेत आपला आपला आयुष्य सहभाग कसा बरोबर आहे व इतर कसे उलटे फिरले आहे ते विदित करत आहे. शेवटी या सर्व भोवर्‍यांची प्रदक्षणा मृत्यू जवळ कशी थांबते व त्या त्या भूमिकेची, कॅरेक्टरची आयुष्य चालण्याची गती दाखवते.

भोवरा कथा ही सर्व साधारण मध्यमवर्गीय घरात घडणारी नेहमीची कथा आहे. एकमेव कमावता नायक, त्याच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या, पैशाचीही नेहमीची कमतरता, नात्यांमधील प्रेम, दुसऱ्या करता कष्ट करण्याची वृत्ती, एकमेकातील समजूतदारपणा पण स्वतःची कुतरओढ कशी होते आहे हे सांगण्याची लालसा, अशा प्रसंगी तसे स्पष्टपणे बोलून, न घाबरता कृती करण्याची प्रत्येकाची क्षमता, इतरांचा असहायपणा ,मृत्यूचे घरावर येणारे सावट, घुसमट ही साध्या साध्या शब्दात लेखकाने व्यक्त केलेले आहे.

गोपाळ, शांतु (त्याची पत्नी) ,मंगल (त्याची मुलगी) ,गोपाळची 30 35 वर्षापासून तर स्वतःच्या भावना दाबून ठेवलेली बालपणातील इच्छा (तो भवरा), नमुताई (बहीण), माधव (भाचा), डॉक्टर काका ,नारायणराव (मेव्हणे वारलेले ),यांचे आपले आपले स्वतःचे विचार भवरे आहेत. त्यांचे आयुष्य जगायचे क्षण हे त्या भोवऱ्याच्या आरि भोवती गुंडाळलेले स्वतंत्र अस्तित्व क्षण आहेत. कधी हे

विचारधागे एकमेकांना स्पर्श करतात, कधी छेडतात, पण एकमेकात गुंतून पडत नाहीत. ही सर्व कथा, आहे, नाही, हवेय, नकोय, द्यायचे आहे, पण घेता येत नाही या तुकड्यांवर फिरते. गोपाळाचा ही विचार तसाच आहे माधव ला वय आहे, पण भोवऱ्या चा उपयोग नाही. मंगला ला वय आहे, भवरा आहे, पण इच्छा नाही. गोपाळ ची लहानपणीची दडपून राहिलेली इच्छा उफाळून आली पण आत्ताच आल्याने पण ते वय संपून गेल्यावर, इच्छा मात्र तशीच आहे, पहिल्यासारखे जोडी अहिल्या सारखी तशीच जडशीळ निर्जीव पडून राहिले आहे. त्याच्या लहानपणीच्या इच्छेचे कथासार त्याचे वडील दोन वाक्यात सांगतात." जे आहे त्याचा काळ नाही, जे मिळते त्याला बळ नाही आणि जे नाही त्याची कळ जात नाही.

ही कथा तशी फक्त गोपाळची नाहीये तेवढीच नमूताईची पण आहे, शांताची पण आहे ,मंगल ची पण आहे ,माधवची ही आहे. यांच्यातील नाते संबंधातील ताणेबाणे नमुताईचा माधव करता असलेला प्रेमाचा कल ,त्यांच्याकरता होत असणारा निष्फळ खर्च, मंगलच्या मागण्या डावलून खर्चाची केलेली तारेवरची कसरत, ओढग्रस्त दहा-बारा वर्षांचा शांती बरोबरचा संसार , ना हौस, ना मौजमजा, ना गप्पा , ना आनंद यांनी वैतागली ती शांता गोपाळला निर्वाणीचे सांगते तेव्हा अनाहूतपणे गोपाळाचा हात उठतो व त्यांचे संबंध अजूनच कडवट होतात. नमो ताईला गोपाळ बद्दल आस्था आहे पण माधव बाबतही प्रेम आहे. एवढा पांगळा माधव, परत केव्हातरी पायावर उभा राहिल, शाळेत जाईल, या वेड्या आशेवर तिचे आयुष्याचे दिवस जोडणे चालू आहे.

मात्र नारायणराव गेल्यावर नमूताईचे व माधवचे गोपाळ कडे येणे का होते याबाबत जी. ए. नि मौन धारण केले आहे. नमोताईच्या सासर जर गडगंज श्रीमंतीचे मध्ये लोळत होते, तर ती नारायणरावांच्या मृत्यूनंतर, तेथेच सासरी का राहत नाही हेही लक्षात येत नाही. त्याचा कोठेही उल्लेख नाही.

लग्नानंतर नमूताईने वडिलांच्या संसाराचे व भावंडांची आब राखून आयुष्य रांगेस लावून दिले आहे. मालती, राजाराम, दत्तू, गोपाळ या भावंडांचा काही वारसा नसताना तिने आधार देऊन सगळयांचे संसार उभे करून दिले आहेत. शांती गोपाळच्या आयुष्यात आली होती ती नंतर. शांतीला या गोष्टीची कल्पनाही नाही व माहिती करून घेण्याची इच्छा नाही. तिचे आयुष्य तिच्या मनात तिच्या मंगल व स्वतःभोवती फिरते त्या भोवऱ्यात रंग नाही, रूप नाही ,फिरती नाही, वेग नाही. फक्त कष्ट व राबण्याची दोरि आरिभोवती फिरत राहणे हेच तिचे दुर्भाग्य व त्याला कारण माधव वरील खर्च व नमुताईचे भ्रमिष्ट वागणे.

तिचा भोवरा अपंग लुळापांगळा माधव याचे भोवती फिरत राहतो कारण नारायणरावांचा आजारपणात व मृत्यूनंतर तिच्यात भ्रमिष्टपणा च्या लहरी पुन्हा प्रकर्षाने दिसू लागतात. नारायणराव गेल्याच माहीत नसणे, सासर तुटणे, माधवचे अचानक आजारपण व त्यात तो विकलांग होणे पण तीला मात्र तो आजारपणातून खणखणीत बरा होऊन कपडे बूट घालून सायकलवरून शाळेत जाणार या दिवा स्वप्नात मग्न राहणे. शांता व गोपाळ यांचे भांडण, एकमेकांना बोलणे व गोपाळने हात उगारून शांतीला मारणे, याची समज भ्रमिष्ट बहिणीला वेळीच घेणे व नंतर गोपाळा शि व्यावहारीक स्तरावर बोलणे व आवराआवरी सुरुवात करणे स्वतःच्या घरावर पाणी सोडणे व शेवटी माधव चा मृत्यू झाल्यावर ती शेवटचे भ्रमिष्ट होऊन हसणे व एक मजा बघा की म्हणुन वेड्या सारखे वागणे गोपाळला स्तिमित करून जाते.

भोवरा, त्याची गती, एकमेकात रंग मिसळणे, वेग संपल्यावर थंड होऊन पडून राहणे, यांचे प्रतीक फार चांगल्या पद्धतीने कथेचे मध्ये वापरले आहे. सूचक शब्द , त्याच्या हालचाली, वेग त्यातून दिसणारे रंग व गतिशीलता व सर्वात शेवटी वेग कमी होऊन भवरा निष्प्राण होऊन थांबणे व गोपाळची विचारधारा यांचा सुंदर मेळ साधला आहे.

लेखाच्या सुरवातीला दिलेल्या काव्यपंक्ती ही या प्रत्येकाला लागू राहतातच गोपाळा ची धडपड, मानसिकता, अगतिकता, ताईचा स्वभाव व माधव बाबतचे वेळोवेळी वागणे. त्याच्या मृत्यूनंतर हास्य व त्या आधी व्यवहार्य बोलणे, शांतीच निघून जाणे, मंगल ने पेन परत देणे अशा गोष्टी व त्यांच्या जगण्याचा कॅनव्हास या काव्यपंक्तीतील उतरला आहे हे निश्चितपणे जाणवते.

शेवटी भोवरा हा प्रत्येकाच्या आयुष्यातील गरजेचा भाग आहे, पाहिजे तेंव्हा मिळत नाही, मिळतो तेंव्हा त्याची आस नाही, अतृप्त इच्छा मात्र अपूर्ण राहून असहाय्य जिवन जगण्यासाठी श्वास घेत राहणे हेच सत्य माणूस स्विकारताना दिसतो. अगदी मृत्यु दिसत असला तरी.

आस्वादक

संजीव सावरगांवकर. 7350002870

विलास वाघोलीकर: माननीय संजीव जींनी कथेचे सूतोवाच मुद्देसूदपणे केले आहे. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या संसारकथेत गोपाळ संसाराचा गाडा ढकलत असतो. पण तो सगळीकडून गांजला आहे. हे या कथेत दाखवले आहे.

नमूनाई ही मुलगी,बहिण, पत्नी, आई या सर्व भूमिकेत मायेने वागते. पण तिच्या वाट्याला एकामागोमाग दुःखे येतात.

यात एकमेकांचे वागणे न कळाल्याने भर पडते. म्हणून भोवऱ्याची प्रतिमा वारंवार वापरली आहे. -

लाल रंग कुठे सुरु होतो, निळा रंग कोठे सुरु होतो हे कळत नाही..... रंग अ स्पष्ट होवू लागले ते कळण्यासाठी वेग कमी होण्याची वाट पाहली पाहीजे...... शेवटी भोवऱ्याची गती संपते व सगळे स्थिर होते.

कथेत प्रत्येकाला इच्छा आकांक्षा असल्यामुळे व संवाद नसल्यामुळे, प्रत्येकजण बेट होतो. असे जीएंना दाखवायचे असेल.

नमूताईल नवरा जिवंत असण्याचा भ्रम होतो. पांगळ्या मुलाची तब्येत सुधारत आहे हा आणखी भ्रम होतो. तिला या भ्रमांमधून कोण काढणार ? घरात अशी मनाने अपंग व्यक्ती असली की इतरांचे संवेदनशील मन कसे कोळपते हे कथेत दाखवाले आहे.

त्यात भर पडते गोपाळ व बायको शांतूच्या संवाद न होता, तुटलेपणाची. त्यामुळे गोपाळ परवडत नसताना खर्च करतो. खरे तर नमू ताई त्याच्यावर अवलंबून आहे. पण पूर्वीचे दिवस आठवून तो झुकत जातो. त्यामुळे बायको पासूनही तुटतो.

नात्यांची विलक्षण गुंतागुंत, त्यामध्ये पूर्वीच्या घटनांची कारणे असणे, आताच्या व्यक्तींचे हितसंबंध व आशा आकांक्षा यांमुळे पहात राहण्याशिवाय गोपाळ काही करू शकत नाही ,ही हतबलता जीएंनी यथातथ्यपणे या कथेत दाखवली आहे.धन्यवाद - विलास वाघोलीकर

रेखा दातार : खूप छान!

भोवरा

काजळमाया

प्रत्येक भोवऱ्याला एक आस असतो आणि त्या टोकदार आसा भवती तो भोवरा गरगर फिरत असतो. फिरतांना त्यावरील सर्व रंग एकमेकांत मिसळतात व त्यांचे स्वतंत्र अस्तित्व संपून तिथे एकच रंग दिसू लागतो. भोवऱ्याची फिरण्याची गती हळूहळू कमी झाली की आसाचा आधार संपतो आणि भोवरा घरंगळून थांबतो.

भोवरा या कथेत देखील निरनिराळ्या आसां भोवती फिरणारे अनेक भोवरे आहेत.

नमूताईच्या भोवऱ्याचा आस माधव आणि नारायणराव. नमू ताईने न स्वीकारलेला नारायणरावांचा मृत्यू आणि कधी न कधीतरी माधव बरा होऊन आपल्या पायावर उभा राहून शाळेत जाईल ही वेडगळ आशा या भोवतीच नमू ताईचा भोवरा फिरत आहे. माधव आणि त्याचे दुखणे बरे करायचा ध्यास एवढेच तिने मनाने घेतले आहे.

गोपाळच्या भोवऱ्याचा मुख्य आस आहे नमू ताई. नमूताईने कुटुंबावर केलेले उपकार, भावंडांचे शिक्षण ,त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी तीने स्वतःच्या जीवनाची केलेली होळी. नमूचा त्याग आणि तिच्या उपकारांची परतफेड या भोवतीच गोपाळचा भोवरा फिरतो.

भोवरा फिरत राहण्यासाठी त्याची गती महत्त्वाची. भोवऱ्याची गती कमी झाली की तो घरंगळून पडतो. शांतू या घरात खूपच उशिरा आलेली. त्यातून ती चांगल्या खात्यापित्या घरातली असावी. तिला न गोपाळच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती माहिती आहे ना नमू ताईचा त्याग. तिची संसाराची स्वप्ने वेगळीच. त्यामुळे ती ना नमूताईची गती पकडू शकते ना गोपाळाची. आणि सरते शेवटी बाहेर फेकली जाते.

या सर्वांना एकत्रित फिरवत ठेवणारा भोवरा म्हणजे परिस्थिती. या भोवऱ्याचा आस आहे दारिद्र्य. त्याचा वेग इतका आहे की आजही भरल्या ताटावर सुद्धा गोपाळला लहानपणी कुडकुडत काढलेल्या रात्रीची आणि भुकेल्या पोटाची आठवण होते. या परिस्थिती नावाच्या भोवऱ्याचा वेग इतका आहे की नमूताई आपला खरा रंग म्हणजे उत्साह, खळखळून हसणे, दंगा करणे हे सर्व विसरली आहे. आता तेथे फक्त काळपट करडा रंग दिसतो आहे. हा भोवरा जमिनीवर फिरणाऱ्या लाकडी भोवऱ्या पेक्षा मला पाण्याच्या प्रवाहात असलेला भोवरा अधिक वाटतो. ज्या भोवऱ्यात सापडणारा प्रत्येक जण खोल खोल आत ओढला जातो व शेवटी गटांगळ्या खायला लागतो.

या गोष्टीत प्रत्येक जण आपापल्या परीने योग्यच वाटतो. माहेर वाचवण्यासाठी आपल्या स्वप्नांचा बळी देऊन मुकाटपणे वयाने दुप्पट असलेल्या बीजवराशी लग्न केलेली नमू नवे आयुष्य स्वीकारते. भावंडांना मार्गी लावते. पण नियतीला तेही बघवत नाही. नारायण रावांचा मृत्यू होतो व लुळा पांगळा झालेल्या माधवची पण त्याच दिशेने वाटचाल सुरु होते. पण त्याच्या कडे दुलर्क्ष करत, नारायणराव अजूनही जिवंत आहेत व माधव कधीतरी बरा होणार आहे या दोन खोट्या आशांच्या जोरावर नमूताई आपला भोवरा फिरवत ठेवते. नाहीतर तो कधीच घरंगळला असता. आत्तापर्यंत मन मारून जगणारी नमूताई माधवच्या मृत्यूनंतर जेव्हा त्याला तयार करून सायकलवर बसवते तो क्षण म्हणजे जीवनातील उरल्यासुरल्या आशेचा धागा पकडणारी तीची केविलवाणी धडपड वाटते आणि डोळयात पाणी आल्या वाचून राहत नाही.

उपकार फेडण्याच्या नादात गोपाळ नमू ताईचे वेडगळ हट्ट पुरवत राहतो व त्यापायी शांतू आणि मंगलला देखिल दुखावतो. माधव काही दिवसांचाच सोबती राहणार आहे हे माहित असल्यामुळे कदाचित, आता त्याचे हट्ट पुरवायला पाहिजे शांतू , मंगल साठी नंतर आपण आहोतच असे त्याला वाटत असावे. नमूताई का शांतू या दोघी मधे कोणाची निवड करावी याची त्याची ओढाताण होते.आणि शेवटी तो मंगल आणि शांतूला गमावून बसतो.

शांतू या घरात बाहेरून आलेली. परिस्थितीचे चटके न अनुभवलेली. गोपाळच्या भावविश्वात ती कधीच शिरू शकली नाही. आपल्यावर आणि आपल्या मुलीवर पैसे खर्च करण्यापेक्षा आपला नवरा वेडगळ नणंद आणि कधीही बरे होण्याच्या आशा नसलेला तिचा मुलगा यांच्याकडे जास्त लक्ष का देत आहे हे ती समजवुन घेउ शकत नाही. तिच्यापरीने तिचेही बरोबर आहे. हौस मौज करून घ्यायचे तिचे दिवस पण तेही तो नवरा पूर्ण करू शकत नाही. गोपाळ ने तिच्यावर हात उचलल्यावर मात्र तिच्या सहनशीलतेचा कडेलोट होते व शेवटी ती माहेरी निघून जाते.

नियतीच्या गतीत फिरत राहणारे नमूताई, गोपाळ आणि शांतूचे भोवरे फिरता फिरता स्वतःचा खरा रंग विसरले आहेत. प्रत्येक भोवऱ्याचे आस वेगवेगळे. फिरताना हातात धरायला जावं तर भोवऱ्याच्या फिरण्याच्या आनंदापेक्षा त्याची टोकदार आरीच आपल्या तळहातात अधिक रुतत जाते.

जी.एं ची ही कथा 'जे आहे त्याचा काळ नाही, जे मिळतं त्याला बळ नाही ,आणि जे नाही त्याची कळ जात नाही' या आसा भोवतीच फिरत राहते.

विश्वेश्वर नांदेडकर: खूपच सुंदर. भोवरा हा पाण्यातीलाच आसावा,आसेल मलाही वाटते. त्यात एकदा आडकले की आणखी खोल खोल त्यात आत ओढले जाणे एवढेच होत राहते.

वंदना बोकील: पण जी एं नी कथेत मात्र लाकडी रंगीत भोवरा प्रतिमा म्हणून वापरला आहे.

गती मध्येच त्याचे भोवरापण...कोणत्याही कारणाने गती मंद झाली की तो कलंडणार...

गती नसते तेव्हा त्याचे रंग स्पष्ट दिसतात...गती वाढली की रंग एकाकार...

या कथेत नमूताई, गोपाळ आणि शांतू...तिनही पात्रांची स्वत:ची गती, नात्यात निर्माण होणारी गती...यांचा फार अर्थपूर्ण पिळ दिसतो..तो त्या भोवरा प्रतिमेतून.

सुनीळ सामंत: रेखाजी, तुम्ही कथेच्या शिर्षकालाच समजून घेऊन कथेचा सौंदर्यशास्त्रीय पद्धतीने विचार केला. फ़ारच कौतुकास्पद. मला तर ही कथा काही ठिकाणी वाचवेनाशी झाली होती. आता वेगळ्या प्रकाशात ती पुन्हा वाचेन.

अलका तडकलकर : शेवटची तीन वाक्ये. खूप सुंदर आहेत.

मंजिरी देशमुख: भोवरा ही कथा मनाला पिळवटून टाकणा-या व दु:खातून कोणतीच सुटका नजरेत न दिसणाऱ्या आयुष्यांची कथा आहे. भोव-यात सर्वांची आयुष्ये गुरफटलेली आहेत. त्यामुळे एक दुस-यांच्या अटळ वेदनांचे भोग सोबती घेऊन कथेतील सर्व फिरतात.

कथेतील पात्रांच्या दु:खाचे न संपणारे भोग पाहून वाचक हादरुन जातो. प्रत्येक पात्राच्या आयुष्यात सुखाची थोडी तरी शिंपण व्हावी अशी आस ठेवतो. पण जीए जीवन जसं आहे तसं वाचकांसमोर ठेवतात. आपल्या वाट्याचे भोग भोगूनच आयुष्य संपतात हे अस्वस्थ करणारं सत्य व प्रश्नमालिका वाचकाहाती ठेवून कथा संपते. गोपाळाचं काय होतं?शांतू परतेल का आणि नमू..... या प्रश्नांतून आलेली विषण्णता सोबत घेऊन वाचक विमनस्क होतो.

इथे भोव-यात सापडलेल्या माणसाची सुटका करु पाहणा-या माणसाला आपले प्राण गमवावे लागतात ही आठवण वाचकाला नक्कीच होते तसेच बालमनाला आकर्षित करणारा भोवरा प्रौढ आयुष्यांना त्याच्या वेगाने कासावीस करतो व वेग कमी होताना त्याच्या निरनिराळया स्वतंत्र रंगांनी कुरुपताच दाखवतो. भोवरा ही अतिशय अस्वस्थ करणारी कथा वाटते.

सुनीळ सामंत: अगदी माझ्या मनातलंच.

एक योगायोग सांगतो.

ए जी कुळकर्णी (अरूण कुळकर्णी- बडोदा) नावाचे एक लेखक आहेत. त्यांची भोवरा नावाची एक दीर्घकथा आहे. यातला भोवरा पाण्याचा आहे.

लहानपणी नदीत पोहोताना भोवऱ्यात सापडून माणसे मुले मरत. तेव्हा भोवरा झाला तर त्यातून बाहेर कसे पडावे याचे शिक्षण पट्टीचे पोहोणारे लोक त्यांना देत. यात महत्वाचा धडा हा की भोवऱ्यात सापडल्यावर हातपाय मारू नयेत. आधी दीर्घ श्वास घेऊन मन शांत करावं. मग खाली पाण्यात खोल जावं. खाली भोवरा कमी वेगाचा असतो. तिथून बाहेर पडावं. लेखकाला नंतर आयुष्यात कुटुंब, व्यवसाय यांत अनेक भोवरे अनुभवाला आले आणि हाच फ़ॉर्म्युला वापरून लेखक त्यांतूनही यशस्वी बाहेर पडले.

भयंकर वेगाने गरगरा फ़िरल्यावर दिशेचे भान रहात नाही. काहीही करून बाहेर पडण्याची धडपड सुरू होते. रंग विरघळून जातात.

जीएंच्या या कथेतला भोवरा ही असाच दिशाहीन करणारा आणि जीवघेणा आहे.

पण जीएंची कथा निराशा देते आणि एजींची कथा आशा. म्हणून मी याला योगायोग म्हटलं.

महेश आफळे : दुःखाच्या आरीवर तोलून धरलेला मानवी जीवनाचा भोवरा

नियतीच्या रज्जूने या भोवऱ्याची अथक घुसळण हेच मानवी प्राक्तन

आणि हा गर्गर भोवरा त्याच दोरीने उचलून तळहातावर घेण्याचा आनंद मात्र फारच दुर्मिळ

दिलिप बडे: बहिण भावाची आतड्याच्या मायेची(जी.एं चा नाते संबंधा बाबत वारंवार येणारा शब्द.)ही शोकांतिका.(माकड गोपाळ)नमुचा लाडका भाऊ.आपला संसार पणाला लावतो व बहिण व भाचा यांना आपल्या पत्नी व मुलीपेक्षा अधिक प्रेम देतो.पण आपल्या बहिणीला भ्रमातुन दुर करण्याचा अजिबात

प्रयत्न करत नाही.जर नवर्याचा मुर्त्यु व मुलाचे व्यंग हा नमुचा भ्रम दुर झाला तर नमुचा मुर्त्यू अटळ.नमूचे भ्रमिस्ट आयुष्य गोपाळला नमूपेक्षा अधिक दुःखदायी ठरते.शेवटी विश्व एक गतिमान भोवराच आहे.आणि आपण सारे या गतिचे परिणाम भोगणारे गोपाळ-शांतू-माधव-----!

निशा क्षिरे: भोवरा कथेमध्ये गोपाळ शांतू मंगल नमुताई माधव अशी प्रत्यक्ष पात्र आहेत तसेच मालती राजाराम दत्तू ही इतर भावंडे तर नारायणराव नामुताई चा नवरा आणि डॉक्टर जोगळेकर हे ही या कथेचा भाग आहेत. नमु ताई ला जशी कुटुंबाची माया प्रेम आहे आणि गोपाळ ला बहिणीच्या त्यागाची कष्टाची जाणीव आहे तशी इतर भावंडाना दिसत नाहीं. त्यांची परिस्थिती बरीचशी चांगली असूनही ते यांची काहीच विचारपूस करतांना मदत करतांना दिसत नाहीत. गोपाळ ताईच्या प्रेमापोटी आणि तिने केलेल्या त्यागाच्या जाणिवेने जमेल तशा गोष्टी अणात असतो एकदा तो भोवरा घेऊन येतो लहानपणापासून आपल्याला भोवरा हवा होता पण मिळाला नाहीं आता मुलांना मिळावा हा हेतू. भोवरा खेळण्याचे मुख्य कौशल्य म्हणजे भिर भिरू लागलेला भोवरा वरच्या वर तळ हातावर झेलणे. तो खेळण्यातला भोवरा गोपाळ ला बरोबर कौशल्याने फिरवता आला पण आपल्या आयुष्यातला भोवरा त्याला नीट फिरवता आला नाहीं त्याच्या आयुष्यातल्या भोवर्याने जी गती घेतली त्यात सगळे रंग हरवून गेले. आयुष्याचा भोवरा कौशल्याने तळ हातावर फिरवत ठेवणे त्याला अशक्य झाले. त्याने स्वतः च्या हातावर फिरणारा भोवरा माधव च्या1 हातात दिला त्याची तो सांभाळण्याची ताकद नसल्याने तो घरांगळ ला थांबला. नमु ताई माधव च्या1 आनंदात त्याने आनंद मानला शांतू आणि मंगल विषयी ही प्रेम होतेच त्याच्या परीने त्यांचेही तो करत होता. परिस्थिती च्या1 भोवाऱ्यातून बाहेर पडणे त्याला जमले नाहीं. नमु ताई ही दुसरी कडे राहायला जाण्याची तयारी करत होती पण घडले सगळे वेगळेच जणू नियतीच्या हातात ह्यांच्या आयुष्याच्या भोवाऱ्याची दोरी होती आणि ती तो गरगर फिरवत होती. गती एवढी होती की सगळे

रंग नाहीसे होत होते. भोवरा कधी थांबणार आणि पुढे कोणते रंग दिसणार ते नियतीच्या हाती.

सुनीळ सामंत: अतिशय उत्तम विश्लेषण. या कथेकडेही नियतीवादाच्या दृष्टीकोनातून पहाण्याचा प्रयत्न आहे. या अर्थाने ही कथा जीएंच्या तात्त्विक बैठकीतली वाटते. नाहीतर मला तरी ही कथा अरविंद गोखले टाईप्स वाटली होती. संसारी, मनोविश्लेषणात्मक, मराठीतल्या तत्कालीन कथांच्या पठडीतली पण त्याहून दर्जाने मात्र उंच.

तुमच्या विश्लेषणातले एक वाक्य नीट समजले नाही-आयुष्याचा भोवरा कौशल्याने तळ हातावर फिरवत ठेवणे त्याला अशक्य झाले. त्याने स्वतःच्या हातावर फिरणारा भोवरा माधवच्या हातात दिला. त्याची तो सांभाळण्याची ताकद नसल्याने तो घरंगळला, थांबला. माधवला या कथेत फ़क्त रेफ़रंशीअल अस्तित्व आहे.

संजीव सावरगांवकर: एका दृष्टीने बरोबर आहे. गोपाळ च्या आयुष्यात भोवरा हे एक उद्दिष्ट होते, जे त्याच्या आयुष्याशि समांतर होते. जेंव्हा त्याने 2 भोवरे आणले त्यावेळेस हे लक्षात येते की बहिणी वरील अतीव प्रेमामुळे व कदाचित माधव परत चालू लागेल, सायकल चालवून बाहेर जाईल (बहिणी सारखीच आंधळी आशा) म्हणुन दुसरा भोवरा माधव करता. त्यांच्या दोघांच्या कमनशिबाने , गोपाळ खरा भोवरा हातावर फिरवू शकला पण नशीबाचा भोवरा दोघांचा ही कायम कधी फिरलाच नाही. ह्या कोनातून तुम्हालाही त्या वाक्याचा संदर्भ लागेल असे वाटते.

निशा क्षिरे: माधव रेफ्रांशियल होता हे तुमचं म्हणणं बरोबर आहे पण नमु ताई च पूर्ण आयुष्य माधव भोवती फिरत आहे त्यामुळे माधव च्या आयुष्याच्या दोरीवर नमु ताईच्या आयुष्याचा आणि गोपाळ च्या संसाराचा भोवरा फिरणे अवलंबून आहे. असे वाटते की माधव बरा झाला असता किंवा त्याने आयुष्या विषयी थोड जरी औत्सुक्य दाखवल असत तरी परिस्थितीत फरक पडला असता तशीच गोपाळ ची ईच्छा होती.

निशा क्षिरे: हा असेच मला वाटते गोपाळ आणि नमु ताई दोघेच मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात माधव प्रत्येक वेळी थोडा खूष होऊन परत पाठ फिरवून झोपत असे

राम कुलकर्णी : जी.एं च्या कथे संदर्भात महत्वाची गोष्ट.

त्यांच्या कथेचे शिर्षक. काजळमाया यातील भोवरा. हा भोवरा सबंध कथेला व्यापुन राहतो. भोवरा त्याची अरी, भोवर्या वरचे रंग नीळे काळे. पिवळे. फिरताना एक मेकात मिसळल्या सारखे पण ते तसे मिसळत नाहीत. पण भोवरा स्थीर. होतो. नव्हे पडतो. एवढेच नव्हे तो लंगडतनमुताईपाशी जाउन थांबतो. माधवच्या पांगळया पायासारखे. गोपाळच्या इच्छे सारखेच. गोपाळने भोवरा घेण्याची इच्छा एवढी वर्षे अहिल्येच्या शिळे सारखी दडपुन ठेवलेली. पण तिची प्रतिक्षा संपली. . पण गोपाळ सारख्या सर्वसामान्य माणसाचे काय?त्या ने आपला आनंद खिळयाच्या टोकातून अलगद माधवच्या हातावर उतरवला. पण दोघांचाही आनंद क्षणभर टिकला. कोलमडुन पणे हेच प्राक्तन. भोवर्याचे फिरणेही, गोपाळच्या आयुष्या सारखे. एकिकडे मंगल व शांतुच्या इच्छा, व दुसरी कडे नमुताई आणी माधवच्या जगण्याची परवड पहात रहाणे, या ताव तणावात तोल राखून फिरत रहाणे. जी. ए. जेव्हां,

नमुताईच्या कपाळीच्या कोरड्या कुंकवाचा उल्लेख करतात तेव्हांही आणखी काहीं सुचवू पहात असावेत का? नवरा गेल्यावरही ते ती लावते. संध्याकाळ पर्यंत त्याच्या कडा वेड्यावाकड्या होउन जखमें सारख्या दिसतात. तिच्या ललाटीचे भविष्य दररोज पहात रहाणें एवढेच गोपाळच्या हाती रहाते. नमुताईचा माधवच्या बाबतितला अट्टाहास . त्याल दिसेल अशी लोकरी चड्डी ठेवणे, त्याच्यासाठी बँट बालअशा वस्तू गोळा करणे. पांगळया पायात बूट घालणे. पण ही वेडी माया एवढीच सिमित नाही. माधव गेल्यावर नव्या सायकल वर त्याचा तोल सभाळण्या साठी पट्टे बांधुन बसवते. माकड गोपाळ अशी आनंदाने गोपाळला हांक मारुन ते दाखवते. किण किण घंटी वाजवुन. "असे ऐट बाज बसणे"पहायचे होते असे सांगते. मला येथे ध्यानी मनीतल्या अदृश असणार्या मुलाशी बोलणार्या आईची आठवण झाली. पण त्या भासात जगण्याचा तिला आनंद तरी होता. पण नमुताईच्या नशिबी माधवचे कलेवर. आणी हे पहाणे नशिबी आलेल्या गोपाळला गर, गर फिरत भोवंडुन जाणे एवढेच हाती राह्यलेले. नमुताईच्या अशा जगण्यात अट्टाहास आहे पण आक्रस्तळेपणा नाही. गोपाळच्या सुखासाठी आपले हक्काचे घर सोडुन रहाण्यासाठी तयार असते. घोड नवर्याशी लग्न करुन आपल्या नव्या इरकली टोप पदराखाली आसरा दिला. आणी आता डोइवरचे छप्परही. जी. एंच्या कथेतल्या अशा प्रत्यक्षात न उतरणारी स्वप्ने उराशी बाळगुन. जगणार्या तसेच खचलेल्या पिचलेल्या व्यक्तीरेखा पाहिल्या की वाटते, तुकारामाच्या कवितेत रंजल्या गंजल्या साठी हक्काचा आसरा होता, तसेच जी. एंच्या कथेत त्या आसर्याला आल्या आहेत. जी. एं च्या कथे संदर्भात महत्वाची गोष्ट. त्यांच्या कथेचे शिर्षक. काजळमाया यातील भोवरा. हा भोवरा सबंध कथेला व्यापुन राहतो. भोवरा त्याची अरी, भोवर्या वरचे रंग नीळे काळे. पिवळे. फिरताना एक मेकात मिसळल्या सारखे पण ते तसे मिसळत नाहीत. पण भोवरा स्थीर. होतो. नव्हे पडतो. एवढेच नव्हे तो लंगडतनमुताईपाशी जाउन थांबतो. माधवच्या पांगळया पायासारखे. गोपाळच्या इच्छे सारखेच. गोपाळने भोवरा घेण्याची इच्छा एवढी वर्षे अहिल्येच्या शिळे सारखी

दडपुन ठेवलेली. पण तिची प्रतिक्षा संपली. . पण गोपाळ सारख्या सर्वसामान्य माणसाचे काय?त्या ने आपला आनंद खिळयाच्या टोकातून अलगद माधवच्या हातावर उतरवला. पण दोघांचाही आनंद क्षणभर टिकला. कोलमडुन पणे हेच प्राक्तन. भोवर्याचे फिरणेही, गोपाळच्या आयुष्या सारखे. एकिकडे मंगल व शांतुच्या इच्छा, व दुसरी कडे नमुताई आणी माधवच्या जगण्याची परवड पहात रहाणे, या ताव तणावात तोल राखून फिरत रहाणे. जी. ए. जेव्हां, नमुताईच्या कपाळीच्या कोरड्या कुंकवाचा उल्लेख करतात तेव्हांही आणखी काहीं सुचवू पहात असावेत का? नवरा गेल्यावरही ते ती लावते. संध्याकाळ पर्यंत त्याच्या कडा वेड्यावाकड्या होउन जखमें सारख्या दिसतात. तिच्या ललाटीचे भविष्य दररोज पहात रहाणें एवढेच गोपाळच्या हाती रहाते. नमुताईचा माधवच्या बाबतितला अट्टाहास . त्याल दिसेल अशी लोकरी चड्डी ठेवणे, त्याच्यासाठी बँट बालअशा वस्तू गोळा करणे. पांगळ्या पायात बूट घालणे. पण ही वेडी माया एवढीच सिमित नाही. माधव गेल्यावर नव्या सायकल वर त्याचा तोल सभाळण्या साठी पट्टे बांधुन बसवते. माकड गोपाळ अशी आनंदाने गोपाळला हांक मारुन ते दाखवते. किण किण घंटी वाजवुन. "असे ऐट बाज बसणे"पहायचे होते असे सांगते. मला येथे ध्यानी मनीतल्या अदृश असणार्या मुलाशी बोलणार्या आईची आठवण झाली. पण त्या भासात जगण्याचा तिला आनंद तरी होता. पण नमुताईच्या नशिबी माधवचे कलेवर. आणी हे पहाणे नशिबी आलेल्या गोपाळला गर, गर फिरत भोवंडुन जाणे एवढेच हाती राह्यलेले. नमुताईच्या अशा जगण्यात अट्टाहास आहे पण आक्रस्तळेपणा नाही. गोपाळच्या सुखासाठी आपले हक्काचे घर सोडुन रहाण्यासाठी तयार असते. घोड नवर्याशी लग्न करुन आपल्या नव्या इरकली टोप पदराखाली आसरा दिला. आणी आता डोइवरचे छप्परही. जी. एंच्या कथेतल्या अशा प्रत्यक्षात न उतरणारी स्वप्ने उराशी बाळगुन. जगणार्या तसेच खचलेल्या पिचलेल्या व्यक्तीरेखा पाहिल्या की वाटते, तुकारामाच्या कवितेत रंजल्या गंजल्या साठी हक्काचा आसरा होता, तसेच जी. एंच्या कथेत त्या आसऱ्याला आल्या आहेत.

सुनीळ सामंत: भोवरा - जीए कुलकर्णी – काजळमाया

काळजाला घरे पडतील अशा कथा जी ए नी अनेक लिहिल्या आहेत. राधी, कैरी, तुती अशा अनेक कथा वाचून झाल्यावर सुन्न व्हायला होते. मनाची तडफ़ड होते. पण त्याच धाटणीची असूनही भोवरा ही कथा मात्र अगदी वेगळी वाटते. ही कथा वाचून झाल्यावर काहीतरी पाहू नये असे पाहिले. ऐकू नये असे ऐकले की, तेव्हा होणारा कानकोंडेपणा जाणवतो. सैरभैर मनोवस्था होते.

कथा अगदी घरगुती आहे. गोपाळ, त्याची बायको शांतू, लहान मुलगी मंगल, आणि त्यांच्याच घरात राहणारी त्याची बहीण नमूताई आणि तिचा मुलगा माधव अशा पाच व्यक्तीं भोवतीची ही कथा आहे. त्या त्या व्यक्तीच्या दृष्टिकोनातून अगदी सहज समजून घेता येईल अशी ही कथा आहे. माधवच्या पत्नीला शांतूला त्या घरात राहणे नकोसे झाले आहे. त्याला कारण तिच्या घरात आणून ठेवलेली गोपाळची बहीण नमूताई वेडसर आहे, आणि तिचा मुलगा माधव अपंग आहे. गोपाळ नोकरीतून जे काही तुटपुंजे कमावतो त्यातून बराच खर्च नमुताई आणि माधव यांच्यावर जातो. गोपाळची स्वतःची मुलगी मंगल हिच्या अगदी साध्या साध्या गरजही त्याला पूर्ण करता येत नाहीत. शाळेत न्यायची पिशवी, चप्पल अशा अगदी साध्या गोष्टींसाठी त्या मुलीला त्याला नाराज करावे लागते. तो हे मुद्दाम करतो असे शांतूला वाटते. यामुळे त्याची बायको शांतू त्याच्यावर नाराज आहे. त्याला आपल्या मुली बद्दल काहीच प्रेम नाही असे ती समजते. याउलट गोपाळ आपण आज जे काही आहोत ते नमुताई मुळे आहे याची जाणीव ठेवून आहे. नमूताईने लहान वयात आपल्याहून दुप्पट परंतु धनवान अशा माणसाशी लग्न करून आपली भावंडे व घर सांभाळले. आता तिचे भाऊ व बहीण सुख वस्तु आहेत. एका भावाचा कारखाना आहे. बहिण तिच्या सुखी संसारात रममाण आहे. परंतु पतिनिधन, मनोरोग व मुलाचे अपंगत्व आणि निर्धन अवस्थाया सर्वांनी वेढलेल्या नमूताई वर मात्र संकट कोसळले

आहे. अशा वेळी तिला टाकून देणे हा पर्याय गोपाळ स्वीकारू शकत नाही. त्यामुळे गोपाळ व शांतू यांचे संबंध अतिशय बिघडतात व शांतू घर सोडून जाते. शांतू तिच्या जागी योग्य तर गोपाळ त्याच्या दृष्टीने योग्य आहे. हे सर्व पाहून नमूताई दुःखी होते व स्वतःच घर वेगळे करण्याचे ठरवते. पण हे सर्व ती ज्या आशेवर करत असते तो तिचा मुलगा माधव अखेर मरण पावतो. तेव्हा मात्र ती पूर्ण वेडी होते. आपल्या पतीचा मृत्यू तिने स्वीकारलेलं नसतो आणि आता आपल्या मुलाचाही मृत्यू स्वीकारायला ती तयार होत नाही.

कथा दुःखांत आहेच परंतु संपूर्ण कथेत वाक्यावाक्यागणिक हताशा ठासून भरली आहे. कुठेही आशेचा किरण दिसत नाही. वेड लागलेली नमूताईच वास्तव न स्वीकारल्यामुळे आशावादी आहे. ही कथा इतकी परिणामकारक आहे की ती वाचल्यावर आपणही निराश, हताश होतो. आजूबाजूला सर्वत्र निराशाच निराशा आहे असे वाटू लागते.

ही कथा सर्वांनी वाचावी व त्यावर चर्चा करावी असे तरी कसे म्हणू?

दिलिप बडे: काळजाला घरे-जी.ए.च्या कथेच संकलन करता येण ही अवघड गोष्ट आहे.तरी आपल्या ग्रूपवर संकलन करणारे जे आहेत त्यांना नेहमीसाठी आदर आणि नमस्कार.

परमजित सिंग: ही कथा वाचून मन सुन्न होते. आणि ह्या कथे बद्दल आपण किती ही लीहले तरी कमी आहे.कारण ह्या कथे तील एक एक वाक्य faqt असे आहे की ते सारे चर्चेत आपण सांगूच shaqat नाही. मला अस वाटत होते की जी ए नी नमु ताई वरील प्रेमा मुळे शांतू वर प्रेम नव्हते काय.पण ज्या वेळेस शंतू घर सोडून जात असते त्या वेळेस गोपाळ तिला सांगतो त्या kooprya जवळ जाई पर्यंत तरी

तुम्ही अगदी सावकाश जा. ते का शंतु विचारते. महन्जे जात असताना तुला नी मंगल ला तेवढेच जास्त पाहत उभ राहायला मिळेल.

अस वाटायचं कारण की तो शांतु का थापड मरतो. तेव्हां ती महणते तुम्हाला एक जाणिव आहे की मारायला आपल्या ला हात आहे ,मला चेहरा आहे.

दिलिप बडे: कोपऱ्यापर्यंत जाई पर्यंत तरी तुम्ही सावकाश जा.म्हणजे जात असताना तुला (शांतू)नी मंगलला तेवढेच जास्त पाहता येईल.2)मारायला आपल्याला हात आहे,मला चेहरा आहे.--दोन्ही जाणिवा इतक्या सुक्ष्म आहेत की त्या फक्त जी.एं.च शब्दबद्ध करू शकतात.बहुधा त्यांना दृष्टीदोषाला सामोर जाव लागण हे अती पहाण्याच्या सवईचा परिणाम असावा.(हजार डोळ्यांनी पहाणारी जी.एं.सारखी माणस दुर्लभ)

# माकडाचे काय, माणसाचे काय.- हिरवे रावे

विलास वाघोलीकर: माकडाचे काय, माणसाचे काय.- कथा, (हिरवे रावे पुस्तक)लेखक - जी ए कुलकर्णी

विवेचक - व्ही. एस. वाघोलीकर

-या कथेत, तुलनेने कमी घटना दाखवल्या आहेत. पण कथेचा विषय व्यापक आहे. विश्व, पृथ्वी, त्यावरील मानवी समाज, कुटुंब, व्यक्ती, प्राणी, वनस्पती, अळी इत्यादी सजीव.....सूक्ष्मापर्यंत आवाका या कथेत घेतला आहे. त्यामुळे, ही कथा महत्वाची वाटते.

- कथानक - प्रा सुब्राव कामत, हे निवृत गणिताचे प्राध्यापक, एकटेच लहान गावात राहतात. त्यांनी हौसेने टेकडीवर घर बांधले. आवारात बाग केली. हरी नावाचा नोकर मधूनमधून त्यांच्याकडे दिवसभरात येतो. रामदास, मोहिनी ही मुले आहेत, सुब्रावोंना नातवंडे आहेत. पण ते सर्व ,दूर, लांबगावी राहतात. बायकोचे (बहुतेक) पूर्वीच निधन झाल्यावर, सुब्रावोंनी मुलांना वाढवले.

- त्यात त्यांना महिन्यापूर्वी वादळासारखा ताप आला होता. ते महिनाभर आजारी होते. मुलगा रामदास आला.त्याने औषधोपचाराची व्यवस्था पाहिली. पण रजा संपल्यामुळे त्याला परत जावे लागले.कथेत सूचकतेने सुब्रावो यांचे काही महीने अखेरचेच आहेत, असे दाखवले आहे.

- उदाहरणार्थ , कथेत म्हटले आहे - आता आपली दिवसांची नाणी संपत आली. मग या घराचे काय होणार ? येथे कोण रहायला येणार ?

लहानपणी सुब्रावो यांनी मोहिनीची वेणी घातली की, तिची मैत्रिण, माझीही वेणी घाला, म्हणून हट्ट करत असे. या वरून त्यांच्या बायकोचे पूर्वीच निधन झाले होते.

- कथेत सुब्रावो आजारपणातून सकाळी उठले.व माणसांची वाट पहात होते. तेवढ्यात पोस्टमनने टपालाचे इंग्लीश मासिक (बहुतेक, सोव्हिएट लँड मासिक) घरात टाकले. त्यातील ग्रह, तारे, असंख्य आकाशगंगा यांचे रंगीत फोटो व मजकूर पाहून सुब्रावोंची विचार शृंखला सुरु होते.

- आपण ' विश्व' हा शब्द सहजपणे वापरतो. आपल्याला पृथ्वीचा आकार, पसारा, अलिकडे माहीत झाला आहे. पण आपल्याला विश्वाचा आकार, आवाका खरोखर समजलेला नाही. इतके विश्व अवाढव्य, अनाकलनीय, व म्हणून अनिर्वचनीय आहे. हे जी एंनी या मासिकातील लेखाच्या रूपाने सांगीतले आहे. ते सर्व वर्णन कथेत, मूळातून वाचण्या सारखे आहे - - -

-...त्यांनी दोन चार पाने उलटली व नंतर डोळयातच विविध रंग फुटल्याप्रमाणे पानापानावर त्यांना रंगीत चित्रे दिसली. त्यांच्यात उत्कंठेची एक झरझर उठली. तारे, ग्रह,तेजोमेघ,तारामंडळे यांची चित्रे आणि आभाळाची अचाट श्रीमंती यांचे दर्शन त्यांच्यासमोर होते. सुब्रावांना त्याबरोबर आयुष्यातील एक निराशाही आठवली.त्यांनी कालेजमध्ये शिकवत असता निवळ आवड म्हणून तसली बरीच पुस्तके वाचली होती, पण जिच्यातून निदान शनीची कडी तरी दिसतील असली स्वतःची एक दुर्बीण घेणे त्यांना कधी जमले नाही. शनीला कडी आहेत, मंगळावर निळे पिवळे डाग आहेत, आणि आपण मात्र आंधळया भिकाऱ्याप्रमाणे,त्या साऱ्याखाली बसून काहीच न पाहता आयुष्य काढले! असली साऱ्या वैभवानिशी रंगीत चित्रे त्यांनी प्रथमच पाहिली होती. एक चित्र अनंत काळापूर्वी आभाळात फेकलेल्या चांदीच्या तबकाप्रमाणे दिसणाऱ्या देवयानी तारामंडळाचे होते. अभ्रकाची पूड फेकलेल्या आभाळात ते अतिमानवी विशाल जग आपल्याच वेड्या

गतीत भिरभिरत होते. नंतर हंसमधील अत्यंत तरल अशा बुरख्याप्रमाणे तरंगणारा तेजोमेघ, अंगठीतील रत्नाप्रमाणे दिसणारे म्रुगातील रंगीत वर्तुळ, कोट्यवधी सूर्य पोटात घेऊन बसलेल्या देवयानी तारामंडळाकडून प्रकाशकिरण इथपर्यंत यायला वीस लाख प्रकाशवर्षे लागतात हे वाचून त्यांचे मन दडपून गेले. एखाद्याचे बहिरेपण काढून घेऊन त्याला राक्षसी यंत्राजवळ बसवावे त्याप्रमाणे ते चकीत होऊन बावरले, वीस लाख प्रकाशवर्ष! म्हणजे किती?..आणि अशा तऱ्हेचे विशाल शून्य ,निःशब्द विश्व पाहिल्यानंतर वरून कुणी तरी वेगाने आपणाला फेकून दिले असे वाटून त्यांचे अंग किंचित कापू लागले.....

(टीप - या विवेचनाच्या शेवटी, परिशिष्टात अंतराळातील काही इमेजेस दिल्या आहेत.)

- त्यामुळे सुग्रावोंची विचारशृंखला पुढे जाते. एवढ्या आकाशगंगा, तारे, त्यात सूर्यमाला, आहेत.त्यात पृथ्वी, त्यात आपले गाव, आपण --- आपण किती सूक्ष्म आहोत. हे त्यांना जाणवते. पण आपणही या विश्वाचा सूक्ष्म का होईना, भाग आहोत. पण हे विश्व आहे म्हणून आपण आहोत.

- मग मासिक बाजूला ठेवून ते बाहेर बागेत गेले.तिथे फुलझाडे होती, मोठी झाडे होती, पाचोळा होता. त्यांनी पूर्वी फुलझाडे आवडीने लावली होती. त्यात निवडूंग होता. त्याला फुले आली होती - म्हणजे ते संपणार होते. एक ताटाएवढ्या, आकाराचे फुल येणारे झाड होते. पण फुलावर अळी पडली होती. त्यांनी ती टाकून दिली. पण नाही म्हटले तरी त्यांच्या मनात अळी व माणूस अशी तुलना आली.

- आवारात आंब्याचे झाड होते. त्याखाली माकडाचे लहान पिल्लू जबर जखमी होवून जमीनीवर पडले होते. व इतर माकडे फांद्यांवर स्वस्थ बसली होती. (ही एक सूचकता आहे.) सुब्रावोंनी त्याला कुंपणापलिकडे काठीने ढकलले. तेव्हा ते विवळले. मग माकडे निघून गेली.

- नंतर सुग्रावो रस्त्याकडे पहात राहीले. अगदी ओळखीची माणसे जात होती. पण सुब्रावोंकडे कोणी पहात नव्हते.

- शेवटी जिसू हा रस्ता झाडणारा कामगार आला व त्याने पिल्लाला टोपलीत ढकलले व टोपली घेवून तो निघून गेला. कथेचे शिर्षक,' माकडाचे काय, माणसाचे काय' हे त्यासंदर्भात आले आहे. माकडाचे पिल्लू व माणसाची (येथे सुब्रावोंची) एकच पातळीवर तुलना केली आहे. सूचकतेने समानता सांगीतली आहे.

- या सर्वांमध्ये आपण एकाकी, विलग आहोत. (विश्व अनिर्वचनीय, अनाकलनीय आहे. व अशा विश्वात माणूस हा एकाकी, विलग, असंबंद्ध आहे.) हे सुब्रावोंना जाणवले.

- जीएंनी आकाशस्थ शक्तींना प्रश्न विचारणाऱ्या अनेक कथा, नंतर लिहिल्या. स्वामी कथेत ते म्हणतात -" हा गोलक आहे तरी कसला? एका बाजूला झगझगीत आग, तर दुसरीकडे सर्व गोठवणारी थंडी. :... हा गोलक आहे तरी कसला? का तो कसला आहे, हे सांगता येत नाही हेच त्याचे अंतिम उत्तर ? पूर्णात् पूर्णम् उदच्यते...." हा परिच्छेद लक्षणीय आहे. हे विचाराचे ज्ञान वेगळे, व अनुभवातून जाणवणे वेगळे.तसाच या कथेतील मिळणारा कलात्मक अनुभव विलक्षण आहे. त्यामुळे ही कथा महत्वाची आहे.

- धन्यवाद. - विलास वाघोलीकर

विलास वाघोलीकर: परिशिष्ट - खाली काही इमेजेस माहितीसाठी देत आहे. धन्यवाद

सुनीळ सामंत: विलासजी

अत्यंत वेगळेच विवेचन केले आहे तुम्ही.

एकच कथा. पण ती मला वेगळी दिसली आणि तुम्हाला. मी त्या कथेतल्या तिसऱ्या पानावरचा तो फुकट मासिक पाहिल्यावर(वाचल्यावर नव्हे) आलेल्या विचारांचा भाग फ़ारसं लक्ष देऊन वाचलाच नाही. मात्र शेवटचा माकडाच्या पिल्लाचा भाग मला सुन्न करून गेला.

आता पुन्हा एकदा कथा तुमच्या पद्धतीने वाचेनच, पण त्या आधी मला जे सूत्र जाणवले ते लवकरच लिहितो.

रेखा दातार : माकडाचे काय माणसाचे काय?

जी.ए. कुलकर्णी हिरवे रावे

जी एं ची ही कथा म्हणजे मला एका दुर्लक्षित, एकाकी म्हाताऱ्याची गोष्ट वाटते. हे सत्य माहित असून देखील त्या वास्तव्यापासून दूर जाण्याची धडपड करणारे म्हातारे सुबराव! जवळजवळ साठ वर्षांपूर्वी लिहिलेली ही गोष्ट असली तरी अनेक वयोवृद्धांना छळणारा हा प्रश्न अजूनही तसाच आहे. नव्हे तर विभक्त कुटुंब पद्धतीने आणि आणि करिअरसाठी लांब राहणाऱ्या मुलाबाळांमुळे हा प्रश्न अधिकच तीव्र होत चालला आहे. यात बहुतेक वेळा दोष कोणाचाच नसतो , परिस्थितीचाच असतो. हल्लीच्या दिवसात पैसा हा सर्वात अग्रभागी आहे व तो मिळविण्या साठी खुशीने अथवा नाखुशीने घरातील तरुण वर्ग एकीकडे व वृद्ध एकीकडे असे विभाजन झालेले दिसते. त्यात विभक्त कुटुंबामुळे मनुष्यबळाची सुद्धा कमतरता असते. तरुण व वृद्ध दोन्ही पक्षांच्या आपापल्या बाजू आहेत पण त्याचा उहापोह करण्याची आत्ता येथे गरज नाही.

तर सुब्राव नुकतेच महिना दीड महिना चाललेल्या एका आजारातून उठलेले. टेकडीच्या पायथ्याला असलेल्या कॉलनीतल्या एका मोठे आवार , बाग- बगीचा असलेल्या एका स्वकष्टार्जित बंगल्यात एकटेच राहणारे. पत्नीचा आधीच मृत्यू झालेला आहे. आजुबाजुला देखिल तसेच बंगले आहेत. त्यात शेजारील नाडकर्णी यांचा बंगला बंद ,समोरचे हात्तंगडी पण दोन महिन्यापूर्वीच गावाला गेलेले , म्हणजे शेजारी -पाजारी कोणीच नाही. सुब्रवांचा मुलगा रामदास नोकरी निमित्त मुंबईला व तेथेच गुरफटलेला. मुलगी मोहिनी लग्न होऊन बंगलोरला व आता आई होण्याच्या तयारीत. त्यामुळे ती इथे येण्याची पण शक्यता नाही.

सुब्राव आधीच एकटे पडलेले , त्यात दीड दोन महिन्याच्या आजारपणात अंथरुणाला खिळल्याने बाहेरच्या जगाशी अजिबात संपर्क तुटलेले. आधीच बाहेरच्या जगाशी त्यांना जोडणारे धागे पण फार पक्के आहेत असं वाटत नाही. वयोवृध्द जज्ज साहेब जे स्वतःच विसरभोळे आहेत, फाड फाड बोलणारी मुलीची मैत्रीण सरोज, उसने रॉकेल नेण्यापुरते येणारा जकात नाक्यावरचा कारकून (ज्याने शेवटी घर बघायला आलेल्या इसमाला हे घर बहुदा गेली दोन अडीच महिने रिकामेच असल्याचे सांगितले. ज्याला सुबराव साधे जिवंत आहेत की मेले आहेत हे सुद्धा माहित नाही) , सुब्रवांनी एकेकाळी फी भरलेला व आता बँक मॅनेजर असलेला केळकर (ज्याच्याकडून साधे पत्र सुद्धा कधीच आलेले नाही) , सुब्रावांच्या पत्रामुळे नोकरी लागलेली सुमती देशपांडे (जिचा ठाव ठिकाण सुद्धा आता ठाऊक नाही) , कर्तव्य केल्याप्रमाणे जेवण देणारा ,बागेला पाणी घालणारा हरी , पोस्टमन, रखवालदार आणि अशीच कोणी कोणी. पण आतड्याने विचारपूस करणारा कोणीच नाही. मुलगा रामदास कर्तव्य पार पाडणारा पण त्याला ना इथे रहायला वेळ ना या बंगल्यात इंटरेस्ट. मुलगी मोहिनी तिच्या संसारात गुरफटलेली. सुब्रवांना या सगळ्याची जाणीव आहे पण हे सत्य ते कायम नाकारत आहेत. मुलगा रजा नाही म्हणून थांबला नाही नाहीतर नक्की राहिला असता, मुलीकडे बाळ येणार म्हणून ती आली नाही. नाहीतर आत्ताही दोघे शाळेत असताना जशी आपली वाट बघत पायरीवर बसायचे तसे बसले असते अशी सुब्राव सतत आपल्या मनाची समजूत काढत असतात. आपल्या संसाराच्या दोन फांद्या, पण दुसऱ्या गावी बहरत आहेत अशी समजूत करून घेतात. स्व कष्टाच्या कमाईतून बांधलेले घर, हौसेने फुलवलेली बाग यात मुलांना इंटरेस्ट नसला तरी रामदास आणि मोहिनी च्या आयुष्याच्या पायरीवर आपली आठवण आपल्यानंतरही अशीच राहील अशी त्यांना भाबडी आशा आहे. पूर्ण कथाभर सुब्रवांचे मन एकाकी आयुष्याच्या कल्पनेने नैराश्याकडे धाव घेते , पण वेगवेगळ्या प्रकारे समजूत काढत ते मनाला परत मागे खेचून घेतात.

हे अफाट विश्व, त्यातील लक्षावधी तारामंडळे, कोट्यावधी सूर्य हे बघून त्यांचा जीव दडपतो. अशा या पसाऱ्यात आपली पृथ्वी नगण्य, आणि त्या पृथ्वीवरील आपण तो अगदीच नगण्य. एकेका तारा मंडळाकडून आलेला प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचायला 20 - 20 लाख वर्ष लागतात, मग तो तारा नष्ट झाला तर आपल्याला वीस लाख वर्षांनी कळेल. निदान आपल्या मृत्यूच्या आधी अडीचशे मैल दूर असलेली मोहिनी आणि 400 मैल दूर असलेला रामदास पोचू शकतील ना ? असे त्यांच्या मनात येते. हा आफाट कारभार चालवताना देवाला तरी आपल्यासारख्या नगण्य जीवाच्या पाप-पुण्याचा , चांगल्या - वाईट कृत्याचा हिशोब ठेवायला वेळ मिळत असेल का? सुब्रवांना आपल्या शूद्रत्वाची जाणीव होऊन ते हा विचार झटकून टाकतात व बागेकडे वळतात

बागेत गेल्यावर निदान आपण आपल्या हाताने लावलेल्या झाडांनी तरी आपल्या गैरहजेरीची दखल घेऊन फुलायचे थांबवायला पाहिजे होते असे त्यांना वाटते. पण ती झाडे देखील फुललेली असतात. मग ते मनाची समजूत काढतात की बी टाकणे पाणी घालणे एवढ्या पुरताच आपला संबंध. - जसे काही मुलांना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभं केले , मार्गी लावले की त्यांचा आपला संबंध संपला. निवडुंगाची फुले पाहून ते क्षणभर आनंदी होतात. पण आता फुले आली म्हणजे निवडुंगाचा अंत जवळ आला असे वाटून त्यांच्या उत्साहावर पाणी पडते. आपल्या मुलांचेही संसारा आता फुलायला लागले आहेत. म्हणजे आता निवडुंगा प्रमाणे आपलाही अंत जवळ आला ?

पाणसर पानांचे झाड पाहून त्यांना त्याचा हेवा वाटतो. बरे झाले यांना फुले येत नाहीत. त्यामुळे फुले झाडावरून गळून त्यांची कधीच ताटातूट होणार नाही. पण तेवढ्यात त्यांना ते झाड खाऊन त्याला मारणारा एक बटबटीत काळ्या डोळयांचा

किडा दिसतो. एक शूद्र किडा झाड खाऊन टाकणार? त्यांना त्या किड्याचा राग येतो. ते त्या किड्याला चिरडून टाकतात.

कोपऱ्यातील आंब्याच्या खाली माकडाचे जखमी पिल्लू त्यांना दिसते पिल्लू एकटेच खाली पडले असते आणि वरती झाडावर इतर माकडे शांतपणे निस्तब्ध बसून त्याच्याकडे पाहत असतात. पण पिलाच्या मदतीला मात्र कोणी नसते. सगळे नुसते बघे प्रेक्षक. आपल्या बागेत हे लचांड नको म्हणून सु ब्राव त्या माकडाला काठीने ढकलत

कंपाउंडला असलेल्या भोकातून बाहेर टाकतात. त्यांना याबद्दल थोडे अपराधी वाटते. पण ते दुर्लक्ष करतात. इतका वेळ जखमी पिल्लाला मदत न करता लांबून शांत पणे पाहणारी माकडे ते पिल्लू नजरेआड जातात तिथून दूर होतात व परत पूर्वीप्रमाणे दंगामस्ती सुरू करतात. नकळत सुबराव माकडाच्या पिल्ल्याशी आपली तुलना करू लागतात. बरे नसलेल्या आपल्याला फक्त लांबून बघणारी माणसे आपल्या मृत्यूनंतर एका क्षणात सर्व विसरून जाणार व आपल्या मार्गाला लागणार. ' रे तुझ्या वाचून काही येथले अडणार नाही '.....जग चालतच राहील या विचाराने ते अस्वस्थ होतात.

माकडाचे पिल्लू गेट बाहेर अर्धमेल्या अवस्थेत पडलेले असते. जज्ज साहेब ,सरोज, मास्तरीणबाई ,शालिनी सगळीजण माकडा जवळ थांबतात. ते जिवंत आहे का मेले आहे याची खात्री करतात.तेथे उभे राहून गप्पा मारतात. पण बंगल्याच्या आत असलेल्या सुब्रावांची कोणी साधी दखलही घेत नाही. सुब्रवांना याचे खूपच वैषम्य वाटते व रागही येतो. उमाबाईंनी दिलेल्या शेवग्याच्या शेंगा सरोज त्यांची पाठ फिरल्यावर सुब्रावांच्या बंगल्यातील गुलाबाच्या वाफ्यात टाकून निघून जाते. आणि जणू काही सुब्रवांच्या अस्तित्वच्या थोड्याफार खुणा सुद्धा पुसून टाकते. दिसू झाडूवाला माकडाला बुट्टी तू उचलून घेतो पण ते केवळ दोन चार रुपये मिळावे यासाठीच. त्याच्या वस्तीतील लोक सुद्धा मेलेल्या माकडाच्या मिरवणुकीसाठी पैसे

देणारी, पण जिवंत व्यक्तीकडे ढुंकून सुद्धा न पाहणारी. सुब्रवांचे तसेच का ? ते जिवंत आहेत का मेले याची कोणाला दखलही नाही ? किती हे निष्ठुर हे जग ! अर्ध मेल्या माकडाच्या अंगात काठी ढोसणाऱ्या शालिनीला मास्तरीण बाई ओरडतात, पण ते माकडाला यातना होतील म्हणून नाही तर शालिनीच्या हातात काठीचा काटा जाईल म्हणून. आपल्या मृत्यूनंतर आपल्याला नसण्याची जाणीव कोणाला तरी होईल का ? का हे अजस्त्र तारा मंडळ, तेथला किरण आपल्या डोळ्यात शिरण्या आधीच नष्ट झालेले तेजोमेघ, आपल्याला शूद्र करणारी पृथ्वी , ज्याच्या पुढे पृथ्वी क्षुद्र आहे तो सूर्य ,कोटी सूर्यांपेक्षा तेजस्वी व्याध आणि कोट्यावधी व्याधांना गिळुन बसणारी आकाशभर पसरलेली आकाशगंगा. आपण गेल्यावर या पसाऱ्यात एखादी फट तरी दिसेल का ? या कल्पनेने सुब्रवांना आपल्या शूद्रत्वाची, नगण्यपणाची जाणीव होते. त्यातच भर म्हणजे रिकामे घर विकत घ्यायला आलेला माणुस! आत शिरताच पिटूयुनिआचे फुल चुरगळुन टाकणारा. आपल्या बागे विषयी प्रेम नसतांना आपले घर विकत घ्यायला निघालेला ! काय होणार आपल्या मागे आपल्या घराचे? सुब्रावांना आपले अस्तित्वच पुसल्यासारखे वाटू लागते!

जज्ज साहेब रोज संध्याकाळी हळूहळू चालत कोपऱ्यापर्यंत जायचे. सुब्रवांना वाटायचे की जणू तेथे असलेल्या कोणाला तरी ते काही प्रश्न विचारतात आणि मग अजून वेळ आली नाही हे उत्तर कळल्यावर मागे फिरतात. आज प्रथमच जज्ज साहेब सुब्रवांच्या बंगल्याच्या इथूनच मागे फिरले. त्यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले होते का ? का न्याय निवाडा करणाऱ्या जज्ज साहेबांनी सुब्रावांच फायनल जजमेंट दिले होते?

-वृषाली दातार

दिलिप बडे: माकडा माणसाचे कलेवर'या तुलनेत दोन्ही समान असेच जी.ए.म्हणतायेत.

सुनीळ सामंत: रेखाजींचे विवेचन वाचल्यावर पुन्हा वाटले"एकच कथा- पण ती विलासजींना वेगळीच दिसली आणि रेखाजींनाही. आणि आपल्याला तर तिसऱ्याच अंगाने जाणवली.

मला सुबराव हा अत्यंत आत्मकेंद्रित जीव वाटला. त्यांना कोणातही इंटरेस्ट नाही. ना व्यक्तींमधे ना प्राण्यांमधे. ना निसर्गामधे. ना मुलांमधे. आपल्या हृदयाची धडधड ऐकत ते बागेच्या दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत आले. बागेची चाहूल त्यांना नव्हती तर बाग आपली चाहूल घेते का याचे त्यांना महत्व वाटत होते. मुलाचे काय नि कसे चालले आहे याचे त्यांना फ़ारसे नव्हते तर तो आपली काळजी करतो की नाही याचेच महत्व होते. सगळ्याच माकडाविषयी वाटणारा आयुष्यभर चा संताप त्यांना होता. पिकल्या केळ्यांचे चार-सहा घड घ्यावेत त्यात प्रत्येकात अर्धा चमचाभर सायनाईड भरावे असे आणि या प्रकारचे समस्त माकड जातीच्या खुनाचे आराखडे ते करत. माकडाच्या पिल्लाला ढोसताना त्याने केलेल्या आवाजाने सुब्रवांना आपल्या अंगात कुणीतरी सर्र्दिशी पात्याची धार घुसवली असे वाटले व झटकन त्यांचा हात मागे आला. कणव वाटली म्हणून नाही. जज साहेबांनी आपली चौकशी केली नाही. सरोज व मास्तरीण हे माकडाकडे पाहतात पण आपल्याकडे लक्ष देत नाहीत याचा त्यांना राग आहे. ते जगाकडे “मी” “माझे” “माझ्यासाठी” “माझ्यामुळे” अशा नजरेने पहातात.

रेखाजींनी मांडलेला वृद्धांच्या एकाकीपणाचा मुद्दा खरा आहे. पण या कथेचा तो विषय आहे असे मला वाटले नाही. विलासजींना हा वैश्विक पसाऱ्यातल्या माणसाच्या नगण्यपणाचा व क्षुद्रत्वाचा मुद्दा केंद्रिय आहे असे जाणवले.

मला मात्र ही एका आत्मकेंद्रित माणसाच्या जगाकडे पहाण्याच्या दृष्टीकोनाची जीएंनी अत्यंत कलात्मकरित्या दाखवून दिलेली विसंगती वाटली. तो तरुण असतानाही तसाच असेल. माझ्याकडे सर्वांचे लक्ष जावे म्हणून धडपडणारा.

विश्वेश्वर नांदेडकर: मुले माझी वाट पाहत पायरीवर बसत याचे ही त्याला कौतुक होते.

तुमचा angal अगदी बरोबर आहे.

दिलिप बडे: गणित-सायन्स आवडणारे असंख्य आत्मकेंद्री सुब्राव आपल्या भोवताली ऊदासिन जगत असावेत.

संजीव कुलकर्णी : याचा अर्थ मी समजून घेण्याचा प्रयत्न करतो आहे. सायन्स मला आवडते. जीएंचा आवडता विषय गणित होता. याचा आत्मकेंद्री आणि उदासीन आयुष्याशी काय संबंध आहे?

संजीव सावरगांवकर: शिक्षण आणि माणसाची मानसिकता व उदासीनता याचा अर्था अर्थी काहीही संबंध नाही. तो एक विचार आहे, कदाचित नायकाच्या मनातील....

सुनीळ सामंत: True. Type of education has no relation with psychology.

महेश आफळे : वैचारिक भोवळ आणणाऱ्या अनंत वैश्विक पसाऱ्यात प्रकर्षाने जाणवणारे माणसाचे(किंवा माकडाचेही) अनंत क्षुद्रत्व आणि त्यातून त्याला घेरून येणारे अंतिम एकाकी एकारलेपण

बस्स, एवढेच, यात कुठेही आत्मकेंद्री असण्या नसण्याचा संबंधच नाही, आणि एका अर्थाने आपल्या क्षुद्रत्वाची टोकदार जाणीव होणे हेही आत्मज्ञानाच्या अंगाने महत्वाचे आहे

अहंकार रहित निर्मम अवस्था केवळ त्यातूनच प्राप्त होऊ शकते

विलास वाघोलीकर: आपण थोडक्यात लिहीले आहे.अगदी बरोबर. विलास वाघोलीकर

दिलिप बडे: Extroitive-introverseअशा अर्थाने.काही personality mixed असा ढोबळ फरक.रेषा मारून असे फरक दाखवता येणार नाहीत.निश्चित नियमबद्ध फरक दाखवता येणार नाहीत.

संजीव सावरगांवकर: Contradictory statement.

महेश आफळे : बिलकुल नव्हे,

आत्मलीन अवस्था

"पिंडी ते ब्रह्मांडी" असो किंवा "आपण आहोत म्हणून विश्व आहे की नेमके या उलट आहे"हा संभ्रम असो, अहंकार गळून पडत नाही तोवर कोणताही बोध अशक्य

आणि त्या अर्थाने ही क्षुद्रत्वाची जाणीव असणे महत्त्वाचे असे मला अभिप्रेत आहे

सुब्बाराव आता या प्रवासाच्या पहिल्या पायरीवर आहेत

विलास वाघोलीकर: प्रतिसाद -

- सुब्रावो गणिताचे निवृत्त प्राध्यापक होते. ते माहीतगार होते. तसेच त्यांनी दोन मुलांसह व्यवस्थित संसार केला होता. म्हणजे ते कर्तव्य जाणणारे होते. ते मुलाकडे मुंबईला गेले नाहीत. कदाचित आजारपणानंतर मुलानेही त्यांना नेले नाही. मुंबईला नेण्याएवढी जागा तर पाहीजे. एकाकी राहणाऱ्या वृद्धाची ही गोष्ट आहे. पण तेवढेच या कथेत नाही. तेवढेच कथेच्या संदर्भात पहाणे उपयोगी नाही.

- दिलेल्या परिस्थितीत सुब्रावो रहात होते. व त्यांना एकूण विश्वाच्या संदर्भात अस्तित्वाचे, स्वतःच्या अस्तित्वाचे प्रश्न पडले, हे कथेच्या संदर्भात महात्वाचे आहे. हे प्रश्न लहान गावात पडू शकतात. मुंबईला पडू शकतात.

- हे अस्तित्वाचे प्रश्न कथेत टोकदारपणे मांडले आहेत. विश्व अफाट आहे. अनाकलनीय आहे. पण विश्व मानवकेंद्रित नाही. उलट मानव निरपेक्षरीतीने ,मोठ्या वेगाने विश्व गरगर फिरत आहे. आतापर्यंत कोठेही सजीवाच्या अस्तित्वाचा पुरावा सापडलेला नाही. म्हणून माणूस समाधान मानू शकतो. पण ते कितपत खरे आहे ? पृथ्वीवरील माणसाकडील उर्जा विश्वातील अंतरांच्या दृष्टीने मर्यादित आहे. त्यामुळे माणूस फारसा पृथ्वीबाहेर जावू शकत नाही.अशा वैराण, विराट विश्वात आपण सजीव म्हणून तटस्थपणे विश्वाकडे पाहू शकतो. हे समाधान मानून माणसाने पुढे गेले पाहीजे. या कथेचा हा दृष्टीकोण लक्षात घेवून पहावे अशी विनंती आहे

सुनीळ सामंत: सुब्राव विद्वान होते यात वादच नाही.

त्यांची विद्वत्ता त्यांच्या विषयांत होती. पण त्याला कुतुहलाची धार होती का? कोणतेतरी नियतकालिक कोणीतरी पाठवत असे म्हणून ते वाचत.

त्यांचे विचारही असंबद्ध वाटले. चिंतनातून तयार होणारे वाटले नाहीत.

जीएं सारखा लेखक जेव्हा त्यांचे विचार तसे लिहितो तेव्हा त्यांना ते मुद्दाम सुचवायचे असावे. (इतर लेखकांनी आपल्या उंचीनुसार तितकेच लिहिले असते तर त्यात हा मुद्दा आला नसता)

त्यांना एक दुर्बीण घेणे जमले नाही. पण कुठेतरी जाऊन प्रयत्नपुर्वक ती पहाण्याएवढे कुतुहलही नसावे.

असो. कदाचित त्यांनी त्या माकडाच्या पिल्लाला दिलेली वागणूक वाचून माझे मत त्यांच्याविषयी वाईटच झाले असावे. त्यांना रस्त्यावरून जाणाऱ्या शेजाऱ्यांनी आपली चौकशी केली नाही, दखलही घेतली नाही याचे वाईट वाटले. पण त्यांनीही त्यांना त्यांची ख्याली खुशाली नाही विचारली हेही खरेच. सहसा अस्तित्व हे दोन्ही अंगांनी असते. दुसऱ्यांच्या अस्तित्वाची दखल घेणाऱ्याच्या अस्तित्वाची दखल इतरांना असते. नाहीतर अनेक विद्वान वा महानता अंगी असणाऱ्या व्यक्तींची दखल केवळ आढ्यतेमुळे घेतली जात नाही.

[20:09, 15/09/2022] संजीव सावरगांवकर: माझे मत: हे गृहस्थ सिम्पल साधे पण अत्यंत स्वार्थी आयुष्य जगणारे होते. फुकटचे मासिक, दुर्बीण घेणे परवडत नाही, शेजार पाजारी ह्यांच्याशी सर्वसाधारण संबंध पण नाहीत. या ही कथे मध्ये मालकीचे घर आहे पण आपल्या मृत्यूनंतर ते वापरले जाणार नाही ही खात्री आहे. झाडावरून पडलेले माकड पिल्लू आणि आजारातून थोडे बरे झाल्यावर 2,4 महिन्याचे आयुष्य उरले याचि खंत शेवटच्या बोलण्यातून जाणवते. यात मानव असून ठोस विचाराने आयुष्य जगण्याची जिद्द नाही त्याचवेळेस माकडाला हे पर्याय ही उपलब्ध नाहीत, ते आपल्यासारखे परावलंबी आहे हा विचार त्यांना जास्त त्रास देतो.माकडाला जसे त्याचे सगेसोयरे जिवंत सोडून जातात तसेच यांचे ही होते. ते त्यांना कळते ही त्यांची शोकांतिका. इतर सर्व शेजाऱ्यांची माकडाच्या बाबत जास्त चौकशी पण जिवंत माणसाशी बोलणे नाही याची खंत. अहो जवळचे सांभाळता येत नाही आणि विचार करतो विश्वाचे, त्यात ही काही नैपुण्य नाहीच, कारण फक्त

एका फुकट मासिकातील काही माहितीवरून सुताने मानसिक स्वर्ग गाठणारा माणूस. प्रोफेसर te ही गणिताचे असून 1 प्रकाश वर्ष म्हणजे काय याची माहिती नसणारा एक शिक्षित माणूस. त्यांची समाजात किम्मत असल्याचे कुठेही सुतोवाच नाही. त्यांना परमार्थ करण्याचे गणित ही जमले नाही, मुला मुलीं बरोबर आत्ताचे सुख क्षण नाहीत, स्वत एकटे. संपत्तीचा सोस पण ती जोपासण्यासाठी, maintenance करण्याची, कष्ट करण्याची तयारी नाही. असा हा पूर्णपणे नकारात्मक आयुष्य जगणारा अभागी मृत्यूची वाट पाहणारा म्हातारा. कथेत भव्यदिव्य काही नाही, त्यांच्या आयुष्यातील उतार चढाव नाहीत. नेहेमीसारखी G.A. यांची काही चमकदार वाक्ये आहेत. लेखकाची कथा लिहण्याची तत्कालीन मानसिकता ही साधी सिम्पल असू शकत नाही का? G.A. लिहितात म्हणजे वाचकाने, आस्वादक याने त्यात गूढ, वेगळा दृष्टीकोन शोधलाच पाहिजे का? हे मला नेहेमी पडणारे प्रश्न आहेत. कोणतेही साहित्य वाचन लेखकाचा चष्म्यातून वाचू नये असे मला वाटते पण त्याचबरोबर साहित्य लिखाणाचा आपापल्या परीने आनंद घ्यावा, कथा उमजून घ्यावी, जमले तर त्या वातावरणातून आस्वाद घ्यावा ,चर्चा व विचार करावा असे सुचवले तर कोणी राग मानू नये येवढीच माफक इच्छा. शेवटी माणसाचे काय? अन माकडांचे काय?.....

दिलिप बडे: सुब्राव हे पात्र व्यक्तीगत जिवन जाणिवा" असलेले आत्मकेंद्री व अस्तित्वा विषयी "चौकस"असलेले पात्र ठरते.या ऊलट प्रदक्षिणा कथेतील दादासाहेब हे सामाजिक जिवन जाणिवा विकसित असलेले बर्हिमुखी अंतरंगाचे पात्र ठरते.लेखकाच्या चष्म्यातून आपण वाचन करू नये हे रास्तच.त्याच बरोबर लेखकाचे अतंरग कथेवर प्रभाव टाकत असते ते आपण स्विकारतोच.

संजीव सावरगांवकर:

॥ श्री ॥



कथा: माकडाचे काय? माणसाचे काय? कथाकार : डोहकाळीया

दिड महिन्याच्या आजारपणातून उठल्यावर पहिल्यांदा खोलीतून बाहेर पडून सुहास सोफ्यावर आले व खुर्ची खिडकीजवळ ओढून बसले. त्यांच्या मनात विचार आला कि आता (त्यांना) नाहीसे व्हायला फारसे दिवस नकोत, आयुष्याच्या दिवसांची नाडी संपत आली आहे. तत्क्षणी आयुष्य काय आहे? स्वत:चे काय हेही विचार आले व विचारांनी क्षत मनाने शून्याच्या मागे धावू लागले रेंगत बघता बघता फक्त क्षितीजही विरून गेले. हेमंतानी म्हणून प्रकाशाच्या एका कणाने उमटून आले अन जगणे नासवून गेले.

सुहास खुर्चीत बसून आयुष्याचा आढावा घेऊ लागले त्यांनी किती मोठा भाग व्यतीत केला आहे. तो मनोव्यापार मात्र कित्येक आठवणींचा होता. काल काय नव्हते, माहीत असलेली नैसर्गिक समृद्ध माळरान, झाडे, झुडपे, स्वत:ची मुले, मुलगी, नातवंडे, स्वत:चे घर, पत्नीबरोबरचे क्षण, नोकर चाकर, पोस्टमन, इंग्लिश पुस्तक, आतील तारे, ग्रह, तेजोमेघ, तारामंडळांची चित्रे, आकाशाची कोडी, व त्याबाबतचे सर्व विचार दर्शनी, पण ते तेवढ्यापुरतेच होते.

असे बसले असताना पाहतोय पडलेले माकडाचे पिल्लू व छपरावर माकडांचा थवा. निरखत, पिल्लाशिवाय न संपणारा अन त्याच क्षणी सुहास सर्व माकडांना व्यायला देऊन मारावे या विचारात. पिल्लाला वाचविण्याऐवजी ती हजारो आपल्या बंगल्यातून केव्हा हद्दपार होईल या विचारात व कुटीत. अशा परिस्थितीत पिल्लू ही खाली येऊन, बराच वेळाने पाहात, जगण्याच्या प्रयत्नात होते अन सुहासही मानव असून त्यांची, तशाच विचारात होते.

सुहास एवढे आयुष्य जगूनही त्यांचे प्रश्न सुटत नाहीत. प्रश्न होते घराचे, आतल्याच्या नात्यांचे, शेजाऱ्यांचे, बागेचे, तारामंडळाचे व निसर्गासह माकडपिल्लाचेही. ते स्वत: आयुष्य कधी म्हणाले माझी वृद्धावस्थेत आठवण विसरणे, आता आई

शेजार पाजाऱ्यांचे बाबत न दाखविलेला विश्वास, प्रेम,
छोट्या छोट्या गोष्टीतून आनंद न घेण्याची क्षमता
सत्यात येऊ शकणारी पण न पाहिलेली स्वप्ने,
उपाय न शोधता येणारे प्रश्न. असे हे नकारात्मक
आयुष्य जगण्याचा सारिपाट मांडून देवा दानवे
ही अपेक्षा. मला काय मन माकडांचा काय,
दोघांचेही त्या देवाचे आयुष्य मात्र मोठे
होऊ घातलेले आहे याची सुब्रावांना जाणीव
आहे. कारण ते मानव आहेत. विचार करू
शकतात पण माकडाच्या पिल्लाला विचार नाहीतच.
त्याची जगण्याची धडपड म्हणजे शरीराची हालचाल
व श्वास चालू राहणे. या पलिकडे जग नाही त्याला.
तसेच झाडावर असलेल्या इतर माकड समुहाला
पण नाही. ते फक्त वयाचे काम करतात. निर्मि
पणे. मात्र सुब्रावांना ते ध्यान आहे.

आता सुब्रावांची अशी स्थिती
पाहिल्यानंतर अनेक प्रश्न निर्माण होतात.
प्रतिकूल परिस्थितीमध्येही माणसे चिवट इच्छेने
का जगतात? अपेक्षा का ठेवतात? त्यांचे असे
अस्तित्वहीन जगण्याची प्रेरणा काय? ह्या प्रेरणा
सध्याच्या आयुष्याशी संलग्न आहेत का? ह्या
तशा असल्या तर, त्या प्रेरणांना शेजारपाजारचे
त्यांना ओळखणारे लोक, शेजारी, झाडेवाले, घर
मोहल्ल्याचा निसर्ग, बाग, मुलगा मुलगी, यांना
सुब्रावांना काही वाटावे असे काही कर्तृत्व
त्यांनी केले आहे का? कोणाच्या आठवणीत
राहण्यासारखे सेवाकार्य केल्याचे स्मरते का? मग
जेव्हा सुब्राव अंतर्शोध घेतात तेव्हा असे लक्षात
येते कि ते पूर्णतः दुर्लक्षित आहेत पण माकडाच्या
पिल्लाबाबत मात्र सर्वजण कुतुहल दाखवून कवतुक
बोलणे व चौकशी करतात. पिल्लाला घेऊन जाणारे
तर एक शब्द बोलत नाही. ह्यामुळे समोर उभी
असणारी माणसे त्यांना आपली वाटत नाहीत.
मन मरते ती माणसे समोर असूनही कित्येक
प्रकाशवर्षे आपल्यापासून दूर आहेत असे वाटते.
त्यांचा भ्रमनिरास होतो व दोन चार महिन्यात
मृत्यूक्षण येणार याची नकळत वाट पाहू लागतो.

जी.ए. लेखक म्हणून वाङ्मयाबाबत म्हणतात माणसाला माणूस म्हणून जगतांना अटळपणे जे भोगावे लागते तेच केवळ वाङ्मयाचा विषय होऊ शकते तर कथा लेखक म्हणून विचार मांडतांना तेव्हा ते म्हणतात "एखादी कलाकृती, लेखन, कलावंताच्या मनात आकाराला आलेली असते. तिला तो (लेखक) ज्यावेळी शब्दरूप देऊन वाचकांच्या पर्यंत नेण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळी त्याने केलेला आविष्कार हा मनातील मूळ कलाकृतीच्या मानाने अपुरा, क्षीण असतो. जी.ए. ना त्यांच्या स्वतःच्या कथांबाबत असेच असमाधान होते.

वरील लेखन विचार पाहता सुभाष यांची कथा लिहिता लिहिता इतर पसारा सोडून बसले आहेत कि त्यांच्या मनातील माणसाची व माकडाची नकीच तुलना करतांना हा फाफटपसारा वाचकाला थोडा संभ्रमित करतो. त्यांचे References म्हणावे असे लागत नाहीत लावता येत नाहीत. म्हणून जी.ए. या कथेबाबत असमाधानी होते का? कथा संपादन परत करून कथेला योग्य न्याय दिला आला असता का? हे प्रश्न उपस्थित होतात.

आलेल्या Probable मोठकमळा ते निश्चित पणे सांगतात कि २,४ महिन्यात कदाचित घर उपलब्ध होण्याची शक्यता असेल. अशा या उरलेल्या उधार आयुष्यात सुभावांना उमेदीच राहिली नाही. मग अशा गलितगात्र माणसाची विचार धाव कोठपर्यंत जाणार? मुलगा-मुलगी येवढ्याशा अंतरावरून भेटायला येतील का नाही? केव्हा भेटतील? मृत्यु आल्यानंतर येऊन मला उपयोग काय? (स्वार्थीच शेवटी सुभावांचा) हे विचार स्वार्थापोटी असतांना दूरस्थ ग्रह ताऱ्यांचे प्रकाशकिरणांचे व प्रकाश वर्षांचे, गृहगोल विश्व याचाही विचार करत असतो हेही एक गुढच.

सर्व नुसती आधिभौतिक व मनोव्यापार विश्लेषणात्मक 1
आणि म्हणूनच शीर्षक सार्थ ठरते माणसाचे काय? माकडाचे काय?

! संजीव कावरगांवकर

दिलिप बडे: सुब्राव हे पात्र व्यक्तीगत जिवन जाणिवा" असलेले आत्मकेंद्री व अस्तित्वा विषयी "चौकस"असलेले पात्र ठरते.या ऊलट प्रदक्षिणा कथेतील दादासाहेब हे सामाजिक जिवन जाणिवा विकसित असलेले बर्हिमुखी अंतरंगाचे पात्र ठरते.लेखकाच्या चष्म्यातून आपण वाचन करू नये हे रास्तच.त्याच बरोबर लेखकाचे अतंरग कथेवर प्रभाव टाकत असते ते आपण स्विकारतोच.

सुनीळ सामंत: तुमचे " G.A. लिहितात म्हणजे वाचकाने, आस्वादक याने त्यात गूढ, वेगळा दृष्टीकोन शोधलाच पाहिजे का? हे मला नेहेमी पडणारे प्रश्न आहेत." हे वाक्य अत्यंत पटले. लेखकाचा प्रवासही असतो आणि विविधताही. जीए न आवडणाऱ्या लोकांना जीएं मधे तोचतो पणा आहे असे वाटते. पण मला, तेही मुख्यतः या वर्षात, हे जाणवले की जीएंची प्रत्येक कथाही स्वतंत्रच असते. जीए प्रयोगशील तर होतेच पण स्वतःच्या विचारांनाच प्रन विचरण्याची हिंअमत त्यांयात होती. आपल्या पात्रांच्या तोंडून ते हे काम करवून घेत.

माणसाचे काय माकडाचे काय ही कथा एकसलग नाही. त्यामुळे त्यातल्या कोणत्या भागावर भर दिला ़्यावर कथेचा अर्थ वेगळा होतो. वाचक आपापल्या परीने त्याचा अन्वयार्थ लवतो. ही चर्चा अजेदार होते आहे. इतरांनीही आपापली मते देत रहावे. या कथेवर.

दिलिप बडे: Space-अवकाश-ब्रम्ह.तिन्हीचा अर्थ एकच.पण ब्रम्ह म्हटले की विज्ञानाशी फारकत होते.सुब्राव हे अवकाशीय ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करतात.गितेत ज्ञान मिळवणे म्हणजे अवकाशिय समज वाढवणे अस म्हटलेल आहे.जाणण्यायोग्य तत्व म्हणजे अवकाश.या अर्थाने सुब्राव योग्य मार्गावर आहेत असे वाटते.अस्तित्वा विषयी प्रश्न पडणे माणसाचे ऊच्च मुल्य आहे.

विलास वाघोलीकर: अस्तित्वाविषयी प्रश्न पडणे - (अवकाशाचा विचार करणे) माणसाचे उच्च मूल्य आहे.... या कथे संबंधी आपला हा योग्य मुद्दा आहे. जीए त्यांच्या कथांतून ,व विशेषतः या कथेत , आकाशस्थ शक्तींना प्रश्न विचारतात. सर्वसाधारण लेखक असे प्रश्न उपस्थितही करत नाहीत. जीएंनी सतत अशा तत्वज्ञानात्मक प्रश्नांवर कथा लिहिल्या. धन्यवाद. विलास वाघोलीकर.

महेश आफळे : सर्वस्पर्शी (नव्हे,सर्वसखोल) तत्वज्ञान हा जी एं च्या समग्र साहित्याचा सहजभाव आहे

त्यांना तत्वज्ञानाची मांडणी कधीच करावी लागत नाही

हे वैशिष्ट्य असणारे जी ए बहुधा जगातील एकमेव असावेत

कथेवरील बराच उहापोह वाचला

काही नवे दृष्टिकोन समजले,तर काही प्रमाणात मनोरंजनही झाले

बाकी सगळे बाजूला ठेवा

अगदी ही कथा,सुबराव सगळे बाजूला ठेवा

आणि रोजच्या पसाऱ्यातले आपले असंबद्ध जीवन जगताना आपल्याला सृष्टीतील आपल्या स्थानाविषयी काही एक प्रश्न सतावतात की नाही हे स्वतःलाच विचारून बघा

या कथेतील प्रश्न हे जी एं ना स्वतःला जाचणारे प्रश्न होते

आपल्या पात्र गवाक्षातून लेखक नेहमीच कळत नकळत डोकावत असतो

महेश आफळे : आपल्याकडे न्यायाधीशना my lord (बोलताना मिलॉर्ड) म्हणण्याची निरर्थक प्रथा रुतलेली आहे

या कथेतील जज साहेब देखील स्वतःला न्याय मिळण्याच्या प्रतीक्षेत दिसतात

"तारीख पे तारीख "हे आपल्या न्याय व्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य आहे

अजून आपली वेळ आली नाही याचीच खातरजमा ते जज साहेब रोजच्या चालण्यातून करत असतात

न जाणो या कथेतून असेही मला भासले की इथे खुद्द ईश्वर नियंता ही त्याला स्वतःला स्वतःच्याच या व्यामिश्र पसाऱ्यात न्याय कधी मिळेल या प्रतिक्षेत असावा

# माघारा- जीए कुलकर्णी- कथासंग्रह- रक्तचंदन

सुनीळ सामंत: माघारा- जीए कुलकर्णी- कथासंग्रह- रक्तचंदन

माघारा ही एका छोट्या हॉटेल व्यवसायिकाच्या बदलत्या काळाची कहाणी आहे. लहानपणापासून अनाथ असलेल्या सदूभाऊने आपली पत्नी सीता हिच्या सहाय्याने हे हॉटेल सुरू केले. एका छोट्याखानी गावातील चौकातले हे हॉटेल आहे. त्याचा मालक सदूभाऊ हा भजी तळण्यात वाकबगार आहे. त्याशिवाय गाडीवानांना लागणारी भाजी आमटी वगैरेही तो बनवतो. त्याच्या हॉटेलमध्ये दोन प्रकारची गिऱ्हाईक येतात; टोपीवाली व बिगरटोपीवाली. टोपी वाली गिऱ्हाईकांसाठी त्याने खुर्च्या ठेवल्या होत्या, पण तेही लोक चुली शेजारी पाटावरच बसू लागले. बाकीचे गाडीवाले लोक गाडीवान इकडे तिकडे बसून खाऊन जात. हे हॉटेल बरेचसे उधारीवर चाले. सर्व गिऱ्हाईके सदूभाऊच्या ओळखीची व सवयीची होती. काम करणारा भीमूही वर्षानुवर्षे सवयीचा असे. हे जवळपास तीस वर्षे चालले होते.

अचानक शहरातील एका मोठ्या हॉटेलवाल्याने तेथे बाजूलाच एक नवीन हॉटेल सुरू केले. त्याचा झगमगट व त्यात मिळणारे वेगवेगळे पदार्थ यांच्या आकर्षणाने सदुभाऊ चे गिऱ्हाईक आटले. सदूभाऊचा शिक्षणात फारसा रस नसलेला मुलगा अनंता याच काळात शहरातून नापास होऊन घरी परत आला. बंद पडायला आलेल्या त्या हॉटेलवर त्यांने आपल्या पद्धतीने काम करायला सुरुवात केली. एवी तेवी कधीतरी आपण त्याला आपले सारे देणारच होतो या विचाराने सदू भाऊने आपल्याकडचे पैसा अडका दागिने मुलाच्या हवाली केले. मुलाने सर्व बाजूंनी जोर लावून हॉटेल चांगले चालवण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी होईना. संपत्तीच्या जोरावर शानभाग त्याला चिरडू लागला. सदूभाऊला हे दिसत होते. त्याने

आपल्या परीने त्याला होईल ते ते केले. घर गहाण ठेवून कर्ज काढून दिले. अनंता नवनवीन कल्पना काढून मार्ग शोधायचा प्रयत्न करत होता. नवे प्रयोग करत होता. त्यात त्याला सदू भाऊची अडचण होऊ लागली.

एके दिवशी त्याने सदू भाऊला गावाच्या घरी जायला सांगितले आणि अखेर जड पायांनी व रिकाम्या हाताने सदूभाऊ व त्याची पत्नी सीता माघारी गेली. वाटेत त्यांना त्यांचे एक नेहमीचे गिऱ्हाईक मास्तर भेटले. त्यांनी त्यांचा मुलगा हल्लीच एका आजारात गमावला होता. कोणाचे दुःख अधिक हा प्रश्न वाचकावर सोपवून जी ए येथे कथा संपवतात.

या कथेतील जीएंची भाषा व एका छोट्या हॉटेलातील अगदी बारीक सारीक व्यवहार, वस्तू, दृश्ये नेमकेपणे टिपणे व डोळयासमोर येतील असे शब्दात मांडणे हेही जीएंचे कसब या कथेचे वैशिष्ट्य वाटते. या कथेतील एखादे वाक्य बोलणारी सीता सुद्धा ठळकपणे डोळयासमोर उभी राहते. भीमू, मास्तर, अनंता या व्यक्ती तर स्पष्टपणे दिसतातच पण शानभाग या ओझरत्या उल्लेख असलेल्या व्यक्तीचे सुद्धा व्यक्तिमत्व स्पष्टपणे दिसते.

कथा अतिशय वाचनीय आहे. मराठी साहित्यातील बहुतांश कथाकारांच्या कथेत गोष्ट प्रमुख असे. जीएंच्या कथेतून खोलवरचे तत्त्वज्ञान विषयक प्रश्न उभे रहातात.

संजीव कुलकर्णी : 'माघारा' ही 'रक्तचंदन' या कथासंग्रहातील शेवटची कथा दोन पिढयांच्या मूल्यांमधला फरक अधोरेखित करते. जुन्या विचारांचा सदूभाऊ आणि सीताबाई आणि त्यांचा नवीन विचारांचा मुलगा अनंत यांच्यातला हा संघर्ष आहे. हा फक्त जुन्या आणि नव्याचा फरक नाही. हा दोन पिढयांमधील मूल्यांचा फरक आहे. हॉटेलातल्या गिऱ्हाईकाला चविष्ट, चमचमीत खायला घालावे आणि त्यांच्या पोटभर खाण्याने आपले पोट भरावे या वृत्तीचा सदूभाऊ आणि नखरेल

आरसे, नाजूक कपाबशा पण बेचव, भळभळीत अन्न यात धन्यता मानणारा त्याचा मुलगा अनंत यांच्यातल्या संघर्षाचा शेवटही अपेक्षेप्रमाणेच होतो. मुलाच्या हाती सगळे सोपवून देऊन सदूभाऊ आणि सीताबाई भल्या पहाटे थंडीत गावाकडे परत जायला निघतात.

'माघारा' या कथेत सावळेकर मास्तरांचे एक पात्र आहे. मास्तर बोलघेवडे आहेत. सगळ्या गावाची अंडीपिल्ली त्यांना ठाऊक आहेत. आणि खाजगी असे काही असते हे त्यांना ठाऊकच नाही. एखाद्या जुन्या विद्यार्थ्याला बघून लांबूनच ते 'ए देशपांडया, तुझी बायको बाळंत होते की नाही एकदा?' किंवा 'ए टकल्या साठया, तुझी मूळव्याध कशी आहे रे आता?' असे बिनघोर विचारतात. सदूभाऊच्या हॉटेलात येऊन ते भजी खातात आणि मनात आले तरच पैसे देतात. सदूभाऊही त्यांना कधी काही विचारत नाही. पण अनंताच्या हातात कारभार आल्यावर गोष्टी बदलतात. अनंत त्यांना रोख पैसे मागतो. तेही चार आणे देऊन निघून जातात. त्यांचा मुलगा फार आजारी असतो.

थंडीत गावाकडे जायला निघालेल्या सदूभाऊला पहाटे अचानक मास्तर दिसतात. तो रस्ता हॉस्पिटलचा असतो. सदूभाऊ मास्तरांच्या मुलाची चौकशी करतो. पराभूत मनाने मास्तर सांगतात, "तो गेला पंधरा दिवसांपूर्वी. सदूभाऊ, तो कसा आहे हे तूच विचारलंस बघ पहिल्यांदा. तो हॉस्पिटलमध्ये आहे हे शंभर माणसांना तरी माहीत होतं. अरे, एकानं तरी विचारावं, चौकशी करावी? तो गेला तेंव्हा चार लोक मिळेनात मला वेळेवर. आणि त्याच्यासाठी गवती चहा मिळावा म्हणून भिकाऱ्यासारखं दारोदार हिंडलो बघ मी"

खचत जाणारी मूल्ये हा काही नवीन विषय नाही. प्रत्येक पिढीच्या मनात पुढच्या पिढीच्या बदललेल्या मूल्यांबद्दल, जीवनशैलीबद्दल, श्रद्धांबद्दल शंका आणि बहुदा नाराजीच असते. पण सदूभाऊ आणि सीताबाई यांना घरातून निर्वासित होऊन बाहेर पडावे लागते आणि एरवी गावातल्या प्रत्येकाला अरेजारे करत हिंडणाऱ्या

मास्तरांचा पोटचा मुलगा मरतो आणि त्यांना सांत्वन तर सोडाच, पण साधी विचारपूसही मिळत नाही हे सामाजिक अध:पतन वाचकाला सुन्न करून जाते. मास्तरांची ही व्यथा प्रातिनिधिक आहे. सदूभाऊ आणि सीताबाई यांच्या वाटयालाही असलेच दु:ख आले आहे.

सदूभाऊचे गावात एक लहानसे हॉटेल आहे. त्या हॉटेलला नखरा नाही, भपका नाही. पण सदूभाऊच्या दृष्टीने हे सगळे दुय्यम आहे. सदूभाऊचे रोट, चरचरीत उसळ आणि मसाला भजी हेच त्याचे सामर्थ्य आहे. ‘‘लेको, खायला चमचमीत करा, अडलेली बाळंतीण येऊन खाऊन जाईल बाळंत व्हायच्या आधी!’’ हे सदूभाऊचे साधे तत्वज्ञान आहे. बेळगावला शिकायला जाऊन, नापास होऊन परत आलेला अनंत आणि सदूभाऊ यांच्यांत या पिढीबदलाची भिंत उभी राहाते. तेवढयात समोरच शानभागाचे चमकदार हॉटेल उभे राहाते आणि अनंताला चेव चढल्यासारखा होतो. तो सदूभाऊचे जुने ते सगळेच मोडीत काढायला निघतो. घरावर कर्ज काढून तो शानभागाच्या हॉटेलबरोबर स्पर्धा करायला निघतो. त्याला मदत करायला पुढे आलेल्या सदूभाऊला त्याचा मुलगा सरकारी साहेबापुढे डोक्याने अर्धवट असलेला नोकर म्हणून संबोधतो. सदूभाऊ आणि त्याची बायको सीताबाई – त्याचे प्रत्यक्ष आईबाप यांनी आता आपल्या गावी जावे असे तो सुचवतो आणि सगळे हरवून बसलेला सदाभाऊ आणि सीताबाई पराभूत मनाने गावाकडे माघारी जायला निघतात.

अनंताच्या बेळगावला शिकायला जाण्यापासून ‘माघारा’ मध्ये मराठी-कानडी संदर्भ दिसू लागतात. सदूभाऊ मूळचा कोकणी आहे. म्हणून त्याच्या भाषेला एक कोकणी बाज पण आहे. शानभागाच्या नखरेल हॉटेलला उद्देशून तो ‘‘शिंचं सगळं बायकी काम! येऊ देत असले शंभर शानभाग! भाऊचे रोट उसळ आणि मसाला भजी तोपर्यंत त्याच्या बाला मी भीत नाही!’’ असे म्हणतो. कोकणातून गाडया घेऊन आलेले गावडे सदूभाऊच्या हॉटेलात बाकडयावर गुडघे दुमडून वर बसतात आणि टेबलवर पसरलेला शेवचिवडा फक्के मारत खातात, खुर्चीत बसल्यावर चिमटा

बसल्याबद्दल साळवेकर मास्तर त्या खुर्च्यांबद्दल गावभर गावगन्ना करतात, गावाकडची, गावंढळ गिऱ्हाईके आली की सदूभाऊ आपुलकीने टमाम फुगतो (बोलीभाषेत हवा आत जाऊन काठोकाठ फुगलेल्या गोष्टीला टमाम फुगणे असे म्हणतात. पुरी टमाम फुगते, एखादा माणूस किंवा बाई सुख लाभले की वर्षा-दोन वर्षांत टमाम फुगते, अशा अर्थाने हा शब्द वापरला जातो). त्या गावडयांना फुकट शेवचिवडा आणि जाड कापडाच्या पट्टीसारखा चहा देऊन तो खुषीने "खावा रे बाजीरावानो. खाऊन काही माझं नशीब लुटत नाही. खावा आणि मरा" असे म्हणतो. (त्याच्या प्रेमळ मनाचे पण ओबडधोबड, गावठी भाषेचे हे उदाहरण आहे. खा याऐवजी खावा असे म्हणणे हाही एक ग्रामीण भाषाविशेष). "टोपीवाली गिऱ्हाईके चुलवणाभोवती पाटावर बसली की अगदी आठनऊची राखण" (अर्थ: आठनऊ वाजेपर्यंत उठणार नाहीत) असे जीए लिहितात. ही गिऱ्हाइके बचकभर मसाला भजी उचलून पानावर ठेवतात, बाजूच्या पातेल्यातून त्यावर चिंचपाणी ओततात आणि सू सू करत खातात. साळवेकर मास्तर सदूभाऊच्या हॉटेलात दहा वर्षे येतात, शिप्तरभर (पाटीभर या अर्थी) भजी खातात आणि कधीतरी पाच रुपयाची नोट सदूभाऊच्या अंगावर भिरकावून त्याला 'घे, घे घालून तुझे पैसे तुझ्या मढयावर' असे ओरडतात. सदूभाऊची बायको सीताबाई अगदी अबोल आहे असे म्हटल्यावर सदूभाऊ अगदी पुढे पडूनपडून हसतो (इतका हसतो की ओणवा होतो) आणि म्हणतो, 'मास्तर, अरे तुला माहीत नाही रे सायबा, बाई बोलू लागली की झाडाचा असोल नारळ कडाकडा तडकतोय बरं! एकदा आमच्या काकाला तिनं असं फैलावर घेतलं की त्याचे केस पांढरे झाले आणि डोकं कोहाळ्यासारखं दिसायला लागलं हो!' अनंत हॉटेलात एक जुना फोनो आणतो पण नंतर सदूभाऊ तो बाजूला ठेवून त्यावर रोट ठेवण्याचे ताट ठेवतो. त्या दिवशी जमिनीवर आडवे होताना गावडे म्हणतात, 'हे बेस झालं. आता दोन तास पडायला बरं सुसूत्र.'

मास्तरांचा मुलगा आजारी असल्यामुळे ते घुम्म (अबोल) होतात, अनंत हॉटेल झकपक करताना केंबळे (जळमटे) दाखवणारे वाशांचे छप्पर झाकून घेतो,

घरावर कर्ज काढलं म्हणजे काही गाय कापली नाही असे अनंता म्हणतो, सीताबाई फार आजारी असताना सदूभाऊच्या हातात एक अरुंद लांबट पिशवी देते आणि म्हणते, “मी यातून उठून बसेन असं वाटत नाही. तेंव्हा असं करा, मी जाताना माझ्या अंगावर पुरेपूर वस्त्र आहे की नाही बघा. (जुन्या श्रद्धांचे प्रतीक) आणि लाकडासाठी माझे पिशवीतील पैसे घ्या.” सगळे हरवून बसलेला सदूभाऊ आणि त्याची बायको सीताबाई मोटार स्टँडजवळ आल्यावर सदाभाऊ म्हणतो, “देवानं आयुष्याचं सारं गुंडगोळं करून टाकलं बघ. (संपूर्ण नाश करणे, सर्वस्व लुबाडणे या अर्थी). शिंच्यानं डोक्यावरचे सगळे केसदेखील अगदी लुबाडून घेतले त्यानं.” थंडीत काकडत असलेली सीताबाई त्यावर काही बोलत नाही. सदूभाऊ आणि सीताबाई यांच्या साध्या, भोळया आयुष्याची ही शोकांतिका वाचकाला व्याकूळ करून जाते.

सुनीळ सामंत: अत्यंत सुंदर विवेचन. विशेषतः सीताबाई ही व्यक्तिरेखा फार उत्तम प्रकारे समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्याबाबतचे कुतूहल ही जागे केले आह.

+91 96893 17371: माघारा : जीएंच्या मौल्यवान कथेंपैकी एक रत्न !!!

माघारा ह्या शब्दाला धरून पूर्वी एक श्रेष्ठ काव्य आपण ऐकलंय. " जातो माघारी पंढरीनाथा, तुझे दर्शन झाले आता || तुकारामाची ही भावकविता. (जीए लव्हर्सनी माघारा कथे संदर्भात ही कविता/गाणं पूर्ण ऐकावे 🙏 🙏 ) पंढरीनाथाचे दर्शन घेऊन कृतार्थ भावनेने तृप्त झालेले तुकोबा आता जन्म मरणाचा हिशोब चुकता झालाय, आता कर्तव्य नाही,सारा आनंदीआनंद, येथे आपण पूर्ण सफल जीवनाचे वास्तव बघतो. माघारातले "सदाभाऊ " हे व्यक्तित्त्व भले काल्पनिक का असेना,त्याची मांडणी जिवंत (खास जीए स्टाईलने) झालीये. सहज सोप्या,प्रवाही जीवनाचे दर्शन हे येथेही आहे. पण शेवटी ठळकपणे जाणवतो तो

सदाभाऊच्या जीवनाचा वैफल्याकडे प्रवास ! जी नाती, मूल्यं,घेऊन सदुभाऊ जगला, त्याचा ऱ्हास वाचक बघतो आणि खिन्न होतो.कथेतलाही प्रवास माघारीचाच आहे,पण सदुभाऊ हरलेलाआहे तुकारामाचा अभंग येथेही आठवतो. तेच स्वाभाविक, भोळं,निरागस जीणं..., पण सर्व प्रवास आनंदाकडे. 👌 👌 का कोण जाणे,पण मला असे वाटते की " माघारा " कथेतून ",सदुभाऊ"चे वैफल्यग्रस्त जीवन हे तुकारामाच्या सफल,तृप्त जीवनाचा Inverse आहे. जीएंचा हा मास्टरपीस, म्हणूनच मला भावला. 💐 🙏

महेश आफळे : ही निव्वळ सदुभाऊ, अनंत यातील पिढीनिहाय कौटुंबिक संघर्ष कथा नव्हे

जी ए हे किती द्रष्टे लेखक होते हे या सुमारे 60 वर्षांपूर्वी च्या कथेवरून स्पष्ट होते

आजचा चकचकीत होऊ पाहणारा शायनिंग इंडिया आणि गरीबग्रस्त भारत याचा किती अचूक वेध जी एं नी तेव्हाच घेतला होता

मॉल संस्कृती ने गावगाड्याची कशी वासलात लावलीय आणि मोठ्या माश्यानी लहान मासे किती सहजपणे गिळंकृत केलेत हे वास्तव अधोरेखित करणारी ही माझी अत्यंत आवडती कथा

आणि हो

कधीच कुणाला न दिसलेल्या सीता माईचा सूप पाखडण्याचा,खोबरे किसल्याचा आवाज किंवा पहाटे अर्ध अंधारात गोपद्म रांगोळी काढतानाची मूक गुणगुण मला नेहमीच स्वच्छ ऐकू येते

सुनीळ सामंत: उत्तम. पण माघारा आणि माघारी एकच?

संजीव सावरगांवकर: यथोचित लेखन व पहिलाच मुद्दा एकदम झकास. 2 पिढ्यांचा संघर्ष. मागच्या पिढीने पुढच्या पिढीला कोणतेच व्यावहारिक माहिती, स्किल्स शिकविली नाहीत. कायम आत्म मॅग्न. जुन्या पिढीची मूल्ये छान पण व्यवहारात निरुपयोगी असतात हे ते ही शिकले नाहीत आणि नवी पिढी पण शिकली नाही. ती वेगळ्या विचारांची निघाली म्हणुन म्हातारे आयुष्य हात चोळत बसले. ह्याच अर्थाच्या बऱ्याच कथा वाचनात आलेल्या असल्याने ह्यात विशेष नावीन्य आढळलेले नाही. नटसम्राट हे एक ढोबळ उदाहरण, अर्थातच तत्त्व म्हणुन.

रमा गर्गे: माघार घेणे शब्दाचा अर्थच मागे फिरणे ,सोडून निघणे असा होतो।त्याअर्थी माघारा म्हणजे माघार घेतलेला माणूस, जो माघारी फिरत आहे असे असेल का

संजीव सावरगांवकर: होय

सुनीळ सामंत: माघारा आणि माहेरी हे कुठेतरी समानार्थी ऐकल्यासारखे वाटते

महेश आफळे : पुन्हा नमूद करतो,

जी एं ची ही कथा केवळ प्रातिनिधिक आहे

नंतरच्या काळात शानभाग चाही बळी कुणी दुसरा घेणारच आहे

हा अस्तित्वाचा संघर्ष आहे

असे लाखो कौटुंबिक संघर्ष ज्यामुळे घडतात त्यामागील मूळ कारण काय?

"भारत विरुद्ध इंडिया "या प्रदीर्घ सामन्यात आजवर लाखो करोडो बळी गेलेत,

रोज नवे बळी जाताहेत

आणि या समाजात बळींना कधीच तोटा नसतो

तुम्हींआम्ही बहुतेक सारे जण हल्ली किराणाच काय,बहुतांशी चिजा ऑनलाइनच मागवतात

कारण ते सोयीचे असते,"तुलनेने"(?)स्वस्त असते

येथे आपण मोठया माश्यांच्या तोंडी लहान मासे सोपवतो असे नव्हे,तर आपण स्वतःच व्यवस्थेच्या भक्षी पडत असतो

विकासाची किंमत मोजावी लागते आणि ती नेहमी वंचित गरिबांनीच चुकवायची असते

आणि ती त्यांना कधीच चुकवता येत नाही

विलास वाघोलीकर: - मानवी आयुष्यात आर्थिक संकट आल्यावर ते कसे उध्वस्त होते हे दाखवणारी जीएंची ही कथा आहे.

- माननीय सुनीळजी यांनी कथेचे प्रास्ताविक मुद्देसूदपणे केले आहे. तसेच वाचनासाठी मूळ कथेची पीडीएफही दिली आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

- आर्थिक जीवन हे इतक्या अनेक घटकांचे असते, की तिला अनाकलनीय नियतीचे, जीवघेणे रूप येते.

सदूभाऊ गरिबीतून कष्टाने पुढे आलेला, त्यामुळे तसा विचार करणारा, हातातील तेवढेच कौशल्य जपणारा, जुन्या पद्धतीने उधारी ठेवून, व वसूली करून ,हॉटेल व्यवसाय करणारा असतो. त्याला तशीच साजेशी, धार्मिक, पतीला सर्व परिस्थितीत साथ देणारी,कष्टाळू, आडगावातून मोठ्या गावात आल्याने बुजलेली, सीताबाई बायको असते.

- अशा परिस्थितीत ,त्याचा आर्थिक दृष्ट्या बलदंड शानभागशी टिकाव लागत नाही. जुन्या पिढीतल्या भावना जपल्याने, नवीन पिढीतला मुलगा, अनंतबरोबरसुद्धा त्याचे …

+91 96893 17371: डियर जीए लव्हर्स,

माघार/माघारी ह्या शब्दांबद्दल आपला प्रश्न कळला.त्यासाठी पुढे -

जीएंचे कथाविश्व हे शब्दांच्या अचूक diction व selection ह्यातून उमलते.शब्दांचे अर्थ हे कथेनुसार बदलत रहातात.हेच तर त्यांच्या आरस्पानी प्रतिभेचं वैशिष्ट्य ! माघारा अन् माघारी, मुळशब्द - माघार.(Return).

आता कथेत कोणता अर्थ घ्यावा,ह्याचे उत्तर जीए वाचकांवर सोपवतात व विचार प्रवृत्त करतात.जीए अलगदपणे असेच वाचकाला कथानकात ओढून घेतात.

त्यांचे कसब हेच की,कथानकात शब्द हे कथावस्तूची फक्त छाया असतात. वाचकास कथा नेहमीच 'शब्दांच्या पलीकडे' गवसते. ("Between the lines"). जीएच्या श्रेष्ठ प्रतिभेची ही दुसरी झलक.इथे वाचक कथानकात ओढला जातो कथापुढे सरकते व उत्सुकता वाढत जाते..

👉 जीएंच्या खूप कथा,ह्याच टप्प्यावर संपतात.

आता पुढील कथानक, पुढे काय !!!

हे सर्व, सर्व.... अर्थ वाचकांवर.

माघारा/माघारी....की माघार ?

आता "योग्य" अर्थ वाचकांवर !

सुनीळ सामंत: माघारा return defeat backfoot

महेश आफळे : मला वाटते, इथे माघार/माघारा जे काही असेल आहे तेही युद्धातून/दैनंदिन संघर्ष लढ्यातून माघार नव्हे,

पराभवाच्याही पलीकडे एक जी "आम्ही जातो अमुच्या गावा"ही विषण्ण भावना असते ती येथे महत्वाची

या कथेत काही जोरदार थपडा आहेत

शेवटी आपल्याला निरोप द्यायला कुणीतरी आहे या भावनेने क्षणभर आनंदी झालेला सदुभाऊ "मागल्या एका पगाराचे 2 रुपये राहिले होते नव्हे"या त्या अर्धवट नोकराच्या वाक्याने आतून पार कोसळतो

तुम्हींआम्ही सतत असेच स्वार्थ जपत जगत असतो

अलीकडे 10-12 वर्षात कथा वाचली नाही,त्यामुळे तपशीलात किरकोळ चूक होऊ शकते माझी

जयश्री जंगले : पतितपावन नांव ऐकुनी आलो मी द्वारा

पतित पावन न होती म्हणुनी जातो माघारा

बरोबर.

परत फिरणारा, the one who returns + defeated

असा अर्थ असावा.

रेखा दातार : माघारा

ही गोष्ट आहे जगाबरोबर न बदललेल्या सदूभाऊंची, जगाबरोबर चालण्याची धडपड करणाऱ्या पण अनुभव गाठीशी नसलेल्या अनंताची आणि जगाबरोबर चालणाऱ्या प्रस्थापित शानभागची.

लहानशा खेडेगावातुन रिकाम्या हाताने सदुभाऊ गावात आले आणि त्यांनी स्वतःच्या बळावर आपले लहानसे जग उभे केले. या जगात सदूभाऊ इतके रंगुन गेले की बाहेरच्या जगात चाललेल्या बदलांची त्यांनी दखलच घेतली नाही. गेली 30 वर्षे घर आणि हाॅटेल सोडुन ते कुठे गेलेही नाहीत. 'ठेविले अनंते तैसेची रहावे, चित्ती असु द्यावे समाधान ।' ही त्यांची वृत्ती ! ह्या उक्तीतील 'ठेवीले अनंते तैसेची रहावे' हा भाग सदूभाऊंनी फारच मनावर घेतला. आणि त्या मुळेच गेल्या 30 वर्षात चमचमीत उसळ, रोट, मसालेदार भजी आणि त्या बरोबर चिंचेचे पाणी या त्यांच्या मेनूत काही बदल झाला नाही आणि मोडक्या टेबल -खुर्च्या, कळकट किटली, कानमोडके कप, पडकी भिंत आणि लोंबकळणारी कोळीष्टके असा आपल्या हाॅटेलचा आवतार झाला आहे हे त्यांच्या लक्षातही आले नाही. त्यांच्या कडे अनेक वर्षे काम करणारा नोकर भीमू देखिल कामचुकार आणि वरवर काम करणारा. त्यांच्या कडे येणारे गिऱ्हाईकही तसेच. मोडक्या खुर्च्यांवर बसणारे, टेबलावरच शेवचिवडा पसरुन खाणारे , तिथेच जमीनीवर आडवे होणारे आणि सदूभाऊंच्या मऊपणाचा फायदा घेत उधारी ठेवणारे. सदूभाऊ देखिल चार लोक आपल्या भोवती जमा होत आहेत, गप्पा मारत आहेत, आपल्या हातच्या पदार्थाची तारीफ करत आहेत या गोष्टीवरच 'चित्ती समाधान' बाळगणारे. उधारी वसुल करण्यात बेहिशोबी आणि आपल्या भोवती गोळा झालेल्या फुकटखाऊ संधीसाधुंना ओळखु न शकणारे.

सदूभाऊंच्या या विश्वाला हादरा बसतो ते त्यांच्याच समोर शानभागचे चकचकीत हाॅटेल झाल्यावर. इतके दिवस सदूभाऊं भोवती जमुन त्यांच्या कळकट हाॅटेलात गप्पा झोडत असणारे त्यांचे फुकटखाऊ गिऱ्हाईक शानभागचा 'better option' मिळाल्याने त्यांना सोडुन जाते. आजकाल गाजत असलेल्या ' Who moved my cheese' या पुस्तकातील 'जीवनात तगुन रहाण्यासाठी परिवर्तन अनिवार्य असते' हा सिध्दांत जीएंनी फार पूर्वीच मांडला आहे.

सदूभाऊंची पत्नी सीताबाई खरं तर प्रत्येक प्रसंगात नवऱ्याच्या मागे खंबीरपणे उभे रहाणारी स्त्री ! स्वाभीमानी आणि कणखर आणि व्यवहारी सुध्दा. नवऱ्याचा बेहिशोबी स्वभाव ओळखुन आपल्या अंतसमयी निदान आपल्या अंगावर पुरेसे वस्त्र असावे या साठी पै पै साठवुन ठेवणारी. सीताबाईंनी शेवट पर्यंत नवऱ्याची साथ दिली ,पण आपला व्यवहारी पणा कधी व्यवसायात दाखवला नाही. सदू भाऊंचे जग घर आणि हाॅटेल बाहेर गेले नाही आणि सीताबाई बंद दाराआड त्यांनी स्वतःच आखलेल्या परीघातुन कधी बाहेर आल्या नाहीत.

अनंता शिक्षणा निमीत्त शहरात राहिल्याने सदूभाऊं पेक्षा जरा जास्त जग पाहिलेला. सदूभाऊंचे हे कळकट जग बदलण्याची इच्छा असलेला पण गाठीशी अनुभव आणि पैसा नसलेला आणि तरुण उसळत्या रक्तामुळे अतताई निर्णय घेणारा. शानभागशी टक्कर द्यायला निघतो पण अयशस्वी होतो. आपला व्यवसाय चालत नाही आणि आपण उभ्या केलेल्या साम्राज्याची एक एक वीट ढासळुन पडत आहे हे पाहुन सदूभाऊ निराश होतात. मनाविरुध्द व्यवसाय, रहाते घर, दागिने सर्व अनंताच्या हाती सोपवतात. शानभाग विरुध्दची लढाई मुलगाही हारत आहे हे पाहुन सदूभाऊ उसन्या आवसानाने परत लढायला जातात पण हारतात आणि उरले सुरले 'बाप' हे बिरुद सुध्दा गमावुन बसतात आणि मग पारच कोलमडुन जातात.

30 वर्षापूर्वी अपमानीत होऊन स्वकतृत्वावर काही करु ही उमेद उराशी बाळगुन घरुन बाहेर पडलेले कफल्लक सदूभाऊ 30 वर्षांनी परत कफल्लक अवस्थेत त्याच बींदूपाशी माघारा येतात आणि वर्तुळ पूर्ण होते.

नवऱ्याच्या कर्तुत्वावर विश्वास ठेवुन त्यांच्या बरोबर घराबाहेर पडलेल्या सीताबाईही त्यांच्या बरोबर माघारा येतात. पण जातांना नवऱ्या बरोबर असणाऱ्या आत्मविश्वासाची जागा आता निराशेने, मनस्तापाने घेतली आहे हे ओळखुन त्याच्या इलाजासाठी अमृतांजची बाटली, सूतशेखरची मात्रा आणि मोरावळा अशा पित्तशामक वस्तु मात्र आठवणीने बरोबर घेतात

विलास वाघोलीकर: फार सुंदर, विचारशील, बारकाईने लिहिले आहे. धन्यवाद. सदुभाऊ अत्यंत गरीबीतून ,खूप पूर्वी , परगावी पोटासाठी येतात. हातातील उपलब्ध कौशल्याने, चार माणसे गोळा करून , मुलासह संसार करतात. हे कर्तृत्व सामान्य माणसाचे वाटले, तरी त्यांच्या परिस्थितीत अलक्षणीय वाटत नाही. होय, कालांतराने आलेल्या ,जगाच्या वावटळीत त्यांचा टिकाव लागत नाही. मोठा मासा लहान माशाला खातो, या मत्स्य न्यायाने ते शानभागपुढे टिकाव धरू शकत नाहीत, यात त्यांच्या दोषांपेक्षा आर्थिक नियतीचा घाला मोठा असतो, असे मला वाटते. नायकाच्या अवगुणांपेक्षा वाट्याला आलेली, 'माघारा' जाण्याची विषण्ण मनोवस्था , जीएंना दाखवायची आहे असेही वाटते. कथा महत्वाची आहे. आपले विवेचनही लक्षणीय आहे. असेच लिहित रहावे ही नम्र विनंती. विलास वाघोलीकर

दिलिप बडे: जागतिकीकरण आपल्या देशाने 1990-92पासुन स्विकारले.जी.एं.नी ही कथा 10-20 वर्षे अगोदरच लिहुन भांडवलशाहीचे महत्व व शानभागचा व्यावसायिक दृष्टिकोनाचे महत्व अधोरेखित केले.ऊद्योग - व्यापार - नोकरीसाठी कित्येक सदुभाऊ गाव सोडतात.स्थलांतरीत होतात.जीवनाला स्थैर्य लाभणे अतिदुर्लभ.हताश-पराभूत-होऊन अनेक होतकरू-कामसु सदुभाऊ माघारा'(मुळ गावी)परततात.माघारा'सार्वत्रिक-सार्वकालिक घडणारी घटना आहे.माघारा'येण हा एक पराभव आहे.तो अस्सह्य होतो.जिवन ऊध्वस्त करतो.(हि गोष्ट---सुक्ष्मदृष्टी ने केलेले लेखन)

विलास वाघोलीकर: अगदी योग्य. जीए वाचकाला विचार करायला लावतात. या कथेत, शानभागची एकतर्फी स्पर्धा, मुलाचा राग व सर्व पैसे काढून घेणे, सदुभाऊंचे प्रयत्न या पैलूंना महत्व आहे. पण (आर्थिक) नियती चा घाला,

सदुभाऊंची पराभूत मनस्थिती व माघारा जाणे हे जास्त महत्वाचे आहे असे वाटते. म्हणून जीएंनी कथेला' माघारा' हे शिर्षक दिले आहे. धन्यवाद. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: अतिशय उत्तम विवेचन.

माघारा ही कथा वेगवेगळ्या पिढ्यांची आहे की वेगवेगळ्या व्यक्तींची की वेगवेगळ्या वृत्तींची असा प्रश्न तुमचे विवेचन वाचल्यावर मनात आला. स्वतःमधे बदल घडवणे ही वृत्ती आहे, त्याचा पिढीशी संबंध नसावा. अनेक जुन्या पिढीतील व्यक्तींनीही बदलाची वृत्ती अंगिकारली. शहरात राहिल्यामुळे ती अनंताच्या अंगात आली. हे तुमचे म्हणणे पटले. -आत्मविश्वासाची जागा आता निराशेने, मनस्तापाने घेतली आहे- हे वाक्य अगदी चोख.

दिलिप बडे: माघारा,सदुभाऊंनी 30वर्षापुर्वी गावसोडुन दुसऱ्या गावात स्थलांतर केले.30वर्षानंतर ते मुळगावी परतले.किंवा ते काळाची पावले ओळखु शकले नाहीत.येथे आयुष्याच्या शेवटी विचार करता,प्रत्येक व्यक्ती काही निर्णय घेते,काही निर्णय घेत नाही,काही निर्णय परिस्थितीवर सोडुन देते,निर्णय प्रक्रियेत अनुकुल-प्रतिकुल-अनपेक्षित-अपेक्षित परिणामाला व्यक्ती सामोरी जाते.मला वाटते,निर्णय प्रक्रियेत चुक-बरोबर-यश-अपयश हे परिणाम दिसतात,घटना घडत राहतात.याची जबाबदारी निर्णय घेणार्यावर येत नाही.

अपयशाच दुःख मानु नये.यशाच श्रेय घेऊ नये.

# माणूस नावाचा बेटा – जी ए कुलकर्णी - हिरवे रावे

सुनीळ सामंत: माणूस नावाचा बेटा – लेखक- जी ए कुलकर्णी , कथासंग्रह- हिरवे रावे

जवळपास 35 पानांची ही कथा तीन ओळीत सांगता येईल. दत्तू जोशी नावाचा शिक्षक, शाळा सुटल्यावर घरी जायच्या ऐवजी सवयीने क्लब मध्ये जातो. पैसे नसल्यामुळे तिथे काही न करता घरी जातो, जेवतो आणि झोपतो. एवढीच ही कथा आहे. खरंच.

जीएंच्या कथां भोवती वेगवेगळी वलयं आहेत काही कथा अद्भुत रस. काही कथांमध्ये अध्यात्म. काही कथांमध्ये व्यावहारिक जीवनातील ओढाताण, दुःख यांचे चित्रण असते. ही कथा या सर्वांना अपवाद आहे. ही कथा वाचताना मला अल्बेर कामू यांच्या नोबेल प्राईज मिळालेल्या द आउटसाइडर ची आठवण झाली. त्याही कादंबरीमध्ये घडत काहीच नाही. कथानायक वेगवेगळे अनुभव टिपत असतो, आणि ते अनुभव टिपताना स्वतःला येणारा अनुभव सुद्धा टिपत असतो. आणि स्वतःला येत असणरा अनुभव टिपताना तो स्वतःच्या मनातले विचार टिपत असतो.

या कथेमध्ये कथानायक दत्तू जोशी असला तरी जवळपास डझनभर व्यक्तींच्या कथा आहेत. शांता दीक्षित ची बहिण (दत्तूला रुमाल देणारी, व लग्नानंतर आत्महत्या करणारी) सुलभा, लोचट सुपरवायझर इंगळे , शाळा सुटल्यावर मीटिंग घ्यायला आलेले मदलूर, सासऱ्याच्या जीवावर जगणारा पण अल्सेशियन कुत्र्यावर प्रेम करणारा नाईक, दत्तू जोशी ची नवऱ्याने टाकलेली मूल न होणारी बहीण, काही वर्षामागे व पौंडामागे सुंदर दिसणारी वसंत कुमारी साठे, मराठीतील चरित्रे, एकेकाळी भरपूर पैसा कमावणारे व तो तसाच उडवणारे गणपत नाना, डाव जिंकता जिंकता

हरलेला, सकाळीच मुलगा वारला असताना संध्याकाळी रमी खेळायला आलेला मोरे, बदफ़ैली वासंती पोतदारशी प्रेमविवाह केलेला केळकर, पैशाची अडचण असतानाही कायम उच्च विचार व सात्विकता जागवणारे शास्त्री बुवा, दत्तूची तक्रारखोर बायको सुधा आणि द्वाड मुलगा मोहन आणि मुलगी बेबी, मिरची भजी विकणारी टंच बाई, कधीही न चिडणारे दत्तू चे वडील - दादा, दत्तूच्या अपरोक्ष त्याच्या बायकोबरोबर गप्पा मारायला येणारा माधवराव, महारोगी भिकारी व त्याची गरोदर बायको, समोरच्या चाळीतली चवचाल इंदिरा या आणि इतर अनेक अनेक कथा या कथेमध्ये आहेत. त्यांचा एकमेकांशी काहीही ताळमेळ नाही. दत्तू त्या कथांना अनुभवतो, पण कोरडा राहून. Outsider राहून.

या कथेमध्ये दत्तू जोशी चे एक आक्रस्ताळे तत्त्वज्ञान मांडलेले आहे. सर्वसाधारण मध्यमवर्गीय मूल्यांना बेधडकपणे छेड देणारे हे तत्त्वज्ञान आहे. हे केवळ दत्तू जोशी चे तत्त्वज्ञान आहे की दत्तू जोशी च्या आडून जीए या समाजाला फटकावत आहेत ते समजणे अवघड वाटले. मराठीतील चरित्रांबद्दल लिहिलेले मला पटले. स्त्रियांबद्दल लिहिलेले मला पटले नाही. दत्तू जोशीला सर्वच स्त्रिया (स्वतःची बहिण सोडून) बदफ़ैली का वाटतात किंवा अनुभवाला येतात?

एकूणच ही कथा गोष्ट बरीचशी दुर्बोध आणि असंबद्ध वाटते. त्याचबरोबर त्या काळातील आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या प्रकारचे लेखन होत होते त्या स्तरावरची वाटते. आणि तरीही सर्वसामान्य विचारी माणसाची संध्याकाळ जशी असंबद्ध घटनांची मांदियाळी असते तशी आहे. यात काहीही घडत नाही आणि तरीही बरेच काही घडत असते. काहीही सांगितलेले नाही आणि तरीही बरेचसे म्हटलेले असते. 35 पानांची ही कथा वाचायला मला चार दिवस लागले. या ग्रुपवर चर्चा करायची म्हणून ही कथा यावेळी इतक्या नेटाने वाचली. अन्यथा चाळत असे. या कथेवर या चार ओळी लिहायला मला दोन दिवस लागले. तरीही खरे सांगायचे तर मी काही लिहिलेलेच नाही मी उत्सुक आहे इतर जाणते लोक काय लिहितात ते वाचायला.

संजीव सावरगांवकर: या कथेवर काही लिहावे असे वाटत नाही. नुसता फाफटपसारा आहे. ह्या कथेला लघु कथा म्हणता येणारच नाही. एक नाट्यगीत ही सर्व कथा सांगून जाते. गीता मध्ये थोडे शब्द इकडे तिकडे केले तर एकदम फिट बसते.

संजीव सावरगांवकर: मी मंगेश पत्की यांच्या मताशी 100 % सहमत.

जी. ए. यांचे 2 September 1959 चे पत्रच कथेचे बाबत बरेच सांगून जाते. त्यामुळे त्यावर (कथेवर) वेगळे काही लिहिता येईल ही शक्यता धूसर आहे. उगीच ओढून ताणून लिहिण्यात अर्थ नाही हे माझे मत.

सुनीळ सामंत: जीए उगीचच काहीबाही लिहितील असे मला वाटत नाही. त्यामुळे मी इतक्या टोकाची प्रतिक्रिया देणार नाही.

कामू, काफ़्का, द टिन ड्रम (लेखक आठवत नाही) अशा नावजलेल्या व नोबेल विजेत्या लेखकांचे १९६० ते १९८० मधील लेखन मी स्वतःला खूप ताण देऊन वाचले. तेव्हाही मला हेच वाटले होते. बहुधा या प्रकारच्या (abstract art शी जवळिक साधणाऱ्या) साहित्याला जागतिक बाजारात वाचक वर्ग असेलही. त्या तऱ्हेची ही कथा मला वाटली. जीए जर जागतिक स्तरावर पोहोचले असते तर कदाचित याच कथेला डोक्यावरही घेर्तले गेले असते. जे माअ पचत नाही ते वाईट असे म्हणणे मला जमत नाही.

तरीही तुमच्या प्रतिक्रियेचा आदर आहे.

राहिले जीएंचे. तर जीए स्वतःच्या कथेची कधी तारीफ़ करतील असे वाटतच नाही. निव्वळ भिड म्हणून नव्हे तर एक वृत्ती म्हणून ते लेखन संपल्यावर त्यापासून अलिप्तच होत असावेत.

महेश आफळे : या कथेवर आता काहीही लिहावेसे वाटत नाही , त्याचे कारण एकच

आतापर्यंत या कथेवर आलेल्या प्रतिक्रिया..

नंतर कधीकाळी व्यक्त होईन कदाचित

सुनीळ सामंत: अजून तर एकच प्रतिक्रिया आली आहे.

तुमची प्रतिक्रिया महत्वाची आहे.

या कथेवर जास्तीत जास्त लोकांनी व्यक्त व्हावे ही इच्छा आहे. तुम्ही तर व्हावेच.

महेश आफळे : एकच लिहितो,ही कथा म्हणजे जी एं चे वास्तवाधिक काल्पनिक आत्मकथन या अंगाने कथा वाचून बघणे

सुनीळ सामंत: Surrealistic Fantasias autobiography हा इंग्लीश, फ्रेंच व डच वाङ्मयातील मधील फ़ार गाजलेला प्रकार आहे.

त्याला मराठीत काही काळ चंगले दिवस आले. चंद्रकांत खोतांच्या पहिल्या दोन कादंबऱ्या त्या प्रकारच्या होत्या. पण काही सीमित वाङ्मयीन वर्तुळांच्या पलिकडे ते जाऊ शकले नाही.

व्यक्तिशः मलाही हा प्रकार समजत नाही. पण जीएंना त्यात पुढे वाव मिळता तर त्यांनी तो प्रकार आणि त्या प्रकाराचा वाचकवर्ग निर्माण केला असता.

महेश आफळे : लेखक काय सांगू पाहतोय हे एकवेळ वाचकाला नाही कळले तरी चालू शकते,

अनेकार्थ ही समजू शकतात

पण लेखनाचा चुकीचा/विपरीत अर्थ लावला जात असेल तर लेखक काहीच करू शकत नाही

आणि

चुकीचा विपरीत हे सापेक्ष शब्द आहेत

काम्युचे Outsider पूर्वी वाचलेले आठवते

पण त्यात उफराटेपणा सोडला तर साहित्यिक मूल्य काहीही नाही

पण पुस्तके गाजतात, गाजवली जातात

आणि आपला समाज तर वर्षानुवर्षे ऑस्कर,नोबेल,,ग्रामी आणि (ज्ञानपीठसुद्धा) यातच अडकला आहे

परमजित सिंग: जी ए च्यन कथा वर जेव्हां पासून चर्चा चालू आहेत मी आतुरतेने माणूस नावाचा बेटा ही कथा केव्हां घेणार याची वाट बघत होतो. पण मी आज ह्या कथे बद्दल आपनची विचार वाचून हादरून गेलो. खर म्हणजे मी बाहेर गावी असल्यामुळे ३० तारखेला नांदेड ला आल्या वर लीहणार होतो, आणि लिहीन ही पण मी इतका अस्वस्थ झालो की एक दोन गोष्टी आज मांडणार आहे. जी ए chya सर्व कथा आती उत्तम आहेत समजा कोणी जर अस काही विचार केला की जी ए chya ५ बेस्ट कथा चे क्रम लावा तर माणूस नावाचं बेटा त्यात नक्की असेल.

आपल्या सर्व जातीच्या लोकांच्या धर्म ग्रंथात जेवढी शिकवण मिळ नाही तेव्हढी ह्या एका कथेत मिळते.मी हजार वेळेस ही कथा वाचली. काय नाही ह्या कथेत.जी ए नी ही कथा फार सुरवाती ला त्यांचे वय फार कमी होते तेव्हां लिहिली आहे.मी ह्या वर खूप काही लिहणार आहे. पण आज एक लाईन सांगतो....

महेश आफळे : तथाकथित वास्तव जगाच्या वारंवार कानफटात मारणारी ही कथा आहे

माझी अतिशय आवडती..

जी एं ची बरीच वाक्ये ही संबंधितांना "शालजोडीतले"असतात

हे लक्षात घेतले पाहिजे

विश्वेश्वर नांदेडकर: माणूस नावाचा बेटा हे जी ए क्या कथांचा सार काढणारी कथा आहे असे म्हणायला हरकत नाही. वास्तव पत्रे घेवून प्रत्येकाची वेगळे वैशिष्ट घेवून येते ही कथा , आणि त्यातील प्रत्येक पात्र आपण अनुभवलेले आहे. दत्तू नापास झाला तरी त्याच्यावर न रागवणारे वडील माझ्या डोक्यात इतके पक्के बसले की चाळीस पंचेचाळीस वर्षे झाली तरी आजुन ही ते मनातून जात नाहीत. या कथेला दुर्लक्षित करण्यासारखी नक्कीच नाही. आपल्याला जी ए च्या काल्पनिक विश्वातल्या कथा एवढ्या भारावून टाकतात की त्यांनी वास्तव जीवनातील पत्रणानी त्यातील कथा यांना थोडे दुर्लक्षित करत आहोत असे माझे मत झाले आहे.

काल्पनिक विश्वात स्वैर संचार करत येतो. पण जी ए ची वास्तवातील patre जास्त जिवंत आणि आपल्या रोजच्या जीवनाशी निगडित त्यांची सुख दुखे मला जास्त भावतात

मी पण कथेवर सविस्तर लिहिणार आहे

महेश आफळे : गुंतवळ कथा आकारहीन आहे अशी टीका झाली
जी एं ना ती आकारहीन च आहे हेच अभिप्रेत होते
पण गुंतवळीला आकार नसतो हे लक्षात तरी घेणार कोण
जी एं नी पत्रात या कथेबाबतही स्वतःकडे कमीपणा घेतला तोही व्यंगार्थानेच

विश्वेश्वर नांदेडकर: खरे आहे. मी ही वाचले आहे ते पत्र.

जी ए चे जवळचे मित्र ग्रेस जसे कविता आणि त्याचा अर्थ कोणाला समजाऊन सांगण्याच्या भानगडीत पडत नसत तसेच जी ए यांनी पण दोन चार कथा सोडल्या तर जास्त विवेचन कधीच केले नाही त्यांच्या कथांचे

विश्वेश्वर नांदेडकर: पस्तीस पानाची कथा ती सुद्धा जी ए यांनी कमीतकमी दोनदा वाचून प्रकाशनाला दिल्यावर ती दुर्लक्षित करण्यासारखी नक्कीच नाही

मनमोहन आंबेकर: कदाचित तुलना योग्य नसेलही.
एका बंगाली सिनमाचे परिक्षण वाचल्याचे स्मरते.
मराठीत सिनेमाच्या नावाचे भाषांतर " तीला ऊशीर का होतो "
चाळीत राहणारी एक मुलगी रात्री दोन वाजले तरी घरी आलेली नसते.
या वर सर्व मंडळी आपापले तर्क सांगतात. सिनेमा संपतो.
प्रत्येकाच्या प्रतिक्रिया , विचरांची दिशा दाखवून देणे हाच सिनेमाचा हेतू.
जागते रहो हा RK बँनरचा चित्रपट याच थीम वर होता.

एकदा एम्. एफ्. हुसेन , यांचे जहांगीर आर्ट गँलरी मध्ये चित्रांचे प्रदर्शन होते. नाव "Black And White. "

सर्व हॉलमध्ये पेपरची रद्दी पसरलेली होती.

त्याचा अर्थ कोणालाही समजला नाही व त्यांनीही सांगितला नाही.

हेच Abstract किंवा Absurd असावे.

तसे पाहता जी एंच्या कोणत्याही कथेला लौकिक अर्थाने कथानक असत नाही.

त्यातील सूचित वा गर्भित अर्थ , सादरीकरण मौलिक.

दिलिप बडे: लौकिक अर्थाने जी.एं च्या कथेला कथानक असत नाही.हे खर आहे.दाही दिशांना स्पर्शून येणारी-प्रवाही कथा हे जी.एं.च्या कथेच वैशिष्ट्य.

विलास वाघोलीकर: माणूस नावाच्या बेटा

प्रतिसाद -

- जीए कुलकर्णी यांच्या काही कथांमध्ये घटना कमी घडतात.पण अशा कथांमध्ये परिस्थिती चे, वातावरणाचे सूक्ष्म वर्णन असते. व वाचकाला ती परिस्थिती आपल्याला वेढून टाकत आहे, असे वाटते. पडदा, गुंतवळ, मुखवटा, पडदा....ही काही अशा कथांची उदाहरणे सांगता येतील. माणूस नावाच्या बेटा - यामध्ये हायस्कूल शिक्षक, दत्तू जोशी याचे फिरणे व त्याच्या मनातील संज्ञा प्रवाह, म्हणजे विचारांचा प्रवाह क सा जाणीवेत व अंतः मनात वहात असतो, त्याची परिस्थिती दाखवली आहे.

- कथेवर अस्तित्ववादाची छाया आहे. "man is an island" माणूस हा बेट आहे. बेटाप्रमाणे तो विश्वामध्ये उपरा अलग आहे त्याचा प्रत्येक निर्णय स्वतंत्र, अलग, असतो. व तो निर्णय त्याला एकाकीपणाने , अटळपणे घ्यावा लागतो. माणसाचे जीवन स्वतः तयार केलेले कमी असते. तर ज्यावर आपले नियंत्रण नाही,

त्या बाह्य परिस्थितीत घडत असते. त्यामुळ माणूस जगाकडे साक्षी भावाने पाहू शकतो.या विचारसरणीचा (व सुधारित नियतीवादाचा) प्रभाव जीएंवर होता.

- जीएंच्या निधनानंतर त्यांच्या पत्रांचे चार खंड प्रसिद्ध झाले आहेत. त्यात ललित निबंधासारखी अनेक पाने आहेत. त्यातून जीएनी आपले अनेक विषयावर विचार मांडले आहेत.माणूस नावाच्या बेटा सारख्या कथांवरूनही त्यांचे अनेक विषयांवरील दृष्टीकोण स्पष्ट होतात.

- एका लहान गावात दत्तू जोशी, हा हायस्कूल मधील शिक्षक रहात असतो. तो संसारी आहे. बायको व दोन मुली यांच्या सोबत रहात असतो. ही शाळा व मुलेही मागासलेली असतात.दत्तू ला सर्व गाव, त्यातील माणसे माहित असतात. दत्तूचे वाचन चांगले असते. त्याला माणसांचे विचार अभ्यासपूर्णरीतीने ओळखता येतात. त्यांचे काही खालील विषयांवरील विचार कथेत व्यक्त झाले आहेत -

- मुंग्यांची रांग घाईघाईंचा अनिवार्य प्रवास करत असते. हे मानवी जीवनाचे सूचक वर्णन आहे.

- शाळेतील खोडकर, अभ्यास टाळणारी मुले दाखवून आताच्या शिक्षण व्यवस्थेवर विचार माडले आहेत.

- झोपडीतील हॉटेलमध्ये बटाटेवडे खाणे तटस्थपणे दाखवले आहे. माणसांच्या हावरेपणावर भाष्य आहे

- माणसाची वादळी वासना व त्याचे परिणाम दाखवले आहेत.

- वसंतकुमारी चरित्रे लिहीते. ही नव लेखक आहे. त्यावरून , चरित्र, आत्मचरित्र यांवर परखड मते मांडली आहेत.

- भिकाऱ्याची मुले, व त्यावरून " लेकुरे उदंड झाली" हा प्रश्न दाखवाला आहे.

- रमी, त्या खेळातले बारकावे, त्या खेळाची व जीवनाची समानता दाखवली आहे. इत्यादी. हे कोरडे विचार दाखवले नसून कलात्मक रीतीने, त्यामधील भावना, नाजूकता दाखवली आहे.

- या सर्व बिंदूंना छेदणारे विशाल वर्तुळ कोणते, असा प्रश्न दत्तूला पड़तो. या सर्वात, देव असेल तर, त्याची भूमिका काय असेल, यावरही परखड विचार मांडले आहेत.

- कथेतील दत्तूचा प्रवास व त्याला भेटलेली माणसे यांचा (खाली दिलेला)आलेख हा विचार करण्यासारखा आहे. -

वर्ग - शेवटचा तास - शाळेची इमारत व शाळेचे रूप - स्टाफ रूम - बाहेरचा रस्ता - (नाईक भेट) - हॉटेल - रामेश्वर रस्ता - बुकस्टॉल - (वसंतकुमारी भेट) - क्लब - (गणपतराव भेट) रमी - रस्ता - केतकरशास्त्री भेट - रस्ता -पाऊस - घर (वडील आठवणी) - जेवण -झोप

- कथा खूप मोठी आहे. पण मनातील विचार लेखकाने सहजपणे ओतले आहे. रमीच्या कार्डसप्रमाणे त्यात सिक्वेन्स दिसला नाही, तरी जीवनाचे असंबद्ध रूप जीएंना दाखवायचे आहे.

- धन्यवाद. - विलास वाघोलीकर

संजीव सावरगांवकर: नमस्कार, आपला कथेवर लिहलेला प्रतिसाद हे योग्य विवेचन आहे यात शंका नाही. त्यात आलेले कथेतील संदर्भ ही तुम्ही थोडक्या शब्दात प्रतीत केले आहेत. कथासार सर्व कथा स्पष्टपणे उलगडून दाखविते. तरीही तुम्ही म्हणता त्याप्रमाणे कथेत sequence नाही व त्यामुळे कथा विस्कळित वाटते, संदर्भ लागत नाही असे होते. कथेत पुढे काय या उत्सुकतेने वाचक कथा वाचतो पण हातात चाळणीतून पाणी आणण्या येवढे ही साहित्यिक सुख मिळत नाही. परिणामी कथा अनेक छोट्या छोट्या प्रसंगाची मालिका बनते. अर्थातच हे माझे मत. दत्तू,

वर्तुळ, वर्ग या बाबतीतील तुमची विचारधारा पटली हे मात्र 100 % खरे. शेवटी प्रत्येकाला कथा कशी भावली, आवडली व कुठल्या perspective मधून वाचली हेच महत्वाचे ठरते. विलास जी धन्यवाद. 🙏🏻

सुनीळ सामंत: बरोबर. या कथेवर चर्चा जास्त करावी

माणूस नावाचा बेटा या नावापासूनच या कथेचे वेगळेपण लक्षात येते. जीएंच्या फारशा कथां ची नावं एकाहून अधिक शब्दात नाहीत. दुसरे म्हणजे माणूस नावाचे बेट आणि माणूस नावाचा बेटा हे काहीतरी वेगळे आहे एवढे नक्की जाणवते. या कथेवर वेगवेगळ्या प्रतिक्रिया अपेक्षित आहेत. काही वेळेला त्या टोकाच्याही असण्याची शक्यता आहे. या ग्रुप वरील लोकांची समज सर्वसाधारण वाचकाहून वरच्या दर्जाची असण्याची शक्यता गृहीत धरून आपण चर्चा करावी व्यक्तिगत गैरसमज टाळावे. चर्चा मनमोकळी असावी.

महेश आफळे : घोडे पळतात-पळून जात नाहीत

माणसे जगतात

पण अभावानेच जिवंत असतात

माणूस नावाच्या बेट्याचे हेच ते भागधेय

शिक्षक दत्तू जोशी आपल्या आयुष्यातून मेलेला भाग काढत जातोय या कथेत

विलास वाघोलीकर:. 🙏

सुनीळ सामंत: ◌@ परमजित सिंग आपण या कथेवर लिहिण्याची नक्की वाट पाहू.

सुनीळ सामंत: कथेत सिक्वेन्स नसणे हे रमीच्या सिक्वेन्स नसण्याच्या जवळचा दृष्टांत आहे. या अर्थाने पुन्हा एकदा कथा वाचतो आहे.

महेश आफळे : जी एं नी सर्व प्रचलित साहित्यिक साचे चुरगळुन टाकून आपली कथा लिहिली(मोडतोड नव्हे)

चूरगळलेला बोळा पुन्हा सरळ करून त्याच त्या साच्यात त्यांच्या कथेला कसे काय बसवता येईल??

हे प्रश्न फारच अभावाने पडलेले दिसतात इथे

म्हणून तर मी गुंतवळ कथेचा मुद्दाम उल्लेख केला होता मागे

भोवतालच्या सर्वसर्वत्र पसरलेल्या बोचऱ्या विसंगती तुन सुसंगतीचा भासप्रत्यय देणे एवढेच खऱ्या साहित्याचे एकमेव प्रयोजन असते

सुनीळ सामंत: विचार करण्यासारखे वाक्य आहे

''माणूस नावाचा बेटा' या कथेवर अनेक जणांचे लेखन बाकी आहे. श्री परमजीतसिंग हे आज लिहिणार आहेत. इतरांनीही लवकरात लवकर लिहावे ही विनंती.

परमजित सिंग: माणूस नावाचा बेटा हया कथे बद्दल लीहताना सूनिळजी एका फटक्यात कथा किती बेकार आहे दतू जोशी नावाचा शिक्षक शाळेला जातो फिरतो व घरी जाऊन झोपतो. अरे वाह क्या बात है.

परमजित सिंग: तुम्ही लिहले आहे की बहिणी सोडून बाकी बायका बदफैल का वाटतात, त्यांनी दोन चार बायका बद्दल अस लिहिले आहे त्यामुळे जगातल्या सगळ्या बायका तश्या होत नाहीत. आपण पुरुष कोणते धुतल्या तांदळसारखे

आहोत. कथेत अस लिहतात की. दोन आण्याची भजी घेताना धुवट कपड्यातील धिप्पाड मने रेंगाळत जवळ मोड असताना उगीच नोटा मिरवत व जास्त हवरी होऊन बोट फिरत. टीव्ही वर एक अड येते तिथे एक जण एका महातरीला रस्ता दाखवत असतो पुढून एक सुंदर स्त्री येत असते तिला पाहून त्या महातरील उलट फिरवतो. आणि आपण man will be man अस म्हणून पुरुषाचे गोडवे गातो. १०० तली एखाद दोन स्त्रिया अश्या असतील नसतील पण पुरुष २०० टक्के लंपट असतात

असो आत्ता कथे विषयी. ह्या कथेतील एक ही लाईन अशी नाही की मी ती सोडून दुसरी लिहू.मिरची भाज्या चा तेलकट कागद एका आईने मुलाला लिहलेले पत्र असते पाणी ओढण्याचे श्रम होत नाही दोन चार रुपये पाठवत जा.ही आई कौन असेल

आता अस खूप काही आहे मी जे फार पूर्वी underline केलेल्या लाईन पाठवतो कदाचित सुनील जी ना कळेल की दातू फिरून येऊन झोपतो. ह्या काही अश्य लाईन आहेत असे विचार आहेत की त्या वयात जगात ला कोणता ही लेखक असे विचार केला असता.

दत्तू फिरून येऊन झोपत नाही प्रत्येक गोष्टी वर विचार करतो. एकदा पुन्हा वाचा.ही कथा

# मुक्ती - कथासंग्रह: पिंगळावेळ.

संजीव सावरगांवकर: कथा: मुक्ती

कथासंग्रहाचे नाव: पिंगळावेळ.

माणूस दोन मुख्य गोष्टींचा मिळून बनतो हे शाश्वत सत्य आहे. त्यातील एक आहे त्याचं मरण धर्मा शरीर आणि दुसरे आहे त्याचा अमृत आत्मा. शरीरात आत्मा असल्यामुळेच शरीर शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहते. तर असे हे शरीरही दोन स्तरांवर कार्य करत असते. एक म्हणजे त्या शरीराच्या मनाच्या इच्छापूर्ती करता शारीरिक आयुष्य जगायचे किंवा दुसरे आत्म्याला मोक्ष मिळण्याकरता, अंतरात्म्यात विलीन होण्याकरता साधना करायची. याला माध्यम म्हणुन शरीर लागतेच. आपल्या मुक्ती या कथेमध्ये "मोक्ष" मिळण्याकरता कोणतेही पात्र प्रयत्नशील नाहीये, नव्हे ती त्यांची इच्छा ही दिसत नाही. त्यांना सर्वांना पाहिजे आहे "शारीरिक स्तरावरची मुक्ती". शरीराला दुःख नसलेली मुक्ती, वेदना संपवणारी, शरीराची अभिलाषा ठेवणारी मुक्ती आणि ती मुक्ती मिळण्याच्या क्षणाला टाळणारी त्यांची, त्यांची नियती म्हणजे ही कथा होय.

जी. ए. यांच्या लेखनाचे मर्म असे आहे की ते पात्रे निर्माण करतात, प्रसंग ही निर्माण करतात, त्या त्या पात्राला त्याचे त्याचे आयुष्यातील एखादे कोडं सोडवण्याचं गहन प्रश्न ही तयार करत असतात. ती कोडी आपण वाचक म्हणून समजावून घेत असताना कथेमध्ये पूर्णतः गुंतत जातो आणि शेवटी अशा चौकात येऊन पोचतो की कोड्याचे पुढे काय होते? ते कोडे कोणाला होते? त्याचे उत्तर काय? अन ते उत्तर कसे शोधायचे? आपण विचार करू लागतो. प्रत्येक वेळी नवे नवे विचारांचे घुमरे फुटतात आणि मग आपण ती कथा परत परत वाचायला सुरुवात

करतो. आशय समजून घेण्यासाठी, कथा समजून घेण्यासाठी, त्यातील कोडे उलगडण्यासाठी.

जीएंच्या त्यांच्या लेखन विचारप्रणाली प्रमाणे त्यांनी "जे लिहिले ते लिहिले आहे, हेच खरे, कारण की त्यांचा नियतीवर विश्वास आहे. त्यांची ही नियती कधीही चांगले लिहित नाही, सुंदर लिहित नाही, आणि यशस्वी ही लिहीत नाही. तिचा लेख नेहमी वाईट, कुरूप व अपयशीच असतो. तिच्या म्हणजे नियतीच्या लेखी जीवन व मरण यात फरक काय? हाच प्रश्न कायम असतो. या कथेत नियती कायम दबा धरून बसलेली आहे. तिच्या दृष्टिपथात जो येतो त्याच्या माथी टप्पा घालण्याचे कार्य ती इमानेइतबारे करते.

या कथेचे मध्ये एकलव्य द्रोणाचार्य व दासीपुत्र यांचे ऐतिहासिक, पुराण कालीन, अपरोक्ष संदर्भ दाखवून कथेचा कालपट पुढे नेला आहे. त्याच मागील इतिहासातून धडे घेऊन, शिकून, चुकांची द्विरुक्ती होणार नाही याची काळजी घेत वीरांग व्याधचा मुलगा शिवांग , एक उत्कृष्ट डावखोरा धनुर्धारी तयार होतो. आचार्यांची पहिली भेट, 10 च्या 10 मासे वेधण्याचे कौशल्य त्यांना सांगत असतो. त्याच वेळेस आचार्य तयाचा उजव्या हाताचा अंगठा गुरूदक्षिणा म्हणुन कपटाने मागून घेतात. पण त्याच्या एका अर्धवट कृत्यामुळे तो आजन्म रक्तपिती घेऊन रानोमाळ हिंडत राहतो आहे. आपल्या गुरुवर्य आचार्यांना सर्प दंश करेल म्हणुन त्यांचा जीव वाचवतो. तेंव्हाही त्याला आचार्य बोलतात व तो अति शीघ्रकोपी असल्यासारखा आचार्य यांवर धनुष्य फेकून मारतो व या भ्रमात राहतो ते आचार्य मृत्यु पावले आहे. मात्र आचार्यांना नियती दोन दिवस जगण्यास मदत करते ती त्या दासी पुत्राच्या रूपाने. आचार्य यांना दासी पुत्राच्या कडून कळलेल्या गोष्टीतून उपरती होते होऊन देवांग ने आपला प्राण वाचवला आहे हे कळते. ते त्याला उःशाप देतात "जर माझ्या मुलीने पितृ हत्येची अपराध विसरून त्याच्यावर क्षमाशील नजर फिरवली तर तो शापमुक्त होईल". म्हणजेच रक्तपिती मधून त्याला मुक्ती मिळेल.

आचार्य सुद्धा शीघ्रकोपी, कोत्या मनोवृत्तीचे, स्वार्थी माणूस होते हे कथेतून कळतेच. त्यांना त्यांच्या मृत्यूमुळे मुक्ती मिळते. पण ती शारीरिक स्तरावरती होते.

शिवगाची कथा बैरागी म्हणजे दासीपुत्र ऐकून घेतो. त्याच्या स्वतःचे झालेली आयुष्याची होळी, दुर्लक्षित माणूस म्हणुन अत्यंत व्यथित मनाने सांगतो. त्याचेही त्याच्या जगण्याचे एक वेगळे तत्त्वज्ञान त्याच्याजवळ होते. परंतु तत्कालीन समाजाला ते अमान्य होते, स्वीकारार्ह नव्हते आणि म्हणुनच तो (कदाचित) बैरागी होतो. (?) आणि तरीही त्याच्या स्वताच्या मृत्यूपर्यंत आयुष्य जगण्याची नियती त्याच्या कपाळी असल्याने त्याला आयुष्यभर पडलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यावर त्याचे समाधान होते. मग तो आपले जीवन कार्य संपवण्याचा संकल्प अत्यंत निश्चल व निर्मळ मनाने, जगण्याची कोणतीही आसक्ती न ठेवता देहत्याग करुन तो त्याच्या पुरती मुक्ती मिळवतो.

तिकडे शिवांगा ने भीरकवलेले धनुष्य आचार्यांच्या डोक्याला लागले व ते खाली पडले व त्या क्षणी तो धावत सुटला घरी ही …

सुनीळ सामंत: माणूस दोन मुख्य गोष्टींचा मिळून बनतो हे शाश्वत सत्य आहे. त्यातील एक आहे त्याचं मरण धर्मा शरीर आणि दुसरे आहे त्याचा अमृत आत्मा. व्वाह सर. यापुढच्या ओळी वाचण्यापुर्वी तुमच्या या क्रिस्प वाक्याला दाद देतो.

संजीवजी. सलाम. मूळ कथेइतकेच तुमचे विवेचनही अत्यंत वाचनीय झाले आहे. तुम्ही जीएंच्या लेखणीचे मर्म समजण्यात फ़ार मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला आहात हे तुमच्या या कथेच्या अनुषंगाने तुम्ही जीएंच्या एकूणच लेखनाबद्दल जे लिहीले आहे त्यातून जाणवले.

सा विद्या या विमुक्तये- या वचनाप्रमाणे सा कथा या विमुक्तये असे जीएंच्या कथेवरून म्हणता यावे इतकी ही कथा मुक्त विचारांची आहे. यात जितके सांगितले आहे त्याहून अधिक वाचकाला स्वतःचा विचार करायला उद्युक्त केले आहे. या

कथेतून प्रत्येक वाचक आपल्या मगदुराप्रमाणे आणि कलाप्रमाणे विचार घेऊ सकतो आणि त्याहून महत्वाचे म्हणजे आजवर जपलेल्या विचारांना स्वतःच आव्हानही देऊ शकतो. मराठीतच नव्हे तर जागतिक वाङ्मयात असे प्रश्नांचे वादळ निर्माण करणारा लेखक मला माहित नाही. (माझे बऱ्यापैकी वाचन आहे आणि अगदी प्रयत्नांनी मी सुमारे पन्नासेक नोबेल लेखकांची पुस्तके विकत घेऊन संग्रही ठेवून वारंवार वाचली आहेत). सहसा प्रत्येक लेखकाची स्वतःची एक विचारशैली असते आणि तो विचार प्रसार करण्याचे काम त्याचे साहित्य करते. सहेतुक वा निर्हेतुक. पण प्रत्येक लेखकाला एका साचेबंद विचारात मोजता येऊ शकते. तसे जीएंचे होत नाही. त्यांच्या एका कथेतून मांडलेला विचार ते दुसऱ्या कथेत खोडून काढतात आणि मुक्तीसाख्र्या कथेते तर अनेक विचार एकमेकांवर भाल्यांप्रमाणे भिरकावतात.

उदा. रिकामा चौथरा, प्रवासाला हेतू न मिळाल्यामुळे एका जागी रहाणे, पट्टी बांधून अंध होणे यातील चूक व बरोबर, डाव्या हाताने धनुष्य चालवण्यामागचे तत्त्व, विदुराची वेदना, आईचा शाप आणि उःशाप, तिचे वाऱ्यापरमाणे येऊन अरण्यासारखे बोलून आगीला समर्पित होणे, बैराग्याचा देहत्याग, शिवांग आणि गुरुकन्येचा संवाद, तिचे अंध असणे, त्याचे कोरडे डोळे ओले होणे या सर्वांतील प्रचंड विरोधाभास वाचताना थक्क व्हायला होते.

जीएंच्या सर्वोच्च कथांपैकी एक मुक्ती आहे. तिला जीएं व्यतिरिक्त कोणीही लिहू शकला नसता. माझे असे मत आहे. इतरांची मते ऐकायला मी उत्सुक आहे.

विलास वाघोलीकर: संजीवजींनी या कथेचे चांगले, मुद्देसूद प्रास्ताविक केले आहे. याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

ही कथा आव्हानात्मक आहे.जीएंचा महाभारत इत्यादी प्राचीन कथांचा उत्तम अभ्यास होता व त्यांच्याकडे प्रतिभाही होती. त्यांचे प्रतिबिंब या कथेत दिसते. एकलव्याची कथा प्रसिद्ध आहे. त्यामधील दुः ख जीएंनी टिपले आहे. इच्छा

असूनही हवा तो गुरू व शिक्षण न मिळणे हे दुःखदायक आहे. पण स्वअभ्यासाने शिक्षण मिळवल्यावर ते मातीमोल होण्यासाठी गुरुनेच कपट करणे, हे खूपच दुःख दायक आहे. जीएंनी कथेत दाखवले आहे की ,शिवांगाने त्यावर आधीच उपाय शोध ला. तो डाव्या हाताने निपुण धनुर्धारी होतो. ही जीएंची * प्रतिभा* आहे. त्यावेळचे वातावरण दाखवणारे दासीपुत्र बैरागी पात्र कथेत येते. हा विदुराचा अवतार आहे. तो ही विद्वान असतो, सर्वज्ञानी असतो, पण दासीपुत्र असल्याने मागे सारला जातो.

- कथेतील शाप ,उ:शाप हे सुद्धा महाभारताची आठवण करून देतात. परशुरामाने कर्णाला दिलेला शाप, ब्राह्मणाने कर्णाला दिलेला शाप, अश्वत्थमाला कृष्णा ने दिलेला शाप , शिशुपालाला 100 अपराधांची क्षमा होईल, नंतर मृत्यू होईल हा शाप , अर्जुनाला ब्रुहन्नडा होण्याचा शाप , यक्षप्रश्नांना उत्तर देता आले नाही तर मृत्यूचा शाप ,इत्यादी अनेक उदाहरणे महाभारतात असून, त्यामुळे व्यासकथा पुढे सरकली जाते. तसाच उपयोग शिवांगाचा शाप, गुरुकन्येचा शाप व उःशाप दाखवून केला आहे. शाप दिला उ:शापही दिला की , प्राक् कथांमध्ये कोडे उलगडते. जी एंनी पुढचा विचार करून, नियतीचे कोडे इतके सरळ नसते, खूप गुंतागुंतीचे असते, असे दाखवले आहे. उजव्या हाताच्या अंगठ्याने पाणी (तीर्थ ) गुरुकन्येच्या डोळयाला लावायचे असा उःशाप आहे. पण शिवांगाने आधीच उजव्या हाताचा अंगठा गुरुदक्षिणा म्हणून दिला होता हा डायलेमा ( शृंगापत्ती ) येथे दाखवून, जीवनाची पराकोटीची गुंतागुंत समोर ठेवली आहे. याचप्रमाणे आठवण येते -'प्रवासी' कथेत , अकालाला हिरवे रत्न पाहण्याचा उःशाप असतो. पण त्याला हिरवे रंग न दिसल्याने तो उःशाप वाया जातो. एकूण मुक्ती, मोक्ष, निर्वाण हेसुद्धा नशीबात असावे लागते.

- जीएंचे प्राक् कथांवरचे महत्वाचे भाष्य म्हणून ,या कथेकडे पहावे लागेल.

माधव पुराणिक : जीए - कथा 'मुक्ती' (१९७४," पिंगळावेळ")

विवेचक डॉ माधव पुराणिक

" अस्तित्ववादी पात्रांना नियतीने दिलेली मुक्ती"

१ ही कथा मला आवडली कारण यात जीएनीं सर्व पात्रांना पूर्ण सकारात्मक न्याय दिला आहे. समाजातील बहुसंख्य माणसांच्या जगण्याचे एक कडवट,व्याकुळ अटळ वास्तववादी निसर्गचित्र जीएनीं रंगविले आहे.

२ यातील पात्रांना नियती वेगवेगळया प्रकारे मुक्ती देते.शिवांग म्हणतो " आपल्या यमयातना अटळ आणि चिरेबंदी राहिल्या. त्या वेड्या (अनंत आणि) जीवघेण्या आशेतून सुटलो हीच अखेर तुझी माझी मुक्ती ठरली."

(इच्छा + आशा =अपेक्षा,आशा =०, इच्छा पूर्ण स्वतंत्र होते, मग भूतकाळातील आठवणी सोडून दिल्या तर वर्तमानाला दु:खाला कमी करु शकते)

बैरागी ही नि:संग (अमर्याद) हसू लागला व त्याने दरीत अंग टाकून दिले. पण बैरागी ही शेवटपर्यंत अटळ यमयातना व जीवघेणी आशा यांचे भोग भोगत होता. तसेच आचार्य व शिवांगची आई ही सुटली.

३ ही सर्व पात्रे अस्तित्ववादाच्या चौकटीत जगतात.या चौकटीत प्रत्येक माणूस आसपासच्या परिस्थितीला (कुटुंब, गणगोत, समाज, संस्कृती, परंपरा, धर्म इ) सतत आपल्या विचार, भावना,कृती यांच्या क्रिया -प्रतिक्रिया देतो. रूढ मते , मार्ग यापेक्षा त्याच्या मनाला, बुध्दीला पटेल असे वागतो.ही त्याची अस्मिता,अहंकार व अस्तित्व. शिवांग, आचार्य, बैरागी यांची ही स्वतः ची अस्मिता आहे.

पण ही अस्मिता आपल्या इच्छापूर्ती साठी इतर माणसांवर, परिस्थिती वर अवलंबून असते.जसे आचार्य , शिवांग, बैरागी यांचे महत्त्व इतरांनी दिलेल्या मान्यतेवर अवलंबून आहे. यात नियतीने फटका दिला कि (जसे शिवांग अंगठा कापून देतो, आचार्यांना धनुष्य फेकून मारतो, बैरागी समाजात उपेक्षित दासीपुत्र असतो इ) ही माणसे भेलकांडत जातात. मग त्यातून बाहेर पडण्यासाठी अथक, एकदिश प्रयत्न करणे एवढेच त्यांचे जगणे राहते. ते सुध्दा जीवघेणी आशा बाळगून.

४ या सर्वांना आपल्या कुवतीची जाणीव असते. ते अधिकाधिक व्याकुळ व निराश होत जातात. ते स्वतः च निर्णय घेतात पण त्या निर्णयांचे परिणाम त्यांचे आयुष्य हादरवून टाकतात. हे त्यांना दिसत असते. शाप, उ:शाप, एकाकी रानात भटकणे, अघोरी जगणे, भरकटणे हे या कथेत सतत दिसते.

५ माणूस म्हणजेच मनात सतत इच्छा उत्पन्न होणे. जगणे म्हणजे इच्छापूर्ती. बहुसंख्य लोकांची बुध्दी (व मन) प्रतिकूल परिस्थिती व इतर माणसांचा सामना करू शकत नाही. मग आशेवर राहणे व निराशा सहन करणे हेच त्यांचे जगणे होते. याच त्या शिवांग म्हणतो त्या अटळ यमयातनांतून प्रत्येकाची सुटका मृत्यूच करतो.

६ बहुसंख्य माणसांना फक्त या पध्दतीनेच जगावे लागते. कारण इतर मार्ग (साधना, उपासना ,धर्म इ) त्यांच्या बुद्धीला पटत नाहीत.

७ या माणसांना आंतरिक , अव्यक्त,अपार , गूढ शक्ती जाणवत असते.पण तिच्याकडे जायचा मार्ग ते स्वतः शोधायचा अपुरा, दुःखद, निराशाजनक प्रयत्न ते करतात व अखेरीस नियती ते मार्ग उद्ध्वस्त करते व मृत्यूरूपाने मुक्ती देते.

८ यात मला या माणसांचा, पात्रांचा प्रामाणिकपणा, प्रयत्न, स्वतःच्या भावनांशी व विचारांशी एकनिष्ठता, माणुसकी, आशावादी वृत्ती, स्वतंत्र बाणा या गोष्टी आवडल्या.शेवटी प्रत्येकाची शक्ती (आत्मा), शरीर, मन, बुध्दी, मुक्ती , इच्छा यांची कल्पना व कृती करायची कुवत वेगळी असते. ती समाजातील आदर्शांकडे पाहत नसते. तसे होणेही त्यांना शक्य नसते.

९ निसर्गनियमानुसार, स्थळकाळाने, परिस्थितीने, अंगभूत वैशिष्ट्य यांनी दिलेले आयुष्य हे लोक धैर्याने जगतात, आनंद ,समाधान, प्रेम, सुख शोधतात. थोडेफार मिळवतात.आशावादी राहतात. नियतीशी झगडतात. शेवटी अटळ भोग भोगून मृत्यू मार्गे मुक्त होतात.

प्रयत्नांची पराकाष्ठा (प्रयत्नांती परमेश्वर!) असेल तर मृत्यू व अपयश ही जगण्याचे सार्थक करतात. शोक, दुःख, खिन्नता, उदासीनता, निराशा, भय, चिंता, काळजी या सर्वांना पुरुषार्थ, पराक्रम, प्रयत्न,प्रेम तोलून धरतात.

१० सारांश, शोध, धडपड, कष्ट, माणुसकी हेच जगण्यातल्या अटळ यमयातना चुकवू शकतात.

माधव पुराणिक

सुनीळ सामंत: विलासजी. आपण फ़ार उत्तम उदाहरण दिले आहे शृंगापत्तीचे. अकालाच्या उःशापाला जसे कधीव वास्तव होण्याची शक्यता नाही तसेच गुरुकन्या आणि शिवांग यांचे एकेमेकांमुळे झाले आहे.

ही कथा जीएंच्या इतर कथांप्रमाणे नियतीवादी आहे असे मात्र म्हणता येत नाही. निराशावादी मात्र जरूर आहे.

सुनीळ सामंत: पुराणिक सरांनी लिहिलेले पहिलेच वाक्य धक्का देणारे होते. मुक्तीसाठी धडपडणाऱ्या दोघांनाही (शिवांग व गुरुकन्या) मुक्ती मिळाली नाही असाच अर्थ मी या कथेतून (आणि शिर्षकातून) घेतला. याउलट पुराणिक सर म्हणतात- यातील पात्रांना नियती वेगवेगळ्या प्रकारे मुक्ती देते याचा अर्थ पुराणिक सरांचे पूर्ण विवेचन वाचल्यावरच समजतो व पटतोही. यात त्यांना श्रेय तर आहेच पण जीएंच्या पैलूदार कथालेखनाही त्याचे श्रेय जाते. वेगवेगळे ज्ञानी वाचक त्यांच्या कथांतून कसे वेगवेगळे व काही वेळेस विरोधाभासी अर्थ काढतात ते पहाणे रंजक ठरते.

दिलिप बडे: मुक्ती कथेत बैरागी रिकाम्या देव्हाऱ्याची पुजा करतो हे जी.एं.च अध्यात्मिक बंड वाटते.शिवाय बैरागी नैसर्गिक मुर्त्यू ऐवजी आत्महत्या करतो.येथे बैरागी नकारात्मक दृष्टिकोनातुन मुक्ती मिळण्याचा प्रयत्न करतो.

सुनीळ सामंत: हेही वेगळे वाटते. जगण्याला काही कारण सापदले नाही, पण मरण्यालाही कारण सापडले नाही म्हणून जगणे. मरण्याचे कारण मिळणे ही मुक्ती?

सुनीळ सामंत: या कथेच्या गाभ्याशी संबंध नसलेल्या पण अत्यंत मौल्यवान अशा वचनांचा या कथेत भरपूर भाग आहे.

एकदा का एक अन्याय घडला की त्याच वेळी प्रतिकारशक्तीचं एक लाहन बी रुजू लागतं.

डारविनचा सिद्धांत इतक्या सुंदर शब्दांत कोणी सांगितला नसेल.

ज्यावेळी माणसाची किंमत ्याच्या यज्ञ यागावरील प्राविण्यावर अगर बुडबुड्यांमधून आणखी बुडबुडे काढावेत त्याप्रमाणे शब्दछल करत निष्फळ शब्द निर्माण करण्याच्या कसबावर किंवा खुळया धनुर्विद्येतील कौशल्यावर ठरते....

जळजळीत द्वेष मनात असता क्षमा करण्याला काहीतरी अर्थ आहे

सुनीळ सामंत: दिलिपजी म्हणतात तसे या कथेत जीए जागोजागी बंद करणारी वचने पेरत असतात

विलास वाघोलीकर: होय.जीएंचे ते वैशिष्ट्य आहे. प्रसंगाचे - जीवनाचे - सार सांगणारी अशी वाक्ये, थबकून विचार करायला भाग पाडतात. अशी वाक्ये लिहीणारा विचारवंत असतो.ते ' येऱ्या गबाळयाचे काम नोहे'.मत्स्यकन्या, विदूषक इत्यादीत असलेली वाक्ये व जीएंच्या प्रतिमा,कथा भरीव करतात. - शिल्पाकृतींच्या मंदिराप्रमाणे. वाचकांनी आवर्जून अशी वाक्ये सांगीतल्यास तो ठेवा होईल. धन्यवाद. विलास वाघोलीकर

जयश्री जंगले : जी. एं. नी अशी वाक्यं उगीचच शब्दरचनेचा हव्यास म्हणून पेरलेली नसतात. अनेकदा ती कथानकाचा अर्क समजून घेण्याच्या दृष्टीने दिशादर्शक असतात.

# मुखवटा' कथा, पुस्तक निळासावळा

विलास वाघोलीकर: 🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

माननीय सुनीळजींच्या सूचनेप्रमाणे -' मुखवटा' कथा, पुस्तक निळासावळा ,या कथेचे सूतोवाच देत आहे. तरी वाचकांनी कथा मूळातून वाचावी /खालील विवेचन वाचावे. व कृपया आपला प्रतिसाद 2 / 3 परिच्छेदांमध्ये अवश्य द्यावा.

अगदी विशेष विचार असेल तर याआधीच्या कथेवर लिहावे. धन्यवाद. विलास वाघोलीकर.

🙏 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

विलास वाघोलीकर: 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 🙏

मुखवटा कथा - पुस्तक निळासावळा ,लेखक जी ए कुलकर्णी

विवेचक - व्ही एस वाघोलीकर

जीएंची ही कथा मुख्यत्वेकरून परिस्थितीची, व परिसराची आहे. त्यांच्या काही कथांमध्ये अशा प्रकारचे जास्त करून, परिस्थितीच्या वातावरणाचे वर्णन दिसते. उदाहरणार्थ, - गुंतवळ, हिरवी मखमल गोरा हात, पडदा , माणूस नावाच्या बेटा.. या कथा अशा आहेत. या कथांत घटना कमी घडतात. पण त्या घटना, ज्या परिसरात घडतात, ज्या व्यक्तींकडून घडतात , ते सर्व सांगण्यातच कथेचे वैशिष्टय जाणवते. अशा कथांमध्ये, तो परिसर दाखवणे, त्याचे हुबेहुब वर्णन करणे हे महत्वाचे असते. मुखवटा या कथेतील गॅरेजची झोपडी, रस्ता, झाडाचा पार इत्यादी अगदी डोळ्यासमोर उभे रहातात.

कथेत, किशोरवयीन गरीब मुले, एक सुटीची दुपार घालवतात, हे दाखवले आहे. ही मुले अनाथ आहेत. कथेत सुरुवातीला ही तीन अनाथ मुले येतात. कथेत नंतर , काही मुलेही येतात. त्यांना आई वडील असतात. कथेत त्या दिवशी सुटी असते. दुपार झालेली असते. कथेतील गाव लहान असते. अशा वेळी ही किशोरवयीन मुले काय करणार ? त्याचे या कथेत चित्रण आहे.

पण कथेत,या मुलांची विशेषतः सदाची विशेष परिस्थिती दाखवली आहे. त्याची आई तीन दिवस ओरडून गरीबीत मरते व तो अनाथ होतो. या पार्श्वभूमीवर हे कथेतील वातावरण आहे. पारावर शांत, निर्विकार, बिनपापणीचा मुखवटा असतो. तो त्या सर्वांची परिस्थिती, त्यांच्या घडामोडी, हे सारे यथातथ्यपणे पहात असतो. म्हणून कथेचे शिर्षक, 'मुखवटा' आहे.

आकाशस्थ शक्ती हे जगातील सर्व राग, लोभ, भूक, खाणे, भावभावना, निर्विकारपणे, सदोदित पहात असतात, हा जीएंचा दृष्टीकोन या मुखवट्याच्या प्रतिमेतून, प्रकट होतो. माणसाचे, सजीवांचे जे जीवन असते, त्याला आकाशस्थ शक्तींची पार्श्वभूमी असते. या आकाशस्थ शक्ती सजीवाच्या घडामोडीं बद्दल (बऱ्याचशा)तटस्थ असतात. माणसाने त्याचे रागलोभ, त्या आकाशस्थ शक्तींच्या चौकटीत पहावेत, असे जी ए सुचवतात. जीएंनी एका पत्रात म्हटले आहे. मी प्रश्न विचारतो ते कोणाला उद्देशून नव्हे, तर आकाशस्थ शक्तींना उद्देशून प्रश्न विचारतो. मुलांचे वागणे दाखववणाऱ्या कथेपेक्षा ही कथा विशेष होते. ती या दृष्टीकोनाने व त्याच्या धारदार अभिव्यक्तीने. त्यामुळे कथा, वेगळी होते. उंच होते.

- सद्या, जोगत्या व भिंगरी ही तीन मुख्य किशोरवयीन मुले व नंतर गोळा झालेली सात आठ मुले यांनी ही कथा तयार केली आहे. त्यांपैकी गोप्या, भोपळ्या, दिलीप, गाडीवानाचा नानू, गवळ्याची गुलशी, वासू, डॉक्टरांचा मधू, सोनाराची काशी, मंगला यांचे वर्णन, त्यांच्या खोड्या, हालचाली, विचार, भावना इत्यादी सर्व जीएंनी यथातथ्यपणे दाखवले आहे. कथेत प्रौढ व्यक्तींचा अप्रत्यक्ष संदर्भ येतो.

- किशोरवयीन मुलांचे विश्व कसे असते, ते उर्जा, जीवनशक्ती, कशी वापरतात, हे कथेत अनेक प्रसंगांतून दाखवले आहे. बालपण सरले आहे. मोठेपणाच्या पाऊल - खुणा हळूहळू येत आहेत. त्यातून तयार झालेली उर्जा वेगाने वापरली जाते. ही उर्जा मारामाऱ्या, खोडया यातून व्यक्त होते. उदा. -

***

- कोंबडीचे पिल्लू निसटते. त्याला पकडायला सगळे मागे लागतात. पण ते सायकलीखाली जावून मरते.

- गंगाई भांडते मग पोरे तिची शेणी विस्कटून टाकतात व " म्हातारी मेली" असे कोळशाने लिहितात.

- दहा बारा वर्षांच्या गुलशी पोरीची खोडी काढतात व गुद्दा सहन करतात.

- अर्धवट इंग्लीशमध्ये बोलून ,खोडी काढून," वासू मे - ला" म्हणायला लावतात.

- शेळी पकडतात व गाडी गाडी करतात.

- बर्फाच्या गाडीभोवती आशेने घुटमळतात. इत्यादी

- या पद्धतीने, किशोरवयीन मुलांचे विश्व जीएंनी," जन्म"(रक्तचंदन), " भूक"(कुसुमगुंजा) या कथांमध्येही दाखवले आहे. वाचकांनी त्या कथाही वाचाव्यात. यातून जीएंचे बाल मानसशास्त्रीय ज्ञान बारकाईने प्रकट होते.

- रात्र झाल्यावर पोरे गॅरेजच्या खोपट्यात येतात. अर्धवट खाऊन झोपतात. त्या पेंगुळलेल्या अवस्थेचे वर्णन जीएंनी प्रतिमांच्या सहाय्याने केले आहे. डोळयासमोर दिवसभर च्या घडामोडी होतात, त्यांच्या आठवणी अर्धवटपणे झोपेत येतात. त्या आठवणींच्या छोट्या होड्या, समुद्रात दूरदूर जातात असे दाखवले आहे. व त्या दिसेनाशा झाल्यावर झोप येते. माणसाच्या झोपेचे इतके परिणामकारक वर्णन फार थोड्यांनी केले आहे. कारण निद्रास्थितीचे वर्णन करणे अवघड असते. येथे ते

केलेले मूळातून वाचण्यासारखे आहे. मुखवटा कथेचे ते मोठे वैशिष्ट्य वाटते. त्यासाठी ही कथा पुन्हा वाचावी वाटते.

- सद्याची आई तीन दिवस ओरडून मरण पावते. "आता आपण मोठे झालो ", ही जाणीव सद्याला शेवटी होते. चाकूच्या धारेला हात लागावा , अशी ही जाणीव असते.त्यातून पुढे, त्याचे व इतर मुलांचे जीवन कसे घडत जाणार, हा प्रश्न पुढे ठेवून ही लक्षणीय कथा संपते. धन्यवाद - विलास वाघोलीकर

- - - -

सुनीळ सामंत: खुप सुंदर विवेचन विलासजी.

तुम्ही ज्या कथांचे उदाहरण दिले आहे त्या कथांवर एकत्रितपणे एकदा चर्चा व्हावी. या कथांचा प्रकार कोणी सांगू शकेल काय?

मुखवटा ही कथा भिडते.

कसलाही आक्रस्ताळेपणा न करता, घायाळ करणारे शब्द किंवा घटना न वापरता वाचकाला अंतर्बाह्य अस्वस्थ करून सोडण्याची जी ए यांची कला या कथेत भिडते. भावंडांचे प्रेम, समाजाची बेदखल वृत्ती, किशोरवयीन मुलांचे एकमेकांशी संबंध, विचार, समजुती अशा वेगवेगळ्या स्तरांवरची ही कथा आहे.

संजीव सावरगांवकर: कथा : मुखवटा.

कथासंग्रह: निळासावळा सप्टेंबर 1956

आस्वादक: संजीव सावरगावकर

नाही दसरा, नाही दिवाळी, रविवारही आता नाही | पोटापाण्यासाठी शैशव मात्र, उन्हात करपून जाई||

मुखवट्यांचे बाकी सोडा,

एक नक्की बरे असते | चेहऱ्यासारखे नसते काही, दिसते ते मात्र खरे भासते||

जी. ए. यांनी आपल्या या कथेतून, एका लहान मुलाचे, लहानपणी , शैशव सोडून जबाबदार माणसाचा चेहरा होण्याचे लिहले आहे. फक्त एका दिवसाच्या अनुभवाचे लहान मुलाचे त्याच्या भावा बहिणीचे ,मित्रांचे व गावातील सामान्य माणसाचे रविवारचे आयुष्य उभे केले आहे. लेखकाने त्या मुलाच्या दृष्टीने या कथेतील भावविश्व पाहिले आहे. हे या कथेचे प्रमुख वैशिष्ट्य होय.

सदूच्या त्या रविवारच्या दिवसाचा दिवसभरातील धांगडधिंगा कदाचित जीएंनी त्यांच्या लहानपणी त्यांच्या मित्रांचे बरोबर अनुभवला असावा. कथे ची येवढी बारकाईनं अभिव्यक्ती हे ही त्यांचे लेखन सामर्थ्य आहे. ते त्यांनी विस्तृतपणे लिहिले आहे व आपण ते प्रत्यक्ष अनुभवतो आहोत यातच लेखनाचे वेगळेपण जाणवते.

जीए यांनी मुखवटा ही संकल्पना त्यांच्या कथेत अनेक ठिकाणी वापरली आहे. त्यातील "अनंत" या कथेत आलेला संदर्भ असा "रस्त्याच्या कडेने अजस्त्र शीला कृती आहेत. सातव्या आकृती जवळ डावीकडे वळ म्हणजे तुला एक रमणीय प्रसाद व उद्यान लागेल. तेथील जनात केवळ एकच व्यक्ती मुखवट्याच्या शिवाय आहे. ती तू शोधून काढ म्हणजे ती तुला एक कागद देईल. पुढील प्रवास त्यावर लिहिला आहे."

अनादिकाळापासून पृथ्वीवरील मानव हा कायम वेगवेगळे मुखवटे व भासमान भासणारे चेहरे घेऊन जगत आहे. त्यामुळे खरे जगणे व भासमय जगणे याची जगण्याची सीमारेषा लोक कधी लक्षात घेत नाही व परिणामी आपण काय

प्रकारच्या आयुष्य जगत आहोत ते त्यांचे त्यांना सुद्धा सांगता येत नाही. सर्वजण अप्रत्यक्षपणे मात्र सांगत असतात कि मित्रा मुखवटे इतके सुखाचे असताना खरा दुःखी चेहरा शोधण्याची यातायात आपण का करायची ? आणि ती करणार तरी कोण? प्रत्येकाचा एकच मुखवटा आहे का याची तरी खात्री आहे का?आणि आयुष्याचा विसर पाडण्याचे सामर्थ्य जर मुखवट्यात असेल तर खरा चेहरा हवा तरी कोणाला आहे?

विविध वृत्ती प्रवृत्तींच्या लेखकांनी वेगवेगळ्या काळात मराठी कथेतून बालमानस निरागस, निरलस, असे चित्रित केले आहे उदाहरणार्थ आचार्य अत्रे यांचे "दिनूचे बिल "गंगाधर गाडगीळ यांची "कबुतरे" कथा किंवा व्यंकटेश माडगूळकर यांची "त्याची गाय व्यायली" ही कथा. अगदी गेला बाजार जी. ए. यांची स्वतःची "मुग्धाची गोष्ट" ही पण वाचनीयच आहे. त्या सर्वांवर कडी म्हणजे साहित्यातील लहान मुलाचे bhav विश्व पूर्णतः उलगडून दाखवणारे "लंपन" ही लहान शाळेत जाणाऱ्या मुलाची कथा व त्याचे भावविश्वाशी रममाण झालेले लेखक श्री प्रकाश संत(इंदिरा संत यांचा मुलगा) यांची पाच पुस्तके व त्यावरील आस्वाद पूर्ण विवेचन व लेखन केलेले "लंपन चे भावविश्व" (लेखक विनायक gandhe पद्मगंधा प्रकाशन) या कथेचे सारखीच वाचनीय आहेत.

वरील लेखकांच्या संदर्भात मुखवटा ही कथा जीएंची एका दिवसाची कथा ही वेगळ्या पद्धतीने समजून उमजून शांतपणे वाचावी लागते हे निर्विवाद सत्य आहे. ही आहे "एका शब्दाची कथा"

मुखवटा  मी कथेतील पात्रे त्यांचे संवाद, तेथील वातावरण याबाबत जास्त लिहणार नाही.

कथेची सुरुवात औदुंबराच्या पारावर मूर्ती नसलेल्या पण स्वयंभू समजल्या गेलेल्या दत्तपादुका आहेत. त्यावर एक पितळी मुखवटा ठेवलेला आहे. या इथेच

भासमय पण मानवनिर्मित देव अथवा दैवत म्हणजेच नियती व त्याचा सध्याचा जगात दाखवता येणारा, काढता घालता येणारा मुखवटा, हे नियतीच्या सामान्य माणसाला नजरेला दिसणारे अस्तीत्व दाखवतो. या एकाच वाक्यात कथेतील सत्य साकारत. "पणतीचा प्रकाश मुखवटा कुरवाळतो. न निरनिराळया रेषा मध्ये चमचमतो आणि शांत, निरामय, निर्विकार उघड्या डोळयांनी मुखवटा सारे काही पाहत असतो."

कथेचे मध्ये लेखकाने रविवारचे रखरखीत ऊन ते संध्याकाळची अंधार रेषा असा कालपट घेतलेला आहे. "मुखवटा" दिवसभर लहान मुलांचे निरागस वागणे-बोलणे भांडणे, आरडाओरडा, छोट्या छोट्या गोष्टीतून आनंद मिळविण्याची इच्छा पहात असतो (कथेचे मध्ये शेळी व आंबील गाडा मिरवणूक, फुटलेले कोंबडीचे पिल्लू, गंगाई, हसण्याच्या गुदगुल्या, गुलशी , वासु मे-ला, बर्फाची गाडी ,लालभडक गोळा, मंगल, राम रक्षा, संध्याकाळ असे हे वरील सर्व प्रसंग रंगविले गेले आहेत, कथेच्या ओघात ते वाचनीय आहेतच. वरील सर्व प्रसंग सर्व मुले वेगवेगळया पद्धतीने आपापल्या बालिशपणा दाखवून, निरागसपणे व आनंदी चेहऱ्याने मुले दिवसभर हुंदडून आनंद घेत राहतात/असतात. त्यातील कोणालाच कोठल्याही मुखवट्याची (ना त्यांच्या स्वतःच्या ना देवळातील मुखवट्याची) गरज भासत नाही. त्या वेळात त्यांच्या करता तो देवळातील मुखवटा अस्तित्वातच नसतो. पण तो मात्र सर्व निर्विकार उघड्या डोळयांनी पहात असतो.

या रविवारच्या दिवसभरात, मागील एक दोन दिवसात आपली आई मरण पावल्याची सदू, जोत्या, भिंगरीला आठवण नाही. आता दररोज संध्याकाळी येणारी प्रकाशकिरणासारखी येणारी आईची हाक आता येणार नाही हे भीषण सत्य त्याला जाणवते. सदू घरात चिमणीला लावतो. शिल्लक शिळेपाके खाऊन तिघेही भाऊ-बहीण झोपतात, प्रयत्न करतात. सदु च्या नजरेसमोरून दिवसभरातील सिनेमा तरळुन जातो. आई गेल्याची सत्य जाणीव उघड्या डोळयांपुढे रात्री त्याला जाणवते. आता या घरात आपणच मोठे, आपल्याशिवाय या दोघांना कोणी नाही हे दारुण जाणीव

होताच आता त्याची झोप उडून जाते. अशा तऱ्हेचा सदू चा शैशव काळाचा, निरागस आयुष्याचा शेवटचा दिवस संपतो. इतक्या लहान वयातच आयुष्याच्या सही शिक्का निशि सदा एकदम प्रौढ, मोठा होतो. उद्यापासून मोठ्या माणसाचा मुखवटा घालायला लागणार, आयुष्य जगावे लागणार याची जाणीव होते. त्याचा स्वतःचा लहानपणचा चेहरा विसरून आता सगळे करावे लागणार. गावातील बाकी लोकांना, त्याच्या भावांना, मित्रांना, शेजारच्या वकिलांना, गावातील लोकांना त्याने घातलेला हा किंवा अनाहूतपणे त्याच्या चेहऱ्यावर चढलेला मुखवटा समजण्यासाठी त्याचे नियम त्याचे नियतीने लिहिलेले लहानपणाचे आयुष्य गावातील रस्त्यावर म्लान पणे पसरले गेले हे त्यालाही समजले नाही तर इतरांची काय कथा? आणि व्यथा? आज रात्री तो मुखवटा रघुनाथ भट धाबळीच्या पिशवीत घालून घेऊन जायचे विसरतो (?). ठेवलेल्या मुखवट्यावर प्रकाश निरनिराळ्या रेषा मध्ये चमकतो आणि शांत निर्विकार बिन पापणीच्या डोळ्यांनी तो सारे काही पहात असतो. पहात राहतो. कदाचित सदुच्या मनात विचार प्रकटतो मागील आयुष्याचा विसर पाडण्याचे सामर्थ्य जर या मुखवट्याच्या आत असेल तर खरा चेहरा हवा तरी कोणाला??

कथा परत वाचली तर आणखीन काही विचारांचे स्फुल्लिंग बाहेर पडतील पण ही सुद्धा एक निराशावादी? कथा म्हणायचे का आशावादी?? कथा तर ही आहे

एका शब्दाची गोष्ट

"मुखवटा"

लेखन सीमा. 8 ऑक्टोबर 2022.

विलास वाघोलीकर: संजीवजी यांनी कथेवर मुद्देसूद प्रतिसाद दिला आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. बालविश्व, मुखवट्यांचे रूप, सद्याला झालेली मोठेपणाची जाणीव हे मुद्दे त्यांनी नेमकेपणाने लिहिले आहेत. जीएंच्या दुसऱ्या कथेतील मुखवट्याचा संदर्भ विलक्षण आहे. नाग, प्रवास, यांप्रमाणे जीएंनी मुखवट्याची प्रतिमा घेतली आहे. प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे माणूस मुखवटे घेत जगत असतो.

मला कथेतील मुखवटा, नियतीचे - आकाशस्थ तटस्थ शक्तींचे साकार रूप वाटते. जीए कधीच सर्वस्थीत नियती विसरू देत नाहीत, असे वाटते. नियती असतेच. पण सद्याच्या आईचे (अचानक) निधन पावणे व रखरखीत उन्हासारख्या या कठोर जगात ,सद्या, जोगत्या, भिंगरी यांचे पुढे वणवण भटकणे ,यातून या कथेत नियती प्रकट होते.

धन्यवाद - विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: शैशवातून एकाच दिवसात प्रौढत्वात रुपांतर होण्याची किमया. कथेचा नेमका गाभा.

दिलिप बडे: पारावरचा मुखवटा(नियती) शांत,निरामय,निर्विकार ऊघड्या डोळयांनी सारे काही पाहत असतो.आईच्या मुर्त्यू नंतर कोवळया सदुला नियतीने प्रौढत्वाचा मुखवटा चढवला.

सुनीळ सामंत: उद्यापासून मोठ्या माणसाचा मुखवटा घालायला लागणार मुखवटा हे शिर्षक नेमके हेच अधोरेखित करते. सुंदर विवेचन संजीवजी. आणि विवेचन करतानाह शैलीदार लिहिण्याची आपली कला आवडली.

दिलिप बडे: कदाचित जी.ए.च अकाली प्रौढ झाले.सदुचा मुखवटा.

रेखा दातार : मुखवटा

मुखवटे! अनेक प्रकारचे ! कधी हसरे, चिडके, रडके , शांत, साळसूद तर कधी निर्विकार. लोकांच्या देखी आपण कसे दिसावे हे ठरवायचे आणि त्या प्रमाणे मुखवटा चढवायचा. त्या मुखवट्र्या आड आपला आनंद, दुःख, नैराश्य , राग , सगळ्या भावना दडवुन टाकायच्या. पण या जगात वावरायचे असेल तर असले मुखवटे चेहऱ्यावर चढवावेच लागतात. मग अगदी देवाचीही त्यातुन सुटका नाही ! दत्ताच्या गाभाऱ्यातील मुखवटा अगदी रात्री रघुनाथभटांनी धाबळीच्या पिशवीत घालुन घरी नेला की मग दत्तमहाराजांच्या पादुका देखिल उघड्या पडतात आणि मग उंदरांचे देखिल फावते. त्या मुळे निर्वीकार का होईना पण एक मुखवटा चढवावाच लागतो. देवाचा मुखवटा - शांत , निरामय , निर्विकार. उघड्या डोळयांनी सर्व काही बघत असणारा, पण त्याच्या मनात काय आहे याचा थांगपत्ता देखिल कोणाला लागु न देणारा.

गोष्टीत भिंगरी, काशी असे खरा चेहरा दाखवणारे काही निरागस , निष्पाप अपवाद सोडले तर जवळ जवळ सगळेच तात्पुरते का होईना पण वेगवेगळे मुखवटे धारण करतात. बकरीच्या खेळात दणादण नाचणाऱ्या मुलांपैकी आपण एक आहोत हे दाखवण्या साठी बोटभर गुलाल हळुच गळयाला लावुन त्याच्या भोवती भोवती

फिरणारा लंगडा वासु केविलवाण्या मुखवट्या आड दडतो. 'वासु मेला' अशी फजीती झाल्यावर शरमेने निर्जीव झालेला वासु 'मुकाट' चेहऱ्याच्या मुखवट्या आड लपतो. म्हातारीने जोत्याला मारल्याचा वचपा काढायला तिच्या घरी जाउन नासधुस करुन आलेली पोरे ती आल्यावर साळसूद पणाच्या मुखवट्याआड दडतात. पोरांपुढे आपली इभ्रत कमी होउ नये म्हणुन गुलशी समोर आल्यावर सदा शूर वीराचा मुखवटा धारण करतो आणि टाळया वाजवुन ओरडतो, 'पोरी पोरी, आंब्याची कैरी, तू माझी नवरी, तू माझी नवरी.' आणि शेवटी गुलशीच्या हातचा दणका खातो. मंगल बाहेर येउन पायरीवर बसल्यावर मात्र सर्व पोरे सभ्यतेचा मुखवटा घालुन बसतात. आणि पायरी वर आईने बळजबरी घालायला दिलेला 'हायर क्लासचा' मुखवटा घालुन बसलेली मंगल मात्र हातावर हनुवटी ठेवुनच एक अदृश्य मुखवटा चढवुन मुलांबरोबर हसते खेळते पडते , धावते, सायकल चालवते, पारावर उड्या मारते.

बर्फाचा गाडीवाला जेव्हा मातीत पडलेला बर्फाचा गोळा खाणाऱ्या भिंगरीला मारतो तेव्हा मात्र सदाचे हे सारे तात्पुरते मुखवटे गळुन पडतात आणि त्याचा खरा असहाय्य चेहरा समोर येतो. आता प्रकाशकिरणा सारखी येणारी आईची हाक तेथे नसते. 'आई गेली' म्हणजे काय? हे अजुनही न समजलेली भिंगरी आणि आपली आई मेली तेव्हा आपण अंघोळ केली, पण काशीची आई मेली तरी तीने अजुन अंघोळ केली नाही असा आईच्या मृत्यूचा अंघोळी पुरताच संबंध माहित असतेला ज्योत्या, यांची जबाबदारी आता आपल्यावरच आहे याची जाणीव झालेला सदा एकदम भानावर येतो आणि आपले बालपण प्रौढत्वाच्या मुखवट्याखाली दडवुन टाकतो.

शांत , बिनपापणीचा देवाचा मुखवटा उघड्या डोळयाने, निर्वीकार पणे सर्व पहात रहातो.

महेश आफळे : माझी एक कविता आहे जुनी मुक्त छंदातली.."क्रूस"
मुखवटा कथा व त्यावरील
हे सारे अर्थप्रयासी विवेचन वाचताना मला त्यातील ओळी आठवतात

हे सर्वशक्तिमान प्रभो,
तू त्यांना कधीही माफ करू नकोस

कारण ते काय करत आहेत
हे त्यांचे त्यांना नीटच ठाऊक आहे

प्रश्न बळी जाणाऱ्यांचा नाही
प्रश्न बळी घेणाऱ्यांचाही नाही

प्रश्न तुझाच आहे रे
हे सारे सारे अशोभनीय निर्विकारतेने पाहणाऱ्या..तुझा

क्षणोक्षणी अश्या अनंत दुःख कथा सृष्टीत घडत असतात,पण हा समग्र तमाशा पाहणाऱ्या ईश्वर नामक मुखवट्याला हा थेट प्रश्न

संजीव सावरगांवकर: सुंदरच. कथा तीच, वाचक बदलला की दृष्टिकोन बदलतो याचे हे उत्कृष्ठ उदाहरण. ह्यातील चेहरे खरे किती आणि मुखवटे किती याचं अप्रतिम विश्लेषण. कथावाचन कसे करावे आणि कथेचा आस्वाद कसा घ्यावा

ह्याचा परिपूर्ण वस्तुपाठ. मी ही कथा वाचली, पण असा विचार मनात येऊन सुद्धा लेखन करू शकलो नाही. परत एकदा अभिनंदन.

महेश आफळे : एका बाजूस माणसांचा पोरकटपणा आणि दुसरीकडे अकाली प्रौढ झालेली (आणि हल्लीच्या काळात आधीच चंगळवादाकडे झुकलेली)पोरे/मुले

ही विसंगती अथक निर्विकार पणे पाहणारा देव..तो आपली भूमिका थेट मांडण्याचे कष्ट घेत नाही कधी

कारण त्याच्या दृष्टीने सारेच पोरकट

सुनीळ सामंत: अगदीच बरोबर. ही कथा मी अनेकदा वाचली. तीन दिवसांआधीच पुन्हा वाचली. आणि आज पहाटे पुन्हा वाचायला घेतली तेव्हा ती इतकी नवीन वाटली की विचारता सोय नाही. प्रत्येक ओळीचा आणि उपमांचा अर्थच बदलून गेला.

या ग्रुपचा इतरांना काय फ़ायदा होवो न होवो. मला अनेक कथांचे अर्थ नव्याने कळले.

संजीव सावरगांवकर: हा आपला सर्वांचा बोनस फायदा आहे. एक कथा, अनेक दृष्टीकोन, अनेक विचार. जी. ए. साहित्याचा आनंदोत्सव जणू. तुम्ही हा ग्रुप तयार केल्याबद्दल तुमचे खास अभिनंदन

Abhay Kulkarni: अगदी बरोबर, मलाही खुप नव्या आयामाची ओळख होतेय, त्यामुळे अजूनच खोलपणा येतोय

श्रीकांत देशमुख : सर्वश्री विलासजी, सुनीळजी, संजीवजी, दिलीपजी, वृषाली ताई आपण अतिशय मुद्देसूद मार्मिक असे विश्लेषण केलेत. इतरांनीही त्यात भर घातली.

आज या कथेचे बहुआयामी स्वरुप चांगले समजले. धन्यवाद.

मुखवटा ही कथा १९५९ सालच्या प्रथम आवृत्ती व पुनर्मुद्रित (१९८०) सालच्या निळासावळा मधीलअसली तरी माझ्या संग्रही नसल्याने मी २००० साली हा कथासंग्रह घेतला आणि सर्व कथा वाचल्या.

नुकतेच सहा महिन्यापुर्वी पुनर्वाचन केले. निटसे कळले नाही. पुन्हा नेटाने वाचले तेव्हा काही नवे आयाम लक्षात आले. त्याचा आपण सर्व महानुभवांनी उल्लेख केलाच आहे. तेव्हा पुनरुक्ती नको. तथापी या कथेचे शिर्षक मुखवटा कां हे जाणुन घेण्यासाठी याच समुहावर मी विचारणा केली होती.

त्यावेळी श्री. विलासजींनी त्या शिर्षकाचा अर्थ(आजच्या सारखाच) उलगडुन कळविला होता.

आज कथेवरील चर्चा वाचुन अनेक नवे आयाम लक्षात आले.

त्यातील पापणीरहीत मुखवटा निर्विकारपणे जगरहाटी बघत असल्याचे लक्षात येते. तथापी वाचकांना तसला तटस्थपणा जमत नाही. त्यामुळे बालकांच्या भावविश्वाचे अनेक स्तर (गरीबी/ सुखवस्तू/ पोरकेपण) बघतांना व त्याची अपरिहार्यता जाणुन देखील सदा व भावंडांची दुःस्तिथी प्रकर्षाने आपल्या मनात ठसठसत राहते. आणि तोच कदाचित कथेचा गाभा असावा कां. (जि. एं. च्या इतर अनेक कथांनुसार). ह्याला नियती वाद म्हणावे काय ?

निशा क्षिरे: मुखवटे आणि चेहेरे आपल्याला या कथेत पाहायला मिळतात. सद्या जोत्या आणि भिंगरी जेव्हा आपल्या खोलीत असतात सद्या प्रेमळ चेहऱ्याने आपल्या भावंडांचा विचार करतो भिंगरी या आपल्या बहीणी विषयी तर त्याला खूपच प्रेम जिव्हाळा काळजी आहे. जोत्त्या वर जरी चड्डी तरी वर घे की साल्या असं रागावून बोलत असला तरी त्याची काळजी आहे आणि जबाबदारी आपली आहे याची त्याला जाणीव आहे.

खोलीतून बाहेर पडल्यावर मात्र वेगवेगळ्या प्रसंगी मुखवटे चढवले जातात. वासुला आपल्या व्यंगाची जाणीव आहे पण ते लपवून आपण कसे नॉर्मल आहोत हे दाखवण्याचा तो प्रयत्न करतो कोंबडीच्या पिलामागे आपल्याला धावायला जमणार नाही पण जागेवरच बसून हुशुक हुषुक करतो शेळीला पकडल्यावरही उत्साहाने गुलालाचा डबा घेऊन येतो पण पोरे नाचू लागल्यावर आपल्याला हे जमणार नाहि हे जाणून साळसूद पणाचा मुखवटा चढवून बाजूबाजूने फिरत राहतो. नामु सकाळी पेपर…

विलास वाघोलीकर: कथेत, लहान मुलेही मुखवटे घेवून कसे जगत असतात हे लिहिलेले कसे व्यक्त होते. हे आपण उदाहरणांसह दाखवले आहे. धन्यवाद

सुनीळ सामंत: निशाजी तुमचा हा सुंदर लघुनिबंध झाला आहे. अतिशय उत्तम प्रकारे तुम्ही या कथेतील मुखवट्यांचे वेगवेगळे अर्थ दाखवले आहेत.

असली क्या है- नकली क्या है

एक चेहरे पे कई चेहरे…

गुलशीचा प्रसंग तसेच वासू मेला म्हटल्याचा प्रसंग हे त्या मुलांच्या अडनिड्या वयातल्या मुखवट्यांचेच प्रसंग आहेत. हे आधी मला उपरे वाटले होते. पण आता तो भाग कथेशी एकजीव झाला.

संजीव सावरगांवकर: मलाही आवडले. मला वाटत होते ते मोठी माणसे फक्त मुखवटे घालतात. पण त्यांचे मुखवटे बेरकी मुखवटे असतात. तर मुलांचे तसे मुद्दामच नसते, ते अनाहूतपणे त्यांच्या स्वताच्या नकळत निरागसता ठेऊन निरागस मुखवटे त्या क्षणाची निर्मिती असते.

सुनीळ सामंत: मुखवटा ही कथा ९५ % मुखवट्यांची आहे. पण कथेचा शेवट मुखवट्याखालचे विदारक वास्तव दाखवून केला आहे. धाकटी भिंगरी भात जेवत नाही तेव्हा तो पटकन खाऊन टाकणारा सद्या हे खरा आहे. त्याचा मुखवटा गळून पडला आहे. त्या नंतरच्या जीएंच्या दहा ओळी या उत्कृष्ट सिनेमॅटोग्राफ़ीचे व एडिटिंगचे उदाहरण देता येईल अशा आहेत.

सद्या भिंगरीला गोणपाटावर झोपवतो. जोत्यालाही झोप येऊ लागते. थोड्या वेळाने दरवाजा लावून, चिमणी फुंकून सद्याही आडवा होतो. त्याचे डोळे मात्र बराच वेळ उघडझापीने अंधाराला टाके घालत राहतात. त्याच्या मनात दुपारच्या घटनांची वलये उठतात. लालभडक शेळी व म्हातारीचा तळतळाट; तिने पाठीत हाणलेला रपाटा; मंगलच्या अंगाचा वास, आणि लाल नखे; ढणाढणा घंटा वाजत येणारी बर्फाची गाडी, आणि धुळीत पडलेल्या रंगीत बर्फाचा तो थंड जाळासारखा शीत, आकर्षक, स्पर्श व गोड पिवळी चव; हिरवी बांगडी; सायकलीत सापडल…

निशा क्षिरे: खूपच छान ठळक मुद्दे मांडले गेले 👌 👌

विश्वेश्वर नांदेडकर: शेवट वाचताना

ग्रेसंची ती गेली होती तेव्हा पावूस निनादत होता या कवितेचा शेवट आठवतो

"अंगणात गमले मजला

बालपण माझे सरले होते

खिडकीवर धुरकट तेव्हा

कंदील एकटा होता "

असाच शेवट ग्रेसानी केला आहे




जीवन इतके अनंतरुप आहे की अगदी
संपूर्णपणे माझ्यासारखेच आयुष्य असलेला
माणूस पूर्वी कधी झाला नाही व पुन्हा कधी
होणार नाही. त्या दृष्टीने प्रत्येक सामान्य माणूस
देखील अद्वितीय असतो. मी गेल्यानंतर एक
अव्दितीय भावविश्व पूर्णपणे विरुन जाणार आहे



जी. ए. कुलकर्णी हे मराठी साहित्यातले रत्नच. त्यांची प्रत्येक कथा पैलूदार असे. या प्रत्येक पैलूचे नेमके आकलन होणे हे कोणा एका वाचकाला दुरपास्तच.

२०२२-२३ हे जी. ए. यांचे शताब्दी वर्ष होते! या वर्षाचे औचित्य साधून जाणत्या जी.ए.प्रेमी वाचकांनी एक उपक्रम हाती घेतला. आभासी पद्धतीने एकत्रित येऊन त्यांनी जी. ए. यांच्या १४ कथांवर विविधांगाने चर्चा केल्या, अनेक मते, दृष्टीकोन मांडले. संकलित केले. ही संकलने सात खंडांत उपलब्ध आहेत. जी.ए. यांच्या कथावाचनाचा आनंद घेतांना या चर्चा जी.ए.प्रेमी तसेच अभ्यासक-समीक्षकांना निश्चितच उपयुक्त ठरतील. हा मौल्यवान ठेवा आपल्याकडे नक्कीच हवा!